

भारतीय ग्रंथ भवन

अमर विश्व साहित्य

: २ :

दहा इंग्लिश, सात अमेरिकन, दोन फ्रेंच, व एक रशियन
मिळून वीस कादंबऱ्या आणि एक इंग्लिश नाटक
अशा एकवीस जगप्रसिद्ध ग्रंथांचे सारांश

अनुवादक
रघुवीर सामंत

भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४

मेसर्स हार्पर अँड ब्रदर्स, न्यू यॉर्क,
यांनीं प्रकाशित केलेल्या
मास्टरपीसेस ऑफ वर्ल्ड लिटरेचर इन् डायजेस्ट फॉर्म
या ग्रंथावरून अनुवादित

पहिली मूळ इंग्रजी आवृत्ति : १९४९
दुसरी मूळ इंग्रजी आवृत्ति : १९५२
पहिली मराठी आवृत्ति : सप्टेंबर, १९६२

संपादक :
स. ह. मोडक

मुद्रक-प्रकाशक :
कृ. रा. सामंत,
संचालक,
भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४

मुद्रण-स्थळ :
न्यू ईरा प्रिंटिंग प्रेस, वरळी, मुंबई १८

अनुक्रमणिका

ऋ ण नि र्दे श

पुढील कॉपीराइट ग्रंथांचा या भागांत उपयोग करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्या त्या ग्रंथांच्या लेखकांचे वा प्रकाशकांचे आभारी आहोंत:

लॉस्ट होरायझन, लेखक जेम्स हिल्टन; लेखकाच्या आणि प्रकाशक विल्यम मॉरो अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९३३, १९३६, विल्यम मॉरो अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांचा. **द फायनॅन्शियर**, लेखक थिओडोर ड्रायसर; मिसेस थिओडोर ड्रायसर यांच्या आणि प्रकाशक द वर्ल्ड पब्लिशिंग कंपनी यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९१२, हार्पर अँड ब्रदर्स यांचा; पुन्हां नव्यानें घेतलेला कॉपीराइट, १९४०, थिओडोर ड्रायसर यांचा. **द टायटन**, लेखक थिओडोर ड्रायसर; मिसेस थिओडोर ड्रायसर यांच्या आणि प्रकाशक द वर्ल्ड पब्लिशिंग कंपनी यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९१४, जॉन लेन कंपनी यांचा. **द फोरसाइट सागा**, लेखक जॉन गाल्सवर्दी; प्रकाशक चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२२, चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स यांचा. **अ मॉडर्न कॉमेडी**, लेखक जॉन गाल्सवर्दी; प्रकाशक चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२८, जॉन गाल्सवर्दी यांचा. **द टाइम मशीन**, लेखक एच्. जी. वेल्स; एच्. जी. वेल्स यांचा इस्टेटीचे एक्झिक्यूटर्स यांच्या आणि प्रकाशक हेन्री होल्ट अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १८९५, हेन्री होल्ट अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांचा; पुन्हां नव्यानें घेतलेला कॉपीराइट, १९२३, एच्. जी. वेल्स यांचा. **टॉम सॉयर**, लेखक मार्क ट्वेन; प्रकाशक हार्पर अँड ब्रदर्स. **ॲरोस्मिथ**, लेखक सिंक्लेअर ल्यूइस; लेखकाच्या आणि प्रकाशक हार्कोर्ट ब्रेस अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२५, हार्कोर्ट ब्रेस अँड कंपनी, इन्कॉर्पोरेटेड, यांचा.

लॉस्ट होरायझन : हरवलेलें क्षितिज

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* जेम्स हिल्टन (१९००-१९५४). *कथानकाचा प्रकार :* साहसकथा. *काळ :* १९३१. *स्थळ :* तिबेट. *प्रथम प्रकाशन :* १९३३.

प्रमुख पात्रें : **ह्यू कॉन्वे**, एक इंग्रज राजदूत. **रूदरफोर्ड**, त्याचा मित्र. **हेन्री बर्नार्ड**, एक अमेरिकन लफंगा. **मिस ब्रिंक्लो**, एक मिशनरी बाई. **कॅप्टन मॅलिसन**, आणखी एक इंग्रज राजदूत. **चांग**, एक चिनी लामा. **फादर पेरो**, वरिष्ठ लामा.

समीक्षण : या कादंबरीची पार्श्वभूमि—घटनास्थळ शांग्री-ला! बहुतेक अमेरिकन लोकांना, म्हणूनच शांग्री-ला हा शांतता व समाधान याचा अर्थवाचक शब्दच वाटूं लागला आहे. जेम्स हिल्टननें तपशीलवार वर्णनानें शब्दांत उभें केलेलें हें अद्भुत मनोराज्य इतकें प्रभावी आहे कीं, ती एक अशक्यप्राय ध्येयभरारी वाटण्या वजीं, जिवंत माणसांची, खरीखुरी व कुठें तरी प्रत्यक्षांत जगाच्या पाठीवर अजूनहि असलेली एक यक्षभूमि आहे असेंच वाटतें.

कथानक : एके दिवशीं, रूदरफोर्ड आपल्या पूर्वीच्या ह्यू कॉन्वे नांवाच्या शाळासोबत्याला, एका मिशन हॉस्पिटलमध्यें योगायोगानें भेटला. तीव्र थकवा व स्मृतिभ्रंश यांनीं तो आजारी झाला होता. दोघां मित्रांच्या भेटींत कॉन्वेनें रूदरफोर्डला एक अगदीं विलक्षण व विश्वास देखील बसणार नाहीं अशी हकीगत सांगितली. चार दोन महिन्यांपूर्वीच कॉन्वे स्वतः एकदम नाहींसा झाला होता. त्या संबंधांतीलच ही हकीगत होती.

बास्कुल येथें जी ब्रिटिश वकिलातीची कचेरी होती तीमध्येंच ह्यू कॉन्वे कामाला होता. तो १९३१ चा मे महिना होता. आणि तिथें बंडाळी सुरू झाली. तिथल्या गोऱ्या मुल्की लोकांना त्या धोक्याच्या ठिकाणाहून हलवितांना, ज्या वाकबगारपणानें थंड मनानें कॉन्वेनें आपलें कार्य पार पाडलें होतें, तें अगदीं असामान्य होतें. त्यामुळेंच त्या वेळीं तो एक प्रकारें शूर वीरांत गणला जात होता.

अखेरीस, तो भाग सोडण्याची स्वतः त्याच्यावरच पाळी आली व तो एका विमानांत बसला. विमानांतल्या मंडळींत त्याच्याशिवाय आणखी तीन माणसें होतीं. एक म्हणजे, मिस् रॉबर्टा ब्रिंक्लो; ही मिशनरी होती. दुसरा, हेन्री

बर्नार्ड; हा अमेरिकन होता. आणि तिसरा, कॅप्टन चार्ल्स मॅलिसन; हा एक ब्रिटिश राजदूत होता. चांदपूरच्या महाराजांनीं त्यांना तें विमान दिलें होतें. खूप उंचीवरून उडूं शकणाऱ्या खास विमानांपैकींच तें एक होतें. असा त्यांचा तो प्रवास सुरू झाला होता.

कॉन्वे त्या वेळीं सदतीस वर्षांचा होता. वकिलातीच्या नोकरींत त्याचीं दहा वर्षें गेलीं होतीं. त्याचें एकूण कार्य तसें फारसें डोळ्यांत भरणारें नव्हतें. पुढेंहि अशाच कुठल्या तरी दुसऱ्या साध्या कामावर त्याची बदली होणार हें त्याला ठाऊक होतें. तत्पूर्वी इंग्लंडला जाऊन कांहीं काळ विश्रांति घ्यायची असा त्याचा बेत होता.

सुमारें दोन तास त्यांचें विमान उडत गेल्यावर मॅलिसनच्या एकदम लक्षांत आलें, कीं त्यांचें विमान चालविणारा पायलट आधीं ठरला होता तो नसून कोणी तरी दुसराच मनुष्य आहे. दुसरीहि गोष्ट त्याच्या ध्यानीं आली कीं, ते आपला ठरलेला मुक्काम जें पेशावर शहर त्याच्या रोखानें चाललेले नाहींत. कधींहि न पाहिलेल्या निराळ्याच डोंगरांच्या रांगांवरून त्यांचें विमान उडत होतें. तें पाहून, अखेर कॉन्वेहि बेचैन झाला. तेवढ्यांत, वैमानिकानें विमान मध्येंच खालीं उतरविलें. त्या वेळीं शस्त्रसज्ज अशा डोंगरी जमातीच्या गराड्यांत विमानांत तेल भरण्यांत आलें. आणि तें पुन्हां उड्डाण करून पुढला प्रवास करूं लागलें. तें पाहिल्यावर मॅलिसन व बर्नार्ड यांच्याशीं कॉन्वेहि सहमत झाला. ते दोघेहि म्हणत होते—'आपल्याला कोणी तरी पळवून नेत आहे आणि आपल्याला ओलीस म्हणून ठेवलें जाणार आहे!'

पायलटला या बाबतींत स्पष्टीकरण करण्यास कॉन्वेनें सांगतांच, त्यानें फक्त कॉन्वेवर रिव्हॉल्व्हर रोखलें. मध्यरात्रीनंतर त्यांचें विमान त्या वैमानिकानें खालीं आणलें. जमिनीवर टेकतांना वास्तविक तें फुटायचेंच होतें; पण ते नशिबानेंच कसे-बसे वांचले. आंतले चौघे प्रवासी खालीं उतरले. त्यांनीं पाहिलें, तों विमानाचा पायलट बराच जखमी झाला होता. चौफेर दृष्टिक्षेप टाकून कॉन्वेनें अंदाज घेतला; तेव्हां त्याला वाटलें कीं, आपण हिमालयाच्या पश्चिम रांगांच्या पार पलीकडे उंच उंच तिबेट पठारावर येऊन पोहोंचलों आहोंत.

तेथील हवा अतिशय थंड व अंगाला झोंबणारी होती. चारी बाजूंना जणूं डोंगरांची तटबंदीच उभी होती. आणि जवळपास मानवी वस्तीचा मागमूसहि दिसत नव्हता.

तो जखमी झालेला वैमानिक दिवस उजाडण्यापूर्वींच मरण पावला. मरण्यापूर्वीं तो जें कांहीं पुटपुटला त्यांत शांग्री-ला नामक 'लामासेरी' (तिबेटी लामांचा मठ) असे कांहीं अस्पष्ट शब्द ऐकूं आले. त्या अंदाजानें ते विमानांतील चौघे प्रवासी तो मठ शोधण्याच्या मार्गाला लागले. ते थोडेसे चालून जातात न जातात तोंच कांहीं माणसें आपल्याकडेच येत आहेत असें त्यांना दिसलें.

तीं माणसें शेवटीं त्यांच्याजवळ पोहोंचल्यावर त्यांच्यांतल्या एकानें अगदीं शुद्ध इंग्रजींत त्यांना स्वतःची ओळख करून दिली. तो चांग नांवाचा एक चिनी इसम होता. त्यांच्या मागोमाग चालत चालत कॉन्वे आणि त्याची मित्रमंडळी संध्याकाळच्या सुमारास शांग्री-ला नामक मठांत जाऊन पोहोंचली.

अगदीं अप-टु-डेट पाश्चात्य शहरांत सांपडतील अशीं अद्यतन पद्धतीचीं साधनें व सुखसोई त्यांना तिथें आढळल्या. घरांत मध्यवर्ति उष्णता-योजना होती. नळाची, सांडपाण्याची व्यवस्था होती. सर्व कांहीं जिथल्या तिथें व्यवस्थित होतें. त्यांना राहण्यास उत्तम खोल्या देण्यांत आल्या. खाण्यास निवडक व छानदार अन्न मिळालें. मग त्यांना समजलें कीं, तिथें एक वरिष्ठ लामा राहतो. पण त्याची भेट घेण्याची त्यांना परवानगी नव्हती. त्याच बोलण्यांत चांगनें त्यांना सांगितलें कीं, कांहीं आठवड्यांतच बाहेरच्या जगाकडे त्यांना घेऊन जाण्यास मार्गदर्शक हमाल येतील. पण कां कोण जाणे, येथें आल्यापासून कॉन्वेचें मन एका चमत्कारिक भावनेनें भारलें होतें. त्याला आतां सारखें वाटत होतें कीं, त्यांचें तेथील आगमन हा कांहीं केवळ एक अपघात नव्हता. आणि तिथून त्यांची लौकर सुटका होणेंहि त्यांच्या नशिबीं नव्हतें.

तेवढ्यांत, चांगनें कॉन्वेला सांगितलें कीं, वरिष्ठ लामाची भेट घेण्याचा सन्माननीय योग लौकरच येणार आहे. तें ऐकून मॅलिसननें कॉन्वेला विनवून सांगितलें कीं, त्या वरिष्ठ लामाच्या भेटींत कॉन्वेनें आपल्या परत प्रवासासाठीं वाटाडे मिळवून देण्यास त्याला भाग पाडावें. त्याला एक कारण होतें. मॅलिसनच्या कानीं आलें होतें कीं अमेरिकेमध्यें बर्नार्डनें फसवाफसवीच्या व अफरातफरीच्या बऱ्याच भानगडी केल्या होत्या आणि तेथील पोलिसांना तो 'हवा असलेला' मनुष्य होता. तेव्हां ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हातीं बर्नार्डला शक्य तितक्या लौकर सोंपविण्याची मॅलिसनला उत्सुकता होती.

अखेर, कॉन्वेची वरिष्ठ लामाशीं भेट झाली. तो एक वृद्ध माणूस होता.

कॉन्वेला तो फार हुशार दिसला. त्याच्याबरोबर झालेल्या संभाषणांत कॉन्वेनें आपल्या परतीच्या प्रवासाबद्दल कांहींच बोलणें काढलें नाहीं. त्याऐवजीं त्याला त्या वरिष्ठ लामाच्या तोंडून एक सविस्तर गोष्ट ऐकावयास मिळाली.

ही हकीगत मोठी संस्मरणीय होती. ती एका कपूशिनपंथीय धर्मोपदेशकाबद्दलची होती. या खिश्चन भिक्षूचें नांव फादर पेरो असें होतें. १७३४ सालीं तो तेथील डोंगरदऱ्यांत नाहींसा झाला होता. त्या वेळीं त्याचें वय ५३ वर्षांचें होतें. योगायोगानें फादर पेरो याला एका पवित्र लामासेरीमध्यें आसरा मिळाला. तेथें त्यानें बुद्ध धर्माची दीक्षा घेऊन कायम वास्तव्य केलें.

१७८९ मध्यें तो म्हातारा मरायला टेकला. परंतु त्यानें आपल्या तेथील वास्तव्यांत कांहीं अद्भुत वनौषधी शोधून काढल्या होत्या. त्यांच्या अजब प्रभावानें व त्या पठारावरील सुंदर निरोगी हवेच्या परिणामानेंच त्याचें मरण टळलें. तो तसाच पुढेंहि जगला. त्यानंतर, तेथील डोंगरी जमातींनीं त्याला मदत केली व त्या जोरावर त्यानें त्या परिसरांत शांग्री-ला हा नवा मठ उभारला. फादर पेरो त्यानंतर तिथेंच राहिला. तो तेथें वाचन-विद्याभ्यासांत गर्क राहिला. १८०४ मध्यें दुसरा एक युरोपियन त्यांच्यांत आला. पुढें युरोप व आशियामधून आणखी कांहीं लोक येऊन त्यांच्यांत दाखल झाले. आलेल्या कोणत्याहि पाहुण्याला परत जायला मिळत नसे.

अशी एकूण ती कथा ऐकून झाल्यावर कॉन्वेला पुढें समजलें कीं त्यांचें विमान पळविलें गेलें होतें तें जाणून बुजूनच. आगाऊ योजना करूनच. त्याला आणखीहि फार महत्त्वाचें समजलें तें असें कीं, ज्या वरिष्ठ लामाबरोबर तो त्या क्षणीं बोलत होता, तो खुद्द फादर पेरो हाच होता. तो आतां अडीचशें वर्षांचा झाला होता. त्या वृद्धानें त्याला पुढें सांगितलें कीं, जो जो माणूस त्या शांग्री-ला मठांत राहतो त्याला तिथें दीर्घायुष्याची गुरुकिल्ली सांपडते. त्या वैमानिकालाहि त्यानें नवीन माणसें आणायला मुद्दामच पाठविलें होतें. त्याचा असा विश्वास होता कीं, लौकरच जगांत एक भयंकर मोठें महायुद्ध होऊन त्यांत सर्व ज्ञात संस्कृति नष्ट होणार होती. आणि त्यानंतरच्या नव्या जगांतील संस्कृतीचें केंद्र शांग्री-ला होणार होतें !

अशा प्रकारें येथील लामासरीचें तें स्वरूप कॉन्वेला फारच आवडलें. तो अगदीं संतुष्ट झाला व आपण तिथेंच पुढेंहि राहावें असें त्याला वाटलें. आपल्या

बरोबरच्या इतर तिघांना आपल्याला समजलेली ही नवी तपशीलवार बातमी पटणार नाहीं, हें कॉन्वे समजून होता. तेव्हां त्या चौघांपैकीं कोणालाहि परत जाणें आतां अशक्य आहे ही वस्तुस्थिती व परिस्थिती कॉन्वेनें त्यांना सांगितलीच नाहीं. त्यामुळेंच मॅलिसन अजूनहि आपल्याला परत घेऊन जाणारे वाटाडे येतील असें अधून मधून बोलतच राहिला. उलट बर्नार्ड व मिस् ब्रिंक्लो यांनीं सांगून टाकलें कीं, शांग्री-ला मठांतून परत बाहेरील जगांत जाण्याचा योग आला तरी आपण तें ठिकाण सोडायला सध्यां तयार नाहीं. पुन्हां एखादी संधि आली तरच तीं दोघें जाणार होतीं.

त्या निर्णयांत त्या दोघांचे दोन निरनिराळे हेतु होते. बर्नार्ड अमेरिकेला परतला असता तर त्याची रवानगी थेट तुरुंगांतच होणार होती. उलट, मिस ब्रिंक्लो हिला वाटलें कीं, आपल्या आयुष्यांत अनायासें तिथें जाऊन पोहोंचण्याची ती एक उत्तम संधि आलेली आहे; आपल्या तिथल्या वास्तव्यांत, तिथल्या लामांना व इतर डोंगरी जमातीच्या लोकांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देणें आपल्याला सहज शक्य होईल.

कॉन्वेचे आठवड्यांमागून आठवडे सुखासमाधानांत जात होते. ब्रिॲक नांवाचा एक फ्रेंच मनुष्य त्याला भेटला. तो शोपं याचा चेला होता. त्याची एका चिनी मुलीशींहि ओळख झाली. तिचें नांव लो-त्सेन. ती अगदीं तरुण दिसत असे. परंतु चांगनें त्याला सांगितलें कीं तिचें खरें वय मात्र पासष्ट वर्षांचें आहे.

कॉन्वे व वरिष्ठ लामा यांच्या अनेक गांठीभेटी होत राहिल्या. शेवटच्या भेटींत त्या वृद्धानें कॉन्वेला सांगितलें कीं, आतां आपल्या मृत्यूची वेळ फार जवळ जवळ येत आहे. आपल्या पश्चात् त्या शांग्री-ला लामासरीचें व त्या खोऱ्याचें राज्य कॉन्वेनें चालवावें, त्यानें त्या भागांतील सर्व लोकांशीं शहाणपणानें संबंध ठेवावा, असें त्याला मरतांना वाटत होतें. तसें झालें, तर महायुद्धानें साऱ्या पाश्चात्य संस्कृतीचा बाहेरच्या जगांत जरी धुव्वा उडाला, तरीहि ती साफ नष्ट होणार नाहीं, असाच त्याचा विश्वास होता.

अशा प्रकारें त्या सर्व गोष्टी तो म्हातारा कॉन्वेला समजावून सांगत असतांनाच आपल्या खुर्चीत बसल्या बसल्या एकदम मागें रेलला. कॉन्वेला समजून आलें, कीं तो मेला. बाहेरच्या बागेंत जाऊन कॉन्वे तिकडे गुपचुप भटकत राहिला. त्या वेळीं त्याचें हृदय इतकें भरून आलें होतें कीं कोणाशींहि कांहींहि बोलणें त्याला अशक्य वाटत होतें.

कॉन्वे अशा मनःस्थितींत असतांनाच, मॅलिसन एकदम तिथें आला व त्याची ती तंद्री ढळली. आपल्याला परत घेऊन जायला वाटाडे आले आहेत ही बातमी मॅलिसननें त्याला उत्सुकपणें सांगितली. तें ठिकाण सोडायला बर्नार्ड व मिस् ब्रिंक्लो दोघें कांहीं तयार होईनात; तरी पण, मॅलिसननें त्या वाटाड्यांना पैसे दिले होते. निदान स्वतःला व कॉन्वेला परत नेण्यासाठीं तरी त्यांना थांबवून ठेवलें होतें. मॅलिसन असेंहि पुढें म्हणाला कीं, ती चिनी मुलगी त्यांच्याबरोबर जायला तयार झाली होती. कारण मॅलिसनचें तिच्यावर प्रेम जडलें होतें आणि ती त्याच्याजवळ राहणार होती.

तें सर्व ऐकून कॉन्वेनें मॅलिसनची पुन्हां समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला कीं, ती चिनी मुलगी ही खरोखर एक म्हातारी बाई आहे. तें थंड हवेचें खोरें सोडलें कीं ती लागलीच मरणार! परंतु तें सर्व ऐकायला किंवा त्यावर विश्वास ठेवावयास मॅलिसन मुळींच तयार होईना.

प्रथम शांग्री-ला मठ सोडायला कॉन्वे तयार झाला नाहीं. पण मग मॅलिसन व ती चिनी मुलगी परत-प्रवासाला निघून पुन्हां दोघें एकटींच पुढें जाण्यास घाबरलीं व परत फिरलीं. हें पाहून मात्र कॉन्वेला वाटलें कीं त्यांच्याहि बाबतींत आपली अशी एक जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठींच अखेर तो शांग्री-ला मठ सोडून त्यांच्या बरोबर निघाला.

निघतांना व जातांना कॉन्वेला मनांत सारखें वाटत होतें—आपलें आयुष्य किती का लहान मोठें असेना, जिवंत असेपर्यंत आपण या ठिकाणीं अत्यंत सुखी-संतुष्ट जीवन घालविणें शक्य आहे. असें असतांनाहि या शांग्री-लासारख्या अद्भुत ठिकाणाहून आपण पळून जात आहोंत.

याच ठिकाणीं रूदरफोर्डनें हातांतलें हस्तलिखित बंद केलें. कारण कॉन्वे तेथून निसटून नाहींसा झाला होता.

पुढें रूदरफोर्डची तिथल्या एका डॉक्टरशीं मुलाखत झाली. त्यानें त्याला सांगितलें कीं, कॉन्वेला या मिशनमध्यें एका म्हाताऱ्या, वांकलेल्या, गलितगात्र झालेल्या चिनी बाईनें आणून पोहोंचविलें होतें. अर्थात्, तर मग, ही गोष्ट कदाचित् खरीच होती. आणि कॉन्वे पुन्हां त्या गुप्त लामासरीकडेच निघून गेला असावा, अशी रूदरफोर्डची तरी खात्री झाली.

रूदरफोर्डला मनांत आशा वाटली, विश्वास वाटला, कीं कॉन्वेचा तो प्रवास यशस्वी झाला असावा आणि तो आतां शांग्री-ला येथें पोहोंचलाहि असावा!

द फायनॅन्शियर : बडा पेढीवाला

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* थिओडोर ड्रायसर (१८७१-१९४५). *कथानकाचा प्रकार :* यथार्थवाद. *काळ :* सुमारें १८५० ते १८७४. *स्थळ :* फिलॅडेल्फिया. *प्रथम प्रकाशन :* १९१२.

प्रमुख पात्रें : **फ्रँक आल्गर्नन कौपरवुड**, पैशाची उलाढाल करणारा बडा पेढीवाला. **लिलियन सेम्पल कौपरवुड**, त्याची पत्नी. **एडवर्ड बटलर**, कचऱ्याचा कंत्राटदार आणि राजकारणी इसम. **आयलीन बटलर**, त्याची कन्या. **हेन्री कौपरवुड**, फ्रँकचे वडील.

समीक्षण : ड्रायसरच्या इतर कलाकृतींमधील पात्रांच्या मानानें प्रस्तुत कादंबरींतील पात्रें अधिक रेखीव व गतिमान आहेत. सिस्टर कॅरी, जेनी गेरहार्ट आणि क्लाइड ग्रिफिथ्स यांच्याशीं तुलना करतां या कादंबरीचा नायक खुद्द कौपरवुड हा केवळ दैवाच्या हातांतलें खेळणें अगर समाजव्यवस्थेचा बळी नव्हे. तो याहूनहि अधिक कांहीं तरी आहे. तो एक आक्रमक माणूस आहे. हा माणूस झगडतो, योजना आंखतो, परिस्थितीशीं व भोंवतालच्या वातावरणाशीं मिळतें करून घेतो. वास्तववादीपणा व लढाऊपणा हे दोन्ही गुण त्याच्या अंगीं एकवटलेले आहेत. त्याचें चित्रण करतांना एक नमुनेदार भांडवलवाला, पैशाची उलाढाल करणारा बडा पेढीवाला, वाचकांसमोर उभा करण्याचा लेखकाचा विचार होता, हें उघड दिसतें.

कथानक : आपल्या अगदीं लहानपणापासून फ्रँक कौपरवुड याला एकाच गोष्टीचा खास नाद होता. ती गोष्ट म्हणजे पैसे कमविणें. तो कुमार वयांत असतांनाचा प्रसंग. त्या वयांतसुद्धां त्यानें एक यशस्वी धंदेवाईक सौदा केला. एके ठिकाणीं लिलांव चालला होता. त्या रस्त्यानें जातां जातां त्यानें त्यांत भाग घेतला. सगळ्यांत जास्त भाव बोलून 'जावा कॉफी' चा एक लॉट त्यानें हस्तगत केला, आणि शंभर टक्के फायदा घेऊन तो माल एका वाण्याला विकला. फ्रँकच्या अंगांतील ती धंदेवाईक कुवत व कुशलता पाहून त्याची कुटुंबीय मंडळी तर आश्चर्यानें थक्कच झाली. सेनेका डेव्हिस नामक त्याचा एक श्रीमंत मामा होता. या मामानें त्याला उत्तेजन दिलें व शक्य तितक्या लवकर त्यानें धंद्यांत पडावें अशी इच्छा दर्शविली.

त्यानंतर फ्रँकनें चांगल्या मिळकतीच्या अनेक नोकऱ्या केल्या, हिकमतीनें सट्टेबाजीचे सौदे केले. आणि स्वतःचें ब्रोकर ऑफिस उघडण्याइतकी भरपूर पुंजी त्यानें जमविली. थोडक्या वेळांत तो खूपच यशस्वी झाला. फिलॅडेल्फिया शहरांतील अत्यंत साहसी तरुण पेढीवाल्यांमध्यें त्याची गणना होऊं लागली.

एके दिवशीं फ्रँक आणि लिलियन सेंपल यांची भेट झाली. ती त्याच्याच धंद्यांतल्या एका सहकाऱ्याची पत्नी होती. सुमारें वर्षभरानंतर तिचा नवरा मेला. आणि फ्रँकनें तिच्याशीं लग्न केलें. तोंपर्यंत त्यानें आपल्या धंद्यामध्यें भरपूर पैसा मिळविला. स्थानिक व राज्य सरकारांतील राजकारणी लोकांशीं त्याची चांगली जानपछान झाली. त्यांपैकींच एडवर्ड बटलर हाहि एक होता. याचा मूळ धंदा कचरा गोळा करून विकण्याचा! पण हा आतां चढत चढत स्थानिक राजकारणांतील मोठ्या पदाला जाऊन पोंचला. फ्रँकचा धंदा वाढला; त्याची लोकप्रियताहि वाढली. त्याबरोबर बटलरच्या मार्फत इतर अनेक वजनदार लोकांशीं त्याच्या ओळखी झाल्या.

फ्रँक व लिलियन यांना बरींच मुलें होतीं. परंतु त्याला मुलांमध्यें मिसळण्याची विशेष आवड अशी नव्हती. त्याचें सारें लक्ष आपल्या धंद्यावरच केंद्रित झालेलें होतें असेंहि म्हणावें हवें तर. त्याचे वडील हेन्री कौपरवुड पूर्वीपासून एका बँकेंत नोकरीला होते. पुढें वर चढत चढत त्याच बँकेचे ते अध्यक्ष झाले. पितापुत्रांनीं पुष्कळसा पैसा खर्च करून आपापलीं घरें बांधलीं. तीं अद्यतन सुखसोईंनीं व पद्धतीनुसार सजविलीं. फ्रँकनें सुंदर सुंदर चित्रें व अनेक निरनिराळ्या कलांचे दुर्मिळ नमुने पैसा ओतून गोळा केले.

फ्रँकचें संसारिक जीवन फारसें समाधानकारक नव्हतें. लिलियन त्याच्यापेक्षां वयानें मोठी होती. त्याच्या मानानें तिच्या अंगांत तडफहि कमी होती. आणि तिचें मूळचें सौंदर्य आतां जवळ जवळ ओसरून गेलें होतें. तिच्याशीं तुलना करतां थेट दुसरें टोंक म्हणजे एडवर्ड बटलरची कन्या आयलीन! ती खूपच आकर्षक होती. ती तरुण होती; सुंदर होती; आणि, जणुं काय, चैतन्याचा एक झराच होती. फ्रँक तिच्या प्रेमांत पडला. वास्तविक मूळच्या कर्मठ, धार्मिक वळणांत वाढलेली असूनहि आयलीननें त्याच्याशीं गुप्त संबंध जोडला. मग त्यानें एक घर भाड्यानें घेतलें. त्या ठिकाणीं तीं दोघें भेटत. त्यानें जमविलेलीं चित्रें, पुतळे, इत्यादि कलात्मक वस्तूंनीं तें आपलें ठिकाण त्या दोघांनीं भरपूर शृंगारलें.

फिलॅडेल्फिया शहरांतील प्रबळ सावकारांमध्यें फ्रॅंकची गणना होत असली तरी आपल्याहून अधिक प्रबळ अशा मक्तेदार सावकारांचे डाव हाणून पाडण्यासाठीं त्याला सतत कांहीं तरी नवे डाव रचावे लागत असत, नव्या योजना कराव्या लागत असत. स्थानिक पुढाऱ्यांच्या मार्फत सरकारी तिजोरींतून मोठमोठ्या रकमा वापरायला मिळतील अशी सोय त्यानें करून घेतली. शहराच्या फडणिशी खात्याचा प्रमुख स्टेनर अनेक रीतींनीं त्याची सोय पाही आणि अनेक संशयास्पद व्यवहारांमध्यें दोघांचेहि हात चांगलेच गुंतले. फ्रॅंकनें रेल्वे कंपन्यांचे व स्थानिक ट्राम्वे कंपनीचे शेअर खरेदी केले.

शिकागो शहरांत लागलेल्या भीषण आगीनंतर त्याचें कांहीं भांडवल धोक्यांत आलें. आपल्या मित्रांकडे व आपल्या सहकाऱ्यांकडे जाऊन नुकसानी टाळण्यासाठीं एकोप्यानें व्यवहार करण्याचा त्यानें त्यांना आग्रह केला. तथापि आगीचे परिणाम इतके सर्वव्यापी होते कीं स्थानिक राजकारणी लोकांचे उलट-सुलट व्यवहार नव्या निवडणुकीच्या सुमारास नक्कीच उघडकीस येणार होते. खरा प्रकार उजेडांत आल्यानंतर संतापलेले सुधारणावादी गट यावर इलाज करण्याची मागणी करतील, म्हणून त्याच्या समाधानासाठीं कांहीं तरी करणें भाग होतें.

दरम्यान एडवर्ड बटलरला कुणी तरी एक निनांवी पत्र धाडलें. फ्रॅंक व आयलीन हीं दोघें गुपचुपपणें एकत्र राहत असतात ही बातमी त्याला कळली. त्यानंतर फ्रॅंक नेहमींसारखा बटलरला भेटायला गेला. तेव्हां त्या कचरा-कंत्राट-दारानें त्याला मदत करण्याचें नाकारलें. त्याच्या कन्येशीं आपला गुप्त संबंध आहे ही बातमी त्याला समजली असावी हें फ्रॅंकनें एकंदर प्रकारावरून ताडलें. तो आतां त्याचा उघड उघड शत्रू झाला होता. आपल्या अप्रामाणिक व्यवहारांचें खापर फ्रॅंकच्या माथीं मारून मोकळें होण्याचा आग्रह त्यानें इतर राजकारणी लोकांना केला.

बटलरच्या या कारवाईचा व्हायचा तोच परिणाम झाला. फसवाफसवी व अफरातफर या आरोपांवरून फ्रॅंक व त्याच्या बरोबरच शहराच्या फडणिशी खात्याचा प्रमुख स्टेनर यांच्यावर खटले झाले. फ्रॅंकची सगळी पत खलास झाली. आपण निरपराधी आहोंत अशी त्यानें आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. तथापि ज्यूरीनें त्या दोघांनाहि दोषी ठरविलें व शिक्षा ठोठावल्या. तुरुंगवास

चुकविण्यासाठीं फ्रँकनें जामिनकी भरली. मग त्यानें अपील केलें. न्यायाधीशांमध्यें निर्णयांबाबत मतभेद असूनहि अपील नामंजूर झालें. वास्तविक अशा प्रकारें अपील फेटाळलें गेल्यामुळे प्रत्यक्ष सजा सुरू होण्यापूर्वींहि शेरिफनें फ्रँकला कैद करून तुरुंगांत न्यायला हवें होतें. पण शेरिफची मूठ दाबली गेली व आणखी कांहीं दिवस तरी फ्रँक मोकळा राहूं शकला. कर्जफेडीपायीं त्याची सर्व मालमत्ता विकली गेली. त्याच्या वडिलांनींहि आपल्या बँकेच्या अध्यक्ष-पदाचा राजीनामा दिला.

ज्या घरामध्यें फ्रँक व आयलीन पूर्वीं भेटत असत तें आतां सोडून देणें त्यांना भाग पडलें. त्यानंतर गांवाच्या दुसऱ्या एका भागांतील घरांत त्यांच्या गुप्त भेटी होऊं लागल्या. हें आपल्या मुलीचें बेकायदा प्रकरण कायमचें संपुष्टांत यावें म्हणून बटलरनें जंगजंग पछाडलें. पिंकर्टन संस्थेच्या खासगी डिटेक्टिव्हांची मदत घेऊन तो त्याहि घरांत शिरला व त्या प्रेमी जोडप्यासमोर साक्षात् उभा राहिला. तिनें तें शहर सोडावें म्हणून त्यानें नाना प्रकारचे बेत योजिले. पण आपल्या वडिलांनीं आपल्यामागें खासगी गुप्त चरांचा ससेमिरा लावला आहे हें तिला एकदां कळल्यावर मग ती वडिलांचें कांहीं एक ऐकून घेईना.

फ्रँकला चार वर्षें नऊ महिने कैदेची शिक्षा झाली. आयलीननें मात्र त्याच्याशीं इमान कायम ठेवलें. मध्यंतरीं एकदां लिलियन तुरुंगांत फ्रँकला भेटायला गेली. त्या वेळीं त्यानें तिच्याकडे घटस्फोट मागितला. तिनें त्याला नकार दिला.

एडवर्ड बटलर मरण पावल्यानंतर फ्रँकच्या मित्रमंडळींनीं त्याला पॅरोल मिळण्याची तरतूद कशीबशी केली आणि तेरा महिन्यांनंतर १८७३ च्या मार्च महिन्यांत तो तुरुंगांतून मोकळा झाला. पुढें विन्गेट नामक आपल्या सहकारी मित्राच्या मार्फत त्यानें आपला धंदा पुन्हां उभा करण्यांत बरेंचसें यश मिळविलें. स्वतःला राहण्यासाठीं त्यानें छोटेंसें बिऱ्हाड थाटलें. तेथें अधून मधून आयलीन त्याला येऊन भेटे. बाह्यात्कारीं तो अजून सपत्नीक राहत असला तरी त्याचे आयलीनशीं असलेले संबंध केव्हांच गांवभर झाले होते !

१८७३ च्या सप्टेंबरमध्यें अमेरिकेवर फार मोठें आर्थिक अरिष्ट कोसळलें. फ्रँकनें पडलेल्या बाजारभावांत खूप शेअर घेऊन ठेवले. भाव पुन्हां वाढतांक्षणीं त्यानें भलताच फायदा कमावला. आणखी कांहीं महिन्यांनंतर तो आयलीनसह शिकागो शहरीं गेला. तिथें आपलें बस्तान पुन्हां नीट बसविण्याची त्यानें योजना

आंखली. लिलियननें यानंतर फ्रँकशीं काडीमोड केली, परंतु कौपरवुड कुटुंबाशीं तिनें मित्रत्वाचे संबंध कायम ठेवले. ती ऐषआरामांत राहूं लागली. फ्रँकनें तिच्यासाठीं व मुलांसाठीं भरपूर पैसे वेगळे काढून दिले. स्वतःचें स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठीं त्यानें हा दंडच भरला म्हणानात.

द फोरसाइट सागा (कुळकथा)

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* जॉन गाल्सवर्दी (१८६७-१९३३). *कथानकाचा प्रकार :* सामाजिक बखर. *काळ :* १८८६-१९२०. *स्थळ :* इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १९०६, १९२०, १९२१.

प्रमुख पात्रें : **सोम्स फोरसाइट**, एक धनिक इसम. **आयरीन**, त्याची पत्नी. **ओल्ड जॉल्यॉन फोरसाइट**, त्याचे काका. **यंग जॉल्यॉन**, ओल्ड जॉल्यॉन यांचा पुत्र. **ज्यून**, यंग जॉल्यॉन याची कन्या. **फिलिप बॉसिन्ने**, ज्यूनचा वाग्दत्त वर; हा वास्तुशिल्पी (आर्किटेक्ट) असतो. **आन्नेत**, सोम्सची द्वितीय पत्नी. **फ्लूर**, त्यांची कन्या. **जॉन**, आयरीन व यंग जॉल्यॉन यांचा पुत्र. **विनिफ्रेड डार्टी**, सोम्सची बहीण; मॉन्टी डार्टी याची पत्नी.

समीक्षण : 'मॅन ऑफ प्रॉपर्टी,' 'इन् चॅन्सेरी' व 'टु लेट' हे तीन खंड मिळून गाल्सवर्दींची ही 'फोरसाइट सागा' कादंबरी तयार झालेली आहे. इंग्लंडमधील मध्यमवर्गाच्या वरिष्ठ थरांतील एका कुटुंबाची ही कथा. व्हिक्टोरिया-राणी-युगापासून तों दोन महायुद्धांमधील काळापर्यंत कथानक चालू राहतें. कुटुंबीय नात्यांतल्या कांहीं पात्रांच्या जीवनदर्शनांतून या काळांतील शिष्टाचारांचें व नीतीचें बदलतें स्वरूप लेखकानें यांत सूक्ष्मपणें चित्रित केलेलें आहे. या कथेचा सर्वसामान्य विषय आपल्या प्रस्तावनेमध्यें गाल्सवर्दीनें सांगितला आहे. माणसांच्या आयुष्यांत सौंदर्य केवढा हाहाःकार उडवितें हें आयरीनच्या कथेनें उदाहरण देऊन विशद केलें आहे. समाजाचा जिवंत इतिहास व कला या दोनहि दृष्टींनीं 'फोरसाइट सागा' या कादंबरीला अव्वल दर्जा प्राप्त झालेला आहे.

कथानक : १८८६ सालची गोष्ट. ओल्ड जॉल्यॉन फोरसाइट याच्या घरीं सगळी फोरसाइट कुटुंबीय मंडळी जमली होती. कारण त्याची नात ज्यून हिचा फिलिप बॉसिन्ने याजबरोबर आज वाङ्निश्चयसमारंभ होता. बॉसिन्ने हा

एक तरुण आर्किटेक्ट (वास्तुशिल्पी) होता. ज्यूनचे वडील यंग जॉल्यॉन फोरसाइट हे आपल्या कुटुंबापासून अलग झालेले होते. कारण आपल्या घरच्या मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकिणीला घेऊन ते पळून गेले आणि ज्यूनची आई वारल्यानंतर त्यांनीं तिच्याशीं लग्न केलें.

आपल्याला ज्यून फारशी भेटत नाहीं ही ओल्ड जॉल्यॉनची तक्रार होती. त्याला एकलकोंडें वाटूं लागलें. म्हणून बऱ्याच वर्षांत गांठभेट न झालेल्या यंग जॉल्यॉन या आपल्या मुलाकडे ते गेले. तो ' लॉइड्स ' कंपनींत कामावर आहे, वॉटर कलर पेंटिंगचीं कामेंहि तो करतो, हें त्यांना तिथें कळलें. दुसऱ्या बायकोपासून त्याला दोन मुलें झालेलीं होतीं; मुलगी हॉली आणि मुलगा जॉली.

सोम्स आणि त्याची सुंदर पत्नी आयरीन यांचें आपसांत पटत नाहीं हें साऱ्या फोरसाइट कुटुंबाला माहीत होतें. तिला आपल्या पतीविषयीं अतिशय तिटकारा वाटे. ' आपलं हें लग्न जर यशस्वी झालं नाहीं तर आपल्याला वर्तन-स्वातंत्र्य असावं ' असें तिनें लग्नापूर्वीच आपल्या पतीकडून कबूल करून घेतलेलें होतें. आणि त्या अटीचें स्मरण तिनें अलीकडेच त्याला दिलें. अशा स्थितींत तिला संतुष्ट करण्याचा एक प्रयत्न म्हणून ग्रामीण भागांत एक छानदार घर बांधायचें असा त्यानें बेत केला. ज्यूनचा वाग्दत्त वर बॉसिन्ने या कामांत आपल्याला चांगला उपयोगी पडेल असेंहि त्यानें ठरविलें. या बेतानुसार त्यानें ' रॉबिन हिल ' या ठिकाणीं एक वाडी विकत घेतली आणि तिथें घर बांधायला बॉसिन्नेला नेमलें.

घराचे प्लॅन तयार होत असतांना सोम्सनें कांहीं स्वतःच्या सूचना केल्या. यामुळें बॉसिन्ने याला आपला अपमान झाल्यासारखें वाटलें. तेव्हां सोम्सनें माघार घेतली. बॉसिन्ने यानें आपल्याला पसंत अशा पद्धतीचे घराचे नकाशे तयार केले. बांधकाम चालू असतांनाहि, पूर्वी ठरलेल्या अंदाजापेक्षां खर्च अधिक होत असल्यावरून उभयतांची वादावादी झाली.

एके दिवशीं सोम्सचा काका स्विदिन फोरसाइट यानें आयरीनला तें घर पाहायला नेलें. तिथें त्यांना बॉसिन्ने भेटला. गप्पा मारतां मारतां स्विदिन पेंगूं लागला. पुढें एकट्या आयरीनबरोबरच बॉसिन्ने बोलत राहिला. त्या पहिल्याच परिचयांत आयरीन व बॉसिन्ने यांचें प्रगाढ प्रेम जमलें. त्यामुळें सोम्सच्या सहवासांतलें आधींच असह्य झालेलें जीवन तसेंच चालू ठेवणें तिला अशक्य

झालें. तिनें त्या दिवसापासून निराळ्या खोलींत राहण्याची मागणी केली.

त्या घरावरूनच आणखीहि कांहीं गोंधळ झाले. घर तयार झाल्यानंतर त्याची सजावट करून देण्याचेंहि बॉसिन्नेनें कबूल केलें होतें. मात्र केवळ आपल्याच योजनेप्रमाणें तें काम करायला पूर्ण वाव मिळत असला तरच तो या गोष्टीला तयार होता. त्याच्या त्याहि म्हणण्याला सोम्सनें मान्यता दिली.

आयरीन आणि बॉसिन्ने हीं दोघें एकमेकांना गुप्तपणें भेटूं लागलीं. हीं त्यांची भानगड जसजशी वाढूं लागली, तसतशी ज्यून अधिकाअधिक दुःखी व स्वयकेन्द्रित होऊं लागली.

शेवटीं ओल्ड जॉल्यॉननें तिला आपल्याबरोबर सहलीला नेलें. त्यानें आपला मुलगा यंग जॉल्यॉन याला पत्र लिहिलें आणि तांतडीची गोष्ट म्हणून बॉसिन्ने याच्या मनांत तरी काय आहे याची चौकशी करायला सांगितलें. यंग जॉल्यॉननें तदनुसार बॉसिन्नेशीं बोलणें केलें खरें; पण त्याविषयीं आपल्या वडिलांना कळवितांना निश्चित काय तें कांहीं लिहिलेंच नाहीं.

नवें घर तयार झालें. आणि सोम्सनें त्यानंतर बॉसिन्नेवर फिर्याद ठोकली. आधींच्या जास्तींत जास्त अंदाजाहूनहि किती तरी अधिक खर्च झाला म्हणून त्यानें नुकसानभरपाई मागितली. नव्या घरीं राहायला जायला आयरीननें साफ नकार दिला. पुढें तो नव्या घराबाबतचा नुकसानभरपाईचा खटला सुनावणीला आला. आणि कसलाहि त्रास न पडतां सोम्सनें ती केस जिंकली.

त्या दिवशीं दुपारभर आयरीन व बॉसिन्ने यांच्या दिलखुलास गप्पा झाल्या. तिचें प्रेम नसतांना सोम्सनें तिच्याशीं हट्टानें लग्न केलें आहे हें त्याला त्या वेळीं कळलें. आणि त्याच रात्रीं बॉसिन्ने एका अपघातांत सांपडून मेला.

खटल्याच्या दिवशींच आयरीननें आपल्या पतीचें घर सोडलें होतें. पण अन्यत्र जायला आपल्याला आतां जागाच नाहीं असें तिला दिसलें, तेव्हां ती पुन्हां सोम्सच्या घरीं आली. ज्यूननें आपल्या आजोबांना आग्रह करून जॉल्यॉन कुटुंबासाठीं 'रॉबिन हिल' हें नवें घर विकत घ्यायला लावलें.

बॉसिन्नेच्या मृत्यूनंतर थोड्याच अवधींत आयरीननें आपल्या पतीचें घर कायमचें सोडलें. एक लहानशी जागा घेऊन ती स्वतंत्रपणें राहूं लागली. चरितार्थाकरितां संगीताच्या शिकवण्या करूं लागली. अशीं कित्येक वर्षें गेल्यावर ती एकदां गुपचुपपणें 'रॉबिन हिल' या घरीं गेली. तिथें ती ओल्ड जॉल्यॉन

फोरसाइट यांना भेटली. आपल्या विनयशील स्वभावानें व आपल्या आकर्षकपणानें तिनें त्या म्हाताऱ्यावर खूप छाप पाडली. तो सबंध उन्हाळाभर तिनें त्या एकाकी वृद्धाचें जीवन सुखी केलें. उन्हाळा सरतां सरतां एके दिवशीं तिचीच वाट पाहत असतांना तो शांतपणें मरण पावला.

आयरीनबरोबर झालेल्या आपल्या फारकतीनंतर सोम्स सतत पैसे मिळविण्यांत गुंग राहिला. पण आपल्याला अजूनहि वारस लाभेल या आशेनें तो आन्नेत लामोत या फ्रेंच तरुणीचा अनुनय करूं लागला.

त्याच सुमारास त्याची बहीण विनिफ्रेड हिचा नवरा मॉन्टी डार्टी तिचें जवाहीर चोरून एका स्पॅनिश नर्तकीबरोबर दक्षिण अमेरिकेला पळून गेला. या बहिणीच्या जीवनांत यामुळें मोठाच गोंधळ निर्माण झाला.

शेवटीं आन्नेतशीं लग्न करायचें सोम्सनें ठरविलें. आयरीनकडून घटस्फोट घेण्यासाठीं काय करावें याबाबत तिच्याशींच विचारविनियम करावा म्हणून तो तिला भेटायला गेला. ती एकटी राहूनहि आदर्श जीवन जगत आहे असें त्याला दिसून आलें. आपण अजूनहि हिच्यावर प्रेम करीत आहोंत याची त्याला या प्रत्यक्ष भेटींत जाणीव आली. तिनें पुन्हां आपल्याकडे नांदायला यावें म्हणून त्यानें तिचें मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला. पण तिनें नकार दिला. यावर नाइलाज म्हणून त्यानें घटस्फोटाकरितां जरूर ते पुरावे गोळा करण्यासाठीं एक खासगी डिटेक्टिव्ह नेमून टाकला.

ओल्ड जॉल्यॉन यानें आपल्या मृत्युपत्रामध्यें आयरीनसाठीं कांहीं हिस्सा ठेवलेला होता आणि तिचा विश्वस्त म्हणून आपला मुलगा यंग जॉल्यॉन याला नेमलें होतें. यंग जॉल्यॉन आतां विधुर झालेला होता. सोम्सकडून त्रास झाल्यावर आयरीन संरक्षण मागण्यासाठीं यंग जॉल्यॉनकडे आली आणि तो त्रास चुकविण्यासाठीं ती पॅरिसलाच निघून गेली. तिच्या पाठोपाठ यंग जॉल्यॉनहि तिकडे गेला आणि तिच्यासमवेत राहिला. पण इकडे त्याचा मुलगा जॉली यानें दक्षिण आफ्रिकेंतील बोअर युद्धांत भाग घेण्याचें ठरविलें त्यामुळें यंग जॉल्यॉनला मध्येंच पॅरिसहून पटकन परत यावें लागलें.

दरम्यान यंग जॉल्यॉनची कन्या हॉली हिचें प्रकरण सुरू झालें. व्हाल डार्टी या आपल्या आतेभावाच्या ती प्रेमांत पडली. त्यानें तिला हळूच मागणी घातली. तेव्हां तिचा भाऊ जॉली जवळपासच होता. त्यानें तें ऐकलें. त्यानें व्हाल

याला मर्दासारखें आपल्याबरोबर सैन्यांत दाखल होण्याचें आव्हान दिलें. व्हालनेंहि तें तत्काळ मान्य केलें. त्या वेळींच ज्यून हिनें रेडक्रॉसमध्यें नर्स म्हणून सामील व्हायचें ठरविलें. आपला ज्यून आत्याबरोबर हॉलीहि तिकडे गेली. इतक्यांत मॉन्टी डार्टी अनपेक्षितपणें परत घरीं आला. आणखी उगीच गवगवा नको म्हणून विनिफ्रेडनें आपल्या पतीला घरांत परत घ्यायचें ठरवून टाकलें.

मग अगदीं शेवटचा प्रयत्न करण्यासाठीं सोम्स पॅरिसला जाऊन आयरीनला भेटला. त्याला बघतांक्षणीं ती घाबरली आणि तशीच यंग जॉल्यॉनच्या घरीं येऊन दाखल झाली. तिथें ती गेल्याबरोबर सोम्सच्या वकिलानें त्या दोघांना पुराव्याच्या कागदपत्रांच्या नकला सादर केल्या. येवढ्या आधारावर सोम्सला घटस्फोट मिळाला आणि त्यानें आन्नेतशीं लग्न केलें.

यंग जॉल्यॉन व आयरीन या उभयतांनीं परदेशच्या प्रवासाला जायचें ठरविलें. पण तत्पूर्वी जॉली तिकडे आफ्रिकेच्या मोहिमेमध्यें दोषी तापानें मरण पावला असा जॉल्यॉनला निरोप आला. हॉलीनें व्हालशीं लग्न केलें. त्यामुळें उभय कुटुंबांचा मोठाच विरस झाला.

यंग जॉल्यॉनला आयरीनपासून मुलगा झाला. त्याचे नांव जॉन ठेवलें. इकडे आन्नेतचेहि प्रसूतीचे दिवस झाले. तिच्या बाळंतपणांत आईला वांचवायचें का मूल वांचवायचें असा बिकट प्रश्न सोम्सपुढें उभा राहिला. आपल्याला वारस पाहिजे या तीव्र इच्छेपायीं त्यानें मूल वांचविण्याला संमति दिली. पण सुदैवानें बाळ बाळंतीण दोघेंहि त्या गंडांतरांतून सुखरूप पार पडलीं.

छोटा जॉन याचें आईवडिलांनीं खूप कौतुक केलें. सोम्सची कन्या छोटी फ्लर हिचे तिच्या वडिलांनीं फाजील लाड केल्यामुळें तिला चांगलें वळण लागलें नाहीं.

वर्षामागून वर्षें गेलीं. मॉन्टी डार्टी मरण पावला. व्हाल व हॉली शर्यतीच्या घोड्यांच्या ट्रेनरचा व्यवसाय करीत होतीं. एके दिवशीं चित्रांच्या प्रदर्शनांत मायकेल मॉन्ट या तरुणाशीं सोम्सची ओळख झाली. तिथल्या तिथें त्यानें या तरुणाला आपलीं चित्रें पाहायला येण्याचें आमंत्रण दिलें.

त्याच दिवशीं दुपारीं आयरीन व जॉन हीं मायलेकरें वीस वर्षांनंतर प्रथमच सोम्सला पाहायला मिळालीं. योग असा कीं जॉन व फ्लर यांची परस्पर भेट झाली. शेतकीचा व्यवसाय करून बघावा असें ठरवून डार्टीकडे राहायला जॉन गेला. हॉलीबरोबर आठवडा आनंदांत घालवावा म्हणून फ्लर देखील तिकडे

गेली. जॉन व फ्लर यांचें एकमेकांवर खूपच प्रेम जडलें.

फोरसाइट कुटुंबाच्या आपापल्या शाखांमध्यें वैर कां आहे याविषयीं त्या दोघांनाहि फारच मोघम कल्पना होती. पुढें फ्लरला याचा सर्व तपशील समजला तो प्रॉस्पर प्रोफंड याच्याकडून. या माणसाचें आन्नेतबरोबर सूत जमलें होतें. विनिफ्रेड डार्टीनेंसुद्धां कांहीं कांहीं गोष्टी सांगितल्या. तरीहि जॉनशीं लग्न करण्याचा तिचा निश्चय कायमच राहिला.

दरम्यान फ्लरचा अनुनय करायला मायकेल मॉन्ट यानें तिच्या वडिलांची परवानगी घेतली. आन्नेत व प्रॉस्पर यांच्या गुप्त संबंधाची वार्ता जेव्हां सोम्सच्या कानीं गेली, तेव्हां तिनें तें नाकबूल मुळींच केलें नाहीं. मात्र याचा गवगवा होणार नाहीं व यांतून कसली बेअब्रू होणार नाहीं अशी खबरदारी घेण्याचें तिनें आश्वासन दिलें.

फ्लरनें घाईघाईनें लग्न उरकून घेण्यासाठीं जॉनला गळ घातली. पण तिला त्यांत यश आलें नाहीं. कारण जॉनच्या वडिलांनीं अत्यंत नाखुषीनें त्याला एक पत्र दिलें. त्यांत सोम्स व आयरीन यांची सर्व कहाणी होती. तें सर्व वाचतां-क्षणींच आपल्याला फ्लरशीं कधींच लग्न करतां येणार नाहीं याची जॉनला जाणीव झाली. जॉनचे वडील वारल्यावर तर त्याचा तो निश्चय पक्काच झाला. मग त्यानें लगोलग इंग्लंड सोडलें व अमेरिका गांठली. पाठोपाठ आयरीन तिकडेच त्याच्या सोबतीला गेली.

फ्लरची अशी निराशा झाली. तेव्हां तिनें मायकेल मॉन्टीशीं लग्न उरकून घेतलें.

वृद्ध फोरसाइट मंडळीपैकीं शेवटचा टिमोथी मरण पावला. त्याच्याबरोबर फोरसाइट युगाची इतिश्री झाली हें सोम्सच्या ध्यानांत आलें. त्या युगाच्या जीवनपद्धतीला 'जागा भाड्यानें देणें आहे' अशी पाटी असलेल्या रिकाम्या घराची अवकळा आली. आपण एकटेच राहिलों, आपली सद्दी संपली, असें सोम्सला वाटलें.

मादाम बावरी

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* गुस्ताव फ्लॉबेर्त् (१८२१-१८८०). *कथानकाचा प्रकार :* मानसशास्त्रीय वास्तववाद. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचा मध्यकाळ. *स्थळ :* फ्रान्स. *प्रथम प्रकाशन :* १८५७.

प्रमुख पात्रें : **शार्ल्स बावरी**, एक प्रादेशिक डॉक्टर. **एल्मा**, त्याची पत्नी. **लियाँ दुपुइ**, एक तरुण वकील. **रोदोल्फ बुलांझे**, एक श्रीमंत जमीनदार.

समीक्षण : अमाप श्रम करण्याची शक्ति हीच फ्लॉबॅर्त् याच्या प्रतिभेची खूण. 'मादाम बावरी' मधील स्वभावचित्रें अगदीं हुबेहुब खरींखुरीं वाटतात. या कादंबरीचें कथानक रचनेच्या दृष्टीनें निर्दोष आहे. हींतील घटना व त्यांची पार्श्वभूमि डोळ्यापुढें उभी राहण्याइतकी जिवंत वाटते. लेखकाच्या कलाकृतींतील सरस वास्तववादाचा हा एक भरभक्कम पुरावा आहे.

जगांतल्या या प्रकारच्या कादंबऱ्यांमध्यें या फ्रेंच कादंबरीला अग्रमान मिळतो. हिच्यांतील सत्यदर्शनानें त्या वेळच्या वाचकवर्गाला मोठा धक्का बसला. साहसी व रोमहर्षक जीवनाला चटावलेल्या एका व्यभिचारी स्त्रीचें पापचित्रण करणारा म्हणून एकीकडे लेखकाचा धिक्कार झाला, तर दुसऱ्या दृष्टीनें हा विषय त्यानें अत्यंत प्रामाणिकपणें व कौशल्यानें हाताळला म्हणून त्याचा गौरवहि झाला. एमा बावरीनें आपल्यावर जो अनर्थ ओढवून घेतला त्यांतून फ्लॉबॅर्तनें तिला निसटूं दिलें नाहीं. आपल्या जीवनांतील तोच-तो-पणापासून पालट व सुटका शोधणाऱ्या एमाला स्वाभिमानाचा बळी द्यावा लागतो. एमाच्या या जीवन-झगड्यामागील हें तत्व, त्यांतील सत्य, हें सर्वव्यापी, सर्वसमावेशक असें जागतिक सत्यच आहे. मानवी जीवनाचें तें आव्हान आहे.

कथानक : शार्ल्स बावरी हा एक वैद्यकशास्त्राचा विद्यार्थी होता. आपल्या पुढील प्रगतीसाठीं त्यानें आपल्याहून बऱ्याच वयस्क बाईशीं लग्न केलें. त्या लग्नानंतर त्याचें आयुष्य मात्र अगदीं दुःखी झालें. कारण ती बया त्याच्यावर अकारण संशय घेई व त्याला सतावत राही.

एके दिवशीं रौओ नामक एका शेतकऱ्याकडून त्याला बोलावणें आलें. त्याचा पाय मोडला होता. तिथें त्याच्या मुलीशीं शार्ल्सची ओळख झाली. तिचें नांव एमा. ती दिसायला सुंदर होती. पण फार अस्वस्थ वृत्ति होती तिची. सुरवातीला एका फ्रेंच कॉन्व्हेंट शाळेंत ती शिकली. यामुळें विस्तृत, विविध अनुभवाची तिला एक तृष्णाच लागली. तिचें आकर्षक सौंदर्य व छाप पाडणारें वर्तन यांमुळें शार्ल्स तिच्या एकदम प्रेमपाशांत सांपडला. तिच्या वडिलांचें आजारीपण हें या तरुण डॉक्टरला तिची भेट घ्यायला उत्तम सबब म्हणून उपयुक्त ठरलें.

पण लवकरच त्याची पिरपिरी पत्नी हेलुआज हिच्या तें लक्षांत आलें व ती

फार संशयग्रस्त झाली. आपला नवरा वारंवार त्या शेतकऱ्याकडे जात असतो याचें खरें कारण काय हें ती शोधूं लागली. मग तिला असें कळलें कीं एमा ही किसानकन्या व खेड्यांत राहणारी असली तरी एखाद्या अप-टु-डेट घरंदाज स्त्री-सारखी वागते. हें सर्व ऐकून हेलुआज खूपच संतापली व आपण त्या शेतकऱ्याच्या घरीं जाणार नाहीं अशी तिनें आपल्या डॉक्टर नवऱ्याला शपथ घ्यायला लावली.

पुढें आपल्या पत्नीची स्वतःची अशी इस्टेट वगैरे कांहीं नाहीं हें शार्ल्सच्या लवकरच लक्षांत आलें. या फसवाफसवीवरून नवराबायकोंचें हमरीतुमरीचें भांडण झालें. शार्ल्सचे आईवडीलहि आपल्या सुनेला नाहीं नाहीं ते बोलले. त्या सगळ्या प्रकारानंतर तिची एक जुनी व्यथा एकदम बळावली आणि तिच्या पायीं ती तडकाफडकीं मरण पावली.

आपली पत्नी मेल्याचें शार्ल्सला कांहींच वाटलें नाहीं. पण त्या एकंदर प्रकारामुळें त्याला स्वतःकडे थोडीशी गुन्हेगारी घ्यावीशी वाटली. त्याच सुमारास त्याला त्या वृद्ध शेतकऱ्याचें पुन्हां बोलावणें आलें. तिथें गेल्यावर तो पुन्हां एमाच्या जाळ्यांत सांपडला. शार्ल्स आपल्या मुलीच्या प्रेमांत अधिकाधिक गुरफटत आहे हें त्या शेतकऱ्याच्या जाणत्या नजरेंतून सुटलें नाहीं. तसा तो तरुण डॉक्टर त्याला सभ्य व विश्वासार्ह वाटत होता. म्हणून त्यानें शार्ल्सवर पटकन दडपण आणलें आणि उभयतांच्या विवाहाला आपली संमति व आशीर्वाद आहे अशी त्याला जाणीव करून दिली. तें लग्न झालें.

लग्नानंतर पहिले कांहीं आठवडे एमानें आपल्या नव्या घराचा कायापालट करण्यांतच घालविले. घरांतल्या सगळ्या कामामध्यें लक्ष गुंतवावें आणि अशा रीतीनें आपल्या मनाची चलबिचल होऊं देऊं नये, आपला भ्रमनिरास होऊं देऊं नये, अशी तिची खटपट चाललेली होती. पण शेवटीं तिला खरें काय तें समजून चुकलें. आपलें शार्ल्सवर प्रेम आहे असें तिला उगीचच वाटलें होतें. लग्नानंतर जो कांहीं न्यारा, रोमहर्षक अनुभव यायला हवा अशी तिची कल्पना होती, तो कांहीं तिला लाभला नाहीं.

आपल्या पूर्वायुष्यांत तिनें जीं विविध अद्भुत पुस्तकें वाचलीं, त्यांमुळें तिच्या विवाहाविषयींच्या एकंदर अपेक्षा खूप उंचावल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर तिला आपल्या भावना-वासना आतां मृतवत वाटूं लागल्या. हा तिच्या दारुण निराशेचा कडेलोटच ठरला. लग्नामुळें येणाऱ्या अगदीं खासगी जवळिकीची तिला

शिसारी वाटूं लागली. मखमलीचा व लेसची नक्षी असलेला सुंदर पोशाख केलेला व अंगावर सुगंध शिंपडलेला, अशा संगमोत्सुक प्रियकराऐवजीं अंगाला औषधांचा उग्र दर्प येत असलेल्या निर्बुद्ध नवऱ्याशीं जखडलेली आपण लग्नाची बायको आहोंत याची तिला प्रत्यक्ष प्रचीति आली.

आपल्या या नव्या आयुष्यांत आतां आपल्याला कधींच आनंद लाभणार नाहीं, ती आशा फोल आहे, असें तिच्या मनाला अखंड वाटूं लागणार, इतक्यांत एक घटना घडली. शार्लसकडून उपचार करून घेतलेल्या एका खानदानी पेशंटनें त्या उभयतांना आपल्या वाड्यावर नृत्यसमारंभासाठीं बोलाविलें. या वेळीं कमींत कमी डझनभर तरी निरनिराळ्या तरुणांबरोबर एमानें नृत्य केलें. तिथें तिनें शँपेनची चव घेतली. तिच्या सौंदर्याला अनुलक्षून तर तिच्यावर स्तुति-सुमनांचा नुसता वर्षाव झाला. या नव्या अनुभवामुळें बावरी कुटुंबांतील एकमार्गी नीरस जीवन व सरदार घराण्यांतील बहुरंगी जीवन या दोहोंतील अफाट अंतर तिच्या मनावर ठसलें आणि ती अत्यंत दुःखी झाली.

येथून पुढें पतीच्या संगतींत एमा अधिकाधिकच असंतुष्ट होत गेली. तो बिचारा तिला सुखी करण्याचे सर्व प्रकारचे रांगडे प्रयत्न करून पाहत होता. पण ते सगळे व्यर्थ गेले. उलट पक्षीं त्यांत आपल्या पतीचा आकलनशून्य निर्बुद्धपणा दिसत असलेला पाहून तिला त्याची कींव आली आणि ती अधिकच निराश झाली. खिडकीशीं बसून तीं पॅरिसचीं सुखस्वप्नें मनांत घोळवूं लागली. त्यांतूनच ती आजारी पडली.

थारेपालट केला तर तिची प्रकृति कदाचित सुधारेल या आशेनें तो यॉनविल येथें तिला घेऊन गेला व बिऱ्हाड करून राहिला. तिथें त्यानें आपल्या धंद्याचा नवा जम बसविला. त्याच सुमारास तिला दिवस गेले. ती माता व्हायची वेळ जवळ आली.

तिला मुलगी झाली. ती आपल्या मुलीकडे एकांगीच लक्ष देऊं लागली. मुलीचे कपडे, त्यांना लावायची लेस, रिबिनी, यांतच तिचें मन गुंतलेलें असे. मुलीला अंगावरच्या दुधासाठीं तिनें एका दाईकडे धाडलें. या दाईच्या घरीं ती मुलीला भेटायला जाऊं लागली. तिथेंच योगायोगानें लियाँ दुपुई हा तिला अकस्मात भेटला. हा कोर्टांत कारकुनी करी. तालुक्याच्या गांवांतल्या जीवनाचा त्याला उबग आलेला होता. कसला तरी विरंगुळा तो शोधत होता.

नवीन परिचय झालेल्या या तरुण मातेची त्याच्यावर एकदम मोहिनी पडली. तो संध्याकाळीं तिच्या घरापर्यंत तिला सोबत करायला गेला. त्या वेळीं वाटेंत झालेल्या संवादांत जीवनाविषयींच्या आपल्या अनेक अद्भुत कल्पना तिनें त्याला सांगितल्या. या बाबतींत तो आपल्याशीं सहमत आहे व त्याला आपल्याविषयीं सहानुभूति वाटते हें तिच्या ध्यानीं आलें.

पुढें त्या गांवांतला औषधि-दुकानदार होमे याला बरोबर घेऊन तो तिच्या घरीं गेला. हा दुकानदार गांवांतल्या एका खानावळींत संध्याकाळच्या वेळीं छोट्या छोट्या मेजवान्या देई व तिथें गांवच्या लोकांना बोलावी. अशाच प्रसंगीं तिच्याशीं लिऑँचा परिचय वाढत गेला. गांवांतले लोक त्या दोघांविषयीं कुजबुज करूं लागले. परंतु तिच्या या नव्या सलगीचा खरा अर्थ समजण्याइतकी कुशाग्र बुद्धि तिच्या पतीजवळ नव्हती.

शेवटीं लियाँ या निष्फळ प्रेमाला व यॉनविल गांवाला कंटाळला आणि आपला अभ्यास पुरा करायला पॅरिसला निघून गेला. त्यामुळें एमा भग्नहृदय झाली. आपल्या लियाँला आपण वेळींच आपलें सर्वस्व अर्पण केलें नाहीं या आपल्या दुबळेपणाचा ती मनोमन धिक्कार करूं लागली. आपल्या कंटाळवाण्या जीवनामुळें ती आंतल्या आंत धुमसूं लागली आणि त्यामुळें ती पुन्हां आजारी पडली.

तथापि तिची ही अडचण लवकरच दूर झाली. कारण रोदोल्फ बुलांझे हा नवीन इसम त्या गांवांत आला. आपल्या शेतावरील कुळाला त्याचें रक्त काढण्यासाठीं तो तिच्या पतीकडे घेऊन आला. हा रोदोल्फ पट्टीचा प्रेमवीर होता. एमा आपल्या सुखाचें साधन होणार असें त्याला निश्चितपणें वाटलें आणि त्यानें तिच्याशीं हळूहळू लगट चालू केली. याला जर आपण सर्वस्व अर्पण केलें तर तें अनैतिक ठरेल याची तिला जाणीव झाली. परंतु आपल्या मनांतले हे सारे सुष्टदुष्ट विकल्प, या शंकाकुशंका, तिनें एक प्रकारच्या तकलुपी युक्तिवादानें दडपून टाकल्या. तिनें आपल्या मनाची अशी समजावणी केली कीं प्रेमाइतकी रोमहर्षक सुंदर गोष्ट कधींच पापमय असूं शकणार नाहीं.

शेवटीं पतीला फसवून तिनें रोदोल्फची भेट घेतली. त्याच्याबरोबर रानां-वनांतून घोडदौड केली, त्याच्या तीव्र प्रेमाच्या आणाशपथा ऐकल्या आणि त्याच्या गळेपडू आग्रहाला ती शरण गेली. प्रथम तिला आपण अपराध केला

असें वाटलें. पण आपण वाचलेल्या कथा-कादंबऱ्यांतील व्यभिचारी नायिकांशीं ती एकरूप झाली. त्यांच्याचप्रमाणें आतां आपल्याला प्रेमाची खरी परिपूर्ति लाभलेली आहे असा तिला विश्वास वाटला.

आतां तिचें प्रेम म्हणजे रोदोल्फला अगदीं आपल्या खिशांतली बाबच वाटूं लागली. अर्थात् प्रेमवीरांच्या नाजुक हळुवार प्राथमिक पद्धतींची त्याला तिच्याशीं वागतांना त्यापुढें मुळींच जरूरी वाटेनाशी झाली. तिला भेटायला जातांना उशीर झाला तर त्याचें त्याला आतां कांहींच वाटेना. तो तसा तिला अजूनहि भेटत असला तरी त्याच्या प्रेमभावनेंतील तीव्रता साफ ओसरत चालली आहे असा तिच्या मनांतहि संशय डोकावूं लागला.

इकडे तिचा पति एका निराळ्याच त्रांगड्यांत केवळ त्या औषध-विक्रेत्याच्या आग्रहामुळें अडकला. जन्मतःच वांकड्या पायाचा एक मुलगा त्याच्याकडे उपचारार्थ आला. त्यानें त्याच्यावर उपचार करण्यासाठीं एक यंत्र बनविलें. आपल्या या यंत्रामुळें मिळणाऱ्या यशावर आपल्याला पुढें सामाजिक प्रतिष्ठा नक्की लाभणार अशी तो डॉक्टर व औषध-विक्रेता या दोघांनाहि खात्री वाटली. म्हणून त्याच्या पाठिंब्यानें त्या बालरोग्याच्या पायावर त्या यंत्राच्या मदतीनें डॉ. शार्लसनें उपचार सुरू केले. पण कित्येक आठवडे उपचार करूनहि गुण येण्याचें बाजूलाच राहून उलट त्या मुलाचा तो पायच सडला आणि तो कापून टाकावा लागला. या गोष्टीमुळें होमे याच्या अब्रूला जरा देखील धक्का पोंचला नाहीं, कारण तो निव्वळ औषध-विक्रेता होता. परंतु डॉ. शार्लस बावरीकडे मात्र त्यानंतर लोक संशयी वृत्तीनें पाहूं लागले. त्याची चांगली चाललेली प्रॅक्टिस भराभर घसरूं लागली.

पतीच्या या भयंकर अपयशामुळें एमाला त्याचा तिटकारा आला. त्याच्या ऐवजीं रोदोल्फला आपल्या पाशांत घट्ट जखडून ठेवण्याचा तिनें आटापिटा आरंभला. आपलें पूर्वीचें जीवन सर्वस्वीं उपेक्षणीय ठरवून आतां ती जडजवाहीर, उंची कपडे यांवर बेछूटपणें उधळपट्टी करूं लागली. त्यामुळें तिच्या गरीब बिचाऱ्या पतीच्या शिरावर कर्जाचे डोंगरच्या डोंगर उभे राहिले.

शेवटीं रोदोल्फनें आपल्याला घेऊन पळून जावें असें तिनें त्याच्याकडून वचन घेतलें. परंतु पळून जाण्याचा संकल्पित दिवस उजाडायच्या आदल्या दिवशीं त्याचें तिला एक पत्र आलें. त्यांत त्यानें आपल्या संयुक्त पापाचरणाचा

आपल्याला पश्चात्ताप झाल्याचें दांभिकपणें कबूल केलें होतें. त्याच्या या नफ्फड वृत्तीमुळें तिला त्याचा भयंकर तिटकारा आला.

आतां तो आपल्याला कायमचा दुरावला हें तिला समजून चुकलें. या जाणिवेनें तिला जी भीति बसली, तिच्या भरांत ती जीव देण्यासाठीं खिडकींतून उडी टाकायच्या अगदीं बेतांत होती. तेवढ्यांत तिला पतीची हांक ऐकूं आली आणि तिनें स्वतःला सांवरलें. तथापि यांतून तिला मेंदूच्या तापाचें गंभीर दुखणें जडलें. कित्येक महिने ती मृतप्राय पडून राहिली.

तिची प्रकृति हळू हळू सुधारली. थोडी हिंडूं फिरूं लागल्यावर ती रुआँ गांवीं नाटक पाहायला गेली. रंगभूमीवरील नाजुक प्रणय-प्रसंगांचा तिच्या मनावर येवढा प्रभाव पडला कीं एका अज्ञात दुस्वासाच्या भावनेनें ती तिथल्या तिथें धुसफुसत राहिली. पुन्हां ती रोमहर्षक प्रणयाच्या सुखस्वप्नांमध्यें दंग होऊं लागली. त्यांतच तिला त्या गांवीं लिऑं दुपुइ पुन्हां भेटला.

या वेळीं तिला आपलीशी करून घेण्याचा लिऑंनें निर्धारच केला. तिच्या साऱ्या तक्रारी त्यानें सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतल्या, तिचें सांत्वन केलें, तिला फिरायला नेऊन आणलें. ती आंतल्या आंत ज्या वासनांपायीं जळफळत होती, त्यांच्यामुळें ती त्याच्या आहारीं गेली. ही गोष्ट आपण पूर्वीच करायला पाहिजे होती अशी तिनें स्वतःची समजूत घातली.

इकडे शार्ल्स बावरी वाढत्या कर्जापायीं टेंकीला आला. वडिलांच्या मृत्यूमुळें त्याच्या आर्थिक अडचणींत आणखी भर पडली. त्यांनीं मरणापूर्वी आपल्या व्यवहारांची कसलीच माहिती शार्ल्सच्या आईला दिलेली नव्हती. सासूसाठीं एखादा चांगला वकील बघावा या मिषानें एमानें थेट रुआँ गांवीं जाऊन लिऑंची भेट घेतली. त्यानें आतां तिथें वकिली सुरू केली होती. त्याच्या सूचनेनुसार तिनें पतीकडून मुखत्यारपत्र मिळविलें. त्या अधिकाराच्या जोरावर तिला आतां पतीला नकळत त्याचा पैसा हवा तसा उधळायला पूर्ण मुभा मिळाली.

परिणामीं शार्ल्स कर्जबाजारीपणापायीं पुरता निराश झाला. आपल्या अफाट कर्जाची अगदीं तुटपुंजीच माहिती त्याला एमाकडून कळली. मग मात्र त्यानें आपल्या आईला विश्वासांत घेतलें व एमाच्या नांवचें मुखत्यारपत्र रद्द करण्याचें ठरविलें.

आतां पतीच्या पैशाअडक्यावर एमाचा कसलाच अधिकार राहिला नाहीं.

तिला स्वतःचीं कर्जें फेडणेंहि अशक्य होऊन बसलें. अशा परिस्थितींत ती लिऑंच्या पूर्णपणें आहारीं गेली. तिला सुरक्षिततेचा किंवा कसलाच धरबंध उरला नाहीं. तिच्या अधःपाताची आतां इतकी परमावधि झाली कीं त्यांतून सुटका करून घेऊन सुखी व्हावें किंवा वेडीच व्हावें याखेरीज तिला गत्यंतरच नव्हतें.

बुडत्याचा पाय खोलांत या म्हणीप्रमाणें एमाची अवस्था झाली. आपल्यावर प्रेम करणाऱ्या पतीला आपण आपल्याबरोबरच जमीनदोस्त केलें याची तिला आतां जाणीव होऊं लागली. त्याच्याविषयीं तिला आतां आदर अजिबात वाटेना. तो आपलीं कर्जें फेडण्यासाठीं पैसे द्यायला असमर्थ आहे हें पाहून त्याच्या एकनिष्ठेचा ती तिटकारा करूं लागली.

शेवटीं कित्येक हजार फ्रँकचें कर्ज वसूल करण्यासाठीं एमाचें नांव चवाठ्यावर जाहीर झालें. कोर्टाचा बेलीफ तिच्या पतीची इस्टेट विकायला निघाला. योग असा कीं याच वेळीं शार्ल्स कुठें तरी बाहेरगांवीं गेला होता. अशी सर्व बाजूंनीं कोंडी झाल्यावर ती सगळा स्वाभिमान गुंडाळून ठेवून रोदोल्फकडे मदतीची याचना करायला गेली. पण त्यानेंहि तिला तत्काळ झिडकारून नकार दिला.

ज्या असत्याच्या, खोटेपणाच्या चौकटीच्या जोरावर तिनें आपल्या पतीला आजवर हजारदां फसविलें होतें, ती चौकटच आतां ढांसळून पडते आहे असें दिसतांच तिनें एखाद्या कादंबरीच्या नायिकेप्रमाणें आत्महत्या करायचें ठरविलें. औषध-विक्रेत्याच्या दुकानांतून विकत आणलेलें कुचल्याचें विष तिनें पिऊन टाकलें. तेवढ्यांत शार्ल्स परत आला. पण तिला वांचवायची वेळ आतां टळून गेली होती. शेवटीं अत्यंत मंद गतीनें सहस्र यातना भोगत भोगतच तिचा अंत झाला.

तिची शवपेटिका बंद करतांना खिळ्यांवर जे हातोडीचे घाव बसत होते, त्यांचा आवाज शार्ल्सला त्या दारुण दुःखांत सहन करणें केवळ अशक्य झालें.

आपलें दुःख थोडेंसें आंवरून शार्ल्सनें तिचें डेस्क उघडलें. त्यांत काळजीपूर्वक लावून ठेवलेलीं लिऑं व रोदोल्फ यांचीं प्रेमपत्रें त्याला एकत्रच आढळलीं!

पत्नीची बेइमानी, कर्जाचा बोजा व साऱ्याच बाबतींत झालेल्या भ्रमनिरासामुळें आलेला अगतिकपणा, यामुळें शार्ल्स तिच्या पाठोपाठ लवकरच मरण पावला.

आपल्या पोरक्या पोरीसाठीं त्यानें केवळ बारा फ्रँक ठेवले! बावरीची शोकान्तिका इथें समाप्त झाली!!

मोबी डिक

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* हर्मान मेल्व्हिल (१८१९-१८९१). *कथानकाचा प्रकार :* प्रतीकात्मक रूपककथा. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचीं सुरवातीचीं वर्षें. *स्थळ :* सात समुद्र. *प्रथम प्रकाशन :* १८५१.

प्रमुख पात्रें : **इस्माइल**, निवेदक. **कीकेग**, देवमाशांवर फांस टाकणारी बंदूक चालविणारा दर्दी (हार्पूनर) रानटी इसम. **आहाब**, 'पेक्वोड' बोटीचा कप्तान. **स्टारबुक**, त्याचा पहिल्या नंबरचा दुय्यम—(फर्स्ट मेट). **स्टब**, दुसऱ्या नंबरचा दुय्यम—(सेकंड मेट). **फिदाउल्ला**, कप्तान आहाब याचा पारशी नोकर.

समीक्षण : अमेरिकन वाङ्मयांतील सर्वोत्कृष्ट कादंबऱ्यांमध्यें 'मोबी डिक' ऊर्फ 'व्हाइट व्हेल' (पांढरा देवमासा) या प्रस्तुत कादंबरीची निश्चितपणें गणना होते. एका पातळीवरून विचार करतां या कादंबरीचें मुलांना विशेष आकर्षण वाटतें. तर दुसऱ्या पातळीवरून विचार करतां सगळ्याच वाचकांना ती एक सखोल व मर्मभेदी परिणाम घडवून आणणारी कथा वाटते. मनुष्य स्वतःच सर्वशक्तिमान ईश्वराची भूमिका करायची इच्छा धरून साऱ्या विश्वामध्यें ईश्वरानें प्रस्थापित केलेली एखादी शक्ति उलथून पाडण्याची धडपड करतो, त्या वेळीं याचा हमखास परिणाम हाहाःकारांतच होणें अटळ असतें हें सूचित करण्याचा उद्देश ही कथा लिहितांना मेल्व्हिल यानें ठेवलेला होता. प्रस्तुत कथेंतील देवमासा म्हणजे जगांतील दुष्ट शक्तीचें प्रतीक आहे. तथापि आपण एकटेच ती शक्ति नष्ट करूं शकूं असा दावा करणारा कप्तान आहाब हा देखील एक दुष्ट शक्तीच होता. ही एक विश्वव्यापी समस्या आहे. आणि लेखकानें ती कुशलतेनें व समजूतदारपणें हाताळलेली आहे.

कथानक : इस्माइल हा शाळामास्तर होता. आपलें एकमार्गी प्रशांत जीवन आपण सोडून द्यावें आणि सागरपर्यटनाला निघावें असें त्याला पुष्कळदां वाटे. आयुष्याचा बराचसा भाग त्यानें खलाशी कामांत खर्ची घातला होता. आणि अधून मधून मनाला ग्रासणारी बेचैनी घालवून टाकायचें एक साधन म्हणून तो सागर-सफरी करीत असे.

देवमाशांच्या शिकारीसाठीं जाणाऱ्या जहाजावर खलाशी म्हणून आपलें

नांव दाखल करायचें असें त्यानें एके दिवशीं ठरविलें. लगेच त्यानें आपली छोटी बॅग भरून घेतली व मॅनहॅटनला रामराम ठोकला; आणि दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण टोंकाकडील केप हॉर्न व पॅसिफिक महासागर गांठण्यासाठीं तो मार्गस्थ झाला.

न्यू बेडफोर्ड येथें पोंचल्यावर किनाऱ्यालगतच्या 'स्पाउटर' खानावळींत त्यानें रात्रीचा मुक्काम केला. एका हार्पूनवाल्या खलाशाची सोबत पतकरली तरच इथें त्याला खोलींत जागा मिळणार होती. त्याचा खोलींतला जोडीदार रात्रीं आंत आला तेव्हां इस्माइल फारच घाबरला. कारण तो हार्पूनवाला एक नरभक्षक रानटी इसम आहे अशी त्याची खात्री झाली.

पण तो क्वीक्वेग नामक जंगली माणूस स्नेहशील स्वभावाचाच आहे असें त्याला कांहीं क्षणांतच पटलें. कारण त्यानें आपल्याजवळची मसाला भरून पक्की केलेली माणसाची कवटी इस्माइलला बक्षीस दिली आणि आपल्याजवळच्या तीस डॉलर पुंजीपैकीं निम्मी त्याला देऊं केली. लगेच दोघे एकमेकांचे मित्र बनले. शेवटीं दोघांनीं एकाच जहाजावर खलाशाचें काम मिळवायचें असें ठरवून टाकलें.

थोडीशी कळ सोसल्यावर त्या दोघांनीं नान्टुकेटमधून देवमाशांच्या शिकारीवर निघणाऱ्या 'पेक्वोड' नामक जहाजावर हार्पूनवाले म्हणून नोकरी मिळविली. "'पेक्वोड' सारख्या टुकार जहाजाला यश तें कसचें मिळणार? त्या जहाजाचा कप्तान आहाब हा एक चमत्कारिक माणूस आहे! आणि तें जहाजच अपेशी आहे!" असें कित्येक लोकांचें मत त्यांना ऐकायला मिळालें. तथापि या दोघांनीं आपला मूळचा बेत मुळींच बदलला नाहीं. मात्र हा आपला कप्तान आहे तरी कसा, हें पाहायला ते फार उत्सुक झाले.

जहाजाचा प्रवास कित्येक दिवस झाला. तरी कप्तानाचें दर्शन घडेना. तो आपल्या केबिनमध्यें ठाण मांडून बसलेला असे. त्याचे दोघे दुय्यम (मेट) स्टारबुक व स्टब यांच्यावरच त्या जहाजाचा सगळा कारभार सोंपविलेला होता. त्यांच्याशीं इस्माइलची चांगली दोस्ती जमली. तथापि त्यांच्याकडून देखील आहाबविषयीं त्यांना अधिक कांहींच कळलें नाहीं.

एके दिवशीं हें जहाज दक्षिणेकडे चाललें असतांना हा कप्तान अकस्मात डेकवर आला. त्याच्या चेहऱ्यावरील उग्र कठोर भाव पाहून इस्माइल जरा चमकलाच. विशेष म्हणजे या कप्तानाचा एक पाय तुटलेला होता हें त्याच्या नजरेस आलें. तुटलेल्या पायाच्या जागीं लांकडी पाय बसविण्याऐवजीं त्यानें

तिथें देवमाशाच्या जबड्याचें हाडच योग्य तो आकार देऊन बसविलेलें होतें. कप्तानाच्या चेहऱ्याच्या एका बाजूवर काळ्या निळ्या झांकेचा एक पांढुरका वण होता. तो वरपासून मानेपर्यंत जाऊन त्याच्या कॉलरीआड दडला होता. त्यामुळें हा वण जणुं काय अगदीं डोक्यापासून पायापर्यंत गेलेला असावा असें वाटत होतें.

त्यानंतर कित्येक दिवस निरनिराळ्या जातींच्या देवमाशांचा शोध घेत त्यांचें जहाज दक्षिणेकडे चाललें होतें. खलाशी आलटून पालटून मधल्या डोल-काठीवर चढून टेहळणी करीत होते; आणि एखादा देवमासा दिसतांक्षणीं तत्काळ खुणेनें कळविण्यासाठीं टपून राहिलेले होते.

असाच एकदां आहाब एकदम डेकवर आला आणि जहाजावरील सगळ्या खलाशांना त्यानें आपल्याभोंवतीं जमा व्हायला फर्मावलें. मग त्यानें एक औंस वजनाचा सोन्याचा तुकडा खिशांतून काढला आणि तो डोलकाठीवर खिळा ठोकून घट्ट बसविला. "मोबी डिक नामक सुप्रसिद्ध देवमासा ज्या खलाशाला प्रथम दिसेल त्याला हें सोनं बक्षीस मिळेल" अशी त्यानें घोषणा केली.

सगळ्या खलाशांच्या मनांत यामुळें उत्साहाची एक नवी लाट उसळली. याला स्टारबुक व स्टब हे दोघेच तेवढे अपवाद होते. विशेषतः स्टारबुकनें तर त्या वेळीं आपलें मत स्पष्ट शब्दांत सांगून टाकलें. आपली सगळी शक्ति केवळ या एका उद्दिष्टासाठीं खर्ची घालायला तयार होणें हा त्याच्या मतें आहाबचा पिसाटपणाच होता. याबद्दल कप्तानाचा धिक्कार करून त्यानें त्याला बजावलें, "तुम्ही एखाद्या झपाटलेल्या माणसासारखेच वागतां आहांत. कारण जे कोणी पांढऱ्या देवमाशाची शिकार करायचा प्रयत्न करतात त्यांना हा देवमासा धोका देतो. मोबी डिकशीं पूर्वी झालेल्या झटापटींत तुम्ही तुमचा पाय गमावून बसलांत. आतां पुढल्या झटापटींत तुम्ही कदाचित आपला जीवच गमावून बसाल."

तथापि या इशाऱ्याचा परिणाम कप्तानाच्या मनावर मुळींच झाला नाहीं. त्यानें कोठारांतून मद्य मागविलें आणि त्याच्या हुकुमानेंच सगळ्या खलाशांनीं मद्याच्या घोटाबरोबर मोबी डिकचा नायनाट करण्याची त्या क्षणीं शपथ घेतली.

तो पांढरा देवमासा कसा व कुठें संचार करीत असावा याचा अंदाज आतांपर्यंतच्या बातम्यांवरून आपल्या मनानें घेऊन आहाबनें आपलें जहाज त्या प्रदेशाच्या रोखानें चालविलें होतें. आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाशीं केप ऑफ

गुड होपजवळ त्यांच्या जहाजाला 'स्पर्म' जातीच्या देवमाशांची एक झुंड आढळली. लगेच जहाजावरील खलाशी मंडळींनीं हार्पूनच्या सहाय्यानें मिळतील तेवढ्या जास्तींत जास्त देवमाशांची शिकार केली, त्यांचीं चामडीं सोललीं, त्यांची चरबी वितळविली, आणि या सगळ्या मालाचा सांठा करून ठेवला.

देवमाशाची शिकार करणारें दुसरें एक जहाज त्यांना वाटेंत भेटलें. कप्तान आहाबनें पांढऱ्या देवमाशाची नवी बातमी त्याच्याकडे विचारली. "मोबी डिकचा पाठलाग करायच्या भानगडींत तूं पडूं नकोस." अशी धोक्याची सूचना त्या जहाजाच्या कप्ताननें त्याला दिली. परंतु आहाब आपल्या ठरविलेल्या उद्दिष्टापासून कशामुळेंहि विचलित होणें शक्य नव्हतें ही गोष्ट आतां स्पष्ट दिसूं लागली.

नंतर दुसरें एक जहाज त्यांना भेटलें. त्याच्या कप्ताननें पेक्वोड जहाज थांबविलें व तो स्वतः तेल विकत घेण्यासाठीं आहाबकडे आला. त्या वेळींहि आहाबनें त्याच्याकडे पांढऱ्या देवमाशाची फिरून चौकशी केली. परंतु त्या राक्षसी देवमाशाची त्याला कांहींच माहिती नव्हती.

तो कप्तान आपल्या जहाजाकडे परतत असतांना समोरच सहा देवमाशांचा कळप दिसला. त्याबरोबर त्यांतले खलाशी होड्यांमध्यें बसून वल्हीं मारीत त्यांचा पाठलाग करूं लागले. स्टारबुक व स्टब यांनीं आपलीं माणसें होड्यांतून पाठलागाला धाडण्यापूर्वी ते किती तरी दूर निघून गेले. तथापि पेक्वोड जहाजाच्या त्या दोघां दमदार नेत्यांनीं आपल्या हाताखालच्या लोकांना असा कांहीं चेव आणला कीं त्यांचीच सरशी झाली. त्या वेळीं क्वीक्वेगनें अचूक हार्पून डागून त्यांतल्या सर्वांत मोठ्या देवमाशाची शिकार साधली.

देवमासा असा शिकारींत ठार करणें ही एका प्रदीर्घ व अत्यंत कष्टप्रद कामगिरीची नुसती सुरुवात असे. त्या मोठ्या देवमाशाचें धूड ओढून आणून तें मोठमोठ्या दोरखंडांनीं बोटीच्या एका अंगाला बांधण्यांत येई. मग खलाशी त्या बाजूला खालीं जाऊन त्याच्या अंगांतला चरबीचा भाग कापून काढत असत. अशा वेळीं त्या धुडाचा बराचसा भाग त्याच्या भोंवतीं जमणारे शार्क मासे लचके तोडून फस्त करीत असत. त्या वेळीं ते शार्क मासे एकमेकांचेहि लचके तोडत असत. मग त्या देवमाशाचें डोकें तोडून तें कित्येक फूट उंचीवर जहाजाच्या डेकवर टांगून ठेवत असत. जहाजावरील प्रचंड घमेल्यांमध्यें त्याची चरबी

वितळवून ती पिंपांत सांठवून डेकखालच्या कोठींत ठेवून देत असत.

जहाजावरील मंडळी अशा प्रकारें निरनिराळ्या कामांत गुंतली होती. परंतु त्यांचें जहाज पांढऱ्या देवमाशाचें संचारस्थळ अशा हिंदी महासागराजवळपास आल्याबरोबर त्यांची उत्सुकता पुन्हां शिगेला पोंचली. त्या वेळीं त्यांना वाटेंत त्यांच्याच प्रमाणें देवमाशांच्या शिकारीवर असलेलें एक इंग्लिश जहाज भेटलें. तेव्हां सुद्धां कप्तान आहाबनें तत्काळ त्या जहाजाच्या कप्तानाला मोबी डिक विषयीं विचारलें.

त्याच्या प्रश्नाला उत्तर म्हणून त्या इंग्लिश जहाजाच्या कप्तानानें आपला हात उंचावून पुढें केला. त्या हाताचा कोंपरापासून खालचा सगळा भाग स्पर्म जातीच्या देवमाशाच्या हाडाचा तयार केलेला होता. तें पहातांच आहाबनें आपली खास होडी समुद्रांत सोडण्याचा घाईघाईनें हुकूम दिला. झपझप होडी चालवायला लावून तो त्या इंग्लिश जहाजाच्या डेकवर हजर झाला.

मोबी डिक बरोबर आपली कशी झटापट झाली याची माहिती त्या इंग्लिश कप्तानानें सांगितली. त्या बरोबरच त्यानें कप्तान आहाबला गंभीरपणें बजावलें कीं "मोबी डिकचा पाठलाग करणें हें एक वेडं धाडस आहे." पण आहाबनें पुढची सगळी शिष्टाचाराची वागणूक गुंडाळूनच ठेवली. तो प्रचंड पांढरा देवमासा त्या इंग्लिश कप्तानानें अगदीं अलीकडे कुठें पाहिला होता हें त्याच्या बोलण्यांतून समजून येतांक्षणीं आहाब तत्काळ घाईघाईनें आपल्या पेक्वोड जहाजावर परतला आणि मोबी डिक निश्चित सांपडेल अशा ठिकाणीं आपलें जहाज पोंचावें म्हणून त्याची दिशा बदलण्याचे हुकूम त्यानें फर्मावले.

या पिसाट पाठलागापासून आपल्या त्या वेड्या कप्तानाला परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न त्या वेळीं स्टारबुकनें करून पाहिला. पण आहाबनें त्याचें ऐकून घेण्याऐवजीं जवळची एक रायफल उचलली व रागारागानें त्याच्यावर ती रोखून त्याला आपल्या केबिनमधून हुसकून लावलें!

दरम्यान क्वीक्वेग तापानें आजारी झाला. आपलें मरण जवळ आलें आहे असें त्याला दिसतांच त्यानें जहाजावरच्या सुताराला बोलावून घेण्याची विनंति केली. आपल्या रानटी जमातीच्या रिवाजानुसार स्वतःसाठीं संपानाच्या आकाराची शवपेटिका तयार करण्यास त्यानें त्या सुताराला सांगितलें. मग ती शवपेटिका तयार झाल्यावर त्याच्याच केबिनमध्यें आणून ठेवण्यांत आली.

पण पुढें तिचा उपयोग करायची जरूरच लागली नाहीं. कारण क्वीकेग बरा झाला आणि आपल्या सवंगड्यांबरोबर पुन्हां कामालाहि लागला. त्यानंतर त्यानें ती शवपेटिका साधी पेटी म्हणून वापरायला घेतली व तीवर निरनिराळ्या प्रकारच्या चमत्कारिक आकारांचें नक्षीकाम केलें.

पेक्वोड जहाजाची ही सफर सुरू झाल्यानंतर लवकरच त्यावर फिदाउल्ला नामक एक पार्शी खलाशी आला. त्याला पाहून इतर खलाशी त्या वेळीं बुचकळ्यांत पडले होते. त्याचें व कप्तानाचें येवढें सूत तरी कसलें आहे हें कोणालाच कधीं निश्चित कळलें नव्हतें. तथापि कप्तान त्याचा मोठा मान ठेवीत होता हें मात्र उघड दिसत होतें.

या फिदाउल्लानें एक भविष्य वर्तवून ठेवलें होतें तें असें: हा कप्तान दोन वस्तु बघितल्यानंतर मगच मरेल. त्या म्हणजे समुद्रावर मृतांचा अंत्यसंस्कार करण्यासाठीं वापरांत येणाऱ्या चमत्कारिक प्रकारच्या शववाहक गाड्या. त्यांपैकीं एक गाडी माणसाच्या हाताचा स्पर्श न होतां निर्माण झालेली असणार आणि दुसरी अमेरिकेंतल्या लांकडापासून तयार झालेली असणार ! पण खुद्द कप्तानाचें दफन मात्र शववाहक गाडीशिवाय किंवा शवपेटिकेशिवायच होणार असेंहि त्याबरोबरच फिदाउल्लानें सांगून ठेवलें होतें.

एके दिवशीं रात्रीं एक भयंकर वादळ सुरू झालें. विजा कडाडल्या व जहाजाच्या तीन्ही डोलकाठ्यांना आगी लागल्या. त्या आगीच्या ज्वाळा काळोखाच्या पार्श्वभूमीवर भयाण दिसत होत्या. त्या अपशकुनानें सारे खलाशी भयभीत झाले. ज्या मार्गाला आपलें जहाज लागलें आहे तो सोडून आपण घराकडे परतावें असा इशारा खुद्द परमेश्वर आपल्या हातानें खुणावून देत असावा असा त्यांनीं त्या आगीचा अर्थ लावला.

एकटा कप्तान आहाब तेवढा या देखाव्यानें डगमगला नाहीं. तो स्वतः डोलकाठीच्या पायथ्याशीं उभा ठाकला व त्या आगीच्या रूपानें अवतरलेल्या दुष्ट शक्तींच्या सैतानाला त्यानें उच्च स्वरांत आव्हान दिलें. मग त्यानें पुन्हां एकदां शपथ घेतली व त्या पांढऱ्या देवमाशाला शोधून काढायचा व ठार मारायचा आपला अढळ निश्चय जाहीर केला.

त्यानंतर आणखी कांहीं दिवस गेले आणि एक ललकारी साऱ्या जहाजभर दुमदुमली. मोबी डिक दिसला. ती ललकारी खुद्द कप्तान आहाब

याचीच होती. सगळे खलाशी डोळ्यांत तेल घालून बघत असले तरी त्याच्या अगोदर अन्य कुणाचीहि नजर मोबी डिक याला टिपूं शकली नाहीं.

मग जहाजावरून होड्या खालीं सोडण्यांत आल्या. पाठलाग सुरू झाला. खुद्द आहाबची होडी या पाठलागांत आघाडीवर होती. आपलें हार्पून त्या डोंगरायेवढ्या पांढऱ्या देवमाशाच्या बगलेंत तो घुसविणार येवढ्यांत मोबी डिक अकस्मात होडीवर उलटला. बुडी मारून तो तिच्या खालीं गेला आणि बघतां बघतां त्यानें त्या होडीच्या ठिकऱ्या उडविल्या. होडींतलीं सारीं माणसें समुद्रांत इतस्ततः फेंकलीं गेलीं. खुद्द मोबी डिक स्वतःभोंवतीं गरगरां फिरून पाणी घुसळूं लागला. त्या भोंवऱ्यांतून त्या लोकांना बाहेर काढणेंहि त्यामुळें इतरांना अशक्य झालें.

शेवटीं अन्य होडीवाल्यांनीं सरळ मोबी डिकच्या अंगावरच होडीची धडक मारावी नि त्याला घाबरवून सोडावें असा हुकूम आपल्याला वांचवायला आलेल्या खलाशांना आहाबनें फर्मावला. म्हणजे त्या दरम्यान त्याला व इतरांना भोंवऱ्यांतून सोडविणें बाकीच्यांना सुलभ होईल असा त्याचा होरा होता.

उरलेला दिवस मोबी डिकचा आणखी पाठलाग करण्यांत खर्ची पडला. पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सर्व खलाशांनीं पुन्हां मोबी डिकच्या मागावर आपल्या होड्या हांकारल्या. त्यांनीं त्याला पुन्हां एकदांचें गांठलें आणि त्याच्या पांढऱ्या शुभ्र बगलांमध्यें तीन हार्पूनें घुसविलीं. पण तो येवढ्या प्रचंड शक्तीनिशीं गरगरां फिरला, त्यानें आपलें अंग असें कांहीं वांकडें तिकडें घुसळलें, कीं त्यामुळें हार्पूनांना बांधलेल्या दोरांचा गुंता होऊन सगळ्या होड्या इतस्ततः खेंचल्या गेल्या. होड्यांच्या सुकाणूंवर खलाशांचा ताबा राहिला नाहीं. दोन होड्यांचा तर चक्काचूर झाला. त्यांतल्या खलाशांना दुसऱ्या होड्यांमध्यें वर ओढून घेण्यांत आलें. आहाबच्या होडीला मात्र अजून धक्का लागलेला नव्हता. पण तेवढ्यांत त्याची होडीहि अकस्मात पाण्यांतून वर हवेंत उंच फेंकली गेली. खुद्द कप्तान आहाब व त्याच्या होडींतले इतर खलाशी यांना भराभर दुसऱ्या होड्यांत ओढून घेतलें खरें, पण फिदाउल्लाचा मात्र पत्ता लागला नाहीं.

तिसरा दिवस उजाडला. पुन्हां पाठलाग सुरू झाला. आतां मोबी डिक दमला भागलेला दिसत होता. होडीवाल्यांनीं लौकरच त्याला गांठलें. त्याच्या पाठीवर हार्पूनचीं दांडकीं व त्यांना बांधलेलीं दोरखंडें यांचें भलें मोठें जाळें

पसरलेलें दिसत होतें. त्यांतच फिदाउल्लाचें प्रेत अडकलेलें आढळलें. त्यानें वर्तविलेल्या भविष्याचा पहिला भाग अशा प्रकारें खरा झाला.

तेवढ्यांत जखमांच्या वेदनांमुळें संतापून मोबी डिकनें एकदम होड्यांना धडक दिली व त्यांचीं शकलें उडविलीं. स्टारबुक हा सगळा प्रकार पेक्वोड जहाजावरून बघत होता. त्यानें लगेच जहाजाची दिशा बदलून तें मोबी डिकच्या रोंखानें चालविलें. कांहीं खलाशी व कप्तान आहाब यांचे प्राण तरी वांचवावेत म्हणून हा त्याचा प्रयत्न होता.

परंतु संतापानें बेभान झालेल्या त्या राक्षसी देवमाशानें थेट खुद्द जहाजावरच धडक मारली. जहाजाचे तुकडे तुकडे झाले. आपलें जहाज आपल्या डोळ्यांदेखत बुडत असलेलें पाहून आहाब मोठ्यानें ओरडून म्हणाला– "फिदाउल्लानं सांगितलेली ही दुसरी शववाहक गाडी!" कारण तें जहाज बनविलेलें होतें अमेरिकेंतल्या लांकडांचें. फिदाउल्लानें वर्तविलेलें तिसरें भविष्य असें होतें कीं आहाबचा मृत्यु तागाच्या दोरामुळें होणार. हेंहि नंतर खरें ठरलें. कारण आहाबनें मागाहून फेंकलेल्या हार्पूनचा दोर वेगानें मोबी डिक बरोबर पुढें पुढें सरकत असतांना एक अपघात घडला. दोराचा एक वळसा आहाबच्या मानेभोंवतीं बसून खुद्द तोच आपल्या होडींतून वरच्यावर समुद्रांत ओढला गेला.

अशा प्रकारें इस्माइल वगळून पेक्वोड जहाजावरील सगळे लोक प्राणास मुकले. जहाज बुडतां बुडतां जो प्रचंड भोंवरा झाला, त्यांतून क्वीक्वेगची संपानाच्या आकाराची शवपेटिका तेवढी अलग फेंकली गेली. तिचाच आधार घेऊन इस्माइल कित्येक तास पाण्यांत तरंगत राहिला. तिकडून जाणाऱ्या दुसऱ्या एका जहाजाचें त्याच्याकडे लक्ष गेलें, आणि तो तेवढा वांचला.

अ मॉडर्न कॉमेडी : आधुनिक सुखान्तिका

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* जॉन गाल्सवर्दी (१८६७-१९३३). *कथानकाचा प्रकार :* सामाजिक बखर. *काळ :* १९२२-१९२६. *स्थळ :* इंग्लंड आणि अमेरिका. *प्रथम प्रकाशन :* १९२४, १९२६, १९२८.

प्रमुख पात्रें : **सोम्स फोरसाइट**, एक धनिक इसम. **फ्लर मॉंट**, त्याची कन्या. **मायकेल मॉंट**, त्याचा जांवई. **जॉन फोरसाइट**, फ्लरचा पूर्वीचा प्रियकर. **मार्जरी फेरार**, फ्लरच्या ओळखीची एक महिला.

समीक्षण : इ. स. १८८६-१९२६ या कालखंडांतील फोरसाइट घराण्याचा जो वृत्तान्त जॉन गाल्सवर्दी यानें तयार केला, त्यांतलाच प्रस्तुत कादंबरी हा एक भाग आहे. या समग्र वृत्तान्ताला लेखकानें काळजीपूर्वक तपशीलवार रेखाटलेल्या इंग्लिश समाज-जीवनाच्या पार्श्वभूमीची जोड आहे. या पार्श्वभूमीवर त्यानें एका मोठ्या वरिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबाच्या जीवनाचें चित्रण केलेलें आहे. भरभक्कम व फारच वाचनीय अशी ही कादंबरी वाङ्मयीन दृष्ट्या मौल्यवान असून एक सामाजिक बखर या दृष्टीनेंहि तिला फार महत्व आहे. मुळांत 'व्हाइट मंकी,' 'सिल्व्हर स्पून' व 'स्वान साँग' अशा तीन वेगवेगळ्या कादंबऱ्या व त्यांना जोडणाऱ्या दोन कथा अशा स्वरूपांत ही कादंबरी प्रसिद्ध झाली. इ. स. १९२० ते १९२९ या कालखंडांतील ब्रिटिश जीवनाच्या विविध प्रवाहांची नोंद म्हणून गाल्सवर्दीनें रेखाटलेला हा सामाजिक इतिहास मोलाचा ठरतो.

कथानक : प्रॉव्हिन्शियल प्रीमियम रीॲशुअन्स सोसायटीचा एक डायरेक्टर म्हणून सोम्स फोरसाइट याची निवड झालेली होती. त्याच्या मुरब्बी मतांना न जुमानतां सोसायटीनें आपलें बरेंचसें भांडवल परराष्ट्रांच्या सरकारी रोख्यांमध्यें गुंतविलेलें होतें. त्या वेळीं युरोपमधील निरनिराळ्या देशांचे हुंडणावळीचे दर फारच अस्थिर होते, म्हणून सोम्स यानें असा आग्रह धरला कीं भागीदारांना सादर करायच्या रिपोर्टांत सगळे तपशील द्यावेत. त्यानंतर लवकरच सोसायटीचा एक कारकून बटरफील्ड यानें मॅनेजर एल्डरसन व एक जर्मन इसम यांचें आपसांतलें बोलणें ओझरतें ऐकलें. जर्मनीमध्यें सोसायटीनें गुंतविलेल्या पैशांवर एल्डरसन याला कमिशन दिलेलें होतें. म्हणून जर्मन मार्कच्या हुंडणावळीचा भाव जर घसरला तर त्यामुळें होणारी सोसायटीची नुकसानी डायरेक्टर बोर्डाकडून भरून घेण्याची तरतूद एल्डरसन यानें करावी असा त्या जर्मन इसमाचा आग्रह होता. यावरून एल्डरसन याजवर लांचलुचपतीचा आरोप आला. त्यानें हा आरोप नाकारला व बटरफील्डला नोकरीवरून काढून टाकलें. याबाबत अधिक पिच्छा पुरविला गेल्यावर मात्र एल्डरसन युरोपांत पळून गेला. अशा प्रकारें त्याला डायरेक्टर बोर्डानें निसटूं दिलें म्हणून भागीदार खूपच चिडले. मॅनेजरचा अप्रामाणिकपणा अगोदर उघडकीस आणणें निरर्थक ठरलें असतें असा खुलासा सोम्स यानें केला, पण त्याला सभेंत पाठिंबा असा

अगदींच कमी मिळाला. म्हणून त्यानें डायरेक्टरपदाचा राजीनामा दिला.

सोम्स याचा जांवई मायकेल मॉंट हा प्रकाशक होता. सोसायटींतली नोकरी सुटल्यावर बटरफील्ड याला या जांवयाकडे सोम्सनें नोकरी देवविली. त्या प्रकाशन संस्थेंत खास आवृत्तींचा विक्रेता म्हणून बटरफील्ड याला बरीच बरकत झाली.

मायकेलची पत्नी फ्लूर हिला वडिलांच्या जादा लाडांमुळें चांगलें वळण लागलेलें नव्हतें. ती स्वभावानें चंचल व उल्लू होती आणि पतीवर तिचें विशेष प्रेम नव्हतें. विल्फ्रेड डेसर्ट हा चित्रकार तिच्यावर फार प्रेम करी. तथापि त्याच्या-कडून आपल्याला फार तर रोमहर्षक अनुभव मिळतील, प्रेम नव्हे, हें ती जाणून होती. अखेरीस विल्फ्रेड अरबस्तानला गेला. त्यानंतर कांहीं काळ फ्लूर व मायकेल यांचे परस्परसंबंध अधिक सुखाचे दिसले. तिला एक मुलगा झाला. त्याचें नांव क्रिस्टोफर ठेवलें.

लग्न होण्यापूर्वी आपला चुलत भाऊ जॉन फोरसाइट याच्यावर तिचें प्रेम होतें. तथापि कौटुंबिक तेढीमुळें त्याच्याशीं तिला लग्न करतां आलें नाहीं. मग जॉन अमेरिकेंत स्थाइक झाला. तिथें ॲन विल्मॉट हिच्याशीं त्याचें प्रेम जमलें व लग्न झालें. ही दक्षिणेकडील होती.

क्रिस्टोफरच्या जन्मानंतर साधारण वर्ष गेलें असेल नसेल, त्या सुमाराला मायकेलनें पार्लमेंटमध्यें प्रवेश केला. पतीला मदत म्हणून आणि आपलीहि करमणूक व्हावी म्हणून फ्लूर अनेक प्रतिष्ठित लोकांना आपल्या घरीं चहापान-भोजनाला बोलावीत असे. अशाच एका रात्रीं सोम्स समारंभाला हजर असतांना फ्लूरची एक पाहुणी मार्जरी फेरार हिच्या तोंडून फ्लूर फाजील शिष्ट असल्याचे उद्गार त्यानें ओझरते ऐकले. तें ऐकतांच सोम्सनें तिला तत्काळ घरांतून निघून जायला सांगितलें. आपल्या वडिलांनीं या बाबतींत अशी ढवळाढवळ करायला नको होती म्हणून फ्लूरनें त्यांच्यावर राग काढला आणि असला नको तो प्रसंग ओढवून आणल्याबद्दल तिनें मार्जरीलाहि दोष दिला. सोम्सनें आपली क्षमा मागितली पाहिजे असा मार्जरीनें आग्रह धरला. हें प्रकरण आपण मिटवून टाकूं असें त्यानें सुचविलें असतांहि तिनें आपला आग्रह कायम ठेवला आणि कोर्टांत त्याच्यावर फिर्याद केली. असें वादाला एकदां तोंड लागल्यावर त्यानें व त्याच्या वकिलानें खटपटी लटपटी करून असें सिद्ध केलें कीं मार्जरी ही बेजबाबदार नीतिमत्तेची बाई आहे. अशा प्रकारें या खटल्यांत फ्लूरचा विजय झाला. पण

तिच्या अनेक जुन्या मित्रांकडून तिला कानपिचक्याच मिळाल्या. त्यामुळें तर ती अधिकच दुःखीकष्टी झाली.

जॉन फोरसाइटची पत्नी ॲन हिचा भाऊ फ्रान्सिस विल्मॉट हा एकंदरींत इंग्लंड कसें काय आहे तें पाहायला अमेरिकेहून आला. कांहीं काळ तो फ्लर व मायकेल यांच्याकडेच राहायला होता. पुढें त्याचें प्रेम मार्जरी फेरारवर बसलें. मार्जरी व फ्लर यांचा तंटा झाल्यानंतर तो त्यांच्या घरांतून बाहेर पडला. तथापि मार्जरीनें त्याच्याशीं लग्न करायला नकार दिला. तिच्या मतें अमेरिकेंतील जीवन रुक्ष असून त्यांत त्याला साथ द्यायला ती तयार नव्हती. एका अगदीं बाजूच्या हॉटेलमध्यें फ्रान्सिस एकाकी राहत असतांना त्याला न्युमोनिया झाला. त्या आजारांत फ्लरनें त्याची प्रेमळपणें शुश्रूषा केली नसती तर तो मेलाच असता. तो बरा झाला व अमेरिकेला परतला.

लंडनमधील आपल्या जीवनाला फ्लर कंटाळली. वडिलांना गळ घालून त्यांच्याबरोबर ती जगाच्या सफरीवर गेली. पार्लमेंटची चालू बैठक तहकूब होईपर्यंत मायकेलला लंडन सोडणें अशक्य होतें. सध्यां तो 'फोगार्टिझम' चा पुरस्कर्ता झालेला होता. सर्वांनीं शेतीवर भर द्यावा आणि ब्रिटिश साम्राज्याच्या अंकित देशांमध्यें गरीब ब्रिटिश नागरिकांच्या मुलांना वस्ती करायला धाडावें अशी या 'फोगार्टिझम' ची मतप्रणाली होती. म्हणून आपण लंडनमध्यें राहिलें पाहिजे असें त्याला वाटत होतें. शेवटीं पांच महिन्यांनंतर कॅनडांतील व्हॅन्कूव्हर येथें फ्लर व सोम्स यांना मायकेलनें गांठावें असा त्यांचा बेत ठरला. दरम्यान छोट्या क्रिस्टोफरला संभाळायचें काम त्याच्या आजीनें म्हणजे सोम्सच्या पत्नीनें पतकरलें.

वॉशिंग्टन येथें असतांना फ्लर, मायकेल व सोम्स हीं एका हॉटेलांत राहत होतीं. त्याच हॉटेलांत जॉन फोरसाइट व आयरीन हीं मायलेंकरेंहि राहत होतीं. या ठिकाणीं कित्येक वर्षांनीं सोम्सला आपली घटस्फोटित पत्नी पुन्हां पाहायला मिळाली. मोठ्या धोरणी हुशारीनें तो त्या परिस्थितींत मागें मागेंच राहिला. फ्लर आणि जॉन यांची गांठ भेट होऊं नये अशी दक्षता त्यानें बाळगली.

सफर संपवून लंडनला परतल्यावर फ्लर कांहीं तरी करायला उत्सुक झाली. मार्जरी फेरार प्रकरण जवळ जवळ विस्मृत झालें होतें. त्या वेळीं १९२६ चा

सार्वत्रिक संप सुरू झाल्यावर स्वयंसेवक कामगारांसाठीं फ्ळरनें एक कॅंटीन चालू केलें. एके दिवशीं तेथें तिला जॉन फोरसाइट दिसला. संपाच्या काळांत काम करण्यासाठीं तो फ्रान्सहून आला होता. जॉनची सदसद्विवेकबुद्धि त्याला पुन्हां फ्ळरच्या प्रेमांत पडूं देईना. तिनें मात्र जास्तींत जास्त वेळां त्याचा सहवास घडेल असे बनाव घडवून आणले. एकच रात्र तीं दोघें एकत्र आलीं. पण त्यानंतर दुसऱ्याच दिवशीं जॉननें तिला लिहिलें, " मी तुला पुन्हां भेटूं शकणार नाहीं. "

' फोगार्टिझम ' जनतेला अजिबात आवडेनासा झाला. लंडनमधील गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यांत मायकेल लक्ष घालूं लागला. जॉननें धुडकावून लावल्याची चीड अजूनहि फ्ळरच्या मनांत डांचत होती. तिनें कामगार तरुणींसाठीं ग्रामीण भागांत एक आरोग्यधाम सुरू केलें. मायकेलच्या उद्योगांतून त्याला एक धडा शिकायला मिळाला. मुलांच्या खस्ता खाण्यांत व त्यांच्या संगोपनांत किती का त्रास होईना, गरीब लोक आपल्या मुलांना आपल्यापासून दूर करायला कधींहि राजी झाले नसते, हाच तो धडा. म्हणूनच 'फोगार्टिझम' चा नाद आपण सोडला हें बरें झालें हें त्याच्या ध्यानांत आलें.

युद्धोत्तर परिस्थितींतील सांवळा गोंधळ आणि कौटुंबिक परिस्थितींतील बेचैनी, कडवटपणा, यामुळें सोम्स अलीकडे दुःखी कष्टी झाला होता. मनाला विरंगुळा मिळावा म्हणून तो मोठमोठ्या चित्रकृतींच्या आपल्या संग्रहालयांत अधिकाधिक वेळ घालवूं लागला. याच काळांतील एका रात्रीची गोष्ट. धुराच्या कडवट वासानें त्याला जाग आली. आपल्या घरांतील चित्रसंग्रहाच्याच गॅलरीला आग लागलेली आहे हें भयानक दृश्य त्याला दिसलें. आपल्या शोफरच्या मदतीनें धांवाधांव करून अनेक चित्रें खिडकींतून खालीं भिरकावून त्यानें आगींतून वांचविलीं. त्या दोघांना त्या खोलींत राहणेंच अशक्य झाल्यावर ते बाहेर पडले. तोंपर्यंत बाहेर जमा झालेल्या बंबवाल्यांचें मग सोम्सनें कसेंबसें मार्गदर्शन केलें. तेवढ्यांत त्याला एक प्रकार दिसला. खूप मोठी वजनदार फ्रेम असलेलें एक चित्र खिडकींतून खालीं कोसळायच्या बेतांत होतें. ती फ्रेम आपल्या अंगावर कोसळावी म्हणून फ्ळर मुद्दाम खिडकीखालीं उभी असलेली त्याला दिसली. तत्काळ तिला बाजूला ढकलायला तो पुढें धांवला आणि त्या धडपडींत त्या पडणाऱ्या फ्रेमचा मारा त्याच्या अंगावरच झाला. त्या जखमांमुळें आणि त्यामुळें आलेल्या ग्लानीनें त्याला मरण आलें. या घटनेमुळें फ्ळरचें मन अधिकच खिन्न झालें. कारण आपण

मरायला उत्सुक झालों आणि त्या पायींच आपल्या वडिलांचें मरण ओढवलें हें ती जाणून होती. तथापि सोम्सच्या या मृत्यूमुळेंच ती भानावर आली. जॉन-बरोबरचा तिचा प्रेमसंबंध येथेंच कायमचा खलास झाला याबद्दल मायकेलची खातरजमा झाली.

प्राइड अँड प्रेज्युडिस : अहंभाव आणि पूर्वग्रह

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखिका :* जेन ऑस्टेन (१७७५-१८१७). *कथानकाचा प्रकार :* आनंदपर्यवसायी शिष्टसमाज-दर्शन. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचीं आरंभींचीं वर्षें. *स्थळ :* इंग्लंडमधील ग्रामीण विभाग. *प्रथम प्रकाशन : १८१३.*

प्रमुख पात्रें : **मिस्टर बेनेट**, पांच मुलींचे वडील. **मिसेस बेनेट**, त्यांची पत्नी. **एलिझाबेथ बेनेट**, वडिलांची विशेष आवडती कन्या. **जेन बेनेट**, कुटुंबांतील स्वरूप-सुंदरी. **मेरी-कॅथरीन(किट्टी)-लिडिया बेनेट**, तिच्या धाकट्या बहिणी. **मिस्टर बिंग्ले**, एक विवाहेच्छु तरुण. **कॅरोलिन बिंग्ले**, त्याची बहीण. **मिस्टर डार्सी**, एक अभिमानी गृहस्थ, बिंग्लेचा मित्र. **मिस्टर कॉलिन्स**, एक चढेल इसम. **लेडी कॅथरीन द् बर्ग**, कॉलिन्सची घमेंडखोर आश्रयदाती.

समीक्षण : इंग्रजी भाषेंतील कादंबऱ्यांमध्यें केवळ एलिझाबेथ बेनेट या आपल्या असामान्य नायिकेमुळेंच 'प्राइड अँड प्रेज्युडिस' आपलें वैशिष्ट्यपूर्ण स्थान कायम टिकवून राहील. कारण एलिझाबेथ ही कोणत्याहि काळच्या रसिकाला हृद्य व आनंददायक वाटेल अशीच असामान्य नायिका आहे. याशिवाय या कादंबरीला सुंदर प्रमाणबद्ध कथानक लाभलेलें आहे. एखादी सागरावरील लाट जशी अनिवार्यपणें वर चढते, खालीं जाते, तशीच या कथेंतील घटनांची रचना आहे. एलिझाबेथच्या जोडीला या कादंबरींतील आणखीहि कित्येक पात्रें अत्यंत हळुवार कुशल हातानें चितारलेलीं आढळतात.

लेखिका जेन ऑस्टेन हिनें आपल्या काळच्या ग्रामीण इंग्रज प्रतिष्ठित समाजावर—हा बहुधा तिच्याच आसपासच्या परिसरांतला असावा—जी नाजुक पण परिणामकारी उपहासगर्भ टीका केलेली आहे, ती आल्हाददायक तर आहेच, पण तींतील प्रभावी प्रहारांचा रोख मानवी स्वभावांतील बारीकसारीक व्यंगांवरच असल्याचें आढळून येतें.

कथानक: मिसेस बेनेट यांच्या आयुष्यांतला मुख्य धंदा एकच. आपल्या मुलींसाठीं त्यांना साजेसे वर शोधून काढणें! अर्थातच त्या दृष्टीनें उपयोगी अशा सर्व गोष्टींवर त्यांचें लक्ष असे. आपल्या आळींतल्या 'नेदरफील्ड पार्क' नामक मोठ्या वाड्यांत मिस्टर बिंग्ले हा प्रतिष्ठित तरुण लंडनहून अलीकडेच राहायला आला आहे ही बातमी ऐकतांक्षणीं त्यांना जरा फुशारल्यासारखें झालें.

त्यांना गांवगप्पांची फार आवड. बिंग्ले हा खूप श्रीमंत आहे हें त्यांतूनच त्यांना नवीन समजून आलें. अर्थात तो लग्नाला योग्य असा उमेदवार ठरला. ही बातमी त्यांनीं आपल्या पतिराजांना सांगितली. पण त्या स्वारीनें तें सगळें आपल्या नेहमींच्या निर्विकार शांत वृत्तीनेंच ऐकून घेतलें. मग आपल्या सरावांतल्या मृदु पद्धतीनें त्यांनीं अशी शंका प्रदर्शित केली कीं बेनेट कुटुंबांतील मुलींपैकीं एखादीला पतकरण्याच्या एकमेव हेतूनें आपल्या खेड्याकडे हा इसम निश्चितपणें झुकलेला नसावा.

शेजारीं एक नृत्यसमारंभ झाला. त्या निमित्तानें मिस्टर बिंग्ले त्या परिसरांत पहिल्या प्रथम समाजांत चमकला. त्या वेळीं त्याच्या बरोबर त्याच्या दोन बहिणी, मोठ्या बहिणीचे यजमान व खुद्द मिस्टर बिंग्लेचा मित्र मिस्टर डार्सी असा परिवार होता. स्थानिक समाजांत बिंग्ले तत्काळ लोकप्रिय झाला. बेनेट कुटुंबांतील ज्येष्ठ कन्या जेन मोठी गोड व आकर्षक, साधीसुधी व सुस्वभावी होती. तिचें व बिंग्लेचें लगेच सूत जमलें.

त्याचा मित्र डार्सी याच्याविषयीं मात्र लोकमत कांहींसें प्रतिकूल झालें. सगळ्यांना तो रुक्ष व अहंमन्य वाटला. एलिझाबेथ बेनेटचा तर त्यानें अपमानच केला.

एलिझाबेथ ही तडफदार, चलाख व बुद्धिमान होती. आपल्या वडिलांचीहि फार आवडती. नृत्य करायला जोडीदार नाहीं, म्हणून ती बसली होती. तरी तिला घेऊन नृत्य करायचें डार्सीनें नाकारलें. दुसऱ्यांनीं नको म्हटलेल्या तरुणींची निवड करायची आपल्याला संवय नाहीं असें तो तिला स्पष्ट ऐकूं जाईल येवढ्या मोठ्यानें बोलला. पण पुढील कांहीं प्रसंगीं मात्र तो स्वतःला नकळतच तिच्याकडे प्रभावीपणें आकर्षित झाला. तिची तो स्तुति करूं लागला. नंतरच्या एका नृत्यसमारंभांत त्याची जोडीदारीण व्हायला चक्क नकार देऊन तिनेंहि आपल्या पूर्वीच्या अपमानाचें उट्टें काढण्याचें समाधान मिळविलें.

बिंग्ले आणि जेन यांच्या प्रेम प्रकरणाची चांगली आणि संथ प्रगति होत

गेली. परस्पर गांठीभेटी, भोजनें, नृत्यसमारंभ अशा सर्व मार्गांनीं हा संबंध दृढ व्हायला आणखी मदत झाली. त्याच्या दोघी बहिणी तिच्याविषयीं आपल्याला खूप प्रेम असल्याचें दर्शवीत होत्या. भाबड्या जेनला त्यांचें हें सगळें खरें वाटलें.

पण एलिझाबेथ अधिक चाणाक्ष व सखोल दृष्टीनें पाहणारी होती. बिंग्ले भगिनींचा दांभिकपणा तिनें तत्काळ ओळखला. कारण त्या दोघीजणी जेनच्या नातेवाइकांची खूपच टिंगल टवाळी करीत. विशेषतः तिची खेडवळ व बडबडी आई आणि अर्धवट शिकलेल्या व ऑफिसरांसाठीं वेड्या झालेल्या तिच्या दोघी धाकट्या बहिणी यांची तर त्या फारच रेवडी उडवीत.

खरें म्हणजे मिस कॅरोलिन बिंग्ले हिला बेनेट कुटुंबाची अशी बेछूट टिंगल करावीशी वाटायला तसेंच एक गुप्त कारण होतें. डार्सीशीं लग्न करायला ती स्वतःच उत्सुक होती. पण तो एलिझाबेथकडे अधिकाधिक आकर्षित होत आहे व तिचीच जास्त स्तुति करतो हें तिच्या धूर्त दृष्टीनें अचूक हेरलें होतें.

एका प्रसंगीं तर खुद्द एलिझाबेथच तिच्या टवाळीचा विषय झाली. तो प्रसंग असा घडला. बिंग्लेभगिनींनीं दिलेलें आमंत्रण स्वीकारल्याचें कळवायला जेन पावसांतून भिजत नेदरफील्ड पार्कला गेली. त्या थंडीच्या परिणामीं ती आजारी झाली आणि तिथेंच राहिली. तिची चौकशी करायला एलिझाबेथ तीन मैल चिखल तुडवीत तिकडे गेली. तिचा हा उपद्व्याप त्या भगिनींना व त्यांतल्या त्यांत कॅरोलिनला हास्यास्पद वाटून तिनें तिची टिंगल केली. पण जेनला बरें वाटून तिला घरीं परत नेतां येईपर्यंत एलिझाबेथला तिच्या शुश्रूषेसाठीं तिथें राहणें भाग पडलें. पुन्हां तिच्या तिथल्या त्या वास्तव्यांत डार्सी अनेकदां तिच्या मागें घोंटाळतांना दिसे. त्यामुळें उलट कॅरोलिन अतिशय बेचैन होऊ लागली. जेन एकदांची लवकर बरी होऊं दे आणि एलिझाबेथची ही पीडा इथून टळूं दे असें ती मनापासून चिंतूं लागली. तिच्या मनांतले हे विकल्प अगदींच बिनबुडाचे नव्हते. कारण एलिझाबेथच्या प्रभावामुळें आपलें मन केव्हां एखाद्या गोंधळांत गुंतेल त्याचा कांहीं नेम नाहीं असें खुद्द डार्सीलाच मनोमन वाटत होतें. पण कांहीं झालें तरी ती जरा खालच्या थरांतल्या कुटुंबांतील मुलगी होती हाच एक प्रत्यवाय मात्र त्याच्या मार्गांत उभा होता.

त्यानंतर एलिझाबेथला एक नवाच स्तुतिपाठक लाभला. त्याचें नांव कॉलिन्स. जरा जादा डामडौल करणारा हा धर्मोपदेशक तिला एकंदरीनें हास्या-

स्पदच वाटायचा. बेनेट कुटुंबाचा हा दूरचा नातलग. मिस्टर बेनेट यांना मुलगा नसल्यामुळें त्यांची इस्टेट केव्हां तरी आपल्यालाच मिळणार अशी त्याची कल्पना होती. त्याची आश्रयदाती होती लेडी कॅथरीन द बर्ग. यानें आतां लग्न करावें असा तिनें आग्रह चालविला. या बाईचा प्रत्येक शब्द झेलायचा व तिच्यापुढें तोंडपुजेपणा करायचा अशी त्याची वृत्ति होती. तिची आज्ञा त्यानें शक्य तितक्या लवकर अंमलांत आणायचें ठरविलें.

बेनेट कुटुंबाचें धन आपल्याकडेच येणार व त्यामुळें त्या मुलींवर पुढें मागें दारिद्र्य ओढवणार, त्यांतून त्यांची अंशतः तरी सुटका करावी, म्हणून कॉलिन्सनें एका दृष्टीनें मोठें मन करूनच एलिझाबेथला मागणी घातली. पण तिनें ती तत्काळ व निश्चितपणें झिडकारून टाकली. यामुळें मिस्टर बेनेट जरी आनंदले तरी तिच्या आईचा मात्र तिच्यावर रोष झाला.

हा असा प्रकार घडल्यावर कॉलिन्सनें आपला पवित्रा बदलला. एलिझाबेथची जिवाभावाची मैत्रिण शारलॉट ल्यूकस हिच्याकडे त्यानें आपल्या प्रेमाचा ओघ वळविला. ही सुमारें सत्तावीस वर्षें वयाची व संसारी वृत्तीची होती. त्यानें मागणी घालतांच हिनें पटकन होकार दिला.

हा कॉलिन्स घरांत आलेला असतांना आणखी एक घटना घडली. किट्टी आणि लिडिया ह्या त्या घरांतल्या धाकट्या बहिणी मेरिटोनकडे अनेकदां फिरायला जात असत. तिकडे त्यांना लष्करांतला एक तरुण अधिकारी भेटला. त्याचें नांव विकहॅम. जवळपास कँप असलेल्या रेजिमेंटमध्यें त्याची नेमणूक होती. तो वर वर तरी आकर्षक व प्रभावी व्यक्तित्व असलेला माणूस होता. त्यामुळें तरुणींमध्यें तो लोकप्रिय झाला. एलिझाबेथला देखील तो आवडूं लागला. त्यानें स्वतःविषयीं सांगितलेली हकीगत जरा विलक्षण होती. तो म्हणाला—
"डार्सीचे वडील हे माझे मानलेले वडील. त्यांच्याकडून मला वारसा हक्कानं कांहीं संपत्ति मिळायची होती. पण त्या बाबतींत माझी फार फसवणूक झाली."
हा वृत्तांत एलिझाबेथला खरा वाटायला लागला. डार्सीच्या उद्धट व लोभी स्वभावाविषयीं तिला वाटणाऱ्या शंका आणखी बळावण्याला तसेंच एक कारणहि घडलें. बिंग्ले मंडळीकडे एक नृत्यसमारंभ होता. तिथें विकहॅम आला नाहीं; कारण डार्सी तिथें येणार हें त्याला माहीत होतें.

हा नृत्यसमारंभ आटोपल्यावर लवकरच सगळें बिंग्ले कुटुंब नेदरफील्ड

पार्क सोडून गेले. जातांना कॅरोलिननें निरोप घेणारी एक चिठी जेनला लिहिली ती अशी: "आम्ही सगळी मंडळी आतां इकडे परत येणार नाहीं. माझ्या भावाचा वाङ्निश्चय डार्सीच्या बहिणीबरोबर होण्याची शक्यता आहे." हा सारा मजकूर जेन बिचारी खरा धरून चालली. आपण आतां बिंग्लेच्या प्रेमाची आशा सोडून द्यावी, कारण त्याचें मन अन्यत्र गुंतलें आहे, असा हळुवार इशाराच आपल्या मैत्रिणीनें दिला आहे असें तिला वाटलें.

हें पत्र एलिझाबेथला मात्र निराळेंच वाटलें. बिंग्ले आणि जेन यांची एकमेकांपासून ताटातूट करण्यासाठीं डार्सी व त्या दोघी बहिणी यांनीं हा कट रचला असावा असें आपलें स्पष्ट मत झालें असल्याचें तिनें जेनला सांगितलें. ती म्हणाली: "बिंग्लेचं तुझ्यावर नक्की प्रेम आहे. हिंवाळा संपायच्या आंतच हर्टफोर्डशायरला तुला भेटायला म्हणून तो नक्की परत येणार आहे."

तिचें हें म्हणणें जेनलाहि पटलें. पण तेवढ्यांत तिला कॅरोलिनचें आणखी एक पत्र आलें तें असें: "आम्ही सारींजणं हिंवाळ्यांत लंडन मुक्कामींच राहणार आहोंत." तरी देखील एलिझाबेथला आपलें पूर्वीचें मत बदलावेसें वाटेना. आपल्या बहिणीवर बिंग्लेचें प्रेम आहे याविषयीं तिला पक्की खात्री होती. मात्र त्याच्या अंगीं निर्धार हा गुण नाहीं, आणि म्हणूनच तो आपल्या कारस्थानी मित्रांच्या हातांतलें केवळ लुकण बनला आहे, याचा तिला विषाद वाटला.

याच सुमारास या मुलींची मावशी मिसेस गार्डिनर त्यांच्या घरीं आली. आपल्या दोघी ज्येष्ठ भाच्यांवर तिचा फार लोभ होता. ती नाताळच्या सणासाठीं इकडे आली होती. बोलतां बोलतां तिनें सुचविलें कीं जेननें हवापालट करायला व विश्रांति घ्यायला आपल्याबरोबर लंडनला यावें. खरें म्हणजे एलिझाबेथ व तिची मावशी या दोघींनीं मुद्दाम हा डाव गुप्तपणें रचलेला होता. लंडनच्या मुक्कामांत बिंग्लेच्या मैत्रीला उजाळा देण्याची संधि जेनला मिळवून द्यावी हाच तो डाव. पण हा डाव फारसा यशस्वी होईल अशी एलिझाबेथला आशा व खात्री नव्हती. कारण लंडनच्या ग्रेसचर्च स्ट्रीटवरील गार्डिनर मंडळींच्या घराकडे जेनची भेट घेण्यासाठीं आपल्या मित्राला फिरकायला अहंमन्य डार्सी कधींच वाव देणार नाहीं, हें तिनें मावशीला बोलून दाखविलें. पण हें त्या दोघींचें खासगी रहस्य होतें. जेननें मावशीचें निमंत्रण स्वीकारलें आणि ती तिच्याबरोबर लंडनला निघून गेली.

नावडत्या कॉलिन्सबरोबर एलिझाबेथची मैत्रीण शारलॉट ल्यूकस हिचें लग्न होण्याची ठरलेली तारीख जवळ येत होती. तिनें आपल्याला केंट परगण्यांत येऊन भेट अशी एलिझाबेथला विनंति केली. या भेटींत कांहीं अर्थ उरला नाहीं असें वाटत असूनहि तिनें हें निमंत्रण स्वीकारलें. शारलॉटनें हें स्थळ केवळ पैशाकडे पाहून पतकरलें याचें एलिझाबेथला राहून राहून वैषम्य वाटत होतें. आपल्या मैत्रिणीच्या या उतावळ्या निर्णयाला आपली सहानुभूति मिळणें शक्य नाहीं आणि म्हणून तिच्याविषयींचा आपला जिव्हाळा संपला असें ती गृहीत धरून चालली. पण मार्च महिना जवळ येऊं लागल्यावर तिला आपल्या मैत्रिणीला भेटायची तीव्र ओढ लागली. शारलॉटचे वडील व तिची बहीण यांच्याबरोबर ती आनंदानें लग्नाला हजर राहायला रवाना झाली.

वाटेंत या मंडळींनीं लंडन शहरीं गार्डिनर कुटुंबाकडे मुक्काम केला. जेनची प्रकृति एलिझाबेथला वरवर तरी छान दिसली. पण बिंग्ले-भगिनी एकदांच घाई-घाईनें भेटून गेल्या असल्या तरी खुद्द मिस्टर बिंग्ले अजूनहि तिला भेटलेला नाहीं हें तिला जेनकडून कळलें. जेन लंडनला आलेली आहे ही बातमीहि बिंग्लेला कळलेली नसणार, असेंच एलिझाबेथला खात्रीपूर्वक वाटलें. तिनें याबाबत डार्सीला दोषी ठरविलें.

कॉलिन्स कुटुंबाच्या घरीं सगळी मंडळी जाऊन पोंचल्यावर लेडी कॅथरीन द बर्ग यांजकडून सर्वांना जेवायचें निमंत्रण आलें. "तुमचा हा मोठा सन्मान होतोय" असें कॉलिन्सनें त्यांना पुन्हां पुन्हां सुनावलें. कॉलिन्सची ही आश्रय-दाती लेडी कॅथरीन म्हणजे डार्सीची आत्या होती.

भोजनसमारंभाच्या वेळीं लेडी कॅथरीनचें दर्शन एलिझाबेथला घडलें. ही एक मग्रूर व उद्धट स्वभावाची बाई आहे, चारचौघांत नीट सभ्यपणानें कसें वागायचें हेंहि हिला समजत नाहीं, असें एलिझाबेथला वाटलें. तिची मुलगी तर काटकोळी, रोगिष्ट नि लाजाळू दिसली. इतरांच्या खासगी गोष्टींत पुन्हां पुन्हां नाक खुपसायची या बाईला फारच आवड असल्याचें दिसत होतें. कुणाविषयीं कांहीं तरी ऐकून ज्याला त्याला अनाहूत उपदेश व सल्ला देत राहणें हा या बाईला जणूं आपला जन्मसिद्ध हक्कच वाटत असावा! आपल्या या वृत्तीचा प्रयोग हिनें एलिझाबेथवर करून पाहिला. पण हिच्या प्रत्येक विसंगत प्रश्नाला तिनें थंड्या अप्रत्यक्षपणानें डावललें. या भंपक बाईला अशा प्रकारें तोंड देऊन धिटाईनें गप्प बसविणाऱ्या

बहुधा आपणच्च पहिल्या वहिल्या असूं अशी एलिझाबेथची खात्रीच झाली. या प्रश्नोत्तरांचा तसा जबरदस्त परिणाम लेडी कॅथरीनवर झालेला स्पष्ट दिसत होता.

एलिझाबेथ तिथें आली आणि लवकरच डार्सीहि आपल्या आतेला व आतेबहिणीला भेटायला आला. तिथून तो अनेकदां चर्चेला जाऊं लागला. या ठिकाणीं तो व एलिझाबेथ यांच्या पूर्वीच्या ओळखीला थोडा उजाळा मिळाला. अनेकदां उभयतांचे अटीतटीचे शाब्दिक खटके उडूं लागले. तिच्याविषयींचा परकेपणा हळू हळू कमी होत जाऊन डार्सीच्या वृत्तीला एकदम कलाटणी मिळाली आणि त्यानें तिला मागणी घातली. पण या मागणींत त्याचा अहंपणा जाणवत होता. तिला गर्वाचें आवरण होतें. हिच्या बाबतींत आपण खालच्या पातळीवर जात आहोंत व हिच्यावर एक प्रकारें उपकारच करीत आहोंत असा भाव त्या मागणीमागें दडलेला दिसत होता. म्हणून तिनें ही मागणी तिथल्या तिथें धुडकावून लावली.

आपली मागणी हिनें अशी तडकाफडकीं कां नाकारली याचें स्पष्टीकरण त्यानें तिच्याजवळ मागितलें. याला उत्तर म्हणून तिनें एकामागून एक अनुभवांचे दाखले त्याच्या तोंडावर फेंकले. बिंग्ले व जेन यांची ताटातूट व विकहॅमवरील अन्याय यांचा तिनें यांत प्रामुख्यानें निर्देश केला. हें ऐकून डार्सी खूपच संतापला आणि एकाएकीं तिथून निघूनहि गेला. पण दुसऱ्या दिवशीं तिला त्याचें एक पत्र आलें. त्यांत आपल्यावरील सगळ्या आरोपांचें त्यानें आपल्या दृष्टीनें तपशीलवार निराकरण केलेलें होतें.

"जेन व बिंग्ले यांची ताटातूट करण्यांत माझा हात होता हें कबूल. पण त्याला तशींच सबळ कारणें आहेत. तुझ्या आईचें वर्तन औचित्याला सर्वस्वीं सोडून असतें. तुझ्या धाकट्या बहिणीहि रांगड्या व बडबड्या असून माझ्या तोलाच्या नाहींत असें माझें स्पष्ट मत आहे. मुख्य म्हणजे जेनचें प्रेमच बिंग्लेवर नाहीं असें माझें प्रामाणिक मत आहे.

"विकहॅमशीं मी वाईट रीतीनें वागलों हा आरोप मला मुळींच मान्य नाहीं. याच्या उलट त्या ध्येयशून्य, तत्वशून्य इसमाशीं मी अधिकांत अधिक उदार मनानें वागलों आहे. त्यानें मात्र माझ्या या उपकाराची फेड अपकारानें केली आणि माझ्या धाकट्या बहिणीला घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला."

डार्सीचें तें पत्र वाचतांना सुरवातीची त्याची ती अहंमन्य ताठर भाषा

व शिष्ट वृत्ति यांची एलिझाबेथला चीड आली. पण पत्राचें शेवटपर्यंत वाचन केल्यावर तिचा राग ओसरला. त्याच्या लिहिण्यांतला न्यायाचा भाग मान्य करणें तिला भागच होतें. आणि त्यामुळें डार्सीविषयींचे तिच्या मनांतील सारे गैरसमज, पूर्वग्रह हळूहळू कमी होत गेले.

तथापि ती त्याची पुन्हां भेट न घेतांच तडकाफडकीं घरीं परतली. घरीं येऊन पाहते तों आपल्या धाकट्या बहिणी ब्रायटनला जायचा हट्ट धरून बसल्या आहेत असें तिला आढळून आलें. मेरिटोनला पूर्वी जें रेजिमेंट होतें तें त्याला मिळालेल्या हुकुमानुसार आतां तिकडे गेलें होतें. तिथल्या एका तरुण लष्करी अधिकाऱ्याच्या पत्नीचें लिडियाला आमंत्रण आलें होतें. या बाबतींत एलिझाबेथच्या विरोधाला न जुमानतां लिडियाला तें निमंत्रण स्वीकारायची परवानगी मिळाली.

खुद्द एलिझाबेथ हिला तिच्या मावशीचें निमंत्रण होतें. ही गार्डिनर मंडळी फिरतीवर निघाली होती आणि त्या प्रवासांत ती वाटेंत डर्बीशायरला जाणार होती. हा तर डार्सीचें जन्म-गांव असलेला परगणा. आपण नुसते त्या भागांत गेलों म्हणून आपली व त्याची भेट होईलच असें नाहीं, असा आपल्या मनाशीं युक्तिवाद करून ती मावशीबरोबर जायला निघाली. पण ती मंडळी तिथें गेल्यावर मावशीनें पेम्बर्लीला जायचें ठरविलें. हें तर डार्सीचें जन्म-गांवच. तिथें न जाण्यासाठीं एलिझाबेथनें सतरा सबबी तयार केल्या. पण मावशीनें तिला आपल्याबरोबर न्यायचा हट्ट सोडला नाहीं. पण डार्सी कुटुंबाचें वास्तव्य सध्यां तिथें नसल्याचें तिला तेवढ्यांत कळलें. म्हणून थोडी निश्चित होऊन तिनें मावशीबरोबर तिकडे जायचें कबूल केलें.

पेम्बर्ली येथें ती व डार्सी यांची गांठ पडायची ती पडलीच. ही भेट अगदींच अनपेक्षित होती. दोघांनाहि त्या वेळीं अवघडल्यासारखें झालें. या वेळीं तो तिच्याशीं कधीं नव्हे असा विनयशीलपणें व सौहार्दानें वागला. आपल्या बहिणीची तिच्याशीं भेट घडवून आणण्यासाठीं त्यानें तिच्याजवळ अनुमति मागितली. मग दोघींच्या गांठीभेटी झाल्या. उभय कुटुंबांचें एकमेकांकडे जाणें येणें घडलें. अशी या लोकांची थोडीफार आनंददायक दिलजमाई होत होती. पण तितक्यांत यामध्यें अकस्मात एक व्यत्यय आला.

कारण आपली धाकटी बहीण लिडिया ही विकहॅमबरोबर पळून गेली असें

पत्र एलिझाबेथला आलें. ही माहिती तिनें डार्सीला सांगितली आणि ती आपल्या मावशीसमवेत तत्काळ आपल्या घरीं निघून गेली. त्यानंतर कित्येक दिवसांनीं त्या पळून गेलेल्या जोडप्याचा शोध लागला व त्या दोघांचें लग्नहि उरकून घेण्यांत आलें.

लिडिया घरीं परत आली. ती अजूनहि पूर्वीसारखीच बेछूट व निष्काळजी दिसे. आपल्या लग्नाला डार्सी हजर होता अशी माहितीं तिनें एलिझाबेथला दिली. तिला तें प्रथम खरेंच वाटेना. पण ती गोष्ट खरी असल्याचें तिच्या मावशीकडून तिला कळलें. विकहॅमला पैशाची मदत डार्सीकडूनच मिळाली आणि म्हणून हें लग्न होऊं शकलें.

हें नवें जोडपें निघून गेल्यानंतर लवकरच बिंग्लेची स्वारी नेदरफील्ड पार्क येथें परत राहायला आली. त्याच्याबरोबर त्याचा मित्र डार्सी हाहि आला. एलिझाबेथ हिचा आतां डार्सीविषयीं पूर्वीं कधीं नव्हता इतका अनुकूल ग्रह झाला. तो तिथें राहायला आला याचाच अर्थ तो अजूनहि आपल्यावर प्रेम करतो आहे असा ती समजली. त्यानें मात्र तसें कधीं आपल्या वर्तनानें दर्शविलें नाहीं.

बिंग्ले व जेन हें जोडपें मात्र एकमेकांच्या प्रेमांत पुरतें सांपडलें. शेवटीं त्यांचा वाङ्निश्चय झाला. बेनेटबाई खूप आनंदल्या. त्यांचा जीव एका मुलीच्या बाबतींत तरी एकदांचा भांड्यांत पडला!

यानंतर थोड्याच दिवसांत लेडी कॅथरीन द बर्ग एकाएकीं बेनेट कुटुंबाला भेटायला आली. आपला भाचा डार्सी यानें एलिझाबेथ हिच्याशीं वाङ्निश्चय केला आहे असा बभ्रा तिच्या कानावर गेला होता. आपल्या मुलीचें लग्न त्याच्याशीं करून द्यायचें असा तिचा बेत होता. या बेताच्या आड येणारी एलिझाबेथ! म्हणून लेडी कॅथरीननें आपल्या रांगड्या उद्धट असभ्य पद्धती-नुसार तिचा उद्धार केला. "तूं डार्सीची मागणी मुळींच मान्य करूं नकोस" असा त्या जहांबाज बाईनें जणुं तिच्यावर हुकूमच बजावला. पण एलिझाबेथनें तिला मुळींच दाद दिली नाहीं. तिच्या त्राग्यापुढें व एक प्रकारच्या दादागिरीपुढें ती जरा देखील डगमगली नाहीं. "मी डार्सीशीं लग्न न करायचं किंवा कसलंच वचन देणार नाहीं" असें तिला तिनें थंडपणें सांगितलें.

लग्नाविषयीं डार्सीबरोबर बोलणें करायला आपल्याला पुन्हां कधीं योग

येईल हें या वेळीं एलिझाबेथच्या ध्यानींमनींहि नव्हतें. पण त्यानंतर लवकरच आश्चर्यचकित होण्याची पाळी तिच्यावर आली! लेडी कॅथरीन तिथून जी रागारागानें गेली ती थेट आपल्या भाच्याकडे! तिनें डार्सीला आपलें एलिझाबेथ-बरोबरचें सगळें बोलणें तावातावानें तपशीलवार सांगितलें! डार्सी आतां एलिझाबेथला चांगलाच ओळखून होता. 'ता वरून ताकभात' म्हणतात तसा त्यानें त्या वेळच्या तिच्या भावनांविषयीं अचूक अंदाज बांधला. तिच्या सगळ्या भावना आतां पुरतेपणीं बदलून गेल्या आहेत हें त्यानें तत्काळ हेरलें. अर्थात् त्यानंतर तो तसाच नेदरफील्ड पार्ककडे परत गेला. उभयतांची दिलजमाई झाली. वाङ्निश्चय ठरला. अशा प्रकारें अहंभाव नमला. पूर्वग्रह नष्ट झाले.

रॉबिन्सन क्रूसो

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* डॅनियल डीफो (१६६१?-१७३१). *कथानकाचा प्रकार :* अद्भुतरम्य साहसकथा. *काळ :* १६५१-१७०५. *स्थळ :* दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यासमोरील दूरचें एक बेट, आणि सात समुद्र. *प्रथम प्रकाशन :* १७१९.

प्रमुख पात्रें : **रॉबिन्सन क्रूसो**, जहाज फुटल्यामुळें बुडतां बुडतां एका बेटावर आश्रयाला गेलेला इसम. **फ्रायडे**, त्याचा इमानी नोकर.

समीक्षण : या कादंबरीचें लेखकानें दिलेलें नांव म्हणजे "रॉबिन्सन क्रूसोचें चरित्र आणि त्यानें केलेलीं चमत्कारिक आश्चर्यजनक साहसें" असें खूप लांबलचक आहे. ती प्रथम प्रकाशित झाल्यावर लोकांनीं जितक्या उत्सुकतेनें वाचली तितक्याच उत्सुकतेनें ती आजहि लोक वाचतात. कधीं कधीं तींतील निवेदन फारच तपशीलवार असल्यासारखें वाटतें. त्या अज्ञात बेटावरील क्रूसोचें दैनंदिन जीवन वर्षानुवर्षें जवळजवळ सारख्याच प्रकारचें होतें हें याचें कारण आहे. पण वर्णनाला कलाटणी देण्याची नाट्यक्षेत्रांतील क्लृप्ति कशी वापरावी याचें लेखकाला ज्ञान होतें. म्हणूनच, या कादंबरीच्या नायकाच्या जीवनांतील दैनंदिन तपशिलांचीं वर्णनें वाचतां वाचतां आपण थोडेफार कंटाळतों आहों तोंच एकदम एखादी नवी घटना घडते आणि कथानायकाच्या जीवनांतील आणि कथेच्या वर्णनांतील तोच-तो-पणा एकदमच नाहींसा होतो. जगाच्या उत्कृष्ट वाङ्मयांत या पुस्तकाची गणना होते आणि ती योग्यच आहे.

कथानक : रॉबिन्सन क्रूसो एका मध्यमवर्गीय इंग्लिश कुटुंबांत जन्मला. त्यानें एखाद्या धंद्यांत पडावें आणि चार चौघांसारखें साधेंसुधें शांत जीवन जगावें अशी वास्तविक त्याच्या वडिलांची इच्छा होती. खुद्द त्याला मात्र समुद्र-पर्यटनाची फार ओढ होती. त्यामुळें त्याला आपल्या घरीं राहणें अगदीं जिवावर आलें. आई-वडिलांना नकळतच तो पहिल्या जलपर्यटनाला गेला. त्या वेळीं त्याचें जहाज वाटेंत प्रचंड वादळांत सांपडलें. त्यांत तो भयंकर आजारीहि झाला. यामुळें त्याची इतकी घाबरगुंडी उडाली कीं 'या आजारांतून मी जर सुदैवानं वांचलोंच तर पुन्हां आयुष्यांत मी कधीं जमीन म्हणून सोडणार नाहीं' अशी त्यानें शपथ घेतली.

तें जलपर्यटन संपलें. तो सुरक्षितपणें किनाऱ्याला लागला. त्यानंतर पुन्हां त्याला वाटूं लागलें कीं आपली समुद्रपर्यटनाची इच्छा अपुरीच राहिली. यासाठीं तो व्यापारी बनला आणि जहाजांतून प्रथम त्यानें आफ्रिकेच्या किनारा गांठला. पण वाटेंतच चांचेगिरी करणाऱ्या एका तुर्की जहाजानें त्याचें जहाज पकडलें आणि त्याला कैद करून मोरोक्कोच्या किनाऱ्यावरील साली नामक बंदराकडे धाडून दिलें.

तिथें तो गुलाम झाला. तिथलें आयुष्य त्याला इतकें असह्य झालें कीं पहिली संधि सांपडतांच एका लहानशा होडींतून तो पळाला. एका पोर्तुगीज मालवाहू जहाजानें त्याला वांचविलें आणि सुरक्षितपणें दक्षिण अमेरिकेंतील ब्राझील या देशांत आणून सोडलें. तिथें त्यानें एक लहानसा मळा घेतला व तो मळेवाल्याचें साधेंसुधें जीवन जगूं लागला.

पुढें दुसऱ्या एका इंग्लिश मळेवाल्यानें त्याला एक नवा बेत सुचविला. दोघांनीं आफ्रिकेची सफर करायची व तिथून जहाजावर गुलाम लादून आणून त्यांचा व्यापार करायचा! रॉबिन्सनच्या मनाची पुन्हां एकदां चलबिचल झाली. आणि मनांत दडलेली जलपर्यटनाची इच्छा पुन्हां बळावून तो नव्या सफरीवर निघाला. त्याची ही सफर त्याच्या सगळ्या सफरींमध्यें संस्मरणीय व दैवाच्या चमत्कारिक खेळांनीं भरलेली अशी ठरायची होती. कारण त्या वेळीं घडलेल्या घटनांमुळें त्याच्या आयुष्यांतील सर्वांत मोठें धाडस त्याच्या वांट्याला आलें. तें जहाज दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यासमोर पाण्यांत दडलेल्या खडकांच्या रांगेवर आपटून फुटलें आणि त्याच्याखेरीज इतर सगळे प्रवासी, खलाशी बुडून गेले. लाटांबरोबर वाहत तो किनाऱ्याला लागला.

किनाऱ्यावर बसल्या बसल्या आपल्या सगळ्या दुर्दैवी परिस्थितीचा त्यानें आढावा घेतला. तो ज्या बेटाला लागला, तें पूर्णपणें निर्जन होतें, किंबहुना त्यांत रानटी पशूंचाहि थांगपत्ता नव्हता. आतां आपलें जीवन सर्व जगापासून दूर दूर व एकाकी अवस्थेंत जाणार हें त्यानें ओळखलें आणि तें त्यांतल्या त्यांत जमतील तेवढ्या सुखसोईनीं सुसह्य करावें असें ठरविलें.

त्यानें एक तराफा तयार केला आणि त्यावरून त्या फुटलेल्या जहाजावर जाऊन त्यांतून हातीं लागलें तेवढें निरनिराळ्या प्रकारचें सामान त्यानें काढून आणलें. खाद्य पदार्थ, दारूगोळा, पाणी, मद्य, कपडे, हत्यारें, शिडाचें कापड, लांकडें, असल्या अनेक वस्तु त्यानें गोळा केल्या आणि त्या बेटावर आणल्या.

एका लहानशा टेकडीच्या उतारावर त्यानें प्रथम शिडांचा लहानसा तंबू ठोकला. त्याच्या भोंवतीं त्यानें उंच उंच अणकुचीदार खांबांचें कोंडाळें केलें. एक शिडी तयार करून तिच्यावरूनच तो आपल्या त्या आसऱ्याच्या ठिकाणीं जाऊं-येऊं लागला. काम झालें कीं ती शिडी तो आपल्या पाठोपाठ ओढून घेई.

या आपल्या निवासस्थानीं त्यानें तो सर्व माल नेऊन ठेवला. बंदुकीच्या दारूची त्यानें खास काळजी घेतली. त्यानंतरची त्याच्या जिवाची चिंता म्हणजे अन्नाचा पुरवठा! जहाजावरील बहुतेक खाद्य पदार्थ उंदीर घुशींनीं खलास केलेले होते. त्यांतल्या त्यांत जे थोडेसे त्याच्या हातीं लागले ते पुरवून पुरवून खायला त्यानें सुरवात केली. असे त्याचे त्या निर्जन बेटावरील मुक्कामाचे पहिले कांहीं दिवस लोटले.

आपण जहाजावरून आणलेल्या वस्तूंमध्यें शाईची एक बाटली व पिसाच्या कांहीं लेखण्यासुद्धां असल्याचें त्याला कांहीं दिवसांत कळलें. त्यानंतर तो आपली रोजनिशी वक्तशीर लिहून ठेवूं लागला. आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगाचा त्यानें स्वतःशीं आढावा घेतला. आपल्या या परिस्थितींतलें चांगलें व वाईट काय याचा सखोल विचार स्वतःशीं करून 'परमात्म्याचे आभार मानण्या-सारख्याच अनेक गोष्टी मला लाभल्या आहेत!' असा त्यानें निष्कर्ष काढला.

मग त्यानें तें आपलें निवासस्थान अधिक चिरस्थायी करण्याचें काम आरंभलें. आपल्या तंबूच्या मागेंच त्याला एक गुहा आढळली. तीच त्यानें खोदून अधिक मोठी केली व तिला धिरगे दिले. आपल्यापाशीं असलेल्या ओबड धोबड हत्यारांचा उपयोग करून त्यानें एक टेबल व एक खुर्ची तयार

केली. वस्तु नीट ठेवण्यासाठीं कांहीं मांडण्याहि त्यानें बनविल्या. आपल्या संग्रहांतल्या बंदुकांसाठीं त्यानें एक लांकडी घोडा तयार केला. या सर्व कामगिरी-मध्यें त्यानें कित्येक महिने घालविले.

या मुदतींत अधून मधून एखाद दुसरी रान-कोंबडी त्याच्या हातीं लागे. किंवा दुसरी कसली तरी शिकार तो साधी. अशा प्रकारें त्याचा अन्न-प्रश्न आतां बराचसा सुटला. ठिकठिकाणीं जिवंत झरेहि सांपडले असल्यामुळें त्याची पिण्याच्या पाण्याचीहि छान सोय झाली.

त्यानंतर पुढल्या चोवीस वर्षांतलें त्याचें त्या बेटावरलें जीवन जवळ जवळ सुरवातीच्या काळासारखेंच चालू राहिलें. या मुदतींत त्यानें त्या बेटाचें बरेंच संशोधन केलें. त्याच्या दुसऱ्या अंगाला त्यानें दुसरें निवासस्थान तयार केलें. त्याला तो आपलें ' उन्हाळ्यांतलें घर ' म्हणायचा. तांदूळ, जव, इत्यादि धान्यांची लागवड करून त्यांचीं पिकें काढणेंहि त्याला जमूं लागलें. दुसऱ्या वर्षी पुन्हां पेरणीचे दिवस येईपर्यंत तो आदल्या वर्षीच्या धान्याचें बियाणें राखून ठेवी.

अशा प्रकारें हातीं लागणाऱ्या धान्यसांठ्याचा उपयोग करणें, तें धान्य दळून त्याचें पीठ करणें, व त्याच्या जाड्या भरड्या भाकऱ्या भाजणें, हेंहि काम तो करूं लागला. मग त्यानें जंगली बोकड-बकऱ्या पकडल्या व त्या पाळून आपल्या दुभत्याची सोयहि केली. कांहीं पोपट पकडून ते माणसाळवून त्यानें आपल्या एकाकी जीवनांत कांहीं सवंगडीहि मिळविले.

वेळ भरपूर होता. म्हणून त्यानें अधिकाधिक चांगलें फर्निचर तयार केलें आणि आपल्या गुहेचीहि अधिक सुधारणा घडवून आणली. आतां ती अधिकच सुरक्षित झाली. बाहेरून येणाऱ्या हल्लेखोराला तिच्यांत शिरकाव करणें मुश्कील होईल अशी सगळी व्यवस्था त्यानें केली. साधे पक्षी, बोकड, रान-कोंबड्या इत्यादि प्राण्यांखेरीज इतर प्राणी त्या प्रदीर्घ मुदतींत त्याला कधीं आढळलेच नाहींत. त्या दृष्टीनें तें बेट तसें बिनधोक होतें. तरी देखील कधीं कुणी एकदम येऊन आपल्यावर कसा घाला घालील याचा नेम नाहीं अशी त्याला सतत धास्ती वाटत होती.

जहाजावरच्या वस्तूंमध्यें त्याला बायबलच्या तीन प्रती मिळाल्या. तो धर्मग्रंथ काळजीपूर्वक वाचायला त्याला भरपूर वेळहि होता. दररोज सकाळीं व पुन्हां संध्याकाळीं त्यानें प्रार्थनेची वेळ नेमून ठेवली. त्या वेळीं तो वाचन करी.

समुद्राच्या कचाट्यांतून आपल्याला सुरक्षित ठेवल्याबद्दल तो ईश्वराचे मनःपूर्वक आभार मानी. त्यावांचून त्याचा त्या वास्तव्यांतला एक दिवसहि सुना गेला नाहीं. असें होतां होतां त्याच्या तिथल्या मुक्कामाचें चोविसावें वर्ष लागलें. वर्षाचे पहिले पांच सहा महिने उलटल्यावर एक अशी घटना घडली कीं तीमुळें त्याच्या जीवनांत पुन्हां फेर-पालट झाला.

सुमारें दीड वर्षापूर्वी कांहीं रानटी लोक त्या बेटावर आलेले त्याला दिसले होते. बहुधा शेजारपाजारच्या बेटावरून आपल्या छोट्या होड्या वल्हवीत ते तिथें येऊन पोंचलेले असावेत असा त्याचा त्या वेळचा अंदाज होता. ते रात्रींच्या वेळीं तिथें आले होते आणि त्यांनीं दुसऱ्या कांहीं रानटी लोकांना अधाशीपणें खाऊन फस्त केलें होतें. हे भक्ष्य झालेले लोक बहुधा त्यांचे कैदी असावेत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याला त्या ठिकाणीं माणसांचीं हाडें व मांसाचे उरले सुरले अवशेष दिसले होते.

तेव्हांपासून तो फारच भयभीत झाला. ते नरमांसभक्षक पुन्हां कधीं तरी आपल्या बेटावर परत येतील व त्यांना आपलाहि पत्ता लागेल आणि मग आपलीहि तीच गत होईल असें त्याला सतत वाटूं लागलें.

शेवटीं त्याच्या बेटावर रानटी लोकांची एक टोळी खरोखरीच येऊन थडकली. आपली नरमांस भक्षणाची भेसूर मेजवानी ते तिथें सुरू करणार, इतक्यांत त्यानें त्यांच्यांतल्या कांहींना गोळ्या घालून जमीनदोस्त केलें. त्याबरोबर उरलेले घाबरून जीव घेऊन पळाले.

त्यांनीं बरोबर आणलेल्या कैद्यांपैकीं एकाची सुटका त्याला करतां आली. अशा प्रकारें येवढ्या प्रदीर्घ एकाकी जीवनानंतर त्याला एक मानवी सवंगडी प्रथमच लाभला. तो एका शुक्रवारीं त्याला मिळाला, म्हणून त्यानें त्याचें नांव 'फ्रायडे' असें ठेवलें. त्यानंतर हा फ्रायडे त्याचा विश्वासू नोकर व मित्र झाला.

आणखी कांहीं दिवसांनीं फ्रायडेला कामचलाऊ इंग्रजी शिकविण्यांत त्यानें यश मिळविलें. मग त्याला फ्रायडेकडून एक बातमी कळली. ज्या बेटावरून तो इकडे आला, तिथें सत्रा गोरे लोक कैदी होऊन पडलेले आहेत व त्यांना तिथें चांगली वागवणूक मिळते. तरीहि आपण त्यांना सोडवावें अशी त्याला उत्कट इच्छा होऊं लागली. कारण सगळ्यांनीं मिळून कांहीं तरी खटपट केल्यास बाहेरच्या सुधारलेल्या जगांत परत आपल्याला जातां येईल अशी त्याची खात्री होती.

फ्रायडेच्या मदतीनें त्यानें एक संपान तयार केलें आणि त्या दुसऱ्या बेटाकडे समुद्रांतून जायची तयारी केली. पण ते निघायच्या अगोदरच रानटी लोकांची दुसरी एक टोळी त्यांच्या बेटावर उतरली. त्या कैद्यांमध्यें एक गोरा इसम आहे असें दिसतांच रॉबिन्सननें त्याची सुटका केली. त्या गोऱ्या कैद्याबरोबरच दुसरा एक रानटी कैदीहि सुटला. नवलाची गोष्ट अशी कीं हा रानटी कैदी म्हणजे फ्रायडेचा बापच होता.

पितापुत्रांच्या त्या अद्भुत आकस्मिक भेटीमुळें मोठा आनंदी आनंद झाला. रॉबिन्सननें त्याला अभय दिलें. तो गोरा कैदी स्पॅनियर्ड होता. फ्रायडेनें पूर्वी माहिती दिलेल्या सत्रा कैद्यांपैकींच तो होता. एका वैरी जमातीनें फ्रायडेच्या बेटाचा ताबा मिळविल्यामुळें तिथल्या गोऱ्या लोकांचें जीवित अतःपर असुरक्षित होतें.

तेव्हां रॉबिन्सननें फ्रायडेचा बाप व तो स्पॅनिअर्ड अशी दोघांची तुकडी त्या जवळच्या बेटावर तिथल्या गोऱ्या लोकांना सोडवायला धाडून दिली. ते परत यायची तो वाट पाहात असतांनाच एक इंग्लिश जहाज आपल्या किनाऱ्याजवळच नांगर टाकून उभें असल्याचें त्याला दिसलें. त्या जहाजाचा कप्तान आणि आणखी दोघे यांची रॉबिन्सनशीं गांठ पडली. जहाजावरील सगळ्या बंडखोर खलाशांनींच त्या निर्जन बेटाच्या किनाऱ्यावर त्यांना सोडून दिलें होतें.

पुढें रॉबिन्सन, फ्रायडे, कप्तान आणि त्याच्या बरोबरचे लोक या सगळ्यांनीं मिळून निकराचा हल्ला केला व तें जहाज पुन्हां त्या बंडखोरांकडून आपल्या ताब्यांत घेतलें. अशा प्रकारें त्या निर्जन बेटावरील येवढ्या दीर्घकालीन अज्ञात वास्तव्यानंतर रॉबिन्सनची एकदांची सुटका झाली.

पण कामगिरीवर पाठविलेला तो स्पॅनिअर्ड व फ्रायडेचा बाप हे दोघे तिकडून परत आल्याशिवाय इंग्लंडला परतणें रॉबिन्सनला पटेना. शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं ज्या बेटावर आपण इतकीं वर्षें राहिलों त्या बेटावर पुन्हां परत यायचें. हेतु हा कीं आपण निघून गेल्यावर ते सगळे लोक कसे काय राहतात तें आपल्याला पाहायला मिळावें.

इकडे जहाजावरल्या बंडखोरांपैकीं पांच जणांनीं त्या निर्जन बेटावरच राहायचें ठरवून जहाजाला रामराम ठोकला. कारण इंग्लंडला पोंचल्यावर आपल्यापुढें फांशीच वाढून ठेवलेली आहे हें त्यांना ठाऊक होतें.

अशा प्रकारें फ्रायडेसह रॉबिन्सन प्रथम इंग्लंडला पोंचला व जवळजवळ

पस्तीस वर्षांच्या गैरहजेरीनंतर १६८७ च्या जून महिन्यांत आपल्या गांवीं दाखल झाला. गांवांतल्या सगळ्यांनाच तो सर्वस्वीं नवखा व अनोळखी वाटला.

पण रॉबिन्सनचें साहसी जीवन येवढ्यावरच संपलें नाहीं. आपले आईवडील केव्हांच मरून गेले हें घरीं पोंचल्यावर त्याला कळलें. त्याच्या बहुतेक इतर नातलगांचीहि तीच गत झाली होती. नाहीं म्हणायला त्याच्या दोन बहिणी व त्याच्या भावांपैकीं एकाचीं दोन मुलें हयात होतीं.

इंग्लंडमध्यें आतां आपलें कांहींच उरलेलें नाहीं हें पाहून तो पोर्तुगाल देशांत लिस्बनला गेला. आपल्या मळ्याची काय स्थिति आहे हें माहीत करून घ्यायला तो उत्सुक होता. तिथें पोंचल्यावर त्याला कळलें कीं आपल्या मित्र-मंडळींनीं आपल्या मळ्याचें उत्पन्न आपल्यासाठीं जमा करून शिल्लक ठेवलें आहे. ही सगळी रक्कम आतां सुमारें ५००० पौंड झालेली होती. हा हिशेब प्रामाणिकपणें व कांटेकोर रीतीनें ठेवलेला असल्याची त्याची खात्री पटली. मग तो पुन्हां इंग्लंडला गेला. तिथें त्यानें लग्न केलें. पुढें त्याला तीन मुलें झालीं. त्यानंतर त्याची पत्नी वारली. मग १६९५ सालीं तो नव्या जलपर्यटनाला निघाला. त्याचा पुतण्याच या जहाजाचा कप्तान होता. त्यांतून तो खासगी व्यापारी म्हणून सफर करीत होता. हें जहाज भारताजवळील पूर्वेकडील बेटें व चीन या प्रदेशांकडे चाललें होतें.

वाटेंत हें जहाज रॉबिन्सनच्या जुन्या मुक्कामाच्या बेटानजीक थांबलें. तो तिथल्या लोकांना जाऊन भेटला. त्याच्या वेळचा तो स्पॅनिअर्ड कैदी व इंग्लिश बंडखोर खलाशी यांनीं जवळच्या बेटावरील जंगली बायकांशीं लग्नें करून संसार थाटले असून त्या एका काळच्या निर्जन बेटाची लोकवस्ती आतां भरपूर वाढली आहे असें त्याला दिसून आलें. तें सर्व पाहून त्याला खूप आनंद झाला. त्या प्रीत्यर्थ त्यानें त्या सर्व मंडळींना एक जंगी मेजवानी दिली. परत निघतांना त्यानें त्या लोकांना जहाजावरील अनेक वस्तु भेट म्हणून दिल्या.

रॉबिन्सन व फ्रायडे नंतर पुढील प्रवासाला निघाले. ब्राझीलच्या वाटेवर असतांना कांहीं रानट्यांनीं त्यांच्या जहाजावर हल्ला केला. त्या झटापटींत फ्रायडे मारला गेला.

ब्राझीलहून रॉबिन्सन निघाला व आफ्रिका खंडाच्या दक्षिण टोंकाकडील केप ऑफ गुड होपला वळसा घालून पुढें चीनच्या किनाऱ्यापाशीं आला. एका

बंदराजवळ त्यांचें जहाज लागलेलें असतांना त्यांच्या खलाशांनीं तिथल्या एका कत्तलींत भाग घेतला. तें पाहून रॉबिन्सन संतापला. त्यानें त्यांच्यासमोर एक भलें मोठें उपदेशपर प्रवचन झोडलें. त्यामुळें ते खलाशी अधिकच चिडले.

" रॉबिन्सनला इथेंच सोडून द्या. तरच आम्ही जहाजावर काम करूं. असला बडबड्या धर्मोपदेशक आम्हांला आमच्या जहाजावर नको. आतांच्या आतां त्याला हांकलून द्या. " अशी सगळ्या खलाशांनीं एकमुखी मागणी केली. रॉबिन्सनचा व त्याच्या कप्तान पुतण्याचा त्यापुढें नाइलाजच झाला.

चीनमध्यें उतरल्यावर रॉबिन्सन उंटांच्या एका तांड्याबरोबर पुढें निघाला. रशियाच्या पूर्व भागांतील सैबेरिया प्रांतांत तो दाखल झाला. तिथून तो परत इंग्लंडला आला.

त्याचें वय आतां चौपन्न वर्षांचें झालें होतें. त्यांतला बहुतेक काळ त्यानें आपल्या मातृभूमीपासून दूरदूरच्या भागांतच घालविला होता. उरलेलें आयुष्य आतां शांतपणें घालविण्याचें त्याला समाधान लाभलें.

आतां तो एकाच खूप मोठ्या पर्यटनाची तयारी हळू हळू करीत होता. मात्र त्या सफरीवरून त्याला परत कधींच यायचें नव्हतें !

सायलस मार्नर

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखिका :* जॉर्ज ईलियट (मेरी ॲन ईव्हान्स, १८१९-१८८०). *कथानकाचा प्रकार :* घरगुती वास्तववाद. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचीं आरंभींचीं वर्षें. *स्थळ :* इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १८६१.

प्रमुख पात्रें : **सायलस मार्नर**, एक कोष्टी. **एप्पी**, त्याची मानलेली कन्या. **आरन विन्थॉर्प**, याच्याशीं एप्पीचें लग्न झालें. **गॉडफ्रे कॅस**, एप्पीचा जनक पिता. **डन्स्टन कॅस**, तिचा उधळ्या चुलता. **नॅन्सी लॅमिटर**, हिच्याशीं गॉडफ्रेचें लग्न झालें.

समीक्षण : 'सायलस मार्नर : रॅव्हेलो गांवचा कोष्टी' ही कादंबरी लिहिण्यांतला लेखिका जॉर्ज ईलियट हिचा हेतु असा होताः जगांत जे लोक निष्पाप नैसर्गिक जीवन जगतात त्यांनाच शेवटीं चांगल्या गोष्टींची प्राप्ति होते हें दाखवून द्यावें. या कादंबरीचा नायक अतिशय गंभीर वृत्तीचा आहे. त्याच्या

या स्वभावाला उठाव देण्यासाठीं साधीसुधी व विनोदी खेडवळ पात्रें लेखिकेनें उभीं केलीं आहेत. महत्वाच्या वाङ्मयीन स्वभावचित्रांमध्यें सायलसला कसलेंच स्थान नाहीं. तो म्हणजे चिकाटी, चांगुलपणा व कारुण्य या गुणांचें केवळ एक प्रतीक आहे. त्याच्यावर एक अन्याय झालेला असतो. तथापि त्याचें निराकरण करून घेण्याचा तो जरा देखील प्रयत्न करीत नाहीं. तो सतत सोळा वर्षें वाटच पाहत राहतो. शेवटीं अमूर्त न्यायाचा विजय होतो आणि सायलस या सत्पात्र माणसाला त्याच्या योग्यतेचें फळ लाभतें.

कथानक : रॅव्हेलो या खेड्यामध्यें एक कोष्टी राहत होता. त्याचें नांव होतें सायलस मार्नर. आपल्या चरख्याजवळ वर्षानुवर्षें काम करीत राहिल्यामुळें त्याच्या डोळ्यांवर परिणाम होऊन त्याची दृष्टि फार अधू झाली होती. अगदीं नजीकच्या किंवा चकचकीत अशाच वस्तू त्याला दिसूं शकत असत.

तो पूर्वी लॅन्टर्नयार्ड येथें राहत असे. पण त्याच्यावर एकदां चोरीचा आळ आला. तत्काळ त्यानें तें गांव सोडलें, आणि तो संसारांतून विरक्त झाला. पंधरा वर्षें तो एकाकी जीवन जगला. त्याचें शरीर सुकून गेलें. आयुष्यांत एकच गोष्ट तो करीत राहिला. विणकर कामांतून जे पैसे मिळतील ते एकेक करीत जमवून ठेवायचे हा एकच ध्यास त्यानें घेतला. रोज रात्रीं तो आपली ही सोन्याची दौलत गुप्त ठिकाणांतून बाहेर काढी. झोंपडींतल्या जमिनीखालींच ती त्यानें पुरून ठेवलेली होती. आणि तीं चकाकतीं सोन्याचीं नाणीं तो आपल्या हातांबोटांनीं आंजारत गोंजारत बसे.

त्या रॅव्हेलो गांवीं प्रतिष्ठित असा माणूस म्हणजे स्क्वायर कॅस. या कॅस शेटला एक चांगला मुलगा होता. त्याचें नांव गॉडफ्रे. त्याचा दुसरा मुलगा डन्स्टन हा वाह्यात निघाला. नॅन्सी लॅमेटर हिच्याशीं गॉडफ्रे लग्न करणार असें गांवकरी म्हणत होते. परंतु डन्स्टननें जुगार खेळतांना केलेल्या कर्जाच्या भानगडींत गॉडफ्रे गुरफटला. आपल्या उधळ्या भावाला त्यानें वडिलांच्या वसुलींतील कांहीं रक्कम गुपचुप दिली. आणि त्यानें ती जुगारांत घालविली. अशी ती एकूण भानगड होती.

हा गेलेला पैसा दोघांपैकीं एकालाहि पुन्हां उभा करतां आला नाहीं. तेव्हां गॉडफ्रेचा एक आवडता घोडा 'वाइल्ड फायर' हा शेजारच्या गांवांतील जत्रेंत नेऊन डन्स्टननें विकायचा असें दोघांनीं मिळून ठरविलें. पण या बाबतींत गॉडफ्रेडच्या मनाला एकसारखी एक भीति वाटायची—या भानगडीचा आस-

पासच्या लोकांमध्यें बभ्रा होऊन कदाचित आपल्या इभ्रतीला धक्का पोंचेल आणि त्यामुळें नॅन्सीशीं लग्न व्हायची संधि हातची जाईल. दुसरीहि एक गोष्ट त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला सतत टोंचत होती. आणि म्हणून नॅन्सीजवळ आपल्या प्रेमाची घोषणा करायला तो कचरत होता. ती गोष्ट म्हणजे त्याचें आधींच लग्न झालेलें होतें. एका दूरच्या खेड्यामध्यें तो एकदां गेला असतांना तिथल्या गुत्त्यांत तो खूप पिऊन तर्र झाला आणि तशाच बेहोष अवस्थेंत त्यानें एका खालच्या जातीच्या सामान्य बाईशीं लग्नहि केलें. मात्र शुद्धीवर आल्याबरोबर तिथें क्षणभरहि न थांबतां तो रॅव्हेलो गांवीं पळून आला. आणि तेव्हांपासून त्यानें आपल्या लग्नाचें तें सर्व प्रकरण गुप्तच ठेवलें होतें.

आधीं ठरल्याप्रमाणें 'वाइल्ड फायर' घोड्यावर स्वार होऊन डन्स्टन वावरांतून दौडत निघाला. सर्वत्र धुकें पसरल्यामुळें अस्पष्ट दिसत होतें. एके ठिकाणीं त्यानें घोड्याला उंच उडी मारायला लावलें आणि अपघात होऊन घोडा पांगळा झाला.

हवा तो पैसा उभा करायला दुसरा मार्ग उरलेला नाहीं, दारू पिऊन अर्धा बेहोष झालेला आहे, आणि भीतीनें अंगाला कांपरें भरलेलें आहे, अशा स्थितींत तो सायलस मार्नरच्या झोंपडीजवळ येऊन पोंचला. मार्नरच्या गुप्त खजिन्याचा आसपासच्या लोकांत झालेला गवगवा त्याच्याहि कानीं त्यापूर्वींच आलेला होता.

तो तिथें पोंचला त्या वेळीं झोंपडींत कुणीच नव्हतें. आंतून एकदम स्फूर्ति यावी तशी त्याची अवस्था झाली. त्याचा हात एकदम मार्नरचा गुप्त ठेवा असलेल्या जागेवरच पडला. खजिना हातीं लागतांक्षणीं तो लपत छपत झोंपडी-बाहेर पडला. रात्रीच्या काळोखांतून त्या सोन्याच्या नाण्यांच्या पिशवीसह तो ठेंचा खात पुढें चालला असतांना वाटेंत एका ओसाड दगड-खाणीच्या खड्डयांत धाडकन पडला व ठार झाला.

इकडे बिचाऱ्या सायलस मार्नरची सारी पुंजी चोरीला गेली, ही बातमी गांवच्या साऱ्या लोकांना गप्पाष्टकांसाठीं एक फुकटचा विषय म्हणून कामीं आली. त्याच वेळीं डन्स्टन कॅस अगम्य परिस्थितींत नाहींसा झाल्याची बातमीहि चौफेर पसरली.

आतां मात्र गॉडफ्रेला आपल्या वडिलांपासून तोंपर्यंतच्या सगळ्या घटना छपवून ठेवणें अशक्य झालें. खंडवसुलीच्या रकमेंतील कांहीं भाग आपण

डन्स्टनला कसा दिला आणि त्यानंतर आपल्या मौल्यवान घोड्याचाहि नाश कसा झाला, ही सगळी हकीकत त्यानें सांगून टाकली. कारण त्याचा तो 'वाइल्ड फायर ' घोडा मृतावस्थेंत सांपडला होता.

त्या प्रसंगीं आसपासच्या परिसरांतून निरनिराळे लोक सायलस मार्नरला भेटायला येऊं लागले. त्याच्या विशेष परिचयांतील व त्याची आवडती डॉली बिन्थॉप हीहि आली. तिचा छोटा गोड मुलगा आरन त्याला फार आवडायचा. तथापि त्या दारुण परिस्थितींत देखील आपली झोंपडीवजा मठी सोडून बाहेर यायला तो मुळींच तयार होईना. या बाबतींत त्यानें कुणाचेंच ऐकलें नाहीं. सारी मंडळी निघून गेल्यावर तो आपलें सोनें चोरीला गेल्याच्या दुःखांत चूर होऊन राही.

नव्या वर्षाच्या आदल्या रात्रीं त्याच्या झोंपडीजवळच एक अनाथ बाई बर्फांत गारठून मरून पडली. तिच्याबरोबर पिंवळ्या केंसांची एक बालिका होती. ती मात्र झोंपडीच्या खिडकींतून बाहेर आलेल्या उजेडाच्या अनुरोधानें चालत आली आणि आंत शिरली.

तो घरीं परतला तेव्हां त्याला आपल्या शेगडीसमोरच सोनेरी झगझगाट दिसला. आपलें हरवलेलें सोनेंच घरीं परतलें असावें असें त्याच्या अधू दृष्टीला वाटलें. तो अधिक जवळ गेला आणि त्यानें अगदीं नीट न्याहाळून पाहिलें. त्या उबदार शेगडीजवळ एक चिमुकली मुलगी गाढ झोंपलेली त्याला दिसली. त्या मुलीच्या पावलांचे बर्फांत उमटलेले ठसे बघत बघत तो शोध घेत पुढें चालला, तेव्हां त्याला एका जागीं त्या बाईचें प्रेत सांपडलें.

ही सारी हकीकत सांगायला तो तसाच कॅस मंडळींकडे गेला. त्या वेळीं गॉडफ्रे अगदीं रंगांत येऊन नॅन्सीबरोबर नृत्य करीत होता. ती बातमी ऐकतांच तो इतर मंडळींबरोबर त्या ठिकाणीं गेला. समोरचें तें दृश्य पाहिल्याबरोबर गॉडफ्रेच्या अंगावर भीतीनें कांटा उभा राहिला. कारण तें त्याच्या परित्यक्त पत्नीचेंच प्रेत होतें. पण हें नातें कुणाला सांगायची त्याला छातीच झाली नाहीं. ती सोनेरी केंसांची मुलगी आपलीच कन्या आहे हें उघडपणें कबूल करायचें धैर्यहि त्याच्या अंगीं नव्हतें.

आपला हरवलेला सोन्याचा ठेवा व ही नव्यानेंच आपल्या घरीं आलेली सोनेरी केंसांची मुलगी या दोन गोष्टींची सायलसच्या भाबड्या मनांत चमत्कारिक

गल्लत झाली. तो मुलांशीं अगदीं प्रेमळपणानें वागतो असें डॉली विन्थ्रॉप हिनें मत दिलें. तेव्हां सगळ्या गांवकऱ्यांनीं ती सोनेरी केंसांची बेवारशी गोड पोर त्या म्हाताऱ्या कोष्ट्याच्याच ताब्यांत देऊन टाकली.

अशींच वर्षामागून वर्षे गेलीं. सायलसनें त्या गोड पोरीचें नांव बायबल-मधून शोधून 'हेफ्झीबा' असें ठेवलें. पण ती बोबड्या पद्धतीनें आपलें नांव 'एप्पी' असें सांगे. अशा त्या एप्पीच्या वास्तव्यामुळें त्या कोष्ट्याची झोंपडी यक्षिणीची कांडी फिरावी त्याप्रमाणें आमूलाग्र पालटली. तिच्या खिडक्यांना आतां लेसचे पडदे लागले. आणि खुद्द सायलस देखील आपलें एकलकोंडेपणाचें कवच फेकून देऊन सगळ्यांशीं मिळून मिसळून वागूं लागला. डॉली विन्थ्रॉप देखील आपल्या मुलाला एप्पीशीं खेळावयाला म्हणून अधूनमधून तिथें आणीत असे.

आणखी कांहीं वर्षे लोटल्यावर तो एप्पीला बरोबर घेऊन आपल्या लँटर्नयार्ड या गांवींहि जाऊन आला. आपलें तिथलें जुनें घर, आसपासचा सारा परिसर, त्यानें शोधून पाहिला. पण जुन्या पाशबंधनांतलें नात्यागोत्यांतलें त्याला कुणीच भेटलें नाहीं. जुन्या उद्ध्वस्त जीवनाचे धागेदोरे त्याच्या मुळींच हातीं लागले नाहींत.

गॉडफ्रे कॅस यानें नॅन्सीशीं लग्न केलें. पण त्यांच्या संसाराची फुलबाग फुलली नाहीं. सोळा वर्षे तशीच गेलीं. गॉडफ्रेचें मन आंतल्या आंत सतत जळत राहिलें. सायलसच्या आश्रयाला आपलीच मुलगी वाढत आहे ही जाणीव त्याचें मन कुरतडून कुरतडून काढीत होती.

त्या जुनाट दगड-खाणींतल्या पाण्याचा उपसा झाला. तेव्हां कामगारांना एका माणसाच्या हाडांचा संपूर्ण सांगाडा सांपडला. घड्याळ, खिशांतलें सील, वगैरे पुराव्यावरून तो सांगाडा डन्स्टन याचाच असल्याचें ठरलें. त्या सांगाड्याशेजारीं त्यानें चोरलेली सायलस मार्नरची सोन्याच्या नाण्यांची पिशवीहि सांपडली.

या प्रसंगानंतर गॉडफ्रेला आपलें आजवरचें गुपित उघड करून सांगायला वाव मिळाला. खरा प्रकार नॅन्सीला सांगून टाकावा असा त्यानें निश्चय केला. ती अनुकूल संधि साधून त्यानें एप्पीच्या जन्मरहस्याविषयींचा कबुलीजबाब तिच्यासमोर दिला. मग आपण दोघांनीं मिळून सायलसकडे जावें व त्याला हें सांगावें असें त्या जोडप्यानें ठरविलें.

तें कळल्याबरोबर त्या निःस्वार्थी कोष्ट्यानें तत्काळ एप्पीला तिच्या श्रीमंत बापाकडे जायला मोकळीक दिली. तिचें त्यांत हितच आहे हें तो जाणून होता.

पण आपल्याला कुणाचाहि आधार नव्हता अशा स्थितींत आई व बाप या दोन्ही भूमिका घेऊन ज्यानें तळहातावरच्या फोडाप्रमाणें आपला प्रतिपाळ केला त्या वृद्ध कोष्ट्याच्याच गळ्याला एप्पीनें प्रेमभरानें मिठी मारली.

त्या म्हाताऱ्याच्या आनंदाची परिपूर्ति व्हायला आतां एकच गोष्ट बाकी उरलेली होती. तीहि घडून आली. आरन विन्थ्रॉप व एप्पी यांचें लग्न झालें. तिच्या बाळपणींच्या सवंगड्याशीं तिचें लग्न झालें त्या वेळीं तें दृश्य उचंबळलेल्या हृदयानें म्हातारा सायलस मार्नर कृतार्थ होऊन बघत होता.

अ टेल ऑफ टू सिटीज : दोन शहरांची कथा

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* चार्ल्स डिकन्स (१८१२-१८७०). *कथानकाचा प्रकार :* ऐतिहासिक अद्भुतरम्य कथा. *काळ :* फ्रेंच राज्यक्रांति (१७८९). *स्थळ :* फ्रान्स आणि इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १८५९.

प्रमुख पात्रें : **डॉ. मनेत**, पॅरिस शहरांतील प्रख्यात 'बास्तील' या तुरुंगांतला माजी कैदी. **ल्यूसी मनेत**, त्याची कन्या. **मिस्टर लॉरी**, टेल्सन आणि कंपनीचा एजंट. **चार्ल्स डार्ने**, सेंत एव्हरेमों या गांवचा मार्क्विस (सरदार). **सिडने कार्टन**, एका वकिलाचा कारकून. **मिस प्रॉस**, एक मोलकरीण. **मादाम देफार्ग**, एक फ्रेंच क्रांतिकारक महिला. **मॉसिये देफार्ग**, तिचा पति.

समीक्षण : डिकन्स हा एक असामान्य दर्जाचा कथानिवेदक आहे. त्याच्या गोष्टींमध्यें खूप खूप पात्रांचीं गल्लत-गजबज आढळते अशी टीका अनेकदां कानीं येते. तथापि त्यानें जें कथानक हातीं घेतलेलें असतें, त्याचा त्यानें कल्पिलेला विशिष्ट प्रकारचा विकास साधण्यासाठीं त्यांतील प्रत्येक पात्राची प्रत्यक्षाप्रत्यक्ष व कमीजास्त आवश्यकता असते हें निःसंशय.

फ्रेंच क्रान्तीविषयींच्या या कादंबरीचें कथानक खूपच गुंतागुंतीचें आहे. परंतु त्यांतील प्रत्येक प्रसंग वाचकाला एकाच महान परमोच्च बिंदूकडे ओढून नेत असलेला आढळतो. इतिहासाच्या रंगभूमीवर प्रत्यक्ष घडलेल्या याहूनहि मोठ्या समरप्रसंगाची पार्श्वभूमि या परमोच्च बिंदूला लाभलेली आहे. यामुळेंच

लेखकानें केलेली या कथानकाची मांडणी मनाला औत्सुक्यपूर्ण आनंदाचा प्रभावी प्रत्यय मिळवून देते.

कथानक : त्या वेळीं फ्रेंच राज्यक्रांतीच्या सुरवातीच्या गडगडाटाचे पडसाद इंग्लिश खाडीच्या पलीकडेपर्यंत उमटत होते. फ्रान्स देशाची राजधानी पॅरिस या शहरीं एका घराच्या पोटमाळ्यावर एक एकाकी म्हातारा मोठ्या उत्सुकतेनें एका रोमांचकारी भेटीची वाट पाहत बसला होता. अगदीं चिमुकली छपकडी असतांनाच एकदां पाहिलेली आपली कन्या इतक्या वर्षांनीं त्याला पुन्हां पाहायला मिळणार होती.

टेल्सन आणि कंपनी या फ्रँको-ब्रिटिश पेढीचा एजंट जार्व्हिस लॉरी याच्या मदतीनें ल्यूसी मनेत हिला पॅरिस शहरीं आणलें होतें. ती सुंदर तरुणी आपल्या वडिलांना जाणतेपणीं प्रथमच भेटणार होती. बास्तीलच्या तुरुंगामध्यें गेलीं अठरा वर्षें हा वृद्ध गृहस्थ खितपत पडलेला होता.

मादाम व मॉसिये देफार्ग यांच्या दारू-दुकानाच्या वरच्या माळ्यावर डॉ. मनेत याला गुप्तपणें आणून ठेवलें होतें. त्याची सुटका करणारे त्याला गुपचुप इंग्लंडला परत घेऊन जाईपर्यंत त्यानें तिथेंच राहायचें अशी सारी योजना आंखलेली होती. मादाम देफार्ग आपल्या दारूदुकानाबाहेर एक लांबलचक गळपट्टा विणत बसली होती. त्यांत कांहीं चमत्कारिक खुणांच्या आकृति विणल्या जात होत्या. जनतेचे वैरी ठरलेल्या ज्या अनेक सरदार-दरकदारांना फांशी द्यायचें होतें, त्यांच्याच नांवाची यादी ह्या खुणांमधून तयार होत होती.

यावर पांच वर्षें लोटल्यानंतरची हकीगत. इंग्लंडमधील ओल्ड बेली या प्रख्यात कोर्टात ल्यूसी मनेत ही आपल्या वडिलांशेजारीं बसली होती. तिथें एक खटला चालू होता. त्यांतल्या आरोपीचें नांव चार्ल्स डार्ने. हा भाषाशिक्षक होता. त्याच्यावर देशद्रोही कारवाया चालविल्याचा आरोप होता. फ्रान्स व इंग्लंड यांच्या दरम्यान गुप्त कामासाठीं त्याच्या फेऱ्या होत असत आणि त्यांचा संबंध या आरोपाशीं जोडलेला होता. जॉन बारसद नामक एका माणसानेंच त्याच्यावर हे सारे आरोप केलेले होते.

पांच वर्षांपूर्वी आपण फ्रान्सहून इंग्लंडकडे येत असतांना हा डार्ने आपल्याला बोटींत भेटलेला होता अशी जबानी ल्यूसी व तिचे वडील या दोघांनीं दिली होती. पण तिथल्या तिथेंच अशी एक असामान्य घटना घडली कीं

तिच्यामुळें आरोपी त्या प्रसंगांतून अगदीं शीरसलामत वांचला. स्ट्रायव्हर हा आरोपीचा वकील होता. त्यानें एकदम नाट्यपूर्ण रीतीनें कोर्टाच्या दुसऱ्या टोंकाकडे अंगुलिनिर्देश केला. तिथें बसलेला माणूस म्हणजे डार्नेचीच थेट प्रतिकृति होती. अर्थात् कायदेशीर रीत्या तोंवर सिद्ध झालेली डार्नेची ओळख तिथल्या तिथेंच कोसळून पडली!

हा दुसरा माणूस म्हणजे सिडने कार्टन. त्या दोघांमधील हुबेहुब सारखेपणाच्या मुद्यावरच स्ट्रायव्हर वकिलानें आरोपीला दोषमुक्त ठरवून घेतलें. कार्टन व स्ट्रायव्हर यांचे परस्परसंबंध कोल्हा व सिंह यांच्या संबंधांसारखे होते. कारण कांहीं तरी करायचें म्हणून वकिलाची कारकुनी करीत असलेला दारुडा कार्टन ज्या खटल्यांचीं कागदपत्रें तयार करीत असे, तेच खटले स्ट्रायव्हर कोर्टांत चालवीत असे.

ल्यूसी व तिचे वडील एका लहानशा बिऱ्हाडांत राहत असत. मिस प्रॉस ही मोलकरीण त्यांची घरची व्यवस्था पाही. त्यांचा प्रेमळ मित्र लॉरी होताच. त्याच प्रमाणें टेल्सन कंपनीमधला एक गडी जेरी क्रंचर हा गुप्त क्रांतिवादी देखील अधूनमधून त्यांच्या उपयोगी पडे. त्या खटल्यामुळें त्यांच्याशीं नवा परिचय झालेले डार्ने व कार्टन हे दोघेहि अधून मधून या मंडळींच्या घरीं जात येत असत.

फ्रान्स देशांत जनतेचा संताप वाढत चालला. मॉन्सेन्यूर मार्की सेन्त एव्हरेमों हा सरदार ग्रामीण भागांत आपल्या गाडींतून आपल्या श्रीमंतीच्या धुंदींत बेफिकीरपणें जात असतांना गस्पार नामक एका शेतकऱ्याचें मूल या गाडीखालीं सांपडून मेलें. तरी तो सरदार तसाच आपल्या वाड्यांत परत आला. तिथें तो आपल्या पुतण्याला भेटला. हा त्याचा पुतण्या चार्ल्स डार्ने इंग्लंडमध्यें राहत होता व त्याला भेटायला आलेला होता. चुलत्याच्या विचारांहून डार्नेचे विचार अगदीं वेगळे होते. आपल्या सरदार घराण्यानें भूतकाळीं अनेक गंभीर स्वरूपाचे अन्याय केले आहेत असें त्याला वाटत होतें, पटत होते. आपल्या त्या कृतकर्मांचीं आपण आतां तरी भरपाई करावी अशी त्यानें आपल्या काकांना विनंति केली. काकांनीं ती उद्धट मग्रुरीनें धुडकावून लावली. योग असा कीं त्याच रात्रीं या काकांचा स्वतःच्याच शयनागारांत खून पडला.

डार्ने इंग्लंडला परतला. डॉ. मनेत यांच्या परवानगीनें ल्यूसीचें प्रेम संपादन करण्याची त्याची इच्छा होती. प्रामाणिकपणाचे पक्के परस्परसंबंध जुळून

यावेत म्हणून डार्नेनें आपलें खरें फ्रेंच नांव डॉक्टरला सांगण्याचा प्रयत्न केला. पण तें प्रत्यक्ष लग्नाच्या दिवसापर्यंत उघड करूं नकोस अशी डॉक्टरनें त्याला घाबऱ्या घाबऱ्या मध्येंच थांबवून सूचना दिली. त्याच सुमारास कार्टन देखील लग्नाची मागणी घालण्यासाठीं ल्यूसीला भेटला. पण तिनें त्याला नकार दिला. तेव्हां तें प्रकरण तेवढ्यावरच थांबवून तो तिला म्हणाला—"तूं एक गोष्ट कायमची ध्यानांत ठेव. खुद्द तुला आपल्या खालोखाल ज्याचा जीव प्रिय वाटत असेल, त्याचं संरक्षण करायला स्वतःचा जीव धोक्यांत घालूनहि जगांत एक माणूस सदैव सज्ज आहे!"

दरम्यान फ्रान्स देशांत मादाम देफार्ग हिनें जनतेचा वैरी ठरलेल्या सरदार सेंत एव्हरेमों याच्या कुळाची कथा आपल्या गळपट्ट्यांत विणून ठेवली. मार्की सेंत एव्हरेमों याच्या खुनाबाबत तो शेतकरी गस्पार फांसावर लटकला होता म्हणून त्या सरदाराचें घर उद्ध्वस्त करणें भागच होतें. तेवढ्यांत गुप्त हेर जॉन बारसद यानें बातमी आणली कीं सरदाराचा पुतण्या चार्ल्स डार्ने याच्याशीं ल्यूसी मनेत हिचें लग्न होणार आहे. या बातमीनें देफार्ग मंडळी गडबडून गेली. डॉ. मनेत हा पूर्वीचा बास्तील तुरुंगांतला कैदी होता. आणि क्रान्तिवाद्यांच्या दृष्टीनें त्याला एक खास मानाचें स्थान होतें.

ल्यूसी आणि डार्ने यांचें लग्न झालें. त्या नव्या कुटुंबाचा सिडने कार्टन हा विश्वासू मित्र झाला. असेच कांहीं दिवस गेले आणि छोटी ल्यूसी जन्माला आली. ही मुलगी सहा वर्षांची असतांना १७८९ सालीं फ्रेंच जनतेनें बास्तील तुरुंगावर हल्ला चढविला. तिथें ज्या कोठडींत डॉ. मनेत पूर्वी कैदी म्हणून राहिलेला होता, तींत देफार्ग शिरला व तिच्या भिंतीमधील एका दगडाआड लपवून ठेवलेलीं कांहीं कागदपत्रें त्यानें काढून घेतलीं.

एके दिवशीं टेल्सन कंपनींत डार्ने व लॉरी यांचें बोलणें चालू असतांना लॉरीच्या टेबलावर एक पत्र येऊन पडलें. त्यावर मार्की सेंत एव्हरेमों असा पत्ता होता. तें पत्र आपण योग्य माणसाकडे पोंचतें करूं असें सांगून डार्नेनें तें ताब्यांत घेतलें. मग त्याला एकांत मिळाल्यावर त्यानें तें उघडून वाचलें. त्याच्या कुटुंबांतील एका म्हाताऱ्या नोकराकडून तें आलेलें होतें. आपल्याला क्रांतिवाद्यांनीं तुरुंगांत टाकलें असून आपला जीव वांचवावा अशी त्यानें या पत्रांत मार्कीला विनंति केलेली होती. आपल्याला आतां पॅरिसला जाणें भाग

आहे हें डार्नेला तत्काळ कळून चुकलें. त्याचें खरें नांव एकट्या डॉ. मनेत यालाच ठाऊक होतें व तें गुप्त ठेवण्याबाबत त्यानें शपथ घेतलेली होती.

मग डार्ने व लॉरी असे दोघे मिळून पॅरिसला गेले. टेल्सन कंपनीची फ्रान्समधील शाखा चालवायला लॉरी तिकडे जात होता. दोघे पॅरिसला पोंचल्या-नंतर लवकरच डार्नेला अटक झाली. त्याच्या अटकेचा हुकुम देफार्ग यानें दिलेला होता. फ्रान्समध्यें प्रवेश केलेला अनिष्ट परकीय इसम म्हणून त्याला ही अटक झालेली होती.

ल्यूसी व डॉ. मनेत हीं दोघें एकाएकीं पॅरिसला येऊन पोंचलेलीं पाहून लॉरी फारच बेचैन झाला. डॉक्टरसाहेबांच्या कांहीं मित्रांनीं डार्नेला अटक झाल्याचें त्यांना कळविलें होतें. आपण स्वतः बास्तील तुरुंगांतले माजी कैदी असल्यामुळें आपल्याला क्रांतिवाद्यांची सहानुभूति मिळवितां येईल व तिच्या जोरावर आपला जांवई सुटणें शक्य होईल असें त्यांना वाटलें.

पुढील पंधरा महिने नुसते वाट पाहण्यांतच गेले. डार्नेचा खटला एकदांचा उभा राहिला. आपल्यापासून फ्रेंच लोकांना कोणत्याहि प्रकारचा धोका नाहीं, आपण निरपराधी, निरुपद्रवी आहोंत असें त्याला सिद्ध करून देतां आलें. त्यामुळें त्याची सुटका झाली. पण त्यानें फ्रान्स सोडून जाऊं नये असा त्याच्यावर निर्बंध आला. त्यानंतर कांहीं काळ जातो न जातो तोंच त्याला पुन्हां अटक झाली. या अटकेचें कारण देफार्ग याची तक्रार हें तर होतेंच. आणि दुसऱ्याहि एका अज्ञात माणसाची तक्रार होती. पण त्याचें नांव सांगायला अधिकाऱ्यानें नकार दिला.

एके दिवशीं पॅरिस शहरांतील बाजारांत मिस प्रॉस व जेरी क्रंचर हीं दोघें गेलीं होती. ल्यूसी व लॉरी यांच्या बरोबरच तीं दोघें पॅरिसला आलीं होतीं. बाजारांत समोर एक माणूस पाहून मिस प्रॉस हिला आश्चर्याचा धक्काच बसला आणि ती मोठ्यानें ओरडली. क्रंचर देखील स्तिमित होऊन डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहूं लागला. मिस प्रॉस हिचा सॉलोमन नामक एक भाऊ होता. तो बेपत्ता होता. आणि तोच त्या क्षणीं तिच्या समोर उभा होता. परंतु जेरी क्रंचर त्या माणसाला जॉन बारसद म्हणून ओळखत होता. ओल्ड बेली कोर्टांत हेर साक्षीदार म्हणून त्याला त्यानें पूर्वी पाहिलेलें होतें.

त्याच वेळीं कार्टन तिथें येऊन दाखल झाला. त्यानें टेल्सन कंपनीच्या

कचेरींत आपल्याबरोबर खासगी कामासाठीं भेटायला यायला बारसदला भागच पाडलें. हा बारसद आतां लोकसत्ताक फ्रेंच सरकारचा नोकर झालेला होता. आपला दुटप्पीपणा उघडकीस येईल अशी त्याला भीति वाटत होती. "तूं फ्रान्सचें शत्रू असलेल्या इंग्रज सरकारचा भूतपूर्व गुप्त हेर आहेस आणि हें तुझें बिंग आम्हीं फोडूं" अशी कार्टन आणि जेरी या दोघांनीं त्याला सज्जड धमकी दिली. मग कार्टननें त्याच्याबरोबर कांहीं करार केले.

पुढें न्यायमंडळासमोर डार्नेचा खटला पुन्हां उभा राहिला. त्याच्याविरुद्ध पुरावा सादर करायला देफार्ग हजर होता. त्याच्यावर आरोप करणारा दुसरा इसम म्हणून त्यानें डॉ. मनेत यांचें नांव सांगितलें. मग बास्तील तुरुंगांतील डॉ. मनेत यांच्या कोठडींत सांपडलेलीं कागदपत्रें देफार्गनें कोर्टांत हजर केलीं. त्यांत खुद्द डॉक्टरसाहेबांनींच आपल्या अटकेची व तुरुंगवासाची हकीगत लिहून ठेवली होती. एका गरीब कुळांतली स्त्री व तिचा तरुण भाऊ यांच्या बाबतींत पूर्वी एकदां सेंत एव्हरेमों कुळांतील एका सरदारानें गुप्त गुन्हा केलेला होता. हें गुपित डॉक्टरसाहेबांना माहीत झाल्यामुळेंच त्या वेळीं त्यांची तुरुंगांत रवानगी झालेली होती. डार्नेवर आरोप शाबीत व्हायला डॉक्टरसाहेबांचें हें लेखी निवेदन पुरेसें होतें. म्हणून आपल्या पूर्वजांच्या गुन्ह्यासाठीं सेंत एव्हरेमों कुळांतला तो तरुण चार्ल्स डार्ने अपराधी ठरून न्यायमंडळानें त्याला गिलटिनची म्हणजे शिरच्छेदाची शिक्षा दिली.

येवढें झाल्यावर सिडने कार्टननें आपल्या कामगिरीला सुरवात केली. तो प्रथम देफार्ग कुटुंबाच्या दारूदुकानावर गेला. तिथें त्याला बातमी समजली कीं अनेक वर्षांपूर्वी त्या वेळच्या सेंत एव्हरेमों कुळांतल्या सरदारानें ज्या बाईचा नाश केला होता ती मादाम देफार्ग हिची बहीणच. त्यानंतर दगाबाज बारसदच्या मदतीनें त्यानें तुरुंगांत शिरकाव करून घेतला व तो डार्नेच्या कोठडींत जाऊन पोंचला. तिथें त्यानें डार्नेला अमली पदार्थ पाजून बेशुद्ध पाडलें आणि आतां आपल्या पूर्णपणें कह्यांत आलेल्या बारसदच्या मदतीनें त्यानें डार्नेला कोठडींतून तुरुंगाबाहेर नेवविलें व तो स्वतः त्याच्या ऐवजीं कोठडींत राहिला. त्या दोघांमधील सारखेपणामुळें तोच डार्ने अशी तुरुंगांतल्या लोकांची कल्पना होणार होती आणि त्यामुळें खानदान सरदार कुटुंबांतील डार्ने पळून गेला आहे हें उघडकीस येण्याचें टळणार होतें.

ल्यूसी व डॉ. मनेत यांच्या बिऱ्हाडाकडे त्यांचा धिक्कार करायला म्हणून मादाम देफार्ग गेली. पण तिथें मिस प्रॉस ही एकटीच होती. डार्नेसकट तिथली ती सर्व मंडळी त्यापूर्वी सुरक्षित ठिकाणीं पोंचायला मार्गस्थ देखील झाली होती. हे सगळे लोक पळून गेले आहेत ही बातमी मादाम देफार्ग हिला कळूं नये म्हणून मिस प्रॉस हिनें तिला घरांतच येऊं दिलें नाहीं. दोघींचें कडाक्याचें भांडण जुंपलें. तेवढ्यांत पिस्तुलाचा बार उडाला आणि मादाम देफार्ग मरून पडली. त्या प्रसंगा-नंतर मिस प्रॉस कायमची बहिरी झाली.

ल्यूसी व डार्ने हीं दोघें इंग्लंडला सुखरूप पोंचलीं. आणि आपल्या दोघां जिवलग मित्रांच्या सुखासाठीं स्वतःचे प्राण पणाला लावणारा सिडने कार्टन याचा गिलटिनवर शिरच्छेद झाला.

टेस ऑफ द दोबेर्विल

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* थॉमस हार्डी (१८४०-१९२८). *कथानकाचा प्रकार :* तत्वचिंतनपर वास्तववाद. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध. *स्थळ :* इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १८९१.

प्रमुख पात्रें : **जॅक डर्बीफील्ड**, एक गरीब कामगार. **टेस**, त्याची कन्या. **अलेक दोबेर्विल**, तिला फशीं पाडणारा. **एंजल क्लेअर**, तिचा पति.

समीक्षण : हार्डीची ही 'टेस' आतां एक आधुनिक अभिजात कलाकृति ठरली आहे. दैव व त्याचा बहुतेक माणसांच्या जीवनावर पडणारा प्रभाव या समस्येवर हार्डीनें या कथेंत भर दिलेला आहे.

टेसच्या बापाला आपण दोबेर्विल घराण्याचे वंशज आहोंत हें जर समजलें नसतें, टेसनें दरवाज्याच्या खालच्या फटींतून आंत सारलेलें पत्र एंजल याला जर वेळेवर सांपडलें असतें, तर तिच्या आयुष्याला बरेंच वेगळें वळण लागलें असतें. पण दैवानेंच असा कौल दिला कीं या गोष्टी अशाच प्रकारें घडून याव्यात आणि टेसचा जीवनप्रवाह असाच नियत व्हावा. हार्डी आपल्या टेसला एक निष्पाप पवित्र तरुणी समजतो. तशी ती आहेहि. तिच्या हातून घडलेल्या कृत्यांबद्दल ती जबाबदार नाहीं अशी त्याची श्रद्धा आहे. आणि या बाबतींत तो शेवटीं वाचकांनाहि स्वतःशीं सहमत व्हायला भाग पाडतो.

कथानक : आपण सुप्रसिद्ध दोबेर्विल घराण्यांतील आहोंत असें जॅक डर्बीफील्ड याला ज्या दिवशीं समजलें तो त्याच्या जीवनांतला मोठा अभिमानाचा दिवस होता. आपल्या घरच्या लोकांना जेमतेम पोटाला मिळावें आणि आपल्याला बीयर प्यायला मिळावी येवढ्यापुरतें काम करण्याहून अधिक असें त्यानें आजपर्यंत काय केलें होतें ? पण ही नवी बातमी समजल्यापासून त्यानें तेवढें थोडेंसें कामहि टाकून दिलें.

त्याची बायकोहि त्याच्याच विचाराशीं सहमत झाली. येवढ्या मोठ्या घरंदाज कुळांतल्या माणसानें कमी श्रम करून अधिक श्रीमंतीचें जीवन जगलें पाहिजे असेंच तिलाहि वाटलें. म्हणूनच तिनें आपल्या ज्येष्ठ कन्येचें मन वळवून तिला स्टोक-दोबेर्विल मंडळींची भेट घ्यायला धाडून दिलें. हीं माणसें चांगलीं सधन होतीं. दोबेर्विल या नांवावर आपला हक्क सांगायला तोंपर्यंत दुसरें कुणीच पुढें आलेलें नव्हतें. येवढ्याच कारणास्तव त्या कुटुंबानें तें नांव धारण केलेलें होतें. म्हणूनच आपली कन्या त्या श्रीमंत लोकांवर सहज छाप पाडील आणि कदाचित त्या घराण्यांतल्या एखाद्या मुलाशीं आपलें लग्नहि जमवून घेईल अशी त्या आईला अशा वाटत होती.

टेस आपल्या त्या तथाकथित नातेवाइकांना प्रत्यक्ष भेटली, तेव्हां मात्र तिथें तिला आई व मुलगा अशीं दोघेंच असल्याचें कळलें. आई आंधळी होती. पण मुलगा तरतरीत चलाख होता. तथापि आपल्या विसंगत व चमत्कारिक बोलण्यानें त्यानें टेसला अगदीं बेचैन केलें.

त्याचें नांव अलेक. त्यानें त्या निष्पाप साध्यासुध्या तरुण पोरीला हातोहात बनवून आपल्या कोंबड्या पाळण्याच्या धंद्यांत मदतनीस म्हणून ठेवलें. ती कोण, कुठली, याचा त्याच्या आईला थांगपत्ताहि नव्हता. पण ही गोष्ट त्यानें टेसलाहि कळूं दिली नाहीं. कांहीं दिवस निघून गेल्यावर आपल्या आईबापांना व खंडीभर भावंडांना मदत व्हावी म्हणून तिनें दुसरीकडे कामधंदा शोधण्याचा निश्चय केला. ती निष्पाप होती. पण अलेकपासून आपल्याला फायदा तर होणार नाहींच, मात्र त्याच्यापासून धोका भरपूर आहे हें तिला आतां समजून चुकलें. कारण त्याचा एकंदर हेतु तिला ठीक दिसेना. तथापि तो तिच्यापेक्षां जास्त चाणाक्ष होता. त्यानें संधि साधून एकदां तिला एकटें गांठलें व आपलें काम साधून घेतलें.

टेस आपल्या घरीं परतली. तिनें आपल्यावर ओढवलेला भयंकर

प्रसंग आईला सांगितला. पण अलेक तिच्याशीं लग्न करायला तयार नाहीं येवढीच एक चिंता त्या आई म्हणविणाऱ्या बाईला वाटली. गरीब बिचारी टेस ! आपल्या बरोबरीच्या पोरींनीं केलेली बेअब्रूकारक टिंगल गिळून ती निमूटपणें शेतांतलें दैनंदिन काम करीत राहिली.

हा तिच्यावर आलेला प्रसंग अधिकच गंभीर होण्याला आणखी एक कारण घडलें. ती जिथें जिथें कामाला जाई, तिथें तिथें अलेक तिचा पाठलाग करी आणि तिला पुन्हां पुन्हां गळ घालूं लागे. शेवटीं कामाच्या जागा वारंवार बदलून तिनें अलेकला हुकविलें आणि तो कापणीचा हंगाम कसाबसा संपवीत आणला. पुढें त्याला नकळतच आपले दिवस भरल्यावर तिनें एका मुलाला जन्म दिला. पण तें मूल फार दिवस जगलें नाहीं. मुलाच्या मृत्यूनंतर कांहीं दिवसांनीं तिनें नवा विचार केला आणि दक्षिणेकडे खूप दूर दूर जाऊन एका डेअरीमध्यें गवळण म्हणून काम मिळविलें.

या नव्या डेअरींतील कामाच्या ठिकाणीं ती सर्वांची आवडती झाली. तिथें एंजल क्लेअर नामक एक तरुण कामावर होता. हा एका पुरोहिताचा मुलगा. शेतीचा अभ्यास करण्याच्या इराद्यानें त्यानें धर्मोपदेशकाचा अभ्यासक्रम सोडून दिलेला होता. पुढें मागें स्वतःच्या मालकीची शेती करावी अशी त्याची महत्वाकांक्षा होती. म्हणून सर्वसामान्य शेतीव्यवसाय करणाऱ्याला जीं अनेक प्रकारचीं कामें करावीं लागतात त्यांची थोडथोडी माहिती घेण्यासाठीं तो निरनिराळ्या प्रकारच्या शेतांवर काम करीत होता.

तसें पाहिलें तर डेअरीमध्यें काम करणाऱ्या सगळ्याच गवळणींना त्याचें आकर्षण वाटत होतें. पण त्याचें स्वतःचें लक्ष मात्र फक्त टेसकडेच जाई. ती सुंदर आणि निष्पाप तरुणी आहे असेंच तो समजे. आणि तें कांहीं खोटें नव्हतें. या निष्पापपणापायींच पूर्वी अलेकनें तिला धोका दिला होता. मात्र आपण अगदीं दुष्ट आहोंत असें तिला स्वतःला वाटे. एंजल तिच्यावर जी स्नेहाची जवळिकीची दृष्टि ठेवण्याचा प्रयत्न करी, ती तिला नको होती. म्हणून तिनें त्याला या कामीं मुळींच उत्तेजन दिलें नाहीं. उलटपक्षीं त्यानें आपला नाद सोडून देऊन आपल्या बरोबरच्या तरुणींपैकीं कोणाशीं तरी जमवून घ्यावें असा तिनें त्याला आग्रह केला. एका धर्मोपदेशकाचा मुलगा साध्यासुध्या गवळणीशीं लग्न करील ही जवळ जवळ अशक्यप्राय गोष्ट होती. पण तो मात्र लग्नाच्या बाबतींत कौटुंबिक उच्च परंपरेची पर्वा करणारा नव्हता.

तिनें त्याला असें अनेकदां परोपरीनें सांगून देखील त्यानें तिचा अनुनय चालूच ठेवला. आणि त्यानें तिला मागणीहि घातली. स्वतःच्या आईवडिलांची संमति नसतांहि त्यानें हें केलें. कारण तो तिच्यावर प्रेम करीत होता इतकेंच नव्हे तर आपण स्वतःच्या शेतावर काम करतांना अशी शेतीकामांतली हिच्यासारखी अनुभवी तरुणीच आपल्याला मदत करील असेंहि त्याला वाटत होतें, पटत होतें.

तिचें त्याच्यावर प्रेम होतें. त्याच्याकडून मागणी येईपर्यंत तें खासच वाढलें होतें. पण अलेकच्या संबंधांतील त्या रात्रीची स्मृति तिच्या मनाला सतत बोंचत होती. ही स्मृतीच एंजलच्या म्हणण्याला वारंवार नकार देण्याला तिला भाग पाडत होती. अशा परिस्थितींत त्याचा आग्रह तिला बेचैन करूं लागला. त्यांत भर म्हणूनच कीं काय तिनें कोणाशीं तरी लग्न करून घ्यावें असा तिला आग्रह करणारीं पत्रें तिच्या आईबापांकडून येऊं लागलीं. आपल्याला आर्थिक मदत करूं शकेल असा एखादा जांवई त्या स्वार्थी माणसांना हवा होता, येवढाच त्या आग्रहाचा अर्थ होता.

तिनें एकदांचें त्याच्याशीं लग्न करायचें कबूल केलें. पण आपण या दर्जाला अपात्र आहों असें तिला सतत वाटत असल्यामुळें तिनें लग्नाची तारीख एकसारखी लांबणीवर टाकली. शेवटीं तारीखहि ठरली. तरी देखील लग्नमुहूर्ताच्या आदल्या रात्रीं तिच्या मनाचा अखेरचा झगडा झाला. तिनें त्याला एक सविस्तर पत्र लिहिलें. त्यांत अलेकविषयींचें सर्व कांहीं कळविलें. तें पत्र तिनें एंजलच्या घराच्या दाराखालील फटींतून हळूच आंत सारलें. तो सारा प्रकार समजून आल्यावर तत्काळ एंजल आपल्याला कायमची तोडून टाकील अशी त्या वेळीं तिला खात्री वाटली होती.

तरीहि दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो आपल्या पूर्वीच्याच प्रेमळ आस्थे-वाईकपणानें तिच्याशीं वागला. तें पाहून व त्याच्या क्षमाशील अंतःकरणाची ओळख पटून तिच्या हृदयांतील त्याच्याविषयींचें प्रेम पूर्वीपेक्षांहि अधिक उचंबळून आलें. पण घडलें होतें भलतेंच. त्याला तिचें तें पत्र मिळालेंच नव्हतें. ह्या वस्तु-स्थितीची जाणीव होतांक्षणीं तिनें आपलें पूर्वचरित्र त्याला सांगून टाकण्याचा फिरून एकदां प्रयत्न केला. पण त्या वेळीं त्यानें उलट तिचीच थट्टा उडविली. तो म्हणाला, "अशा निष्पाप गोड पोरीच्या आयुष्यांत पश्चातापानं कबुलीजबाब देण्यासारखीं काळीं पापं असणारच मुळीं कुठून ? "

अशा प्रकारें तिच्या पूर्वायुष्यांतील तें सगळें अलेक प्रकरण त्याला अज्ञातच राहिलें. आणि तें लग्न पार पडलें. लग्नाच्या रात्रीं एकान्तांत त्यानें आपल्या पूर्वायुष्यांतील एक गुपित तिला सांगितलें. अनैतिक संबंधानें बरबटलेला आनंद त्यानें पूर्वी एका रात्रीं उपभोगलेला होता. तें ऐकून घेऊनहि तिनें त्याला पूर्ण क्षमा केली. आपण जशी त्याला क्षमा केली, तशी तोहि आपल्याला करील असें वाटून तिनें त्याच एकान्तभेटींत आपलें अलेक प्रकरण त्याला सविस्तर सांगितलें.

पण तिची अपेक्षा मात्र साफ फोल ठरली. तिनें सांगितलेली ती हकीगत लग्नानंतर प्रथमच ऐकल्यावर तो तर आधीं दिङ्मूढच झाला. आपल्या भावना दुखावल्यासारखें वाटून त्याला तिच्याशीं काय बोलावें हेंच सुचेना. जिच्यावर आपल्याला प्रेम करावेंसें वाटेल अशी स्त्री आतां उरलेली नाहीं असें त्यानें शेवटीं तिला स्पष्ट शब्दांत सांगून टाकलें. जिच्यावर त्यानें त्या क्षणापर्यंत प्रेम केलेलें होतें, जिच्याशीं त्याचें लग्न झालेलें होतें, ती टेस आतां त्याच्या दृष्टीनें उरलेली नव्हती! आतां त्याच्या लेखीं ती एक अगदीं परकी स्त्री झाली होती. निदान त्या वेळीं तरी तिच्याशीं एकान्त करणें त्याला केवळ अशक्य होतें.

त्यानें तिला तिच्या माहेरीं पोंचविलें. तिला तिथेंच ठेवून तो परतला. तो आपल्या गांवीं गेला व तिथून पुढें देश सोडून ब्राझीलव्लाहि रवाना झाला. तिथें स्वतःचें एक शेत खरेदी करण्याचा त्याचा विचार ठरला होता.

आपल्या या आकस्मिक फारकतीचा खुलासा तिनें किंवा त्यानें आपापल्या आईबापांजवळ केला नव्हता. पण तिनें शेवटीं आपल्या आईला सांगितलें. जें मनांतलें गुपित तिनें आपल्या नवऱ्याला सांगायला नको होतें व जें त्याला मुळींच न कळून सहज चालण्याजोगें होतें, तेंच तिनें त्याला सांगून आपल्या हातानेंच आपला नवरा कायमचा गमावला, म्हणून त्या अडाणी बाईनें तिलाच दोष दिला.

त्यानें तिच्यासाठीं थोडे पैसे ठेवलेले होते. त्याच्या मानलेल्या आईनें त्याला दिलेले थोडेसे दागदागिनेहि त्यानें तिला दिले होते. हे दागिने तिनें एका बँकेत ठेवले व रोकड पैसा मात्र आपल्या आई-बाप-भावंडांना पोसायला खर्च केला. पण तो सगळा पैसा एकदांचा संपल्यावर तिच्या माहेरीं पुन्हां उपासमार सुरू झाली. कारण तिच्या बापाच्या मनांतला उच्च घराण्याचा अहंगंड नाहींसा होतो थोडाच! आपल्या चरितार्थासाठीं श्रम करायला तो स्वतः मुळींच तयार

नव्हता. त्याच्यासारख्या घरंदाज माणसाचें तें म्हणे कामच नव्हतें! तेव्हां स्वतःला व माहेरच्या माणसांना जिवंत ठेवण्यासाठींच ती पुन्हां एका शेतावरून दुसऱ्या शेतावर अशी जिवापाड कष्ट करीत फिरूं लागली.

अशींच कामें करीत फिरत असतांना तिला अलेक पुन्हां नव्यानें भेटला. तत्पूर्वी एंजलच्या धर्मोपदेशक वडिलांना भेटून त्यानें आपल्या कृतकर्मांचा पाढा त्यांजपुढें वाचून पश्चात्तापाचा कबुलीजबाब दिलेला होता. आणि आतां तो स्वतःच एक फिरता धर्मोपदेशक झालेला होता. पण अशी अकस्मात भेटल्यानंतर त्याच्या मनांतील तिच्याविषयींचे पूर्वीपासूनचे विकार पुन्हां उफाळून वर आले. त्या पाशवी आगींत त्याची नवी धर्मोपदेशकाची निष्ठा व पवित्रता होरपळून गेली. तो पुन्हां तिला आपल्याला सुख देण्याचा आग्रह करीत तिच्या मागें मागें भटकूं लागला.

या नव्याच प्रकारामुळें ती अतिशय घाबरून गेली. तिनें एंजलला एक सविस्तर पत्र लिहिलें आणि तो असेल तिथें तें धाडण्यासाठीं त्याच्या आई-वडिलांकडे पाठविलें. "माझें तुझ्यावरचें प्रेम अढळ आहे. मला तुझी फार फार जरूरी आहे. एका वैऱ्यानें माझा पाठलाग करून छळवाद मांडला आहे," असा त्या पत्रांत मजकूर होता आणि शेवटीं तिनें त्याला असें विनविलें होतें: "तूं मला क्षमा कर आणि कसेंहि करून शक्य तितक्या लवकर मला भेटायला निघून ये."

तिचें हें पत्र त्याच्या हातीं पडायला कित्येक महिने लागले. दरम्यान अलेक तिच्याशीं अतिशय प्रेमळपणानें वागूं लागला. तिच्या माहेरच्या माणसांनाहि तो औदार्य दाखवूं लागला. या सगळ्याच्या परिणामीं मध्यंतरीं आपण त्याच्या-विषयीं जी वृत्ति धारण केलेली होती तीबद्दल तिला पश्चात्ताप होऊं लागला.

एंजलच्या उत्तराची तिनें खूप खूप वाट पाहिली. शेवटीं तिनें त्याला निर्वाणीचें पत्र लिहिलें: "लग्नानंतर तूं माझ्याशीं फार फार कठोरपणानं वागलास. मला क्षमा न करण्यांत तुझी भयंकर चूक झालेली आहे. आतां यापुढें मात्र तुझ्या सगळ्या कठोर वर्तनाबद्दल मी तुला कधींहि क्षमा करणार नाहीं." यानंतर ती पुन्हां अलेक याजकडे गेली आणि त्याची पत्नी म्हणून त्याच्यासमवेत राहूं लागली.

अशा प्रकारें तिचें नवें जीवन चालू असतांना, तेंच सारें जणूं पाहायला बऱ्याच दिवसांनीं एंजल तिच्याकडे परत आला. "तुला मी क्षमा केली, तुझ्यावर

माझें अजूनहि प्रेम आहे." हें तिला सांगायलाच तो वास्तविक त्या वेळीं आलेला होता. पण अलेकची व तिची गट्टी जमून दोघें एकत्र नांदत आहेत असें प्रत्यक्ष पाहिल्यावर तो तसाच परत निघून गेला. त्याचें मन या आघातानें अतिशय दुखावलें.

त्या सर्व घटनांमुळें टेस ही देखील अतिशय दुःखी झाली. हा अलेकच पुन्हां आपल्या पतीकडून आपला असा धिक्कार व्हायला कारण झाला, या जाणिवेनें तिला अलेकचा तीव्र तिटकारा आला. तो मेला तर आपल्याला सुख लाभू शकेल अशी तिची भावना झाली, आणि तो झोंपलेला असतांना तिनें त्याला सुरा भोंसकून ठार केलें आणि ती घर सोडून एंजलच्या पाठोपाठ निघाली.

तोंपर्यंत गांवांतून दूर जाणारा रस्ता धरून एंजल वाट फुटेल तिकडे चालत जात होता. शेवटीं उभयतांची भेट झाली. आपण काय केलें तें तिनें त्याला सांगितलें. पूर्वी घडलेल्या सर्व गोष्टींबद्दल आणि अलेकच्या खुनाबद्दल देखील त्यानें तिला क्षमा केली. आणि मग तीं दोघें पुढें पुढें जात राहिलीं. अशा प्रकारें कांहीं दिवस तीं दोघें एकमेकांच्या संगतींत सुखांत राहिलीं. अधिकारी आपला पाठलाग करीत करीत लवकरच हिचा शोध लावणार आणि ही आपल्याला अंतरणार हें तो मनांत समजूनच होता.

शेवटीं पोलिस अधिकारी त्यांच्यासमोर हजर झाले. त्या वेळीं ती झोंपलेली होती. ती जागी होईपर्यंत वाट पाहण्याची त्यानें त्यांना विनंति केली. तिनें डोळे उघडले. तिला ते त्रयस्थ लोक समोर दिसले. जें काय समजायचें तें ती समजली. आपल्याला ते न्यायला आले आहेत, आपण आतां फांशी जाणार, या जाणिवेनें देखील तिला आपल्या सुखांत उणेपणा वाटत नव्हता. ज्याच्यावर आपलें खरें प्रेम होतें त्या आपल्या पतीसमवेत आपण कांहीं दिवस तरी सुखानें राहिलों, या आनंदाच्या भरांत ती आपल्याला मिळणारी शिक्षा भोगायला तयार झाली. मोठ्या धीरानें ती पटकन उभी राहिली आणि अधिकाऱ्यांच्या स्वाधीन झाली. तिला यत्किंचितहि भय वाटलें नाहीं !

द टाइम मशीन : काल-यंत्र

वाङ्‌मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* एच्. जी. वेल्स (१८६६-१९४६). *कथानकाचा प्रकार :* अद्भुतरम्य कल्पनाविलास. *काळ :* एकोणिसाव्या

शतकाचा उत्तरार्ध. *स्थळ :* इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १८९५.

प्रमुख पात्रें : काल-प्रवासी. वीणा, त्याला भविष्यकाळीं भेटणारी स्त्री.

समीक्षण : काल-प्रवाशानें कथन केलेल्या या वृत्तांतांत भविष्यकाळांतील 'ईलॉय' नामक दुबळ्या व 'मॉरलॉक्स' सारख्या लुटारू लोकांचें जें वर्णन आहे, त्याला कांहीं मनोरंजक शास्त्रीय गृहीत तत्वांचा आधार आहे. तें कांहीं का असेना, अवकाश-काळ-संबद्ध कल्पनेंतून उभा झालेला हा अंदाज-वृत्तांत भावी जगाच्या स्वरूपाचें इतकें अद्भुत, रोमहर्षक, कुतूहलजनक चित्र आपल्या समोर सादर करतो कीं केवळ साहसकथा या दृष्टीनेंहि ही कादंबरी वाचनीय झालेली आहे. बनावट शास्त्रीय उपपत्ति व कल्पनेची स्वैर भरारी यांचें मिश्रण म्हणजेच हें पुस्तक.

कथानक : काळ आणि अवकाश यांच्या परस्परसंबंधाचा विषय भोजनोत्तर वादविवादांत एके दिवशीं काल-प्रवाशानें काढला. काळ हें मोजमापाचें चौथें साधन ठरतें असा त्याचा सिद्धान्त होता आणि हा सिद्धान्त युक्तिवादानें प्रत्यक्षांत पटवून देण्यासारखा आहे असें त्याचें मत होतें. त्यानंतर त्यानें जें कांहीं केलें तें पाहून जमलेली पाहुणेमंडळी आश्चर्यचकितच झाली. स्वतः तयार केलेला काल-यंत्राचा एक नमुना त्यानें त्यांना दाखविला. "हें काळाच्या विस्तारांत पुढं, मागं, कुठंहि, कसंहि जाऊं शकतं" असा त्यानें आत्मविश्वासानें खुलासा केला. मग त्यानें जमलेल्या पाहुण्यांपैकीं एकाला बोलावलें व त्या यंत्राची एक कळ दाबायला सांगितलें.

क्षणार्धांत तें काल-यंत्र त्यांच्या समोरून अदृश्य झालें. तें पाहून सगळे स्तिमित झाले. "काल-यंत्र आतां दिसत नाहीं याचं कारण असं कीं तें या क्षणीं प्रचंड वेगानं भूतकाळांतून प्रवास करूं लागलं आहे व त्यामुळेंच आपल्या सामान्य दृष्टीच्या टप्प्यांत तें येऊं शकत नाहीं." असा या बाबतींत त्या काल-प्रवाशानें खुलासा केला.

त्यानंतरच्या पुढील आठवड्यांत जेवायच्या ठरलेल्या वेळीं त्याची ती मित्रमंडळी त्याच्या घरीं आली. त्यांचें स्वागत करायला तो मात्र घरीं हजर नव्हता. तथापि "मी नसलों तरी माझ्या मित्रांनीं माझी वाट न पाहतां जेवायला सुरवात करावी" अशी चिठी त्यानें लिहून ठेवलेली होती. त्याप्रमाणें ते सगळे लोक टेबलाशीं जाऊन जेवायला बसतात न बसतात येवढ्यांत त्यांचा तो यजमान घरीं

आला. डोक्यापासून पायापर्यंत त्याचे सगळे कपडे मलीन झालेले होते. तो थोडासा लंगडत होता आणि त्याच्या हनुवटीला एक लहानशी जखम झालेली होती. झटपट कपडे बदलून तो पंक्तींत सामील झाला. जेवणानंतरच्या गप्पागोष्टींत त्यानें त्या दिवशीं घडलेल्या अनेक साहसी प्रसंगांचा वृत्तांत आपल्या मित्रांना सांगितला तो असा :

"माझ्या काल-यंत्रांत बसून मी सकाळीं प्रवासाला बाहेर पडलों. अवकाशाच्या पोकळींतून माझें यंत्र झपाट्यानें पुढें जात होतें. दिवसांमागून दिवस मिनिटागणीक सरत होते. रात्रींमागून दिवस व दिवसांमागून रात्री अशी अत्यंत वेगानें हालचाल होत होती. प्रकाश आणि काळोख अत्यंत वेगानें येतजात असल्यामुळें माझ्या डोळ्यांना त्रास होत होता.

मी माझ्या काल-यंत्राला जरा घाईनेंच ब्रेक लावला. त्यामुळें यंत्रासह मी एकदम खालीं पडलों. मी एका टेकडीच्या उतारावर उताणा पडलों आहें याची मला जाणीव झाली. सभोंवतीं धुक्यासारखा उजेड पसरलेला होता. त्यांत ब्रॉंझच्या बैठकीवर उभी केलेली पंखवाली प्रचंड आकृति मला दिसली. सूर्य वर आल्यावर त्या टेकडीच्या उतारावर मला मोठमोठ्या इमारती दिसल्या. कांहीं लहान लहान आकृत्या माझ्याचकडे येत होत्या. त्यांतला एक माणूस सुमारें चार फूट उंचीचा होता. आतां मला पुन्हां धीर आला आणि त्या भविष्यकालीन नागरिकांची भेट व्हावी म्हणून मी वाट पाहत राहिलों.

लौकरच त्या छोट्या प्राण्यांच्या टोळीनें मला गराडा घातला. त्यांची व माझी भाषा एक नसल्यामुळें मला त्या नवपरिचितांशीं खुणांच्या द्वारांच बोलावें लागलें. त्या लोकांनीं माझें हें अद्भुत काल-यंत्र चारी बाजूंनीं निरखून पाहिलें. प्रसंगावधान राखून मी माझ्या यंत्राच्या सगळ्या कळा आधींच काढून घेतलेल्या होत्या. त्यांच्यापैकीं एकाला वाटलें कीं मी सूर्यावरून आलेलों असावा. म्हणून त्यानें याबाबत मला विचारलें.

मग त्या लोकांनीं मला तिथल्या एका मोठ्या इमारतींत नेलें व एका गादीवर बसविलें. माझ्या पुढ्यांत खायला फळें ठेवलीं. तिथले सगळे लोक पूर्ण शाकाहारी होते. कारण सर्व मानवेतर प्राणी त्या वेळीं नामशेष झालेले होते. जेवण झाल्यावर मी माझ्या त्या नव्या मित्रांची भाषा शिकून घेण्याचा प्रयत्न केला. पण यांत मला फारसें यश आलें नाहीं. हे त्या वेळचे तिथले नागरिक

स्वतःला 'ईलॉय' या नांवानें संबोधून घेत होते. विशेष कोणतेंच काम एकाग्रतेनें करायचें सामर्थ्य त्यांच्यांत नव्हतें. कारण बघतां बघतां ते दमून भागून जात असत.

इकडे तिकडे भटकायला मला पूर्ण मोकळीक होती. तेव्हां मी एका टेकडी-वर चढलों व तिच्या माथ्यावरून मला वज्रतुंड दगडाच्या एका प्रचंड इमारतीचे अवशेष दिसले. माझ्या मागून तिथले कांहीं प्राणी येत होते. या सगळ्यांचे पोशाख सारखेच आहेत हें या वेळीं माझ्या लक्षांत आलें. यांतल्या प्रत्येकाची शरीरयष्टि सारख्या आकाराची, गोलाई-युक्त व मऊ मऊ होती. केवळ आकारावरूनच तिथलीं मुलें ओळखतां येत होतीं, येवढेंच.

हें सगळें निरीक्षण केल्यावर मला हें समजून चुकलें कीं मानवजातीचा प्रत्यक्ष अस्तच मला या ठिकाणीं समोर दिसत आहे. त्या भविष्यकालीन समाजांत शक्तीची मुळींच आवश्यकता राहिलेली नव्हती. लढाया नाहींशा होऊन जगांत फक्त संपूर्ण शांतता नांदत होती. जग सर्वच दृष्टींनीं सुरक्षित झालें होतें. असल्या त्या वातावरणांत प्रचंड शरीरशक्ति किंवा मनःशक्ति असलेल्या माणसाला जीवन वैफल्यानें भरल्यासारखेंच वाटलें असतें.

कुठें तरी झोंप घ्यावी म्हणून मी आजूबाजूस पाहूं लागलों. तेवढ्यांत माझ्या ध्यानांत आलें कीं माझें काल-यंत्र ठिकाणावर दिसत नाहीं. जिथें मी जेवलों, तिथल्या लोकांना जागे करायचा मी प्रयत्न केला. पण त्यामुळें उलट ते सगळे घाबरूनच गेले. मी पुन्हां त्या हिरवळीकडे गेलों व माझ्यावर आलेल्या प्रसंगामुळें बेचैन होऊन बसलों. हा विचार करतां करतांच मला तिथल्या तिथें झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शोधाशोध करतां करतां मला माझ्या काल-यंत्राच्या चाकांच्या धांवांचे ठसे जमिनीवर उमटलेले दिसले. त्यांच्या अनुरोधानें माग काढत काढत मी प्रथम पाहिलेल्या त्या पुतळ्याच्या पायथ्यापाशींच येऊन पोंचलों. त्याच्या खालील ब्रॉंझच्या बैठकींत असलेले दरवाजे बंद होते. ते मला उघडून हवे आहेत असें मी तिथल्या कांहीं ईलॉय लोकांना खाणाखुणांनीं समजावलें. पण त्यांना माझ्याविषयीं तिरस्कार व संताप वाटत असलेला त्यांच्या चेहऱ्यांवरून दिसला. शेवटीं दगडानें ते दरवाजे फोडायचाहि मी प्रयत्न केला. पण हें करतां करतां मी अगदीं थकून गेलों व तो प्रयत्न मी थांबविला.

वीणा नामक एक तरुणी बुडत असतांना तिला मी वांचविलें. त्यानंतर

तिच्याशीं माझी मैत्री जमली व तीच माझी मार्गदर्शिका झाली. चौथ्या दिवशीं सकाळीं मी जुन्या अवशेषांची एक नवी जागा शोधून काढली. तिथली अधिक पाहणी करीत असतांना काळोखांतून दोन डोळे माझ्याकडे टक लावून बघत असलेले मला दिसले. एखाद्या माकडासारखी ती छोटी मूर्ति दिसत होती. मला कुतूहल वाटलें. मी त्या प्राण्यामागोमाग पुढें चाललों. तिथें जमिनींत विहिरीसारखें एक भोंक होतें. त्या भोंकांत तो प्राणी उतरला. त्याच्या पाठोपाठ मीहि आंत उतरलों.

तिथल्या जीवनाचें मी अवलोकन केलें. तेव्हां हा प्राणी देखील माणसाचाच वंशज असावा, मात्र ही जात जमिनीखालीं राहून वरच्या जगांत वावरणाऱ्या माणसांच्या जातीला मदत करीत असावी अशी खात्री पटली. या जमिनीखालील माणसांच्या जातीला 'मॉरलॉक' म्हणत. या लोकांनींच माझें काल-यंत्र पळविलें असावें, तें जाग्यावरून नाहींसें व्हायला हेच लोक जबाबदार असावेत, असें आतां माझ्या मनानें घेतलें. तेव्हां त्यांच्याविषयीं अधिक माहिती मिळवावी म्हणून मी त्या भोंकांत उतरलों. भोंकाच्या तळाशीं एक बोगदा होता. तिथून पुढें गेल्यावर मला एक गुहेसारखें खबदाड दिसलें. तिथें एक टेबल होतें. त्यावर मला मांसाचा सांध्याजवळचा भाग दिसला. हे मॉरलॉक लोक मांसाहारी असावेत असें यावरून मी अनुमान काढलें. तिथें प्रचंड यंत्रसामुग्री मला पाहायला मिळाली.

दुसऱ्या दिवशीं वीणाबरोबर मी एक म्यूझियम पाहायला गेलों. त्याची इमारत हिरव्या रंगाच्या चिनी मातीची होती. त्यांत प्राण्यांचे सांगाडे, पुस्तकें व यंत्रसामुग्री ठेवलेली होती. पाहतां पाहतां खूप दूरवर गेलों, म्हणून त्या रात्रीं वीणेनें आणि मीं जंगलांतच झोंपायचा बेत केला. त्या काळोख-प्रेमी मॉरलॉक लोकांनीं आमच्याजवळ येऊं नये म्हणून मी एक शेगडी पेटविली. तेवढ्यांत जवळपास झुडपांच्या आडोशाला तीन इसम दबा धरून बसलेले मला दिसले. मी मूळचा बेत बदलला. जंगलापलीकडील अधिक सुरक्षित अशा एका टेंकडीवर आम्ही गेलों. शत्रूंना दूर ठेवण्यासाठीं मी तिथें शेगडी पेटविली.

जागा झाल्यावर पाहतों तों शेगडी विझून गेलेली दिसली. माझी काड्यांची पेटीहि गायब! आणि वीणाहि बेपत्ता! मी अगोदर पेटविलेली शेगडी मात्र अजून जळत होती. आणि तिच्यामुळें सारें जंगलच पेटलें होतें. त्या वणव्यांत कमींत कमी ३०-४० मॉरलॉक जळून मेलेले मला दिसले.

सूर्योदयानंतर मी पुन्हां त्या पुतळ्याकडे गेलों. दिवसभर तिथेंच झोंपलों व संध्याकाळीं तिथले दरवाजे फोडायची मी तयारी चालविली. त्या म्युझियममध्यें मला दरवाजे उघडायचीं साधनें सांपडलीं होतीं व त्यांचा मी उपयोग करणार होतों. पण या वेळीं बघतां तों ते दरवाजे उघडेच दिसले. आंतल्या अंगाला समोरच मला माझें काल-यंत्र दिसलें. त्यांत मी बसलों. त्याच वेळीं मॉरलॉक लोकांची एक टोळी माझ्यावर चाल करून आली. पण तेवढ्यांत मी आकाशांत उड्डाणहि केलेलें होतें.

ईलॉय व मॉरलॉक या लोकांशीं माझ्या त्या गांठीभेटी, हे सामने झाले, तो काळ म्हणजे इ. स. ८,०२,७०१ हें साल होतें. त्यानंतर पुढील प्रवासाच्या वेळीं मी दशलक्षच काय, कोटि वर्षेंहि पुढें पुढें भरारत गेलों. त्या वेळीं पृथ्वीचें भ्रमण बंद पडलेलें असणार होतें.

त्या काळीं मी एका निर्जन किनाऱ्यावर उतरलों. नाहीं म्हणायला मोठ्या पांढऱ्या फुलपांखरासारखा एक अजस्र उडता प्राणी तिथें होता व चिंबोऱ्यां-सारखे दिसणारे कांहीं अवाढव्य प्राणी होते. मी तसाच पुढें पुढें काळाच्या अनंत विस्तारांतून भरारत चाललों. शेवटीं थेट तीन कोटि वर्षांपर्यंतचा पल्ला गांठल्यानंतर यी थांबलों. त्या दूरच्या युगांत सूर्य मावळायला चालला होता. सगळीकडे भयंकर गारठा पडलेला होता. हिमवर्षाव होऊं लागला. सर्वत्र स्मशानशांतता पसरली. मी खूपच घाबरलों आणि पुन्हां आजच्या काळाकडे परतायला काल-यंत्रांत बसून निघालों. ''

त्यानें हा सगळा वृत्तांत तपशीलवार सांगितला, पण त्याच्या पाहुणे मित्रांना तें कांहीं खरें वाटेना. वस्तुतः त्याला स्वतःलाच आधीं आपल्या प्रयोग शाळेंत जाऊन आपलें काल-यंत्र तिथें असल्याची खात्री करून घ्यावीशी वाटली आणि तशी त्यानें करून घेतली.

दुसऱ्या दिवशीं मात्र मनांतल्या सगळ्या शंका कुशंका विरून गेल्या. कारण त्याच्या मित्रांपैकीं एकानें त्याला आपल्या काल-यंत्रांत बसून निघून जातांना स्वतः पाहिलें. त्याच्या त्या मित्रानेंच ही कथा त्यानंतर तीन वर्षांनीं लिहिली. या दरम्यानच्या काळांत तो काल-प्रवासी पृथ्वीवर परत आलेला नव्हता. त्याचे मित्र नाना तर्कवितर्क करीत बसले होते. कुणी सांगावें, कदाचित चमत्कारिक अपघात घडून तो काल-प्रवासी अजूनहि अवकाशाच्या ओसाडींत वाट चुकून

सैरावैरा फिरतच राहिला असेल, अशी काळजी करीत त्यांनीं तो परत येईपर्यंतचा काळ काढलेला होता.

द टायटन : करोडपति

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* थिओडोर ड्रायसर (१८७१-१९४५). *कथानकाचा प्रकार :* यथार्थवाद. *काळ :* १८९० ते १८९९. *स्थळ :* शिकागो. *प्रथम प्रकाशन :* १९१४.

प्रमुख पात्रें : **फ्रँक आल्गर्नन कौपरवुड**, एक करोडपति व अत्यंत यशस्वी पेढीवाला. **आयलीन कौपरवुड**, त्याची प्रेयसी; ही मागाहून त्याची पत्नी झाली. **पीटर लाफ्लिन**, त्याचा धंद्यांतील भागीदार. **स्टेफानी प्लॅटो**, कौपरवुडची रखेली. **बेरेनिस फ्लेमिंग**, कौपरवुडची आश्रित आणि रखेली.

समीक्षण : ड्रायसरनें एका करोडपति बड्या पेढीवाल्या जादुगाराचें विस्तृत स्वरूपांत केलेलें हें चित्रण म्हणजे यथार्थवादी लेखकांच्या कलेंतील एक विक्रमच होय. १८९० व या कादंबरीचें प्रकाशन-वर्ष (१९१४) या दरम्यानच्या कालखंडांत अमेरिकन पेढीवाल्यांच्या जीवनाचें वर्णन करणाऱ्या कित्येक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. तथापि त्यांतील कोणतीहि कलाकृति सर्वांगीण निर्दोषपणा व व्यापकपणा आणि मानसशास्त्रीय बारकाव्यांची जाणीव या बाबतींत प्रस्तुत 'द टायटन' या कादंबरीची बरोबरी करू शकली नाहीं. ड्रायसरनें 'द फायनॅन्शियर' या कादंबरींत आरंभिलेला कौपरवुडचा मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यास प्रस्तुत 'द टायटन' या कादंबरींत पूर्ण स्वरूपांत वाचकांना सादर केलेला आढळतो. लेखकानें या दोन कादंबऱ्यांत चित्रित केलेला कथानायक कोणतींहि रूढ नीतिबंधनें पाळत नसला तरी तो जीवनहेतु असलेला सामर्थ्यवान पुरुष आहे. खुद्द कादंबरी-लेखक आपल्या या कथानायकाविषयीं स्वतःचा कोणताहि बरावाईट न्यायनिर्णय देण्याचा प्रयत्न करीत नाहीं. त्याच्याच पावलावर पाऊल टाकून आपणहि त्या बाबतींत मौनच स्वीकारावें असें वाचकाला वाटतें.

कथानक : १८७३ च्या मार्च महिन्यांत पेन्सिल्व्हानिया जेलमधून फ्रँक आल्गर्नन कौपरवुड सुटून आला. तो अजून तरुण होता. लक्षाधीशहि होता.

आपली त्या वेळची मैत्रीण आयलीन बटलर हिला बरोबर घेऊन नव्या जीवनाला सुरवात करण्यासाठीं तो शिकागो शहरीं गेला. थोडक्याच अवधींत तेथील धंदे-वाईक वजनदार वर्तुळामधील अनेकांशीं त्यानें नवीन मैत्री जोडली.

पहिल्या पत्नीनें त्याच्यापासून काडीमोड घेतल्यानंतर त्यानें आपली आतांपर्यंतची मैत्रीण आयलीन हिच्याशीं लग्न केलें. आपली धनदौलत वाढवावी, त्या शहरांत आपण एक सामर्थ्यशाली व्यक्ति होऊन आपल्या नांवलौकिकानें तेथील शिष्ट समाज आपण जिंकावा हीच त्याची महान महत्वाकांक्षा होती. याच हेतूनें तो उद्योगाला लागला. ही गोष्ट साधण्यासाठीं भांडवल गुंतविण्याचें असें क्षेत्र तो शोधत होता कीं ज्यांतून आपल्याला लौकरांत लौकर खूप फायदा मिळेल. शिकागो शहरांतील गॅस कंपनीवर प्रभुत्व मिळविणें हा उद्देश पुढें ठेवून त्यानें तिथल्या बड्या पेढीवाल्यांशीं शेअरबाजारांत पहिली लढाई दिली.

या हालचालींबरोबरच या कौपरवुड कुटुंबानें आपल्या मानमरातबासाठीं व नांवलौकिकासाठीं शहरांतील वरच्या थरांतल्या समाजावरहि आपला पहिला हल्ला चढविला. पण त्यांत मात्र त्यांना जवळ जवळ मुळींच यश लाभलें नाहीं. स्वभावतः आयलीन ही जरा चढेल वृत्तीची होती. त्यामुळें शिष्ट समाजांत निश्चित यशस्वी स्थान पटकावायला ज्या प्रकारचा समतोलपणा लागतो तो तिच्या अंगीं नव्हता. त्यांतच पुन्हां त्या कुटुंबाला कित्येक कज्ज्यां-खटल्यांमध्यें गुंतून पडण्याची पाळी आली. त्यांतूनच एकेक जुनीं खरकटीं बाहेर पडलीं. आणि कौपरवुडला पूर्वायुष्यांत फिलॅडेल्फिया शहरीं जी राजकीय-आर्थिक नाचक्की पतकरावी लागली, ती शिकागोच्या वृत्तपत्रांनीं उजेडांत आली. तथापि दीर्घकालीन झटापटीनंतर त्यानें आपल्याला फायदेशीर होईल अशा दरानें आपल्याजवळचे गॅस कंपन्यांचे शेअर आपल्या प्रतिस्पर्धी गॅस कंपन्यांना विकत घ्यायला भाग पाडलें.

मात्र दुर्दैव असें कीं या सर्व धंदेवाईक हालचालींत त्याचा पैशाच्या दृष्टीनें फायदा झालेला असला तरी शिष्ट समाजामध्यें तात्पुरती का होईना, त्याची मान खालीं झाली होती. याचें मुख्य कारण म्हणजे त्याच्या धंदेवाईक प्रतिस्पर्धी कंपन्यांचे प्रमुख हींच त्या वेळच्या शिकागो शहरांतील शिष्ट समाजांतलीं बडीं धेडें होतीं. याच सुमाराला पुन्हां एकदां तो एका नव्या रखेलीच्या नादीं लागला. पण आयलीननें तिला ठारच करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां मात्र तें प्रकरण तेवढ्यावरच संपलें.

कित्येक वर्षें त्याचा बहुतेक सारा वेळ शहरांतील ट्राम वाहतुकीच्या कंपन्यांमध्यें लक्ष घालण्यांत गेला. शहराच्या उत्तर भागांत चालू असलेल्या घोड्यांच्या ट्राम कंपनीवर आपलें वर्चस्व बसेल येवढे शेअर त्यानें विकत घेतले. त्याच सुमारास त्याची एका मादक रसरशीत स्त्रीशीं भेट झाली. तिचें नांव स्टेफानी प्रॅटो. तत्काळ त्याच्या मुळांतल्या छंदीफंदी स्वभावानें पुन्हां एकदां उचल खाल्ली. ही स्त्री त्याच्या बायकोपेक्षां दहा वर्षांनीं तरुण होती. चित्रकला, साहित्य आणि संगीत या विषयांची तिला गोडी होती. त्याच्या आयुष्यांत आयलीनला जें स्थान कधींच मिळवितां आलें नसतें तें हिला सहज हस्तगत करतां आलें.

अशा प्रकारें या भानगडींत तो गुंतला असतांनाच शहरांतील पश्चिम बाजूच्या रस्त्यांवर ट्राम गाड्या चालविणाऱ्या कंपनीचे शेअर हस्तगत करण्यांत त्यानें यश मिळविलें. पण त्याच वेळीं स्टेफानी ही दुसऱ्या एका माणसाची प्रेयसी आहे हें उघडकीस आल्यामुळें त्याच्या आर्थिक यशांतील आनंदावर थोडेंसें विरजण पडलें. दरम्यान शहरांतील आर्थिक सत्ता त्याच्या विरुद्ध कारवाया करीत होत्या. शहरावर राजकीय वर्चस्व गाजविणाऱ्या दोघां दादांना हाताशीं धरून स्थानिक नगरपित्यांना त्याच्या विरुद्ध उठवायचें असा त्यांचा डाव होता. कारण स्थानिक नगरपालिकेची मंजुरी व मदत मिळाल्याशिवाय त्याला साऱ्या ट्राम कंपन्यांचें एकत्रीकरण करणें व त्या आपल्या वर्चस्वाखालीं घेणें अशक्य होतें.

नगरपालिकेवर वर्चस्व मिळविण्यासाठीं पहिली लढाई झाली ती निवडणुकींच्या वेळीं. शहरांतील सगळे बडे पेढीवाले व शिष्ट समाजांतील सर्व मोठमोठीं धेंडें आपल्याविरुद्ध उभीं ठाकलेलीं आहेत हें या वेळीं त्याला कळून आलें. पण त्याहूनहि अधिक दुःखद अशी बातमी त्याच वेळीं त्याच्या कानीं आली. ती अशी कीं प्रत्यक्ष त्याची पत्नीच त्याच्याशीं बेइमान झाली. निवडणुकींत त्याची बाजू हरली व त्या धक्क्यांतून त्यानें लौकरच स्वतःला सांवरून घेतलें. पत्नीच्या बदफैलीपणाचाहि त्याच्या मनावर कायमचा परिणाम राहूं शकला नाहीं. त्याच्या विरोधकांनीं स्वतःच्या हातांनींच निवडणुकींतील आपल्या यशावर बोळा फिरविला. कारण नवीन निवडून आलेल्या कौन्सिलमध्यें स्वतःला फायदेशीर अशीं नवनवीन बिलें त्या लोकानीं पुढें ढकललीं खरीं, पण त्याबरोबरच जो पैसा पेरावा लागतो व क्लृप्त्या लढवाव्या लागतात त्यांतलें त्यांनीं कांहीं एक केलें नाहीं. म्हणून नवा महापौर देखील लौकरच त्याचा पाठिराखा झाला.

यानंतर लौकरच बेरेनिस फ्रेमिंग नामक एका तरुण पोरीशीं त्याची गांठ पडली. बड्या लोकांना खासगी पात्रें पुरविणाऱ्या एका बाईची ती कन्या होती. शिष्ट समाजांतील भावी जीवनाची सर्वांगीण पूर्वतयारी करण्यासाठीं तीं एका वसतिगृह-शाळेंत शिक्षण घेत होती. त्यानें बेरेनिसला तिच्या परिवारासह आपल्याकडे आश्रय दिला. तो जरा भीत भीतच तिचा प्रियकर बनला. कारण त्या वेळीं तो बावन्न वर्षांचा होता आणि ती जेमतेम सत्रा वर्षांची होती. याच सुमाराला त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं विजेवर चालणाऱ्या ट्रामगाड्यांच्या लाइनी टाकण्यासाठीं परवाने मिळविण्याची खटपट चालविलेली होती. त्यांच्या या नव्या प्रयत्नाचा अर्थ येवढाच होता कीं कौपरवुडच्या ताब्यांतील ट्राम कंपन्यांच्या गाड्या विजेवर चालत्या करणें भाग होतें. आणि शिवाय या नव्या लाइनींचा थोडासा तरी हिस्सा आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं चढाओढ करणें त्यला भाग होतें; आपला सर्वनाश टाळण्यासाठीं त्याला हें करावेंच लागणार होतें.

त्याच सुमाराला म्हणजे १८९३ मध्यें शिकागो शहरीं जागतिक प्रदर्शन भरलें. त्यामुळें शहराच्या दक्षिण भागांतील 'एल्' या इंग्रजी अक्षराच्या आकाराची नवीन लाइन खूपच फायद्यांत चालली. आणि मग सारें शहर अधिक चांगल्या वाहतूक साधनांसाठीं हांकाटी करूं लागलें. कौपरवुडला आपला नवा उद्योग सुरू करायला मोठ्या प्रमाणावर कर्जें हवीं होतीं. आणि शहरांतील बँकांवर तर त्याच्या प्रतिस्पर्ध्यांचें वर्चस्व होतें. त्यामुळें त्याला बँका कर्जें देईनात. पूर्वेकडील भागांतलें काम चालू करण्यासाठीं पैशाची तरतूद करण्याचा त्यानें प्रयत्न केला, तेव्हां त्याला असा पत्ता लागला कीं त्याच्या तारणांबद्दलच बँका संशय घेत आहेत. तथापि अशा प्रतिकूल परिस्थितींत देखील या दमदार भांडवलवाल्यानें असा कांहीं एकच जोरदार रामटोला हाणला कीं त्यामुळें त्याची बाजारांतील पत व त्याचें कर्तृत्व याविषयींचे संबंधित लोकांचे सारे संशय पार विरघळून गेले. त्यानें स्थानिक विद्यविद्यालयाला एक मोठी दुर्बिण ध्यायला व वेधशाळा बांधायला एका झटक्यांत तीन लाख डॉलरांची देणगी दिली.

अमर्याद पत असून देखील परवाने मिळविण्याचा प्रश्न तसा सोपा नव्हता. साऱ्या शिकागो शहरांतील वाहतूक व्यवस्था आपल्याच वर्चस्वाखालीं ठेवण्याचा त्याचा कृतनिश्चय होता. परंतु शहरांतील शिष्ट समाजांत आपल्याला किंवा आपल्या पत्नीला मान्यता कधींच मिळणार नाहीं हें त्याच्या ध्यानांत येऊं

लागलें. म्हणूनच त्यानें न्यू यॉर्कमध्यें एक टोलेजंग इमारत बांधायचें ठरविलें. त्या ठिकाणीं तो आपल्या संग्रहांतील सार्‍या कलाकृति ठेवणार होता. याच्या योगानें तरी आपली शिष्ट समाजांतील प्रतिष्ठा वाढण्याचा मार्ग खुला होईल असें त्याला वाटलें.

दरम्यान, परवाने मिळविल्यानंतर शहरांतील नवीन वाहतूकमार्गांचें काम त्यानें सुरू केलें. या कारभारांत त्याचे सारे व्यवहार त्याच्या सपशेल आटोक्याबाहेर जावेत व त्याचा आर्थिक दृष्ट्या चक्काचूर होऊन तो शहरांतील शिष्टसमाजांतूनहि पुरता बाद व्हावा अशा दूरदर्शी धोरणानें त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं या वेळीं कांहींशी तटस्थता पतकरली. तेवढ्यांत अमेरिकन मॅच कॉर्पोरेशन या कंपनीचें एकाएकीं दिवाळें वाजलें. हा प्रकार घडायला कौपरवुड हाच अंशतः जबाबदार होता. या दिवाळ्यामुळें त्याच्या प्रतिस्पर्धी गटांचें वर्चस्व असलेल्या बँकांवर शहरांतील घेणेकर्‍यांची तोबा गर्दी उडाली. त्या सर्व बँकांनीं त्याला दिलेलीं प्रचंड कर्जें परत वसूल करायचा प्रयत्न केला त्यांत त्यांना यश आलें नाहीं. यामुळें या सर्व प्रकरणानंतर पूर्वीपेक्षां किती तरी पटींनीं त्याला मजबुती आली.

शहरांतील त्याच्या या धंदेवाईक कारकीर्दीची अखेरची लढाई, त्याच्या आर्थिक कर्तबगारीचा परमोच्च बिंदु गांठण्याची वेळ, म्हणजे त्यानें आपल्या वाढत्या वाहतूक व्यवस्थेसाठीं महानगरपालिकेकडून पन्नास वर्षांच्या मुदतीचा परवाना मिळविण्यासाठीं केलेले प्रयत्न हे होत. त्याची ही योजना दुप्पट कठीण होऊन बसली, ती त्यानें अगदीं अलीकडे ताब्यांत घेतलेल्या 'युनियन लूप' या ट्राम कंपनीमुळें. या कंपनीच्या जोरावर त्यानें सगळ्या नव्या ट्राम कंपन्यांवर वर्चस्व स्थापन केलें. ही नवी वर्तूळाकार लाइन शहरांतील व्यापारी विभागाला वेढा देऊन बसलेली होती. यामुळें शहरांतील सगळ्या लाइनींना या लाइनीचा वापर करणें भागच पडे. शहरांतील बड्या थैलीशहांचा त्याला विरोध होता; कारण तो त्यांच्यांतला नव्हता. वृत्तपत्रेंहि त्याच्याविरुद्ध होतीं; कारण त्यांना शहरांतील वाहतूक साधनें अधिक स्वस्त व अधिक चांगलीं व्हायला हवीं होतीं. अशा परिस्थितींत तो कितीहि पैसे व सत्ता द्यायला तयार असला तरी त्याला हवे असलेले परवाने मंजूर करायला अत्यंत बेदरकार नगरपिते देखील भीत होते. मग त्याच्या कायदेपंडितांनीं त्याला कळविलें कीं असले लांब मुदतीचे परवाने

देण्याचा अधिकार राज्यघटनेनें शहराच्या महानगरपालिकेला दिलेलाच नाहीं. दबाव आणून अशी मंजुरी जरी मिळविली तरी ती बेकायदेशीर ठरणार.

यानंतर त्यानें आणखी एक नवीन शक्कल काढली. राज्य विधान सभेंत लांचलुचपतीच्या जोरावर वाहतुकीबाबतच्या प्रश्नासाठीं एक कमिशन नेमून घ्यायचें. कमिशन नेमणाऱ्या बिलामध्येंच एक कलम असें घालायचें कीं आज अस्तित्वांत असलेल्या सर्व वाहतूक-धंदा करणाऱ्या संस्थांना पुढील पन्नास वर्षांसाठीं परवाना वाढवून दिलेला असावा. तें बिल विधानसभेंत एकदांचें पास झालें. पण राज्यपालानें तें आपल्या अधिकारांत फेटाळून लावलें.

इकडे न्यू यॉर्क शहरीं बांधत असलेली टोलेजंग इमारत पूर्ण झाली आणि आयलीन तींत राहायला गेली. तथापि त्यामुळें शिष्ट समाजांत तिचा फारसा शिरकाव झाला नाहीं. नाहीं म्हणायला शिष्ट समाजाच्या स्वैराचारी गटांत तेवढी ती चमकली. पार्क ॲव्हेन्यूवरील एका मोठ्या बंगल्यांत त्याच सुमारास बेरेनिस फ्रेमिंग हीहि आपल्या परिवारासह राहूं लागली. त्यानंतर कौपरवुडच्या खासगी आयुष्यांतील पुढचें पाऊल म्हणजे त्याचा दुसरा घटस्फोट. बेरेनिस फ्रेमिंग हिच्या संबंधांतील त्याची भानगड आयलीनला समजली. त्या वेळीं त्यानें तिच्याकडे घटस्फोट मागितला. तेव्हां तिनें आत्महत्येचा प्रयत्न केला; पण त्यांत तिला यश आलें नाहीं.

इलिनॉय विधानसभेमधून आपलें पूर्वीचें बिल पुन्हां मंजूर करून घेण्याचा त्यानें एक नवा प्रयत्न केला. पण तेथील सभासदांनीं तें बिल फिरून महानगर-पालिकेकडे परत पाठविलें. तेथें अर्थात् पूर्वीप्रमाणेंच तो हरला. सर्व जनतेनें व साऱ्या वर्तमानपत्रांनीं हल्ल्यांवर हल्ले चढवून नगरपित्यांना असें कांहीं घाबरवून सोडलें कीं प्रचंड लांचलुचपतीचें आमिष असूनहि त्यांना तें बिल पास करून घेण्याचें धाडस झालें नाहीं.

अशा प्रकारें शिकागो शहरांतील वाहतूक-व्यवस्थेवर आपलें वर्चस्व ठेवण्याची त्याची आशा निष्फळ ठरल्यानंतर त्या धंद्यांतील आपले सारे हितसंबंध त्यानें विकून टाकले. आपल्या पराभवापुढें त्यानें मान वांकविली. बेरेनिसला घेऊन तो युरोपच्या प्रवासाला निघून गेला. या करोडपतीचें साम्राज्य कोसळलें.

टॉम सॉयर

वाङ्‌मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* मार्क ट्वेन (सॅम्युएल एल. क्लेमेन्स, १८३५-१९१०). *कथानकाचा प्रकार :* साहसमय अद्भुतरम्य कथा. *काळ :* एकोणिसावें शतक. *स्थळ :* उत्तर अमेरिकेंतील मिसिसिपी नदीकांठचें सेंट पीटर्स बर्ग. *प्रथम प्रकाशन :* १८७६.

प्रमुख पात्रें : **टॉम सॉयर.** **आँट पॉली**, टॉमची मावशी. **हकलबेरी फिन**, आणि **जो हार्पर**, टॉमचे मित्र. **बेकी थॅचर**, टॉमची प्रियतमा. **इन्जुन ज्यो**, एक खुनी इसम. **मफ पॉटर**, खेड्यांतला एक रिकामटेकडा इसम.

समीक्षण : भरदार देशी घाटाचा विनोद व मनुष्यस्वभावाचें प्रत्यक्ष निरीक्षण यांच्यामुळें 'टॉम सॉयरचीं साहसें' याची गणना मुलांसाठीं लिहिलेल्या सर्वश्रेष्ठ पुस्तकांमध्यें होते. तें केवळ मुलांसाठीं लिहिलेलें पुस्तकच नव्हे, तर अमेरिकेच्या सुवर्णयुगाचें चित्रण करणारें ग्रामगीत आहे. तो ग्रामीण जीवनाचा काळ व त्या वेळचें तें वातावरण अगोदरच लुप्त झालेलें होतें. आपल्या स्वत:च्या बाळपणींच्या आठवणींतून लेखकानें सेंट पीटर्सबर्गचें हें चित्र पुन्हां निर्माण केलें. 'हकलबेरी फिनचीं साहसें' याच्याशीं तुलना करतां प्रस्तुत पुस्तकाची थोरवी उणी पडते, आणि याचा हेतुहि वेगळा आहे. तरी देखील टॉम सॉयरच्या साहसांची ही कथा कुमार वयांतील कल्पनांची भरारी व प्रौढ वयांत मागें रेंगाळत राहणाऱ्या लहानपणींच्या आठवणी या दोहोंशींहि सुसंगत ठरते. या कथेंतील टॉमची ती चांच्यांची टोळी, चामखिळींवरील रामबाण उपाय, कुंपणाला लावलेली सफेती, जॅकसन बेट, बेकी थॅचर, इन्जुन ज्यो आणि हक फिन यांचीं सर्व वर्णनें म्हणजे अमेरिकन वाङ्‌मयाचीं भूषणें आहेत. त्यांच्या अभावीं तें कंगाल ठरेल.

कथानक : आपली पॉलीमावशी आपल्यावर फार प्रेम करते या जाणिवेनेंच टॉम सॉयरच्या जीवनाला स्थिरता वाटत होती. कधीं कधीं ती त्याला खूप रागें भरे; कधीं चाबकानें झोडपूनहि काढी. पण तिच्या हृदयांत मागाहून त्याबद्दलची एक प्रकारची चुटपुट नक्की रेंगाळत राहत असावी असें त्याला तरी वाटे. त्यांतल्या बहुतेक वेळां तसल्या शिक्षेला तो पात्रच असायचा. पण कधीं कधीं त्याचा चुगलखोर सावत्र भाऊ सिड याच्यापायींहि त्याला हा मार

ग्यावा लागे. उलटपक्षीं त्याची मावसबहीण मेरी ही मात्र त्याच्याशीं अधिक प्रेमानें वागे. त्याच्या बाबतींत तिला करावी लागणारी सगळ्यांत वाईट कामगिरी म्हणजे त्या स्वारीला घांसून-धुवून साफ करणें, त्याला स्वच्छ कपडे चढवून चर्चला जायला तयार करणें! कारण दर रविवारीं टॉम, सिड व मेरी यांना घेऊन पॉलीमावशी चर्चला जात असे. त्या वेळीं तरी तो नीटनेटका दिसला पाहिजे असा मावशीचा कटाक्ष असे.

त्यांच्या त्या परिसरांत एक नवीन कुटुंब राहायला आलें. जरा अधिक तपास लागल्यावर त्याला घरगुती लेसकाम केलेला लेंगा घातलेली निळ्या डोळ्यांची एक छबकडी पोरगी दिसली. तिचें नांव बेकी थॅचर. आजवर त्याचें ॲमी लॉरेन्सवर जें प्रचंड प्रेम होतें तें तत्काळ तिच्यावरून उडालें आणि बेकीवर जाऊन बसलें. त्याच्या चंचल मनाला आतां या नव्या मुलीची ओढ वाटूं लागली.

दुसऱ्या दिवशीं ती शाळेंत आली. वर्गामध्यें मुलींच्या जागेंत ती एका बांकावर बसली. तिच्याजवळची जागा रिकामी होती. त्या दिवशीं सकाळीं टॉमला शाळेंत पोंचायला थोडा उशीर झाला. "तुला उशीर कां झाला?" म्हणून मास्तरांनीं त्याला खुलासा विचारला. त्या वेळीं त्याचें लक्ष बेकीजवळच्या रिकाम्या जागेकडे गेलें. "गांवच्या दारुड्याचा मुलगा हकलबेरी फिन याच्याशीं मी येतां येतां बोलत उभा राहिलों," असें त्यानें अगदीं बेछूटपणें कबूल केलें. हकच्या अंगावर लोकांनीं रद्दी म्हणून टाकून दिलेले कपडे असत. तो शाळेंत कधीं जात नसे. धूम्रपान करी. हवे तेव्हां मासे पकडी. जागा मिळेल तिथें झोंपे. या हकशीं मैत्री ठेवल्याबद्दल मास्तरांनीं टॉमला चाबकानें झोडपलें. त्याला मुलींच्या जागेंत जाऊन बसायला फर्माविलें. बेकीजवळच्या रिकाम्या जागीं तो बसत असतांना सारा वर्ग उपहासानें चोरून हंसत होता.

आपल्या पाटीवर नाना प्रकारच्या रेघोट्या आणि चित्रें काढून त्यानें बेकीचें लक्ष प्रथम आपल्याकडे आकर्षून घेतलें. मग त्यानें पाटीवर लिहिलें— "माझें तुझ्यावर प्रेम आहे." तें वाचून ती एकदम लाजली. शाळा सुटल्यानंतर मला भेट असें त्यानें तिला हळूच आग्रहानें सांगितलें.

तिच्यासह कुंपणावर बसून त्यानें आपला तिच्याशीं वाङ्‌निश्चय होण्याच्या शक्यतेचा खुलासा करून सांगितला. तिनें निष्पापपणें लागलीच त्याला होकार

दिला. पण "अशा गोष्टी चुंबन घेतल्यावरच कायम होतात" असें त्यानें तिला आग्रहपूर्वक सांगितलें. आपल्या सहज सुलभ लाजेमुळें तिनें थोडा प्रतिकार केला; त्याला आपला पाठलाग करायला लावलें. आणि ती त्याला शरण आल्यावर त्यानें तिला मिठी मारली. त्या क्षणीं त्याच्या आनंदाला पारावार नव्हता! पण पुढील गप्पांत त्यानें ॲमी लॉरेन्सशीं पूर्वी आपली अशीच गट्टी असल्याचा निर्देश केला. त्याबरोबर त्यांचें तें नवें प्रेमप्रकरण तिथल्या तिथेंच एकदम संपुष्टांत आलें! आपले गोंडस खांदे तिटकाऱ्यानें एकदां उडवून तिनें आपल्या या वाग्दत्त वराचा त्याग केला. त्या रात्रीं टॉम आपल्या खोलींत झोंपला होता. तेवढ्यांत हकची परिचित शीळ बिछान्याजवळच्या खिडकींतून त्याला ऐकूं आली. तत्काळ तिथून गुपचुप मार्ग काढून तो बाहेर निसटला आणि आपल्या मित्राला जाऊन मिळाला. मग ते दोघे दूर दूर दफन-भूमीकडे निघाले. हकनें दोरीला बांधलेलें एक मेलेलें मांजर आपल्या पाठीमागून फरफटत चालविलें होतें. चामखिळी बऱ्या करायचा नवा रामबाण उपाय शोधून काढायच्या ते खटपटींत होते.

स्मशानांतलें तें खिन्न, भयाण वातावरण! त्या दोघां मुलांच्या मनांत एक प्रकारची अज्ञात भीति व नाहीं नाहीं त्या शंका कुशंका निर्माण होत होत्या. ही त्यांची भीति पुढें फारच वाढली. कारण तीन अस्पष्ट आकृति लपत छपत आंत येत असलेल्या त्यांना एकदम दिसल्या. त्या तीन व्यक्ति त्यांच्या परिचयांतीलच होत्या. इन्जुन ज्यो, मफ पॉटर आणि डॉ. रॉबिन्सन. ही मंडळी एखाद्या थडग्यांतलें प्रेत पळवायला तिथें आली होती हें उघडच दिसत होतें. त्या दोघां चोरांनीं प्रेत उकरून बाहेर काढलें आणि पुढें पैशावरून त्यांचें डॉक्टरशीं भांडण जुंपलें. त्या मारामारींत ठोसा लागून पॉटर खालीं पडला. मग इन्जुननें त्याचा चाकू घेतला आणि एका फटक्यांत डॉ. रॉबिन्सनला ठार केलें. थोड्या वेळानें पॉटर शुद्धीवर आला. त्याला वाटलें कीं रॉबिन्सनचा खून आपणच केला. ही त्या बिचाऱ्या म्हाताऱ्याची समजूत इन्जुननें तशीच कायम राहूं दिली.

आपल्या डोळ्यांदेखत घडलेला हा सगळा प्रकार बघून तीं दोन्ही पोरें भेदरून गेलीं. संधि मिळतांक्षणीं त्यांनीं तिथून जीव घेऊन पोबारा केला. आपण तिथें होतों याचा पत्ता जर कदाचित इन्जुन याला लागला तर तो आपणां दोघांनाहि ठार करील अशी त्यांना भीति बसली. आपण हक याच्या समवेत जें

कांहीं पाहिलें, तेंच टॉमच्या मनांत एकसारखें घोळत राहिलें. त्यामुळें पॉली-मावशीला अशी खात्री वाटूं लागली कीं याला कसला तरी आजार झाला आहे. आणि तिनें ' पेन-किलर ' चा एक मोठा डोस त्याला पाजला; त्याला बिछान्यांत झोंपवून ठेवलें; तरी पण तो कांहीं केल्या बरा होईना.

टॉमचा हृदयभंग करून त्या दिवशीं बेकी जी एकदां घरीं गेली, ती त्यानंतर शाळेंत आलीच नाहीं. ती देखील आजारी झाली आहे अशी गांवांत अफवा पसरली. टॉमच्या मनांतल्या या सगळ्या दुःखांत इन्जुनविषयींच्या भीतीचीहि आणखी भर पडली. मग बेकी एकदांची शाळेंत येऊं लागली. पण तिनें निर्विकारपणें टॉमला चार हात दूर ठेवलें. जीवनांत आतां कांहीं करण्यासारखें उरलें नाहीं अशा भावनेनें त्याचें मन व्यापून गेलें आणि त्यानें घरांतून पळून जायचें ठरविलें. ज्यो हार्पर आणि हक यांना तो भेटला. तिघे मिळून गुपचुप जॅक्सन बेटावर जाऊन पोंचले. तिथें त्यांनीं चांचेगिरीची बतावणी आरंभली.

तशाच प्रकारें मोठ्या आनंदांत ते त्या बेटावर कांहीं दिवस राहिले. शिव्या कशा द्यायच्या व धूम्रपान कसें करायचें या विद्या त्यांनीं हक जवळून शिकून घेतल्या. एके दिवशीं नदीवर त्यांना एका बोटीवरून तोफ डागलेली ऐकूं आली. आपण तिघे बुडून मेलों आहोंत अशा समजुतीनें गांवकरी आपल्या प्रेतांचा शोध नदींत करीत आहेत हें त्यांच्या ध्यानांत आलें. या जाणिवेनें तिघांच्या त्या साहसाला नवी दिशा मिळाली. घरचे लोक आपण मेलों आहोंत असेंच समजून आहेत तर! त्या आनंदाच्या भरांत, आपण मेल्यावर पॉली-मावशीला काय वाटलें असेल हें प्रत्यक्ष पाहण्याचा मोह टॉमला अनावर झाला. म्हणून एका रात्रीं तो हळूच तिथून सटकला आणि गांवच्या किनाऱ्याला लागला. तिथून पुढें तो मावशीच्या घरांतहि शिरला. तिथें ज्यो हार्परची आई आणि पॉलीमावशी आपापल्या उनाड पण निर्मळ मनाच्या बाळांबद्दल शोक करीत असलेल्या त्याला दिसल्या. तें सारें पाहून टॉम परत त्या बेटावर जाऊन पोंचला. पाहतो तों ज्यो व हक हे दोघे त्या बनवाबनवीच्या खेळाला कंटाळलेले आहेत आणि घरी परत जायला तयार आहेत! तेवढ्यांत टॉमनें त्यांच्यापुढें एक नवा आकर्षक बेत मांडला. आणि तो पार पाडण्याचें तिघांनीं तत्काळ ठरवून टाकलें.

साऱ्या गांवावर दारुण दुःखाची छाया पसरली होती. थॉमस सॉयर, जोसेफ हार्पर आणि हकलबेरी फिन या तिघां मृतांच्या सद्गतीप्रीत्यर्थ सांघिक

प्रार्थना चालू होत्या. जमलेल्या सर्व ग्रामीण स्त्रीपुरुषांसमोर धर्मोपदेशक त्या दुर्दैवी मृतांपैकीं प्रत्येकावर लांबलचक स्तुतिसुमनांचा वर्षाव करीत होता. आतां सर्वांची शोक-मिरवणूकहि गांवांतून निघणार, तेवढ्यांत टॉम, ज्यो व हक असे तिघे एकामागून एक चर्चच्या मधल्या वाटेनें आंत आले. त्यांना बघून तिथले शोकाकुल लोक एकदम दचकले आणि त्यांनीं त्यांना प्रेमानें मिठ्या मारल्या.

त्यापुढील कांहीं काळ टॉम त्या गांवांतल्या मुलांचा लाडका पुढारी झाला. मुलें आपापसांत त्याच्याविषयींच कुजबुजत. शाळेच्या आवारांत फिरतांना तीं टॉमकडे बचकूनच बघत असत. बेकीनें मात्र त्याच्याकडे अजिबात दुर्लक्ष केलें. मग एके दिवशीं तिच्या हातून मास्तरांचें एक पुस्तक चुकून फाटलें. "पुस्तक कुणी फाडलं हें मला कळलं पाहिजे" अशी मास्तरांनीं मागणी केली. "तें मी फाडलं" असें टॉमनें कबूलच करून टाकलें. याबद्दल त्याला बेकीकडून कृतज्ञता व क्षमा अशीं बक्षिसें मिळालीं.

दफनभूमींत डॉ. रॉबिन्सनचा खून केल्याबद्दल मफ पॉटर याला अटक होऊन त्याची तुरुंगांत रवानगी झाली. आपण जें कांहीं त्या रात्रीं प्रत्यक्ष पाहिलें, त्यांतला एक चकार शब्दहि काढायचा नाहीं अशा आणाभाका टॉम व हक यांनीं एकमेकांना दिल्या. इन्जुन कदाचित सूडभावनेनें आपलाहि खून पाडील या भीतीनें ते दोघे चोरून तुरुंगाच्या मागल्या बाजूला जाऊन मफ पॉटरला कधीं खाद्य पुरवीत असत तर कधीं धीर देत असत.

पण एक निरपराध माणूस शिक्षेला पात्र व्हावा हें टॉमला सहन होईना. म्हणून तो खटल्याच्या वेळीं हजर राहिला. त्या रात्रीं आपण पाहिलेलें सगळें तो न्यायाधीशाला सांगत होता, तेवढ्यांत तिथें साक्षीसाठीं आलेला इन्जुन कोर्टाच्या खिडकींतून उडी टाकून पळून गेला. आतां इन्जुन परत येऊन आपला नक्की खून करील या भीतीनें टॉम कित्येक दिवस बेचैन होता. तथापि बराच काळ गेला; कांहीं घडलें नाहीं; आणि त्याची भीतीहि हळूहळू ओसरत गेली. बेकी त्याला आतां शूर वीर म्हणून मान देऊं लागली. आतां त्याच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं.

पुढें हक आणि टॉम यांनीं चाच्यांचे गुप्त खजिने शोधून काढायचें ठरविलें. एके दिवशीं रात्रीं ते एका ओसाड घरांत शिरले व तें धुंडाळूं लागले. त्याच वेळीं इन्जुन व त्याचा एक जोडीदार यांनीं त्या घराच्या तक्तपोशीखालून

एक तिजोरी वर काढली. तो प्रकार या दोघांनीं त्यांना नकळत पाहून ठेवला. त्यांच्या हातीं सांपडण्यापूर्वीच यांनीं तिथून जीव घेऊन कसाबसा पळ काढला. दुसऱ्या दिवसापासून या दोघांनीं इन्जुन व त्याचा जोडीदार यांच्या हालचालींवर सतत पाळत ठेवली. तो गुप्त खजिना शोधून काढायचा यांनीं आतां निश्चयच केला.

त्याच सुमारास न्यायाधीश थॅचर यांनीं गांवांतल्या सर्व तरुण मुलांना सहलीसाठीं आमंत्रण दिलें. तो सारा कार्यक्रम उरकल्यावर घरीं परतायला उशीर होईल म्हणून बेकी व टॉम यांनीं त्या रात्रीं हार्परबाईकडेच वस्तीला राहायचें असें ठरलें होतें. या सहलीच्या वेळीं नदीकिनाऱ्यावरील गुहेंत या मुलांना जायला मिळालें. हा त्या कार्यक्रमाचा सगळ्यांत मोठा मौजेचा भाग होता.

पण बेकी व टॉम हीं दोघेंहि नाहींशीं झालेलीं आहेत असें दुसऱ्या दिवशीं सकाळीं पॉलीमावशी व बेकीची आई थॅचरबाई यांना कळलें. कारण आदल्या रात्रीं तीं दोघेंहि आपल्या घरीं वस्तीला आलींच नव्हतीं असें हार्परबाईनीं सांगितलें. मग सगळ्यांना एकदम आठवण झाली. सहलींतले लोक त्या दिवशीं गुहेंतून बाहेर आले तेव्हांपासूनच टॉम व बेकी हीं दोघें त्यांना दिसलीं नव्हतीं.

इकडे टॉम व बेकी गुहेंत असतांना त्यांची वाट चुकली व तीं दोघें आंतल्या आंतच गोंधळून भटकत राहिलीं. टॉम आधींच घाबरलेला होता. तशांत इन्जुन देखील त्याच गुहेंत राहत असल्याचा त्याला पत्ता लागला. जवळ जवळ पांच दिवस त्या भयाण गुहेंत भटकून भटकून शेवटीं टॉमला बाहेर यायचा रस्ता योगायोगानें सांपडला. तीं दोघें जिथें आंत शिरलीं होतीं, तिथून पांच मैल अंतरावर बाहेर आलीं. अशा प्रकारें टॉम पुन्हां एकदां वीर पुरुष म्हणून गाजला.

इन्जुन मात्र त्या गुहेंत उपाशी तडफडून मेला. शोधाशोध करायला आंत शिरलेल्या माणसांना त्याचें प्रेत सांपडलें. त्यानंतर टॉम व हक गुपचुप त्या गुहेंत शिरले. इन्जुननें लपवून ठेवलेली तिजोरी त्यांना शोधून काढायची होती. ती एकदांची सांपडली. तींत त्यांना बारा हजार डॉलर मिळाले.

त्यानंतर लौकरच हक फिन याला डग्लसबाईनें दत्तक घेतलें. दिवसाला एक डॉलर खर्चून उरलेलें आयुष्य निवांतपणीं घालवायचें असा त्यानें बेत केला. तिच्याकडे राहून तिच्या देखरेखीखालीं नीटनेटकें वागण्याचें शिक्षण व संस्कार घ्यायला तो तयार झाला याला कारण जर कोणतें असेल तर तें टॉमनें त्याला

दिलेलें आश्वासनच होय. टॉमनें चांच्यांची टोळी तयार केली, तिचें पुढारीपण हक याला दिलें आणि म्हणून त्या अनुभवांतूनच शेवटीं हक याला ही सुबुद्धि सुचली.

ट्वेन्टी थाउजंड लीग्ज अंडर द सी : समुद्राखालून संचार

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* ज्युल व्हेर्न (१८२८-१९०५). *कथानकाचा प्रकार :* साहसकथा. *काळ :* १८६६-१८६७. *स्थळ :* सातां समुद्रांचा क्षेत्रविस्तार. *प्रथम प्रकाशन :* १८७०.

प्रमुख पात्रें : **प्रोफेसर प्येर अरोना**, एक फ्रेंच वैज्ञानिक. **कन्सेइ**, त्याचा नोकर. **नेड लँड**, त्याचा स्नेही व जोडीदार. **कॅप्टन नेमो**, 'नॉटिलस' बोटीचा कप्तान.

समीक्षण : भावी काळांत होणाऱ्या गोष्टींविषयीं कल्पनाशक्तीच्या जोरावर अंदाज बांधून हुबेहुब व अंतर्भेदी अशा अद्भुत कल्पनाविलासाचें चित्रण करणारे जे कित्येक कुशल लेखक होऊन गेले त्यांमध्यें ज्युल व्हेर्न याची गणना होते. पुढें होऊं घातलेल्या शास्त्रीय शोधांविषयीं व यंत्रांविषयीं आगाऊच कल्पनेनें जाळीं विणणाऱ्या अद्भुत मनोराज्यात्मक जीवनचित्रणाची जी एक लेखन-परंपरा आहे तिला धरूनच हें सुरस पुस्तक लेखकाच्या लेखणींतून अवतरलें. यांतील घटनांचें वर्णन करून व्हेर्न यानें खरोखरीच एखाद्या भविष्यवेत्त्याचें कार्य केलें असेंहि प्रस्तुत कथेसंबंधांत म्हणतां येईल. या कथेंतील कॅप्टन नेमो याच्या केवळ कल्पनेंतून तयार झालेले (पाणबुडी व तसलेच या कथेंत वर्णन केलेले) शोध आतां प्रत्यक्षांत शास्त्रज्ञांनीं जगांत रूढ केलेले आहेत.

अशा प्रकारचीं पुस्तकें क्वचितच श्रेष्ठ असूं शकतात. पण तरीहि त्यांचें वाचन मात्र नेहमींच मनोरंजक ठरतें.

कथानक : सागरावर सर्वत्र संचार करणाऱ्या अनेक प्रवासी जहाजांना एक अद्भुत अजस्र राक्षस अलीकडे दिसला होता. हा जलचर राक्षस नेहमीं झगझगतांना दिसायचा. असला प्राणी माणसाला पूर्वी कधींच दिसला नव्हता. त्यानें कित्येक जहाजांवर हल्ला केला. त्यांतलीं कैक त्यानें बुडविलीं. मग मात्र जगांतील सारेच लोक स्तिमित झाले. अखेरीस 'आब्राहाम लिंकन' नामक अमेरिकन फ्रिगेट जहाज सुसज्ज करून त्या राक्षसाच्या मागावर व त्याला नष्ट करून टाकायच्या मोहिमेवर रवाना झालें.

'लिंकन' वर महत्वाचे असे दोन इसम होते. पहिला प्येर अरोना : हा

पॅरिस शहरांतील म्युझियममध्यें निसर्ग-विज्ञानाचा प्रोफेसर होता. सदर जलचर राक्षस ' नारव्हाल ' जातीचाच प्राणी असावा असें आपलें मत त्यानें प्रसिद्ध केलें होतें. दुसरा नेड लँड : हा पट्टीचा हार्पून शस्त्र चालविणारा होता. फांसे-पारधीच म्हणानात. म्हणून त्याचा समावेश या मंडळींत झालेला होता. अशा जय्यत तयारीनिशीं निघालेलें हें जहाज बराच काळ प्रवास करीत राहिलें. पण येवढा जगभर गवगवा झालेला तो राक्षस त्यांच्या दृष्टिपथांत आला नाहीं.

शेवटीं एकदांचा तो राक्षस ' लिंकन ' वरील लोकांना दिसला. योग्य मोका साधून नेड लँड यानें मोठ्या कुशलतेनें आपलें हार्पून त्याच्यावर भिरकावलें. पण काय आश्चर्य ! त्या तीक्ष्ण शस्त्रानें तो राक्षस जरा देखील जखमी झाला नाहीं. त्या अजस्र प्राण्याच्या अंगावर पोलादासारखें टणक चिलखत आहे हें त्या वेळीं नेड लँड याच्या ध्यानांत आलें.

त्या प्राण्याचा पाठलाग करीत ' लिंकन ' जहाज काळोखांतूनच पुढें चाललें. तेवढ्यांत समुद्रांत एक भयंकर स्फोट झाला व ' लिंकन ' जहाज हादरलें. आपण जहाजावरून पाण्यांत फेंकले गेलों आहोंत हें प्रो. अरोना, त्याचा नोकर कन्सेइ, तसेंच नेड लँड व इतर लोक यांना समजून आलें. अरोना तर बेशुद्धच झाला.

शुद्धीवर येऊन पाहतात तों आपण कोणत्या तरी अद्भुत अशा पाणबुडींतून प्रवास करीत आहोंत असें या लोकांना समजून चुकलें. थोड्या वेळानें दोन अनोळखी माणसें भेटायला आलीं. त्या दोघांशीं बोलायला मिळावें म्हणून या मंडळींनीं आपल्याला अवगत असलेल्या सर्व भाषांचा उपयोग करून पाहिला. पण त्या दोघांना यांतलें कांहींच समजत नसावें असें दिसलें.

मग त्या पाणबुडीचा कप्तानच आला आणि तो या मंडळीशीं फ्रेंच भाषेंत बोलूं लागला. त्यानें यांना सगळा प्रकार हळू हळू सांगितला. तो म्हणाला—
" तुम्ही जींतून या क्षणीं प्रवास करीत आहांत, ती एक पाणबुडी आहे. माझं नांव कप्तान नेमो. तुम्ही सगळे आतां माझे कैदी आहांत. तुम्हांला या पाणबुडींत हिंडाफिरायला पूर्ण मोकळीक आहे. मात्र विशिष्ट प्रसंगीं मी हुकुम देईन त्या-प्रमाणें तुम्हांला आपापल्या खोल्यांतच राहावें लागेल. "

अरोना याला पुढें आणखी माहिती मिळाली ती अशी—त्या पाणबुडीचें नांव ' नॉटिलस. ' तिची रचना अतिशय गुंतागुंतीची होती. तिच्या निर्मितीसाठीं

लागलेले निरनिराळे सुटे भाग निरनिराळ्या ठिकाणांहून हस्तगत केलेले होते. एका ओसाड बेटावर, अतिशय गुप्तता राखून, तिची बांधणी झाली. तेवढें काम पूर्ण झाल्यावर मागें कसल्याहि खाणाखुणा राहू नयेत म्हणून त्या बेटावरील सगळ्या उरल्या सुरल्या सामानाला आग लावण्यांत आली.

या 'नॉटिलस' वर स्वतःच्या जरूरीपुरती वीज तिथल्या तिथेंच निर्माण करायची तरतूद होती. पाण्याखालून प्रवास करतांना लागणाऱ्या प्राणवायूचा पुरवठा तिच्यावर भरपूर होता. एखाद्या घरासारख्याच तिच्यावरील सर्व सुखसोई होत्या.

आंत असलेल्या माणसांना लागणारें अन्न सागरांतूनच मिळविलें जाई. तिथें चव घ्यायला मिळालेले मासे अगदीं नवीन प्रकारचे होते. अरोना यानें ते पूर्वी कधींच खाल्लेले नव्हते. त्या लोकांचे कपडे देखील समुद्रांतल्याच वनस्पतींच्या धाग्यांपासून बनविलेले होते. तिथें मोठे चिरूट होते. पण ते तंबाखूचे नव्हते. समुद्रांत सांपडणाऱ्या एक प्रकारच्या शेवाळापासून ते तयार केलेले होते. कप्तान नेमो यानें त्यांना एअर-गन्स दाखविल्या. त्यांचा उपयोग कप्तान व त्याचे मदतनीस शिकारीसाठीं करीत असत. थेट समुद्राच्या तळाशीं जाऊन तिथें आपल्या पायांनीं चालण्याची सोय होईल असेंहि एक साधन त्यांच्याजवळ होतें.

पुढें पाणबुडी पॅसिफिक सागरांत शिरली. तेव्हां समुद्राखालील 'क्रेस्पो' च्या जंगलांत आपल्याबरोबर शिकार करायला यायचें आमंत्रण कप्तान नेमोनें त्या तिघांना दिलें. तिथें कप्तान नेमोचा जीव नेड लॅंड यानें वांचविला. एक अजस्र जलचर प्राणी त्याला खाऊन टाकायच्या अगदीं बेतांत होता. त्या प्राण्याला नेड लॅंड यानें ठार केलें. पुढें नेड लॅंड याचा जीव वांचवून नेमोनेंहि त्याच्या उपकाराची परतफेड केली. ही पाणबुडी सीलोनमध्यें पोंचली, तेव्हां मोतीं वेंचणाऱ्या पाणबुड्यांचें काम कसें चालतें तें तेथील शिंपल्यांच्या थरांमधून ऐन पाण्यांतूनच त्यांना समक्ष पाहायला मिळालें. एका शार्क माशाच्या तावडींतून कप्तान नेमो यानें तिथल्या एका भारतीय माणसाला वांचविलें.

बोर्निओच्या किनाऱ्यालगतच्या भागांतून पाणबुडी चालली. त्या वेळीं त्या तिघांनीं जमिनीवरच्या कांहीं प्राण्यांची शिकार करायचें ठरविलें. ही शिकार करीत असतांना त्यांच्यावर तेथील रहिवाशांनीं एकदम हल्ला केला. त्या संकटांतून कसेबसे वांचून ते परत 'नॉटिलस' वर येऊन पोंचले. पण ते रानटी लोक टोळ्या करून पाणबुडीभोंवतीं तसेच दबा धरून थांबून राहिले.

या प्रकारामुळें अरोनाची गाळण उडाली. सकाळीं प्राणवायु आंत घेण्यासाठीं पाणबुडीच्या झडपा उघडाव्या लागतील आणि त्या वेळीं ते रानटी लोक नक्की आंत शिरतील असें त्याला वाटलें. कप्तान नेमो यालाहि त्यानें तसें सांगितलें. पण त्यामुळें कप्तान जरा देखील डगमगलेला दिसला नाहीं. अठराव्या शतकांतील एक सोन्यानें भरलेलें जहाज समुद्राच्या तळाशीं कसें गेलें याची हकीकत त्यानें अरोना याला सांगितली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्राणवायु घेण्यासाठीं पाणबुडीच्या झडपा उघडण्यांत आल्या. त्या वेळीं अरोनाच्या कल्पनेप्रमाणें रानटी लोकांनीं त्यांतून आंत शिरायचा प्रयत्न खरोखरीच केला. परंतु ज्यांनीं ज्यांनीं कठड्याच्या गजाला धरून वर चढायचा प्रयत्न केला ते ते मोठ्यानें आरोळी ठोकून पळून गेले. तें पाहून नेड लँड यानें जवळच्या एका गजाला सहज हळूच हात लावून पाहिला. त्याला एकदम धक्का बसला. कारण त्या गजांमधून वीज खेळविलेली होती.

आतां भूमध्य समुद्रांतला प्रवास सुरु होणार आहे असें कप्तान नेमो यानें एकदम जाहीर केलें. वस्तुतः आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाकडील केप ऑफ गुड होपला वळसा घालून आपल्याला जावें लागणार असें अरोना याला वाटलें होतें. पण कप्तान नेमो याचें तें बोलणें ऐकून तो चकितच झाला. नेमो यानें सुएझच्या खालून एक जवळचा मार्ग शोधून काढलेला होता. त्या पाण्याखालच्या मार्गानें ती पाणबुडी भूमध्य समुद्रांत शिरली.

त्यानंतर त्या तिघां प्रवाशांना आपापल्या खोल्यांत जायचे हुकुम मिळाले. लगेच कसली तरी झटापट झाली. पाणबुडींतील एका जखमी खलाशावर इलाज करण्यासाठीं अरोना यास बोलावणें आलें. तो खलाशी वांचला नाहीं. समुद्राच्या तळाशीं असलेल्या प्रवाळाच्या एका जंगलांत त्याचें दफन केलें.

कप्तान नेमो यानें कित्येक बुडालेल्या जहाजांतील सोनें गोळा केलेलें असून त्याच्याजवळ आतां सोन्याच्या राशी सांठलेल्या आहेत, हें या तिघांना आतां-पर्यंतच्या बोलण्यावरून समजून आलें. कां कोण जाणे, पण समाजाविषयीं कप्तानाच्या मनांत अत्यंत तीव्र तिटकारा वसत असावा असें दिसत होतें. मात्र या संपत्तीचा उपयोग तो आपल्या दुर्दैवी बांधवांना मदत करण्याप्रीत्यर्थ सदैव करीत असे.

पुढें पुढें नेड लँड याला हा कप्तान आवडेनासा झाला. पहिली संधि मिळतांक्षणीं आपण पाणबुडींतून पळून जाणार असें त्यानें अरोना याला गुपचुप

सांगून ठेवलें. ही पाणबुडी स्पेनच्या किनाऱ्याला वळसा घालून जात असतांना अशी संधि त्यांना मिळत होती, पण ती हुकली. पुढें 'लॉंग आयलंड' जवळ पाणबुडी आली तेव्हांहि त्यांनीं पळून जाण्याचा बेत केला. पण त्याच वेळीं एक प्रचंड झंझावाती वादळ होऊन ती पाणबुडी मार्ग सोडून न्यू फाउंडलँडकडे ढकलली गेली.

कप्तान नेमो यानें यानंतर आपली पाणबुडी थेट दक्षिण ध्रुवाकडे वळविली. ही बातमी त्याच्या तोंडून ऐकल्यावर या मंडळींना आश्चर्याचा धक्काच बसला. या वेळीं ती पाणबुडी हिमनगांच्या तडाख्यांत सांपडण्याचा धोका उद्भवला. तिच्यावरचे सगळे उतारू व खलाशी प्राणाला मुकण्याची सतत धास्ती होती. या धोक्यांतून सही सलामत पार पडल्यावर त्यांनीं उत्तरेकडे मोर्चा वळविला.

ही 'नॉटिलस' पाणबुडी नॉर्वेच्या किनाऱ्याजवळ पोंचली. त्या वेळीं तिथल्या कुप्रसिद्ध भोंवऱ्यांत ती सांपडली. शेंकडों जहाजें या भोंवऱ्यांत बुडालेलीं होतीं. पण त्यांतुनहि ती कशीबशी बाहेर पडली. या प्रसंगाच्या जरा अगोदर या पाणबुडीवर एका अद्‌भुत जहाजानें हल्ला चढविला. पण तिनें त्या अज्ञात जहाजाचा धुव्वा उडविला. कप्तान नेमो याच्या मनांत समाजाविषयीं जो तिटकारा जाणवत होता त्याचें कारण असल्याच प्रसंगांशीं निगडीत असावें असें अरोनाला वाटलें.

पुढें नॉर्वेच्या किनाऱ्यानजीकच्या भोंवऱ्यांत सांपडल्यावर एकामागून एक काय काय प्रसंग घडले ते प्रोफेसर अरोना याला निश्चितपणें कळलेच नाहींत. आपण व आपले दोघे संवगडी सुरक्षित असून नॉर्वेजवळच्या एका बेटावर आपण सगळे आलों आहोंत येवढेंच त्याला भानावर आल्यानंतर कळलें. या ठिकाणीं आपण कसे येऊन पोंचलों याची या मंडळींना कल्पनाच नव्हती.

आतां तो कप्तान नेमो व त्याच्या हाताखालचे खलाशी जर नाहींसेच झालेले असले तर समुद्राच्या तळाशीं सांपडलेल्या विविध गुपितांची माहिती द्यायला हे तिघेच या जगांत शिल्लक राहिलेले आहेत !

अंकल टॉम्स केबिन : दलितांचें जीवन

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखिका* : हॅरियट बीचर स्टो (१८११-१८६६). *कथानकाचा प्रकार* : भावनाप्रधान कल्पनाविलास. *काळ* : एकोणिसाव्या

शतकांचा मध्यें काळ. *स्थळ :* उत्तर अमेरिकेंतील केंटकी व मिसिसिपी हे प्रदेश. *प्रथम प्रकाशन:* १८५२.

प्रमुख पात्रें : **अंकल टॉम**, नीग्रो गुलाम. **ईव्हा सेंट क्लेअर**, उत्तर अमेरिकेच्या दक्षिण भागांतील श्रीमंत गृहस्थाची कन्या. **सायमन लेग्री**, मळेवाला. **एलिझा**, पळून आलेली गुलाम तरुणी. **टॉप्सी**, काळ्या रंगाचा खोडकर मुलगा.

समीक्षण : गुलामगिरीच्या प्रश्नावरील वादाच्या रणधुमाळींतील एक भावनाप्रधान पण अत्यंत प्रभावी असा ऐतिहासिक महत्वाचा ग्रंथ या दृष्टीनें 'अंकल टॉम्स केबिन' (म्हणजेच 'दलितांचें जीवन') या कादंबरीला एक आगळेंच स्थान आहे. तसें पाहिलें तर या कादंबरींतील राजकीय व भूतदयावादी युक्तिवाद आतां अर्थातच अप्रस्तुत व जुनाट ठरेल. तथापि लेग्री व ईव्हा यांच्या अतिरंजित व्यक्तिरेखा अमेरिकन कल्पनाशक्तीच्या अमोल भांडारांतील अक्षय ठेवा ठरलेल्या आहेत.

दोन प्रकारच्या लोकप्रिय परंपरांशीं ही कादंबरी निगडित असलेली दिसते. भावशील कादंबरीच्या सर्व भावनाप्रधान अंगोपांगांचा या कथानकांत समावेश झालेला आहे. आणि तिच्यांतील भयानक प्रसंगवर्णनांमध्यें वाचकाला मिसेस रॅडक्लिफ आणि होरेस वॉल्पोल यांच्या गॉथिक शैलीच्या कादंबऱ्यांचा प्रभाव जाणवतो.

कथानक : शेल्बीचा मळा केन्टुकीमध्यें होता. प्रतिकूल परिस्थितीमुळें त्याच्या मळ्यावर कर्जाचा खूप भार झाला. दुसरा कांहींच मार्ग आढळेना म्हणून आपला मुख्य धनको हॅले याला आपल्या गुलामांपैकीं एक विकून टाकून अंशतः कर्जमुक्त व्हावें असा त्यानें बेत केला. हा हॅले गुलामांचा व्यापारी होता. न्यू ऑर्लीन्स शहरांत हा राहत असे. त्यानें मोठ्या धूर्तपणानें शेल्बीच्या ताब्यांतील गुलामांपैकीं अंकल टॉम याचीच निवड केली. या व्यवहारानें शेल्बीचें कर्ज अंशतः फिटत होतें. याच गोष्टी ते दोघे आपसांत बोलत होते. आणि नेमक्या त्याच वेळीं एलिझाचा मुलगा हॅरी त्या खोलींत शिरला. त्याला पाहतांच हॅलेनें त्यालाहि विकत घेण्याची इच्छा दर्शविली. परंतु हा गुलाम छोकरा आपल्या हातून घालवायला शेल्बी प्रथम तयार होईना.

हें त्यांचें बोलणें सगळें नाहीं तरी बरेंचसें एलिझाच्याहि कानीं पडलें. ती घाबरली. तिचा पति जॉर्ज हॅरिस शेजारच्याच मळ्यांत गुलाम म्हणून कामावर

होता, त्याला भेटून तिनें ही बातमी सांगितली. खुद्द जॉर्जचा मालक त्याच्याशीं चांगला वागत नव्हता. अधिक चांगलें काम करायची त्याची पात्रता असूनहि मालकानें त्याला शेतावरच राबायला लावलें होतें त्यामुळें तो आधींच मनांत जळत होता. आपल्या मुलाविषयींची ती बातमी ऐकून तोहि अस्वस्थ झाला. "केव्हां ना केव्हां तरी आपण आपल्या जुल्मी धन्यांवर सूड उगवूं," अशी त्यानें तिच्यासमोरच प्रतिज्ञा केली. "एकदम कांहीं तरी उतावळं वर्तन करायचा प्रयत्न करूं नका हं," अशी तिनें त्याला जातांना विनंति केली. तिला शेल्बी कुटुंबांत बऱ्याच मोकळेपणानें व प्रेमाच्या वातावरणांत लहानपणापासून राहायला मिळालें होतें. म्हणूनच तिला हा इशारा देऊन ठेवावासा वाटला.

रात्रींच्या जेवणानंतर शेल्बीकडील सर्व गुलाम मंडळी टॉमकाका व त्याची पत्नी क्लो काकू यांच्या झोंपडींत एकत्र जमली. तिथें त्यांनीं गाणीं म्हटलीं. तरुण जॉन शेल्बी त्या दिवशीं त्यांच्याच पंक्तीला जेवला. त्यानें बायबलमधले कांहीं उतारे वाचून दाखविले. तोंवर इकडे शेल्बीच्या मोठ्या घरांत कांहीं कागदपत्रांवर मालकाच्या सह्या झाल्या. त्या करारपत्रानुसार त्यापुढें टॉमकाका व छोटा हॅरी हे दोघेहि हॅले याच्या मालकीचे झाले. शेल्बी आपल्या पत्नीशीं या बाबतींत कांहीं तरी बोलला आणि तें ऐकून एलिझाला आपल्या मुलाचें भवितव्य कळलें. तत्काळ ती आपल्या मुलाला घेऊन मागच्या दारानें मालकाच्या घरांतून पळाली. आपण झपाट्यानें कॅनडाची हद्द गांठूं व सुरक्षित राहूं अशी तिला उमेद होती. पण टॉमकाकानें मात्र तो हॅलेचा गुलाम झाल्याचें कळल्यावर "जशी सर्वज्ञ ईश्वराची इच्छा" असें म्हणून आपल्या जीवनांतील या नव्या घटनेशीं मिळतें घेतलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हॅलेला आपली नुकसानी झाल्याचें कळलें. तो एलिझाला पकडून आणायला निघाला. पण एलिझाला तोंपर्यंत पुष्कळच अवधि मिळालेला होता. त्यांत पुन्हां शेल्बीबाईनें सकाळची न्याहारी तयार करायला जाणून बुजून उशीर लावला. त्यामुळें पाठलागाची सुरवात आणखी लांबली.

शेवटीं एलिझाला आपला पाठलाग करणारे लोक लांबून दिसले. ती जीवावर उदार होऊन मुलासकट धांवत सुटली. वाटेंत ओहिओ नदी लागली. तिच्यांतील तरत्या बर्फाच्या तुकड्यांवरून उड्या टाकीत टाकीत तिनें पैलतीर गांठलें. छोट्या हॅरीला छातीशीं धरून तिनें हें अचाट साहस केलें व पाठलाग करणाऱ्यांच्या हातांवर तुरी दिल्या.

हॅलेनें सगळ्या ओहिओ राज्यभर तिचा छडा लावायला मार्क्स व लॉकर हे धंदेवाईक गुलाम-शोधक नेमले. या कामगिरीबद्दल त्यांना खुद्द एलिझाच बक्षीस म्हणून मिळणार होती. वास्तव त्या रात्रींच त्यांनीं पाठलाग आरंभला.

इकडे सेनेटर बर्ड व त्याची पत्नी यांच्या घरीं एलिझाला आसरा मिळाला. त्यानें तिला आपल्या माहितींतल्या एका सद्गृहस्थाकडे नेऊन पोंचविलें. पळून जाणाऱ्या गुलामांना तो नेहमींच आसरा व मदत देत असे.

टॉमकाका मात्र तेवढा दैववान नव्हता. तो पळून जाऊं नये म्हणून हॅलेनें आधीं त्याच्या पायांत बेड्या ठोकल्या आणि मगच त्याला न्यू ऑर्लीन्सकडे जाणाऱ्या बोटीवर नेलें. त्याची विक्री झाल्याची बातमी तरुण जॉर्ज शेल्बी याला कळल्यावर तो घोड्यावरून दौडत हॅलेच्या पाठोपाठ आला. टॉमकाका भेटतांक्षणीं जॉर्जनें त्याला आपल्या सहानुभूतिपर प्रेमाची खूण म्हणून एक डॉलर दिला. "केव्हां ना केव्हां तरी मी तुला पुन्हां विकत घेईन" असें त्याला आश्वासन दिलें.

याच सुमारास जॉर्ज हॅरिस आपल्या मालकाकडून पळाला. तो वर्णानें बराच उजळ असल्यामुळें आपण स्पॅनिअर्ड आहोंत अशी ठिकठिकाणीं बतावणी करणें त्याला जमलें. अशाच थाटांत तो वाटेवरल्या खानावळींत गेला व तिथें त्यानें खोली घेतली. जमिनीखालच्या भुयारी रेल्वे रस्त्यावरचें स्टेशन आपल्याला लौकरच गांठायला मिळेल अशी त्याला उमेद वाटत होती.

रॅचेल व सिमिऑन हॅलिडे यांच्या घरीं एलिझा आसरा घेऊन असतांनाच योगायोगानें त्याच क्वेकर वसाहतींत जॉर्ज हॅरिसहि येऊन पोंचला.

इकडे न्यू ऑर्लीन्सकडे बोटींतून जातांजातां ईव्हा सेंट क्लेअर या तरुणीचा जीव टॉमकाकानें वांचविला. कृतज्ञतेची खूण म्हणून तिच्या वडिलांनीं त्याला हॅलेकडून विकत घेतलें. "यापुढचं तुझं आयुष्य सुखांत जाईल" असें ईव्हानें त्याला आश्वासन दिलें. कारण तिचे वडील सर्वांशींच प्रेमळपणानें वागत असत.

ईव्हाच्या आईला रोगभ्रमानें ग्रासलेलें होतें. यामुळें ती मुलीची जरा देखील काळजी घेत नसे. म्हणून ईव्हाचे वडील ऑगस्टिन सेंट क्लेअर यांनीं आपली चुलत बहीण ऑफेलिया हिला घरांतील व्यवस्था पाहण्यासाठीं आणायचा विचार केला आणि उत्तर भागांतून तिला आणायला ते तिकडे गेले. आजवर आबाळ

झालेली आपली नाजुक प्रकृतीची कन्या अशा प्रकारें सुखी होईल असें त्यांना वाटलें. त्याप्रमाणें ती मंडळी या कुटुंबाच्या मळ्यावर येऊन पोंचली. टॉमकाकाला मुख्य गाडीवाला म्हणून काम मिळालें.

लॉकर व मार्क्स हे दोघे एलिझा व जॉर्ज यांच्या मागावर होते. शेवटीं त्यांनीं त्यांना गांठलें. त्या वेळीं झटापट झाली. जॉर्ज हॅरिसनें लॉकरला फटका मारला. लॉकर जखमी झाला. मार्क्स मात्र सटकला. तिथल्या क्वेकर मंडळींनीं त्या पळालेल्या गुलामांना जसा आसरा दिला तसाच त्या जखमी लॉकरलाहि त्यांनीं आपल्या ताब्यांत घेऊन त्याच्या औषधपाण्याची व्यवस्था केली.

दक्षिणेकडील ऐषआरामी चालीरीतींचा मिस ऑफेलिया हिला सराव नव्हता. ती तें सारें समजून घ्यायचा प्रयत्न करीत होती. या कुटुंबाच्या घरीं चाललेली उधळपट्टी पाहून प्रथम तिला धक्काच बसला. तिथली घडी नीट बसावी म्हणून तिनें प्रयत्न चालविला. पण या कामीं तिला कसलेंहि उत्तेजन मिळालें नाहीं. कारण तिथल्या गुलामांना लाड करून घ्यायची जुनी संवय जडलेली होती. खुद्द सेंट क्लेअर हा आपल्या घराकडे व वतनवाडीकडे लक्षच देत नव्हता. घोड्याच्या तबेल्यावरील पोटमाळ्यावर टॉमकाकाचें आयुष्य आरामांत चाललें होतें. मालकाच्या संमतीनें त्यानें ईव्हाशीं चांगलीच गट्टी जमविली. गुलामगिरीच्या प्रथेविषयीं सेंट क्लेअरच्या मनांत कधींमधीं शंका निर्माण होत असत. अशाच मनःस्थितींत असतांना त्यानें एखाद्या परीप्रमाणें दिसणारी टॉप्सी ही बालिका विकत घेतली. तिला ऑफेलियानें शिकवावें अशी त्याची अपेक्षा होती.

ईव्हा अधिकाधिक सुकत चालली. आपलें मरण अगदीं जवळ आलें आहे हें तिला कळून चुकलें. म्हणून पूर्वीं दिलेल्या वचनानुसार वडिलांनीं आपल्या गुलामांना मुक्त करावें अशी तिनें इच्छा दर्शविली. ईव्हाच्या मृत्यूनंतर सेंट क्लेअर बायबल वाचूं लागला व आपल्या सगळ्या गुलामांना मुक्त करायचे बेत करूं लागला. टॉप्सीला त्यानें कायदेशीर रीतीनें मिस ऑफेलिया हिच्या हवालीं केलें. तिला हव्या त्या पद्धतीनें तिनें तिला लहानाची मोठी करावी म्हणून त्यानें ही सोय केली. मग एके दिवशीं संध्याकाळीं दोघां भांडणाऱ्या इसमांना तो अलग करण्याचा प्रयत्न करीत असतांना त्याच्या बगलेंत चाकूचा वार बसला आणि त्यानंतर लवकरच तो मरण पावला. त्याच्या पश्चात् मिसेस सेंट क्लेअर गुलामांना मुक्त करायला तयार नव्हती. तिनें टॉमकाकाला गुलामाच्या बाजारांत विक्रीसाठीं पाठविलें.

जाहीर लिलावांत सायमन लेग्री नामक अत्यंत क्रूर मळेवाल्यानें टॉमकाकाला विकत घेतलें. हा मालक दारू पिऊन सदा तर्र असे. त्याचें मळ्यांतलें घर जमीन-दोस्त व्हायला आलें होतें. पळून जाणाऱ्या गुलामांना पकडण्यासाठीं त्यानें शिकारी कुत्रे पाळलेले होते. तिथल्या गुलामांच्या वस्तींत टॉमकाकाला दर आठवड्याला पोतेंभर धान्य मिळे. तें त्यानें स्वतः दळायचें आणि स्वतःच्या रोट्या स्वतःच भाजायच्या असा त्याला हुकूम होता. दळण्याच्या चक्कीवर तो दोन बायांना मदत करी. याच्या बदल्यांत त्या त्याला रोट्या भाजून देत असत. बायबलमधील उतारे तो त्या बायांना वाचून दाखवी.

पहिले कांहीं आठवडे त्यानें शांतपणें आपल्या क्रूर धन्याला संतुष्ट करायचा प्रयत्न केला. एके दिवशीं एका आजारी बाईला त्यानें कापूस वेंचायला मदत केली. याबद्दल त्या बाईला चाबकानें फोडून काढायचा मालकानें त्याला हुकूम केला. या गोष्टीला त्यानें नकार दिला. तेव्हां खुद्द मालकानें त्यालाच चाबकाचा मार देवविला. इतका कीं त्या मारापायीं तो बेशुद्ध होऊन पडला. या वेळीं कॅसी नामक दुसरी एक गुलाम स्त्री त्याच्या मदतीला धांवून आली. तिनें त्याला मालकासंबंधांतील आपल्या पूर्वायुष्याची कहाणी सांगितली. तिची लहान मुलगी मालकानें कित्येक वर्षांपूर्वी विकली असल्याची माहिती त्याला या वेळीं कळली.

तिथून ती मालकाच्या खोलींत गेली व तिनें त्याला खूप छळून घेतलें. मालकाचा ती भयंकर द्वेष करी. पण त्याला तिचा एक प्रकारचा धाक होता. या मालकाचा शकुनांवर विश्वास होता. ती त्याच्याशीं बोलतांना डोळे वटारून त्याच्याकडे अधून मधून टक लावून पाही. त्यामुळें ही आपल्यावर कसली तरी दुष्ट करणी करीत आहे असें त्याला वाटे. आपल्या पूर्वायुष्यांतील गुप्त पापांचीं भुतें त्याला सतावूं लागत. मग तो झोंप येईपर्यंत दारू पीत राही. पण दुसरा दिवस उजाडल्यावर त्याला या भीतीचा विसर पडला आणि त्यानें टॉमला एक ठोसा लगावून जमिनीवर पाडलें.

दरम्यान जॉर्ज, एलिझा व त्यांचा छोटा मुलगा हॅरी हीं तिघें खूप दूर, उत्तरेकडे जात होती. कॅनडाकडे जाणाऱ्या भुयारी रेल्वे स्टेशनांवरून त्यांचें हळू-हळू मार्गक्रमण चाललें होतें.

इकडे कॅसी व दुसरी एक गुलाम स्त्री एम्मेलाइन या दोघींनीं पळून जाण्याचा निश्चय केला. या प्रयत्नांत जर आपल्याला अटक झाली तर त्याचा

काय भयंकर परिणाम होईल याचा त्यांनीं आगाऊ अंदाज बांधला. आपण दलदलीच्या भागांत लपलों आहोंत अशी त्यांनीं मालकाला हुलकावणी दाखविली. मालकानें आपलीं माणसें व कुत्रे तिकडे धाडले. त्याबरोबर त्या हळूच परतल्या आणि घरांत शिरून माळ्यावर दडून बसल्या. या बाया कुठें गेल्या हें टॉमला ठाऊक असणार असा संशय घेऊन मालकानें त्याच्याकडून ही बातमी काढून घेण्यासाठीं त्याला बेदम बदडविण्याचें ठरविलें. त्यानें त्या म्हाताऱ्याला इतकें फोडून काढविलें कीं त्याला बोलतांहि येईना व उभेंहि राहतां येईना.

टॉमला परत विकत घेण्यासाठीं त्यानंतर दोन दिवसांनीं जॉर्ज सेल्बी तिथें आला. पण आतां वेळ निघून गेली होती. टॉमकाकाची घटका भरत आली होती. खुनाच्या आरोपावरून त्या मालकावर खटला भरायची जॉर्जनें धमकी दिली. यावर लेग्रीनें त्याची टिंगल उडविली. त्याबरोबर जॉर्जनें त्याच्या तोंडावर ठोसा मारून त्याला खालीं पाडलें.

कॅसी व एम्मेलाइन या दोघी त्याच घरांत अजून माळ्यावर लपून बसलेल्या होत्या. त्यांनीं आपण भुतें आहोंत अशी बतावणी केली. लेग्री घाबरला आणि भरमसाट दारू प्याला. जॉर्ज शेल्बीनें त्या दोघी बायांना पळून जायला मदत केली. पुढें त्या नदींतून बोटीमधून उत्तरेकडे चालल्या असतांना त्याच बोटीवर त्यांना मादाम द थो नामक एक बाई भेटली. आपण जॉर्ज हॅरिस याची बहीण आहोंत असें तिनें सांगितलें. आपली कन्या एलिझा म्हणजे जॉर्जनें जिच्याशीं लग्न केलें तीच एलिझा आहे, आणि ती आपला पति व मुलगा यांज-समवेत सुरक्षितपणें कॅनडाला पोंचली ही बातमीहि कॅसीला याच वेळीं कळली.

मग या सर्व नातेवाईक मंडळींचें कित्येक वर्षांनीं कॅनडामध्यें पुनर्मीलन झालें. केंटुकीमध्यें तरुण जॉर्ज शेल्बी यानें आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर आपल्या सर्व गुलामांना कायमचें विमुक्त केलें. तो म्हणाला, "टॉमकाकाच्या स्मृतीप्रीत्यर्थ मी या सर्वांना मुक्त करीत आहे!"

द व्हिकार ऑफ वेकफील्ड

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* ऑलिव्हर गोल्डस्मिथ. (१७२८-१७७४). *कथानकाचा प्रकार :* भावनाप्रधान कल्पनाविलास. *काळ :* अठरावें शतक. *स्थळ :* ग्रामीण इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १७६६.

प्रमुख पात्रें : **डॉक्टर प्रिमरोज,** वेकफील्ड येथील व्हिकार म्हणजे चर्चच्या मालकाचा प्रतिनिधी. **डेबोरा,** त्याची पत्नी. **जॉर्ज,** त्याचा ज्येष्ठ पुत्र. **सोफिया,** धाकटी कन्या. **ऑलिव्हिया,** ज्येष्ठ कन्या. **मिस्टर बर्चेल,** या गृहस्थाचें खरें नांव सर विल्यम थॉर्नहिल हें आहे. **स्क्वायर थॉर्नहिल,** डॉ. प्रिमरोज यांचा घरमालक आणि ऑलिव्हिया हिला फशीं पाडणारा. **आराबेल्ला विल्मॉट,** जॉर्ज याची वाग्दत्त वधू.

समीक्षण : अठराव्या शतकांतील बुद्धिप्रामाण्यवादाच्या पोटांत अध्यात्मवाद व भावनात्मकता यांची जी एक छटा होती तिची स्पष्ट अभिव्यक्ति 'द व्हिकार ऑफ वेकफील्ड' या कादंबरींत झालेली आढळते. हींत ध्येय व वास्तव यांचा संघर्ष दर्शविणारी एक साधीसुधी व गोड स्वभावाची व्यक्ति आपलीं ध्येयें जतन करण्यासाठीं कशी धडपडते याचें दर्शन घडतें. या कथेंत गोल्डस्मिथनें वापरलेला मालमसाला अगदीं निर्भेळ स्वतंत्र आहे असें म्हणतां येणार नाहीं. तथापि त्याच्या मनाचा निष्कपटी मोकळेपणा आणि त्याची चमकदार विनोदबुद्धि हे गुण त्याचे स्वतःचेच आहेत. या त्याच्या गुणांमुळें तो अनेक वाचकांचा आवडता ठरलेला आहे.

कथानक : डॉ. प्रिमरोझ यांच्या बायकोचें नांव डेबोरा. या जोडप्याला देवानें छान छान पांच मुलें दिलीं होतीं. यांपैकीं ऑलिव्हिया आणि सोफिया या दोघी मुली आपल्या सौंदर्यानें कोणाच्याहि पटकन डोळ्यांत भरत.

एका ग्रामीण भागांतील शांत खेडवळ वस्तींत हें प्रिमरोज कुटुंब राहत होतें. त्यांच्याकडे वैभव चांगलें होतें. त्यांचें आसपासच्या परिसरांत नांवहि चांगलें होतें.

डॉ. प्रिमरोज यांचा ज्येष्ठ मुलगा जॉर्ज. त्यांच्या शेजारीं विल्मॉट मंडळी राहत असत. या कुटुंबांतल्या आराबेल्ला नांवाच्या मुलीवर जॉर्जचें प्रेम बसलें. परस्पर-संमतीनें दोन्ही कुटुंबांनीं लग्नाच्या तयारीला सुरवात केली. पण दुर्दैव असें कीं लग्न साजरें होण्यापूर्वी डॉ. प्रिमरोज व मिस्टर विल्मॉट यांचें एका विषयावरून खडाजंगी भांडण झालें. 'बायको मेल्यानंतर माणसानें पुन्हां लग्न करावें कीं नाहीं,' हा या भांडणाचा विषय होता. डॉ. प्रिमरोजनीं जोरदारपणें एकपत्नीव्रताचें समर्थन केलें. मि. विल्मॉट लौकरच स्वतःचें चौथें लग्न करून घेणार होते. अर्थातच डॉ. प्रिमरोज यांच्या तसल्या समर्थनामुळें त्यांना आपला अपमान झाल्यासारखें वाटलें. दोन्ही कुटुंबांच्या परस्पर मैत्रींत पडलेलें हें खिंडार अधिकच वाढायला

आणखी एक कारण घडलें. बातमी अशी आली कीं डॉ. प्रिमरोज यांचा मुनीम त्यांचे सगळे पैसे घेऊन पळून गेला आहे. ते आतां साफ दरिद्री झालेले आहेत हें लक्षांत येतांच मि. विल्मॉट यांनीं आपल्या मुलीचें ठरलेलें लग्न मोडून टाकलें.

आपलें नशीब काढायला जॉर्ज घर सोडून लंडनला गेला. डॉ. प्रिमरोज यांनीं सुद्धां दुसऱ्या एका गांवीं कमी खर्चांत राहण्याची सोय शोधून काढली. तिकडेच साऱ्या कुटुंबीयांना घेऊन जाण्याची घरांत तयारी सुरू झाली. प्रवासामध्यें डॉ. प्रिमरोज यांना एक माणूस भेटला. बरोबरीच्या दुसऱ्या एका वाटसरूवर त्यानें केलेला एक उपकार पाहून डॉ. प्रिमरोज यांच्या डोळ्यांत तो एकदम भरला. त्याचें नांव बर्चेल. तोहि या सर्व मंडळींबरोबर घोड्यावरून पुढला प्रवास करीत होता. वाटेंत एकाएकीं आपल्या घोड्यावरून एका नाल्यामध्यें सोफिया एकदम फेंकली गेली. या संकटांतून बर्चेलनें तिला वांचविलें. डेबोराबाईचें हृदय त्या प्रसंगीं कृतज्ञतेनें भरून आलें. "त्या बाजूला आलांत तर केव्हांहि आमच्या घरीं या" असें कायमचें आमंत्रण त्यांनीं बर्चेलला देऊन टाकलें.

स्कायर थॉर्नहिल नांवाच्या एका श्रीमंत सरदाराच्या वतनवाडीवर डॉ. प्रिमरोज यांना आपल्या नव्या बिऱ्हाडाला जागा मिळाली. हे थॉर्नहिलशेट स्वतः तरुण होते, श्रीमंतहि होते आणि आसपासच्या परिसरांतील तरुण तरुण बायांकडे त्यांची दृष्टि झटपट वळते, अशी त्यांची प्रसिद्धी होती. डेबोराबाईंना वाटलें कीं दोघी मुलींपैकीं कोणत्या तरी एकीला तरुण थॉर्नहिलचें स्थळ चांगलें होईल आणि कर्मधर्मसंयोगानें असा प्रसंग घडून आला कीं तरुण थॉर्नहिलचें लक्ष ऑलिव्हियाकडे वळलें. डेबोराबाईच्या कुशल कारवायांनीं प्रिमरोज मंडळींच्या घरीं तरुण थॉर्नहिलचें येणेंजाणेंहि वाढलें. ऑलिव्हिया लाजत लाजत कधीं कधीं तक्रार करूं लागली कीं हे थॉर्नहिल बरेच धीट आणि उद्धट आहेत. याच दरम्यान प्रिमरोज मंडळींकडे बर्चेलचेंहि येणेंजाणें वारंवार घडत राहिलें. त्याचें लक्ष सोफियावर केंद्रित झालें व ती गोष्ट आपल्याला आवडत नाहीं, असें कांहीं सोफिया कधीं म्हणत नव्हती. तथापि स्वतः डॉ. प्रिमरोज यांना बर्चेल कांहीं तितकासा पसंत नव्हता. कारण, त्यानें आपलें बहुतेक वैभव गमावलें होतें. त्याच्यावर जवळ जवळ गरिबींत राहण्याची पाळी आली होती आणि आपल्या या पडत्या काळाबद्दल त्याला फारशी कसली फिकीरहि वाटतांना दिसत नव्हती.

चार दिवस खेड्यांत राहायला म्हणून शहराकडून प्रतिष्ठित घराण्यांतील

दोन बायका त्या गांवीं आल्या. तेव्हां योगायोगानें त्यांची व प्रिमरोज कुटुंबाची ओळख झाली. शहरामधील जीवनाबद्दलच्या हजारों गोष्टी त्या वेळीं कानावर पडून सोफिया व ऑलिव्हिया यांचे जीव खालीं वर होऊं लागले. बोलण्यां-बोलण्यांतून जेव्हां त्या बाया आपल्याला घरांत हाताखालीं मदतनीस मुली हव्या आहेत असें म्हणाल्या, तेव्हां लागलीच डेबोराबाईनीं ऑलिव्हिया आणि सोफिया यांची निवड करायला त्यांना सुचविलें. त्या दोघी मुली आपल्याला शहरांत राहायला जायला मिळणार या नुसत्या कल्पनेनेंच खूष होऊन हुरळून गेल्या. पण या गोष्टीला एकाच व्यक्तीचा तीव्र विरोध होता. ती व्यक्ति म्हणजे बर्चेल. दोघी मुलींची जाण्याची, प्रवासाची ठरल्याप्रमाणें सर्व तयारी झाली. तेवढ्यांत, डेबोराबाईना एक पत्र आलें. त्यांत असा मजकूर होता कीं एका गुप्त माणसाकडून ऑलिव्हिया आणि सोफिया यांच्या चाल-चालणुकीबद्दल प्रतिकूल माहिती मिळाली असल्यामुळें ठरल्याप्रमाणें त्या शहरांतील बायांना आपल्या हाताखालीं घरकाम करायला त्या आतां योग्य वाटत नाहींत. प्रथम डेबोराबाईना व त्यांच्या यजमानांना असली माहिती आपल्याला पुरविणारा हा अज्ञात उपटसुंभ कोण, याची कल्पनाहि होईना. पण ही बातमीबाजी करणारा बहाद्दर प्रत्यक्ष बर्चेलच आहे हें त्यांना कळलें. तत्काळ डॉ. प्रिमरोज यांनीं त्याला आपल्या घराबाहेर हांकललें. त्याप्रमाणें निघून जातांना त्याला आपल्या कृतकर्माची लाज किंवा पश्चात्ताप कांहींच वाटला नाहीं.

घरांत ऑलिव्हिया आग्रहा आग्रहानें सांगू लागली कीं "थॉर्नहिलशेट आपल्या घरीं वारंवार पायधूळ झाडतात. याचा अर्थ ते माझ्याशीं लग्न करूं इच्छितात." पण यामध्यें डॉ. प्रिमरोज यांना कांहीं तथ्य दिसेना. "एवढा श्रीमंत मनुष्य आपल्या गरीब घराण्यांतील ऑलिव्हियाशीं कसलं लग्न करणार ?" असेंच त्यांना वाटलें. तेव्हां त्याऐवजीं त्यांच्या शेजारीं विल्यम्स नांवाचा एक शेतकरी राहत होता. त्यानें तिला घातलेल्या मागणीचाच ऑलिव्हियानें विचार करावा, असें त्यांनीं तिला सुचविलें. आणखी कांहीं दिवस गेल्यानंतरसुद्धां थॉर्नहिलशेटनें तिला मागणी घालण्याची चालढकलच चालविली. हें पाहून ऑलिव्हियानें त्या तरुण शेतकऱ्याशीं होणाऱ्या आपल्या लग्नाला संमति दिली. आणि लग्नाची तारीखहि ठरली. पण लग्नापूर्वी चारच दिवस आधीं ऑलिव्हिया

घरांतून पळून गेली. थॉर्नहिलशेटच्या सहाय्यानें चौकशी करतां, बर्चेलनेंच ऑलिव्हियाला पळवून नेलें आहे असें डॉ. प्रिमरोज यांना समजून आलें.

आपल्या मुलीच्या या बदनामीकारक उतावळ्या मूर्खपणानें डॉ. प्रिमरोज यांचा जीव अत्यंत दुःखी कष्टी झाला. तथापि तिला शोधून काढण्याचें व हवी ती मदत करण्याचें आपलें पितृकर्तव्य पार पाडण्याच्या निश्चयानें ते बाहेर पडले. पण आपल्या त्या प्रवासांत मध्येंच ते आजारी पडले. आणि एका खानावळीमध्यें तीन आठवडे बिछान्याला खिळून राहिले. आजारांतून उठल्यानंतर ऑलिव्हियाला परत शोधून काढण्याची आपली सारी खटपट फोल आहे असें त्यांना वाटलें व ते घराकडे परतले. परत येतांना त्यांना वाटेंत आराबेल्ला विल्मॉट भेटली. तिनें त्यांच्याकडे जॉर्जबद्दलची चौकशी केली. तो लंडनला निघून गेल्यापासून त्याची आपल्याला पुन्हां कांहीं एक माहिती कळलेली नाहीं असें डॉ. प्रिमरोजनीं तिला खात्री देऊन सांगितलें. थॉर्नहिलशेट अलीकडे आराबेल्लाच्या पाठीमागें होते. डॉ. प्रिमरोजची व त्यांची भेट झाली असतांना डॉ. प्रिमरोज यानीं त्यांना ऑलिव्हियाबद्दल विचारलें. पण त्याबद्दल त्यांना नवीन कसलीच बातमी पुरवितां आली नाहीं. दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडून जॉर्ज त्याच वेळेला आपल्या वडिलांकडे अगदीं दरिद्री होऊन परतला. त्याची ती एकूण स्थिती पाहून थॉर्नहिलशेट यांना त्याची दया आली. त्यांनीं त्याला सैन्यांत अधिकाऱ्याची नोकरी देववून तिकडे पाठविलें. तो जातांना त्याची आराबेल्लाशीं भेट झाली. वैभवसंपन्न होऊन तो परत तिच्याकडे येईपर्यंत त्याची वाट पाहत राहाण्याचें तिनें त्याला जातांना वचन दिलें.

डॉ. प्रिमरोज घर गांठायला पुढें निघाले. वाटेवरच्या एका खानावळींत त्यांना आपली आवडती ऑलिव्हिया एकाएकीं भेटली. भेटतांक्षणींच तिनें आपली भयंकर गोष्ट आपल्या बापाच्या कानीं घातली. ज्या दुष्टानें तिला पळवून नेलें होतें तो बर्चेल नव्हता. तर तो स्वतः थॉर्नहिलशेटच होता. एका तोतया धर्मोपदेशकाच्या सहाय्यानें लुटुपुटूचा लग्नसमारंभ घडवून आणून नंतर त्यानेंच तिला फशीं पाडलें. पुढें तिचा कंटाळा येऊन तिला इथेंच सोडून तो निघून गेला! सगळीं दुःखें अपमान गिळून आपल्या मुलीला घेऊन डॉ. प्रिमरोज घराकडे निघाले, पण दुर्दैव त्यांच्या पाठीशीं हात धुवूनच लागलें होतें. ते आपल्या घरापाशीं पोंचतात न पोंचतात, तोंच त्याला आग लागून त्यांच्या डोळ्यांदेखत

तें जळून खाक झालें. घरांतली मंडळी कशीबशी शीरसलामत जिवंत सुटली. पण डॉ. प्रिमरोज यांचा उभा संसार त्या आगींत भस्मसात झाला होता.

क्षणार्धांत दरिद्री झालेल्या त्या प्रिमरोज कुटुंबाला जवळपासच झोपडें उभारून द्यायला प्रेमळ शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं मदत केली. त्याच वेळीं गांवांत बातमी पसरली, कीं थॉर्नहिलशेट आतां आराबेल्ला विल्मॉट हिच्याशीं लौकरच लग्न करणार आहेत. त्या बातमीनें डॉ. प्रिमरोज यांच्या जिवाचा संताप संताप झाला. त्या आगींत तेल ओतायलाच जणुं काय व त्यांचा अधिकच अपमान करण्यासाठीं थॉर्नहिलशेट स्वतः मानभावीपणें त्यांना भेटायला आला. आणि ऑलिव्हियाला आपण नवरा शोधून देण्याची खटपट करतों असें सांगूं लागला. तिचें वास्तव्य आपल्या जवळपासच असावें असा त्यांचा त्यांत हेतु दिसला. या सर्व प्रसंगपरंपरेनें डॉ. प्रिमरोज यांच्या संतापाचा पारा पराकोटीला पोंचला. त्यांनीं तत्काळ थॉर्नहिलशेटला आपल्या घराबाहेर काढलें. त्यामुळें दुखावलेल्या थॉर्नहिलशेटनें एक डाव टाकला. घर जळल्याच्या आपत्तीनंतर डॉ. प्रिमरोज यांचें तीन महिन्यांचें भाडें थकलें होतें, त्याची त्यानें एकदम मागणी केली. अर्थात् तें देणें त्यांना अगदीं अशक्य होतें.

त्या परिस्थितींत पुढली कारवाई करून थॉर्नहिलशेटनें डॉ. प्रिमरोज यांना कर्जबाजाऱ्यांच्या तुरुंगामध्यें पडण्याची पाळी आणली. तशा तऱ्हेनें ते तुरुंगांत पडले असतांना तुरुंगांतच त्यांचा मुलगा जॉर्ज याची व त्यांची भेट झाली. थॉर्नहिलशेटचा एकूण क्रूर हलकटपणा समजून आल्यावर जॉर्जनें त्या हलकट बदमाषावर हल्ला केला होता आणि त्यांतूनच खटला चालून खुनाच्या प्रयत्नाबद्दल फांशीची शिक्षा होऊन तो तसा तुरुंगांत येऊन पडला. आतां मात्र दुर्दैवाची परमावधि झाली होती. डॉ. प्रिमरोज यांना वाटूं लागलें, कीं आपल्या जीवनांतलें सारें सुख आतां कायमचें निघून गेलें. त्यांतच भर पाडणारी एक बातमी आली कीं सोफियाला कोणी तरी पळवून नेलें आहे.

पण सद्गुण व प्रामाणिकपणा यांचें लौकरच चीज झालें. पळवून नेलेल्या सोफियाला बर्चेलनें ऐन वेळीं सोडवून आणलें. हा बर्चेल थॉर्नहिलशेटचा चुलता सर विल्यम थॉर्नहिल होता. अशा प्रकारें थॉर्नहिलशेटची सारी फसवाफसवी लांडीलबाडी उघडकीस आल्यावर प्रिमरोज कुटुंबाची आपल्या दुःख दुर्दैवाच्या फेऱ्यांतून सुटका झाली. आराबेल्ला व जॉर्ज यांचें पुनर्मीलन झालें.

ऑलिव्हियाची सुद्धां तिच्या बेअब्रूतून अद्भुतपणें सुटका झाली. कारण ज्या तोतया समजला गेलेल्या पुरोहितानें तिचें थॉर्नहिलशेटशीं लग्न लावलें होतें, तो खराखुराच पुरोहित होता. सोफियाचें सर विल्यमशीं लग्न झालें आणि आराबेलाचें जॉर्जशीं. हें पाहून डॉ. प्रिमरोज यांचा जीव विसांवला. आपल्या मुलाबाळांचें दैव उघडलेलें बघून आपलें म्हातारपण सुखांत व आनंदांत घालविण्याची सुखस्वप्नें त्यांना पडूं लागलीं. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या प्रामाणिक गुणीपणाचें त्यांना स्वतःला फळ मिळालें. कारण त्यांचे सगळे पैसे घेऊन त्यांना बुडवून पळून गेलेला त्यांचा मुनीम पकडला गेला. आतां डॉ. प्रिमरोज पुन्हां पूर्ववत सधन सुखवस्तु गृहस्थ झाले.

वॉर अॅन्ड पीस : युद्ध आणि शांतता

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* कौंट लिओ टॉल्स्टॉय (१८२८-१९१०) *कथानकाचा प्रकार :* ऐतिहासिक अद्भुतरम्य कथा. *काळ :* १८०५-१८१३. *स्थळ :* रशिया. *प्रथम प्रकाशन :* १८६५-१८६९.

प्रमुख पात्रें : **प्येर बेझ्यूहोव,** एका श्रीमंत सरदाराचा अनौरस पुत्र. **नताशा रोस्तव,** मॉस्को शहरांतल्या एका सुखवस्तु कुटुंबांतील स्वरूपसुंदर कन्यका. **निकोलाय रोस्तव,** नताशाचा वडील भाऊ. **आन्द्री बोल्कोन्स्की,** एक श्रीमंत रशियन सरदार. **एलेन कुरागिन बेझ्यूहोवा,** प्येर याची स्वरूपसुंदर व बदफैली पत्नी. **आनातोल कुरागिन,** एलेनचा भाऊ. **राजकुमारी मारीया बोल्कोन्स्की,** आन्द्रीची बहीण. **ओल्ड प्रिन्स बोल्कोन्स्की,** आन्द्रीचे जुलमी वडील. **कुतूझोव,** रशियन सेनेचा सरसेनापति; १८१२ च्या ऑगस्ट महिन्यांत याची नेमणूक झाली. **नेपोलियन बोनापार्ट.**

समीक्षण : 'नेपोलियन युग' या नांवानें ओळखला जाणारा, इतिहासांतील जो धामधुमीचा कालखंड, त्यांतील रशियन जीवनाचा प्रचंड व विस्तीर्ण देखावा म्हणजेच कौंट लिओ टॉल्स्टॉय याची 'वॉर अँड पीस' ही कादंबरी. टॉल्स्टॉय एक नवीनच प्रकारचा ग्रंथ लिहीत होता हें या कादंबरीच्या एकंदर रचनेवरूनच आपल्याला जाणवतें. कथानक, पार्श्वभूमि, किंबहुना पात्रें—या गोष्टींना त्यानें या ग्रंथामध्यें फारसें महत्वच दिलेलें नाहीं. इतिहासामधील

जीवनाचें सातत्य हें अनंतकाळ चालूच असतें हें नुसतें दाखवून देणें येवढाच त्याचा हेतु होता. प्रत्येक मानवी प्राण्याचें जीवन आपला प्रभाव इतिहासावर पाडतें; तारुण्य आणि वार्धक्य, युद्ध आणि शांतता, यांचा विकास एकमेकांशीं इतका निगडित झालेला असतो कीं सामाजिक वर्तनाच्या अत्यंत साध्या प्रकारांतून देखील अफाट गर्भितार्थ ओळखून काढतां येतात. प्रत्येक कल्पनीय मानवी शक्तीचा जो प्रभाव इतिहासावर पडतो त्या प्रभावासकट इतिहासाचें दर्शन घडविणें ही आपल्यावरील एक नैतिक जबाबदारी आहे असें टॉल्स्टॉयला वाटत असावें. ही गोष्ट साधण्यासाठीं एकमेकांशीं नीट निगडित अशा साध्या घटनांची मालिका निर्माण करून भागण्याजोगें नव्हतें. घटना आणि व्यक्तिरेखा यांचा संपूर्ण विकास आपल्या निर्मितींतून दर्शविणें त्याला आवश्यक होतें. प्रत्येक पात्रामध्यें बदल होत गेला पाहिजे आणि त्याच्या सभोंवतालच्या पात्रांवर त्याचा प्रभाव पडला पाहिजे; या व्यक्तींचा त्यांच्या परीनें इतरांवर प्रभाव पडला पाहिजे; आणि अशा रीतीनें, अगदीं नकळतच, राष्ट्राच्या इतिहासाची समग्र चौकटच बदलते. अशा प्रकारें ही कादंबरी ऐतिहासिक प्रगतीची हृदय हालवून सोडणारी खबर झालेली आहे. आणि या प्रचंड कादंबरींतील द्विविध विषय—वार्धक्य आणि तारुण्य, युद्ध आणि शांतता, हे इतिहासाच्या एकाच वेळीं घडणाऱ्या परिणतीच्या स्वरूपांत दर्शविलेले आहेत.

कथानक : नेपोलियनशीं युद्ध होणें अपरिहार्य आहे हें १८०५ सालीं बहुतेक माहितगार रशियानांना उघड दिसूं लागलें. ऑस्ट्रिया व रशिया यांच्या फौजांनीं ऑस्टरलित्झच्या लढाईत एकजूट केली आणि तिथें फ्रेंचांनीं त्यांचा सपशेल धुव्वा उडविला. परंतु प्रचंड महत्वाचें असें कांहीं तरी घडायच्या बेतांत आहे याची जणुं काय जाणीवच नसल्याप्रमाणें सर्वोच्च रशियन समाजांतील जीवन चाललेलें होतें. ऑस्ट्रियाला रशिया सामील झाला, हा तसें म्हटलें तर खरोखरी केवळ एक राजकीय औपचारिकपणाचा भाग होता. नेपोलियन केव्हां तरी थेट रशियाच्या सरहद्दीवर चालून येण्याचा धोका आहे ही गोष्ट हास्यास्पद वाटत होती. आणि म्हणून सायंकाळच्या छोट्या मेजवान्या व नृत्य समारंभ चालूच होते, म्हाताऱ्या बायांच्या गप्पाष्टकांना खळ नव्हता, तरुण स्त्रियांचें प्रियाराधन चाललेलेंच होतें. युद्ध अपरिहार्य असलें तरी तें परराष्ट्रांत चाललेलें होतें, आणि म्हणून त्याला जवळ जवळ मुळींच महत्व नव्हतें.

रशियाच्या सरदार घराण्यांतील तरुणांनीं लष्कराकडे आकर्षित व्हावें यांत अपूर्वाई कसलीच नव्हती. कारण महत्त्वाकांक्षी व राजकारणांत गोडी असणाऱ्या तरुणांना रशियन फौजेनें नेहमींच उत्कृष्ट वाव दिलेला होता. त्यांच्या उत्साहाला वाट करून देणारें तें एक उजू साधन होतें. तरुण निकोलाय रोस्तव याचीच गोष्ट घ्या. तो घोडदळांत दाखल झाला. त्या प्रकारच्या जीवनपद्धतीकडे त्याचा ओढा होता हें याचें अगदीं साधें कारण होतें. त्याची झारवरील निष्ठा, त्याचें धैर्य, आणि त्याच्या देखणेपणाला शोभणारा त्याचा गणवेष, यांच्यामुळें त्याच्या कुटुंबांत त्याचें खूपच कौतुक होई. त्याच्याकडे पाहून त्याची बहीण नताशा हिच्या डोळ्यांतून गंगा-यमुना वाहूं लागल्या आणि त्याची मामेबहीण सोनिया हिचें तडकाफडकीं त्याच्यावर प्रेम बसलें.

अशा प्रकारें सेंट पीटर्सबर्ग शहरांतील समाजामध्यें तरुण निकोलाय याची वाहवा चालू असतांना त्या कुटुंबाचा एक स्नेही प्येर बेझ्यूहोव याला मात्र या समाजानें अबुज ठरविलें होतें. तो नुकताच पॅरिसहून परत आलेला होता. तिथें त्यानें विद्यापीठांत अभ्यास केलेला होता. आपल्या आयुष्याचें काय करायचें याविषयीं त्यानें अजून कसलाच निर्णय घेतलेला नव्हता. लष्करांत दाखल होण्याची त्याची इच्छा नव्हती. कारण लष्करी पेशामध्यें त्याला कांहीं अर्थच वाटत नव्हता. त्याच्या वडिलांनीं त्याच्या खर्चाची भरपूर तरतूद केलेली होती आणि तो जुगारांत हवे तसे पैसे उधळीत होता. खरें सांगायचें म्हणजे त्याची अवस्था एखाद्या भ्रांतचित्त माणसासारखी झालेली दिसत होती. निवांत दिवाण-खान्यामध्यें बसल्या बसल्या तो कसला तरी प्रदीर्घ वाद सुरू करी आणि सगळ्यांचें लक्ष जाईल येवढा आवाज चढवी; आणि नंतर एकदम दुर्मुखला चेहरा करून गप्प बसे. वडिलांचा मृत्यु होऊन त्यांनीं त्याच्यासाठीं ठेवलेली लाखोंची संपत्ति त्याला मिळेपर्यंत छोट्या-मोठ्या भोजन समारंभांच्या प्रसंगीं त्याचा सहवास लोक जेमतेमच सहन करीत असत. मग मात्र त्याला अचानक लोकप्रियता लाभली. तथापि तो स्वतः या आपल्या प्रगतीचें श्रेय आपल्या स्वतःच्या व्यक्तित्वामध्यें झालेल्या कसल्या तरी नव्या विकासाला देत होता. त्याचा दुर्मुखलेपणा आतां अजिबात राहिलेला नव्हता. उलट तो सर्वांशीं आपुलकीनें वागे आणि सगळेच त्याच्याशीं आपुलकीनें वागत असत हें तर अगदीं स्पष्ट दिसत होतें. त्याचा सगळ्यांत जास्त पिच्छा पुरविणारा माणूस

म्हणजे प्रिन्स वासिली कुरागिन. हा मुलीचा बाप होता. याची कन्या स्वरूपसुंदरी एलेन ही अविवाहित होती. सेंट पीटर्सबर्ग शहरांतील समाजामध्यें पुढें मागें हिलाच अग्रपूजेचा मान मिळणार ही गोष्ट सर्वमान्य झालेली होती. त्या कावेबाज प्रिन्सनें तिच्याशीं लग्न करायला प्येरला भाग पाडलें. चांगलें सावज दिसलें कीं कसें हेरायचें हें या प्रिन्सला माहीत होतें. मात्र हें लग्न कायमचें अपेशी ठरलें.

प्येरचा जीवश्च कंठश्च मित्र म्हणजे प्रिन्स आन्द्री बोल्कोन्स्की. हा मग्रूर व कांहींसा श्रद्धाहीन माणूस होता. आपल्या पत्नीचाहि तो द्वेष करी. ही त्याची पत्नी लिझी—तिला "लिट्ल प्रिन्सेस" म्हणत—त्या वेळीं गरोदर होती. पण सांसारिक जीवनाची गुलामगिरी त्याला अतःपर सहनच होईना. लष्करांत अधिकाराची जागा मिळाल्याबरोबर त्यानें आपल्या पत्नीला "ब्लीक हिल्स" या आपल्या इस्टेटीवर आपली बहीण मारीया व आपले वयोवृद्ध जुलमी वडील यांच्या स्वाधीन केलें आणि तो युद्धाच्या आघाडीवर निघून गेला. त्याच्या गैरहजेरींत प्रिन्सेस लिझीला मुलगा झाला पण ती त्या बाळंतपणांतच मरून गेली. ऑस्टरलित्झच्या लढाईनंतर तो परत आला. सांसारिक पाशांतून तो आतां मुक्त झालेला होता. पण या मुक्ततेचें समाधान त्याला मुळींच वाटलें नाहीं. एकलेपणा आणि निराशा यांसंबंधींचे कांहीं प्रश्न त्याच्या मनाला सतत भंडावीत राहिले. या प्रश्नांचीं उत्तरें मिळतात का बघावें म्हणून तो आपला मित्र प्येर याला परत भेटला.

दरम्यान प्येर "फ्रीमेसन" पंथांत सामील झालेला होता. या संबंधांतून त्याला एक जीवनविषयक तत्वज्ञान मिळालें. हेंच एकमेव खरेंखुरें तत्वज्ञान आहे असें त्याला मनापासून वाटलें. केवळ आपल्या श्रीमंतीमुळें या पंथानें आपल्याला स्वतःमध्यें सामील करून घेतलें आहे हें जर त्याच्या ध्यानांत आलें असतें तर त्यानें त्यांची विचारसरणी कधींच स्वीकारली नसती. तथापि खऱ्या श्रद्धेनें प्रेरित होऊन प्येरनें एक प्रकारच्या पिसाट व बुद्धिवादशून्य उत्साहाचा अवलंब केला आणि त्याच्या बळावर त्यानें आन्द्रीचें गेलेलें धैर्य त्याला अंशतः परत मिळवून दिलें. आतां आपण एक निःस्वार्थी व स्वतंत्र व्यक्ति झालेलो आहोंत अशा ठाम समजुतीनें प्रेरित होऊन प्येरनें आपल्या शेतकऱ्यांना भूदास-पद्धतीच्या काचांतून मुक्त केलें आणि तो आपल्या शेतीच्या पद्धतींत सुधारणा करण्याच्या उद्योगाला लागला. पण धंद्याचा कारभार कसा करावा याचें त्याला अजिबात गम्य नसल्यामुळें त्यानें

बरेचसे पैसे घालविले. शेवटीं आपल्या कारभारांतला तो सांवळा गोंधळ पाहून त्यानें तें सगळें गाडें एका मुकादमाच्या हातीं सोंपविलें आणि तो प्रिन्स आन्द्रीच्या समंजस सहवासाचा लाभ घेण्यासाठीं "बलीक हिल्स" इस्टेटीवर जाऊन राहिला.

इकडे निकोलाय रोस्तोव लढाईच्या ऐन धुमश्चक्रींत सांपडलेला होता. नेपोलियननें जेनाच्या लढाईत प्रशियन फौजेवर मात केली व ऑक्टोबरांत बर्लिन गांठलें. रशियन फौजा पुन्हां आपल्या शेजाऱ्यांच्या मदतीला धांवल्या आणि १८०७ च्या फेब्रुआरींत आयलॉच्या भयंकर लढाईत उभय प्रतिस्पर्ध्यांची गांठ पडली. जून महिन्यांत फ्राइडलँड येथें निकोलाय या मोहिमेंत सामील झाला आणि तिथें रशियनांनीं मार खाल्ला. भाबड्या निकोलायला असें वाटलें कीं त्या वर्षीच्या जून महिन्यांतच युद्ध संपलें; कारण नेपोलियन आणि झार अलेक्झांडर यांनीं टिलसिट येथें शांततेच्या तहनाम्यावर सह्या केल्या. नेपोलियनच्या अंगीं खुशामतखोरीचा अपूर्व गुण आहे आणि फिन्लंड व टर्की यांच्या बाबतींत हवें तें करायला रशियाला मुभा आहे असें त्यानें वचन दिलें असलें तरी तें वचन पाळायचा त्याचा मुळींच विचार नव्हता, हें त्या तरुण अधिकाऱ्याला ठाऊक नव्हतें. फौजेंतील आपल्या अधिकारपदाचे सगळे खास हक्क त्याच्याशीं निगडित असलेले कसलेहि धोके सहन करावे न लागतां निकोलायनें दोन वर्षें मनसोक्त उपभोगून घेतले. नेपोलियन या मुदतींत स्पेनमध्यें गेलेला होता.

रशियन फौजांचे सरसेनापति जनरल कुतुझोव यांच्या हाताखालीं ॲडज्यूटंटच्या हुद्यावर असतांना प्रिन्स आन्द्रीनें चार दोन किरकोळ चकमकीं-मध्यें भाग घेतला आणि तो परत आपल्या इस्टेटीवर आला. आपल्या जिल्ह्याचा प्रमुख कौंट रोस्तव याजकडून त्याला कांहीं बाबींचा फैसला करून घ्यायचा होता. म्हणून तो ओत्राद्नोये येथें रोस्तव कुटुंबाच्या इस्टेटीवर गेला. तिथें कौंट रोस्तव याची स्वरूपसुंदर तरुण कन्या नताशा हिला पाहतांक्षणीं आन्द्रीवर तिची विलक्षण मोहिनी पडली. अशा प्रकारच्या प्रेमांत आपण कधींच सांपडलों नव्हतों असें त्याच्या मनानें घेतलें. पुन्हां तो सल्ला मसलतीसाठीं प्येरला भेटला. पण प्येरचें आपली पत्नी एलेन हिच्याशीं भलतेंच भांडण झालेलें होतें. तीं दोघें आतां एकमेकांपासून अलग झालेलीं होतीं. आपली पत्नी बेइमान असल्याचा संशय घेऊन त्यानें एका निरपराध माणसाशीं अविचारीपणानें द्वंद्वयुद्ध केलें होतें. परंतु प्रिन्स आन्द्री प्रेमाच्या इतका विलक्षण आहारीं गेलेला पाहून प्येरच्या थोर

अंतःकरणाला चटका लागला. नताशा लहान असल्यापासून त्याच्या परिचयांतली होती व तिच्याविषयीं त्याला नेहमींच आपुलकी वाटत आलेली होती. त्याला हें लग्न आदर्श ठरेल असें वाटलें. अशा प्रकारें त्याच्या मनांत प्रेमभावना पुन्हां रसरसून आल्यामुळें त्यानें आपल्या पत्नीला पुन्हां जवळ केलें. आपलें हें औदार्य म्हणजे आपल्या हातून झालेलें शतकृत्य आहे असें त्याला वाटलें. त्यानें प्रिन्स आन्द्रीला त्याच्या प्रेमप्रकरणांत उत्तेजनच दिलें.

यापूर्वी आलेल्या लग्नाच्या मागण्यांकडे नताशानें दुर्लक्षच केलेलें होतें. परंतु तडफदार व श्रीमंत प्रिन्स आन्द्री तिला मागणी घालायला आलेला बघतांक्षणीं तिनें आपलें हृदय तिथल्या तिथें त्याला देऊन टाकलें. त्यानें तिच्या आई-वडिलांची संमति विचारली आणि त्यांच्या दृष्टीनें हा जोडा उत्तमच जमत असल्यामुळें त्यांनीं लगेच या लग्नाला होकार दिला. परंतु त्यानें ही बातमी आपल्या भांडखोर व हुकुमशाही वृत्तीच्या वृद्ध वडिलांना सांगतांच त्यांनीं चक्क बजावलें कीं "आणखी एक वर्ष होऊन जाईपर्यंत मी या सोयरिकीला आशीर्वाद देणार नाहीं. नताशाजवळ पैसे फार थोडे आहेत आणि तुझ्या घरचा कारभार हातीं घेणं व तुझ्या मुलाचं संगोपन करणं या दृष्टीनं ती अजून फार लहान आहे." त्याची बहीण मारीया हिनेंहि ही सोयरीक नापसंत ठरविली. तिला आपल्या भावाच्या भावी वधूचा मत्सर वाटत होता.

नताशाचा विरस झाला. तिनें एक वर्षभर वाट पाहायचें मान्य केलें. तिला संपूर्ण स्वातंत्र्य असावें म्हणून आपला हा वाङ्निश्चय त्यानें गुप्त राखला. ती आपल्या कुटुंबाशीं ऋणानुबंध असलेल्या एका मॉस्कोनिवासी मित्राकडे गेली. तिथें तिच्या स्वातंत्र्याची भलतीच पूर्तता झाली. एका रात्रीं ती प्येरची पत्नी एलेन हिच्या समवेत ऑपेरा पाहायला गेलेली होती. त्या वेळीं एलेन म्हणजे सामाजिक वर्तुळांतील एक महत्वाची प्रमुख व्यक्ति म्हणून ओळखली जात होती. तिथें एलेनचा बदनाम भाऊ आनातोली याच्याशीं तिची गांठ पडली. एका शेतकरी तरुणीला त्यानें फशीं पाडल्यामुळें तिच्याशीं त्याला अगोदरच लग्न करावें लागलें होतें ही गोष्ट नताशाला ठाऊक नव्हती. आतां या बेछूट तरुणानें नताशाचें मन जिंकायचा निर्धार केला. त्याच्या बेदरकार बहिणीची मदत मिळाल्यामुळें त्यानें नताशाच्या मागें भलताच लकडा लावला. नताशाच्या मनाचा गोंधळ उडाला. तिचें प्रिन्स आन्द्रीवर प्रेम होतें, पण तो पुन्हां फौजेंत दाखल झालेला होता

आणि तिची त्याच्याशीं कधीं भेटच झालेली नव्हती. अनातोलीचा आग्रह तर रोजच्या रोज वाढत चालला आणि तिचें त्याच्यावर प्रेम बसलें. शेवटीं तिनें त्याच्याबरोबर पळून जाऊन त्याच्याशीं लग्न करायचें कबूल केलें. एका तोतया पुरोहिताशीं संधान बांधून अनातोलीनें हा बनावट लग्नविधि उरकून घेण्याची तयारी ठेवली.

पळून जायच्या ठरलेल्या रात्रीं नताशाच्या यजमानिणीला या बेताचा पत्ता लागला. नताशाला खोलीबाहेर जायची बंदी झाली. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं तिनें याच्या अगोदरच प्रिन्स आन्द्रीच्या बहिणीला पत्र लिहून वाङ्‌निश्चयाच्या वचनांतून आपली मुक्तता व्हावी अशी विनंति केलेली होती.

हा लाजिरवाणा प्रकार प्येरच्या कानीं गेला, तेव्हां त्यानें आनातोलीला शहर सोडून जायला भाग पाडलें. मग तो नताशाला भेटायला गेला. विलक्षण प्रकार असा कीं एकट्या त्याच्यावरच तिचा विश्वास बसला आणि फक्त त्याच्याशींच ती मोकळेपणानें बोलूं शकली. हा जणुं काय आपला एक वयस्क काका-मामाच आहे असें तिला वाटलें आणि त्याच्या राकट, स्नेहाळ वृत्तीनें ती मोहित झाली. आपण स्वतः विवाहबंधनांतून मुक्त नसतांनाहि आपल्याला हिच्याविषयीं नको तें आकर्षण वाटतें आहे हें त्याच्या ध्यानांत आलें. तथापि तिच्याविषयीं आपल्याला वाटणारा जिव्हाळा त्यानें तिला कसाबसा उघड करून सांगितला, आणि तीहि त्याच्या या वृत्तीवर खूष झाली. तिला लवकरच बरें वाटूं लागलें. तथापि प्रिन्स आन्द्रीच्या प्रेमाचा विषय झालेली निरागस तरुणी ही तिची मूळची वृत्ति मात्र कायमची नष्ट झाली.

प्रिन्स आन्द्रीच्या स्वाभिमानाला जबरदस्त टोला बसला. पण स्वतःविषयींचें विचार मनांतून घालवून टाकायला लष्करी जीवनामध्यें त्याला अनेक चित्तवेधक विषय मिळाले. १८१० च्या सुमारास फ्रान्स व रशिया यांच्या दरम्यानची दोस्ती हळू हळू संपुष्टांत आली. पोलंडसंबंधींतील जबाबदारींतून रशियाला मुक्त करायची धमकी फ्रान्सनें दिली, तेव्हां मात्र नेपोलियनच्या वचनांमध्यें कांहींच अर्थ नसतो हें झारला एकदांचें कळून चुकलें. या चलाख चिमुकल्या फ्रेंच बादशहानें रशियाला सोडून दिलें आणि ऑस्ट्रियाला जवळ केलें. ऑस्ट्रिया हेंच त्यानें युरोपवरील आपल्या अधिसत्तेचें केंद्र केलें, मारी लुइझे हिच्याशीं लग्न केलें, आणि १८१२ सालीं मॉस्कोवर अचूक नजर ठेवून नीयेमेन नदी ओलांडली. जून

ते ऑगस्ट या मुदतींत नेपोलियन जवळ जवळ मुळींच अडथळा न होतां स्मोलेन्स्क शहरापर्यंत येऊन थडकला.

या शहरांत त्याला घरें जाळून टाकलेलीं व उद्ध्वस्त केलेलीं दिसलीं. शहर ओसाड होतें. त्या वेळेपासून त्याला निकराचा प्रतिकार होऊं लागला. पूर्वेकडील सेनेचा माजी प्रमुख आणि आतां संपूर्ण रशियन फौजेचा सर्वाधिकारी झालेला वयोवृद्ध जनरल कुतुझोव यानें फ्रेंचांच्या आक्रमणाला पायबंद घालण्याचा निर्धार केला. त्यानें नेपोलियनला अडविण्यासाठीं जे डावपेंच योजिले, त्यांचा एक विचित्र परिणाम असा झाला कीं त्यामुळें रशियनांना निर्णायक विजय मिळवितां येऊं नये अशाच गोष्टी त्याच्या हातून घडल्या. त्यानें फ्रेंचांना थोपवून धरण्याचा प्रयत्न जर केला नसता, आणि त्याऐवजीं जर त्यांना तसेंच रशियांत दूरवर येऊं दिलें असतें, आणि अशा रीतीनें त्यांचे दळणवळणाचे मार्ग जर लांबलचक होऊं दिले असते, तर त्यांचा माघार घेण्याचा मार्ग बंद पाडून रशियनांना या युद्धांत अधिक लवकर विजय मिळवितां आला असता. त्या वेळीं नेपोलियनच्या हातूनहि विचित्र वर्तन घडलें. आपलें आगेकूच पूर्ण करण्याच्या त्याच्या प्रयत्नापायीं त्याच्याहि हमखास विजयाची शक्यता कमी झाली. आपला आपोआप हमखास पराभव व्हावा अशाच गोष्टी या वेळीं उभय युद्ध्यमान पक्षांनीं केल्या असें दिसत होतें.

लढायांमागून लढाया झाल्या, उभय पक्षांची भयंकर हानि झाली, आणि शेवटीं नेपोलियननें आपली फौज बोरोडिनोच्या रणांगणावर आणली. या ठिकाणीं या मोहिमेंतील सगळ्यांत जास्त निर्बुद्धपणाची लढाई झाली. मॉस्को येथून अगदीं नजीकच होतें आणि तें हातचें जाऊं न देण्याच्या निर्धारानें रशियनांनीं ही लढाई दिली व त्यांचीं बहुतेक सगळी फौज इथें कामास आली. तितक्याच प्रमाणांत फ्रेंच फौजेचीहि हानि झाली. पण या लढाईत रशियनांचेंच अपरिमित नुकसान झालें हें स्पष्ट दिसत होतें. जनरल कुतुझोव नाराज झाला. युद्धामुळें त्याला खूप थकवा आला. त्यानें आपल्या इच्छेविरुद्ध असा निर्णय घेतला कीं रशियन फौजेला मॉस्को शहराचा बचाव करतां येणार नाहीं. विजयी नेपोलियन पुन्हां एकदां नव्या निर्मनुष्य शहरांत शिरला.

बोरोडिनोच्या लढाईत प्रिन्स आन्द्री याला जबर दुखापत झाली. रोस्तव कुटुंबांतील मंडळींनीं आपली इस्टेट सोडून देऊन पूर्वेकडे खूप दूर जाण्याची

अगोदरच तयारी ठेवलेली होती. तेवढ्यांत जखमी सैनिकांनीं भरलेल्या अनेक गाड्या आसऱ्यासाठीं त्यांच्या घरीं येऊन दाखल झाल्या. या सैनिकांमध्यें खुद्द प्रिन्स आन्द्री हा देखील होता. नताशानें त्याची शुश्रूषा केली, आणि त्याची बहीण मारीया व त्याचा मुलगा निकोलुस्का यांना बोलावणें धाडलें. फ्रेंच सैनिक जवळ जवळ आपल्या उंबरठ्याशीं येऊन ठेपलेले पाहून वृद्ध प्रिन्स बोल्कोन्स्की यांना धक्काच बसला. आणि हृदयविकाराचा झटका येऊन त्यांतच त्यांना मृत्यु आला. मारीया आणि आन्द्रीचा मुलगा यांना निकोलायनें कसें बसें अधिक सुरक्षित स्थळीं नेऊन पोंचविलें. बहीण भेटल्याबद्दल प्रिन्स आन्द्री याला आनंद झाला असला तरी आपण या दुखण्यांतून बरे होऊं अशी त्याला अतःपर आशा राहिलेली नव्हती. नताशानें अत्यंत हुळुवारपणें त्याची शुश्रूषा केली. उभयतांनीं पुन्हां एकदां एकमेकांविषयींचें प्रेम प्रदर्शित केलें. जखम बरी होईना, ती चिघळली, तेव्हां आपण आतां मरणार हें आन्द्रीला समजून चुकलें. एका रात्रीं झोपेंतच त्याला मरण आलें. शोकाच्या प्रसंगीं एकत्र आल्यामुळें मारीया व नताशा या दोघी जिवाभावाच्या मैत्रिणी झाल्या आणि तरुण निकोलाय याला आन्द्रीच्या बहिणीविषयीं आकर्षण वाटलें.

दरम्यान प्येर बेझ्युहोव यानें मॉस्को शहरांतच मुक्काम करायचें ठरविलें. आपण राष्ट्रीय वीर पुरुष व्हावें अशा विचारांचें काहूर त्याच्या मनांत माजलें. त्या भरांत त्यानें नेपोलियनला ठार करायची योजना आंखली. परंतु फ्रेंच सैनिक एका रशियन स्त्रीची छेड काढीत असलेले पाहून तिला सोडवायला तो गेला, आणि त्या प्रयत्नापायीं त्याला युद्धकैदी म्हणून अटक झाली.

नेपोलियनच्या फौजेचा मॉस्को शहरीं संपूर्ण विस्कट झाला. झारकडून शांतता-तहाच्या अटी येतील म्हणून निरर्थक वाट पाहिल्यानंतर त्यानें मॉस्को सोडून फ्रान्सला परत जायचें ठरविलें. एका काळीं जगामध्यें सगळ्यांत जास्त सामर्थ्यशाली असलेल्या त्या फौजेला आतां लक्तरें धारण करणाऱ्या बेजबाबदार पेंढारी टोळीची अवकळा आलेली होती. या टोळीनें आपली लूट गोळा केली, आपली रसद टाकून दिली आणि परत स्मोलेन्स्क शहराची वाट धरली. हिंवाळा आला. सुदैवानें प्येर बेझ्युहोव चांगला धष्टपुष्ट व आरोग्यसंपन्न होता. केवळ ऊब अंगांत असणें आणि पुरेसें खायला मिळणें यांतच सौख्य सांठविलेलें असूं शकतें हें इतर कैद्यांबरोबर प्रवास करतांना त्याला स्वानुभवानें शिकायला मिळालें. त्या

हालअपेष्टांमुळें तो अकालीं वृद्ध व परिपक्व झाला. तो जबाबदारीची जाणीव शिकला आणि त्यानें धैर्य अंगीं बाणविलें. आपल्या दुर्दशेंतील उपरोधामुळें त्याच्या अंगीं विनोदबुद्धीचा विकास झाला. त्याचा साधेपणा व समधात स्वभाव यांमुळें फ्रेंच व रशियन या दोहोंचा तो आवडता झाला.

स्मोलेन्स्कच्या वाटेवर फ्रेंच फौजांचा धीर साफ खचला. कोसाकांनीं जंगलांतून त्यांच्यावर हल्ले चढविले, त्यांच्या रांगांमधून खिंडारें पाडलीं, असंख्य फ्रेंचांना कैद केलें आणि रशियन कैद्यांना सोडविलें. अनेक फ्रेंचांनीं फौजेंतून पळ काढला. इतर कित्येक आजारी झाले व रस्त्यांतच मरून पडले. प्येर शेवटीं मुक्त होऊन ओऱ्येल शहरीं परत गेला. तिथें तो तापानें आजारी पडला. नंतर त्याला प्रिन्स आन्द्री व त्याची स्वतःची पत्नी यांच्या मृत्यूची वार्ता कळली. सेंट पीटर्सबर्ग शहरीं थोड्याशा आजारानंतर एलेनला मृत्यू आला. मनाला धक्का देणाऱ्या या बातम्या आणि फ्रेंचांच्या पराभवाची बातमी यांच्यामुळें त्याच्या मनांतील सगळ्या भावनांचा लोपच झाल्यासारखा दिसला. शेवटीं तो पूर्ण बरा झाला, तेव्हां त्याला असें वाटलें कीं आपला आत्मा विमुक्त झाला आहे या आनंदमय जाणिवेनें आपण भारावून गेलों आहोंत, आपल्याला एकदांची स्वत्वाची ओळख पटली, आपण खरोखरी कोण आहोंत याची आपल्याला स्वतःला जाणीव आली. नुसतें जिवंत राहणें देखील केवढें विलक्षण आनंददायक असतें हें त्याला आतां कळून आलें. जी परमेश्वरावरील श्रद्धा पूर्वी त्याला कधींच ठाऊक नव्हती, त्या श्रद्धेचा त्याला आतां शोध लागला.

प्येर आतां मॉस्को शहरीं परतला आणि त्यानें मारीया बोल्कोन्सी व रोस्तव मंडळी यांच्याशीं असलेल्या जुन्या मैत्रीला नवा उजाळा दिला. नताशानें पुन्हां त्याला मोहित केलें. आतां ती लहान मुलगी राहिलेली नाहीं हें त्याच्या अचानक ध्यानांत आलें. तो तिच्यावर सतत प्रेमच करीत आलेला होता आणि आतांहि त्याचें तिच्यावर प्रेम जडलेलें होतें. संधि मिळतांच त्यानें कर्तव्य बुद्धीनें तिच्या आईवडिलांजवळ तिला मागणी घातली. त्याच वेळीं निकोलाय रोस्तव यालाहि मारीयाशीं लग्न करावेंसें वाटलें. नताशा आणि प्येर यांचें लग्न झालें. दोघांना फार सुख लागलें. नताशा ही कार्यक्षम पत्नी होती आणि ती पतीला मुठींत ठेवीत असे. त्यांच्या मित्रांना या गोष्टीची मौज वाटे. पण प्येरचें मात्र तिच्यावर प्रेमहि होतें आणि तिच्याविषयीं त्याला आदरहि वाटत होता. कारण

सगळ्या गोष्टी आपल्या काबूत कशा आणाव्या हें तिला ठाऊक होतें. त्याच्या इस्टेटी व त्याचें घर या दोहोंचाहि कारभार तीच पाही.

आपलें मारीयावर प्रेम असल्याविषयीं निकोलायला सर्वस्वीं खात्री नसली तरी तिच्याशीं लग्न करणें शहाणपणाचें ठरेल हें तो जाणून होता. रोस्तव कुटुंबाला आतां गरिबी आलेली होती. वृद्ध कौंटनें आपला कारभार अगदींच डबघाईला आणून ठेवलेला होता. निकोलायनें शेवटीं आईच्या आग्रहाखातर मारीयाला मागणी घातली आणि त्या दोन कुटुंबांचें मीलन झालें. हें मीलन निकोलायच्या अपेक्षेपेक्षांहि अधिक सुखकर ठरलें. त्यांनीं प्रिन्स आन्द्रीचा पुत्र निकोलुस्का याला दत्तक घेतलें.

आठ वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर प्येर व नताशा यांना चार छान मुलें झालीं. त्यांचा त्यांना फारच अभिमान वाटे. नताशा आपली पतिभक्ति व आपलें अपत्य-प्रेम यांचा अतिरेक करते असें शिष्ट समाजांतले लोक समजत होते. परंतु प्येर व नताशा यांना मात्र अभूतपूर्व सुखाचा लाभ झालेला होता आणि आपल्या एकत्र जीवनामध्यें त्यांना आपल्या सगळ्या सुखस्वप्नांची परिपूर्ति झाल्याचा आनंद वाटत होता.

वुदरिंग हाइट्स

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखिका :* एमिली ब्रॉंटी (१८१८-१८४८). *कथानकाचा प्रकार :* शीघ्रसंस्कारी अद्भुतरम्य कथा. *काळ :* १७५०-१८०२. *स्थळ :* उत्तर इंग्लंडमधील ओसाड प्रदेश. *प्रथम प्रकाशन :* १८४७.

प्रमुख पात्रें : **मिस्टर अर्नेशॉ**, 'वुदरिंग हाइट्स' या नांवाच्या इस्टेटीचा मालक. **कॅथरीन**, त्याची कन्या. **हिंडले**, त्याचा पुत्र. **हीथक्लिफ**, एक अनाथ मुलगा. **मिस्टर लिंटन**, 'थ्रश क्रॉस ग्रेंज' या शेतीवाडीचा मालक. **मिसेस लिंटन**, त्याची पत्नी. **इसाबेल्ला**, त्यांची कन्या. **एडगर**, त्यांचा पुत्र. **फ्रान्सेस अर्नेशॉ**, हिंडलेची पत्नी. **हेअरटन अर्नेशॉ**, फ्रान्सेस व हिंडले यांचा पुत्र. **कॅथरीन लिंटन**, कॅथरीन अर्नेशॉ व एडगर लिंटन यांची कन्या. **लिंटन हीथक्लिफ**, इसाबेल्ला लिंटन व हीथक्लिफ यांचा पुत्र. **एलेन डीन**, 'थ्रश क्रॉस ग्रेंज' येथील घरकाम करणारी बाई. **मिस्टर लॉकवुड**, 'थ्रश क्रॉस ग्रेंज' येथील शेतावर कुळ म्हणून काम करणारा शेतकरी व या कथेचा निवेदक.

समीक्षण : 'एलिस बेल' या टोपण-नांवानिशीं 'वुदरिंग हाइटस' ही कादंबरी प्रसिद्ध झाली, तेव्हां प्रकाशकांना हा व्यवहार इतका नुकसानीचा वाटला कीं किमान प्रती खपेपर्यंत एमिली ब्रॉन्टी हिला स्वतःला प्रकाशनाचा खर्च करावा लागला. अंगावर शहारे आणणाऱ्या व अत्याचारांनीं युक्त अशा प्रसंगांचें या कादंबरींतील संमिश्रण पाहून एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकालीन अभिरुचीला कांहींसा धक्काच बसला असला पाहिजे. हिच्यांतील अतरंजित छटा जमेस धरूनहि ही कादंबरी सूडबुद्धीचें वर्णन करणारी रहस्यमय कथा ठरते. तिच्यांतील प्रमुख पात्रांच्या अंगीं जो तीव्र मनोविकारांचा जोमदारपणा जाणवतो त्यामुळें त्या पात्रांचें अस्तित्व असामान्य वाटतें. लेखिकेनें या कादंबरीला अन्वर्थक नांव दिलें. 'वुदरिंग' हा शब्द प्रादेशिक भाषेंतील विशेषण असून वादळी हवेचा वातावरणांतील कल्लोळ वर्णन करण्यासाठीं तो उपयोजितात.

कथानक : १८०१ सालीं 'थ्रश क्रॉस ग्रेंज' नामक एका जुन्या शेतीवाडीवर कसणारें कुळ म्हणून लॉकवुड कामाला लागला. जवळच असलेल्या 'वुदरिंग हाइट्स' नामक वतनवाडींतील हीथक्लिफ या गृहस्थाच्या मालकीची ही शेती होती.

कुळ म्हणून कामाला लागल्यानंतर सुरवातीच्या काळांत तो आपल्या जमीन-मालकाला दोनदां भेटायला गेला. पहिल्या खेपेला या मालकाशीं त्याची भेट झाली. कांहींसा माणुसघाण्या, लहरी, असा तो प्राणी होता. भुंकणाऱ्या, गुरगुरणाऱ्या कुत्र्यांच्या गराड्यांत तो बसलेला होता.

तो दुसऱ्यांदा गेला, त्या वेळीं तिथल्या चमत्कारिक घरांतील इतर माणसेंहि त्याला पाहायला मिळालीं. तिथें एक उर्मट, गलथान पण दिसायला देखणा असा तरुण होता. त्याचें नांव हेअरटन अर्नशॉ. दुसरी एक सुस्वरूप तरुणी होती. ती हीथक्लिफ याची विधवा सून.

या दुसऱ्या भेटीच्या वेळीं हिमवर्षाव होऊं लागला. आसपासचा ओसाड प्रदेश व सारे रस्ते हिममय झाले. नवखा माणूस अशा परिस्थितींत धडपणीं जाणें शक्य नव्हतें. मालकाकडील एखादा नोकर वाटाड्या म्हणून त्याच्याबरोबर आला असता तर ठीक झालें असतें. पण मालकानें ही गोष्ट अमान्य केली. "हवं तर इथंच रात्रीं राहा. हेअरटनच्या किंवा जोसेफच्या खोलींत झोंप," असें

मालकानें त्याला सांगितलें. हा जोसेफ तुसडा व दांभिक बडबड करणारा तिथला वृद्ध नोकर होता.

तरी देखील लॉकवुडनें त्या नोकराकडून कंदील मिळवायची खटपट केली. तें कळतांच मालकानें आपले कुत्रे त्या कुळाच्या अंगावर सोडले. त्या वेळची त्याची त्रेधा बघून मालक व हेअरटन या दोघांना मौज वाटली. शेवटीं तिथली स्वयंपाकीण झिला हिनें त्या शेतकऱ्याला कुत्र्यांच्या तावडींतून सोडविलें व वापरांत नसलेल्या एका खोलींत त्याला लपवून ठेवलें.

त्या रात्रीं त्याला एक चमत्कारिक स्वप्न पडलें. खिडकीवर बाहेरून झाडाची एक फांदी खरखरत आहे असें वाटून तो खिडकीचा कोयंडा काढायची खटपट करीत असतांना त्याच्या हातून खिडकीची कांच फुटली. बाहेरची ती देवदाराची डहाळी मोडून टाकावी म्हणून त्यानें हात लांब केला. तत्काळ एक थंडगार हात त्याच्या पंज्यांत सांपडला व 'मला आंत घ्या' असें रडव्या दुःखी स्वरांत कुणी तरी सांगितलेलें त्याला ऐकूं आलें. त्या अदृश्य व्यक्तीनें आपलें नांव 'कॅथरीन लिंटन' असें सांगितलें आणि ती फुटक्या खिडकींतून आंत येण्यासाठीं धडपडली. त्याबरोबर त्यानें किंकाळी फोडली.

ती ऐकून मालक धांवतच तिथें आला. त्यानें खूप संतापून त्या शेतकऱ्याला क्रूरपणानें खोलींतून हांकलून दिलें. मग मालकानें फुटक्या खिडकी-जवळच्या बिछान्यावर अंग झोंकून दिलें व त्या भुताला अंधारांतून व वादळांतून येण्याविषयीं विनविलें. पण नंतर तो स्वर मुळींच ऐकूं आला नाहीं. गरगरणाऱ्या हिमाचा फुसफुसाट व गार वाऱ्याचा गोंगाटच तेवढा ऐकूं येत होता. त्या वाऱ्यानें तिथली मेणबत्ती तेवढी विझवून टाकली.

त्या रात्रीं घडलेला तो प्रकार व त्या घरांतील तीं विचित्र माणसें यासंबंधीं त्या शेतकऱ्याला फार कुतूहल वाटलें. या कुतूहलाचें अंशतः समाधान एलेन डीन या बाईनें केलें. ही बाई 'थ्रश क्रॉस ग्रेंज' येथें घर-कामाला होती. परंतु लहानपणीं ती 'वुदरिंग हाइट्स' येथें राहिलेली होती.

अर्नशॉ, लिंटन व हीथक्लिफ या तीन कुटुंबांची बऱ्याच वर्षांपूर्वींची जुनी कहाणी तिनें सांगितली. त्या वेळीं वुदरिंग हाइट्स येथें वृद्ध अर्नशॉ आपली पत्नी आणि हिंडले व कॅथरीन हीं दोन मुलें यांच्यासह राहत असे. एकदां तो लिव्हरपूल शहरीं गेला असतां तिथें त्याला एक मलीन, भुकेकंगाल, भटक्या

जिप्सीइतका काळ्या रंगाचा, असा पोरका मुलगा सांपडला. या मुलाला त्यानें आपल्याबरोबर घरीं आणलें आणि त्याचें नांव हीथक्लिफ असें ठेवलें. या चौदा वर्षांच्या मुलाचें हेंच नांव पुढें त्याचें आडनांव म्हणूनहि रूढ झालें. हळू हळू या अनाथ मुलानें म्हाताऱ्याचा सगळा जिव्हाळा आपल्याकडे ओढून घेण्यास सुरवात केली. म्हाताऱ्याची प्रकृति आतां ढांसळूं लागलेली होती. त्या घरांत आतां क्षुद्र हेव्यादाव्यांचें थैमान माजलें. हिंडले याला आपली बहीण कॅथरीन व तो पोरका मुलगा या दोघांचा मत्सर वाटे. घरचा जुना नोकर जोसेफ या कलागतींत आणखी भर घाली. कॅथरीन तर त्या पोरक्या मुलावर भलतीच फिदा झाली. पुढें हिंडले याला दूरच्या शाळेंत धाडलें. त्यानंतर लवकरच म्हातारा मरण पावला.

वडिलांच्या अंत्यसंस्कारांसाठीं हिंडले घरीं परत आला. येतांना त्यानें आपली नवी पत्नीहि आणली. या घराचा नवा मालक या नात्यानें तो आतां हीथक्लिफचा सूड घेऊं लागला. त्याला नोकरासारखा वागवूं लागला. कॅथरीन आतां पिसाट, बेशिस्त व उच्छृंखल झाली. तिचा हीथक्लिफ याच्याविषयींचा जिव्हाळा चालूच होता.

एके रात्रीं ती व हीथक्लिफ अशीं दोघें आसपासचा ओसाड प्रदेश तुडवीत शेजारच्या लिंटन कुटुंबावर चोरून लक्ष ठेवायला गेलीं. तिथल्या कुत्र्यानें तिच्यावर हल्ला चढविला. तिला त्या लोकांनीं सोडवून घरांत नेलें आणि पुन्हां चालायला येईपर्यंत ती तिथेंच पांच दिवस पाहुणी म्हणून राहिली. अशा प्रकारें लिंटन पतिपत्नी व त्यांचीं दोन मुलें एडगर व इसाबेल्ला या शेतकरी कुटुंबाशीं तिची चांगलीच घसट झाली. यानंतर या लोकांचें तिच्या घरीं वारंवार येणेंजाणें चालू झालें. हिंडले याची वाईट वागणूक आणि एडगर व इसाबेल्ला यांची मग्रुरी हीं दोन्हीं सहन करावीं लागल्यामुळें हीथक्लिफ हेवेखोर व चिडचिड्या झाला. आपल्या रानटी व संतापी वृत्तीला अनुसरून त्यानें हिंडले याचा सूड उगविण्याची शपथ घेतली.

पुढच्या उन्हाळ्यांत हिंडले याची क्षयी पत्नी फ्रान्सेस ही बाळंतीण होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव हेअरटन ठेवलें. यानंतर लवकरच ती वारली. पत्नीवियोगाच्या दुःखामुळें हिंडले हताश, क्रूर व बेलगाम झाला. दरम्यान कॅथरीन व एडगर यांची गट्टी जमली. पण आपलें खरें प्रेम हीथक्लिफ याजवरच आहे हें आपल्या मनांतलें गुपित तिनें एलेन डीन या मोलकरणीला सांगितलें. पण त्या

निर्धन पोरक्या इसमाशीं लग्न करणें तिला कमीपणाचें वाटलें. हें बोलणें हीथक्लिफनें ओझरतें ऐकलें आणि त्याच रात्रीं तो तिथून जो नाहींसा झाला तो अनेक वर्षें परत आलाच नाहीं. एडगर व कॅथरीन यांचें लवकरच लग्न झालें आणि त्यांनीं आपलें बिऱ्हाड थाटलें व एलेन डीन हिला घरकामाला ठेवून दिलें. तिथें हीथक्लिफ परत येऊन त्यांच्या सुखांत व्यत्यय आणीपर्यंत हें जोडपें सुखांत राहिलें. तो परत आला तेव्हां त्याच्या चालचलणुकींत व चेहऱ्यामोहऱ्यांत खूपच सुधारणा झालेली होती. हिंडले यानें त्याला आपल्या घरीं राहायला बोलावलें. कारण पत्ते खेळायला व सहपान करायला त्याला हा जोडीदार ठीक दिसला; आणि याच्या मदतीनें आपली घसरती आर्थिक बाजू सांवरतां येईल असेंहि त्याला वाटलें.

आतां इसाबेल्ला हिला एकाएकीं हीथक्लिफविषयीं अनिवार्य आकर्षण वाटूं लागलें. तिचा भाऊ व भावजय यांनाहि याचें फार आश्चर्य वाटलें. एका रात्रीं एडगर व हीथक्लिफ गुद्दागुद्दीवर आले. त्यानंतर लवकरच इसाबेल्ला हिला घेऊन हीथक्लिफ पळून गेला. केवळ सूडबुद्धीनें व एडगरला चिडविण्यासाठीं त्यानें तिच्याशीं लग्न केलें हें उघडच दिसत होतें. कॅथरीनला दिवस गेलेले होते आणि तिला खूप ताप आला. पुढें इसाबेल्ला आपल्या पतीसह परत आली तेव्हां तिच्या भावानें तिला ओळख देण्याचें साफ नाकारलें. आपल्या मेव्हण्याला आपल्या घराची पायरी चढायला मनाई केली. असें असूनहि हीथक्लिफनें चोरून कॅथरीनची एकांतांत शेवटची भेट घेतली. या भेटीचा अंशतः परिणाम म्हणून कॅथरीन दिवस पूर्ण भरायच्या आधींच बाळंतीण झाली आणि त्यानंतर कांहीं तासांनीं तिला मृत्यु आला. तिला मुलगी झालेली होती व या मुलीचें नांव कॅथरीन लिंटन असें ठेवलें.

दरम्यान इसाबेल्ला हिला आपलें हीथक्लिफच्या सहवासांतील जीवन असह्य झालें. त्याला सोडून ती लंडनला गेली. तिथें कांहीं महिन्यांनीं ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव लिंटन ठेवलें. हिंडले याच्या मृत्यूनंतर पाहुणा हीथक्लिफ हाच आतां 'वुदरिंग हाइट्स' चा मालक झाला. कारण ही सगळीं इस्टेट त्याच्याकडे अगोदरच गहाण पडलेली होती. खरा वारस हेअरटन याच्यावर आतां आपल्या वडिलांच्या वैऱ्याचा आश्रित होण्याची पाळी आली.

पतीला सोडून दिल्यानंतर बारा वर्षांनीं इसाबेल्ला वारली आणि तिच्या भावानें आपला रोगिष्ट भाचा आपल्या घरीं आणला. आपला मुलगा तिकडे

आल्याची बातमी हीथक्लिफला लवकरच कळली. त्यानें आपला मुलगा आपल्याकडे राहायला आला पाहिजे अशी लिंटनकडे मागणी केली. धाकटी कॅथरीन एके दिवशीं वुदरिंग हाइट्सला गेली आणि तिथें ती आपल्या मामेभावाला भेटली. तिच्या वडिलांनीं तिथें कोण कोण राहतात याचा तिला पत्ता लागूं नये अशी व्यवस्था केलेली होती. कारण कॅथी व लिंटन यांचें लग्न व्हावें अशी आपली इच्छा असल्याचें हीथक्लिफ सगळ्यांना सांगत असे. आणि ही इच्छा त्यानें पूर्ण करून घेतली. एडगर खूप आजारी असल्याची संधी साधून त्यानें कॅथीला तिच्या अतिशय आजारी मामेभावाच्या भेटीला म्हणून बोलावून घेतलें. ती आल्यावर त्यानें तिला पांच दिवस कोंडून ठेवलें आणि तिचें तिच्या रोगिष्ट मामेभावाशीं सक्तीनें लग्न लावून मगच तिला आपल्या वडिलांना भेटायला परत जाऊं दिलें. वडिलांच्या मृत्यूपूर्वी तिला त्यांच्याकडे परत जातां आलें तरी त्यांच्या मृत्युपत्रांत बदल करून घ्यायला पुरेसा अवधि तिला मिळाला नाहीं. अशा प्रकारें तिच्या वडिलांची इस्टेट देखील अप्रत्यक्षपणें हीथक्लीफ याच्याच ताब्यांत गेली. त्यानंतर लवकरच अशक्त रोगिष्ट लिंटन वारला आणि विधवा कॅथी अशा प्रकारें आपला सासरा हीथक्लिफ याची आश्रित झाली.

वुदरिंग हाइट्स अगर तिथलीं माणसें यांच्याकडे पुन्हां न जातांच लॉकवुड वसंत ऋतूमध्यें लंडनला परतला. पुढच्या पावसाळ्यांत त्या भागांतून प्रवास करीत असतांना त्याला तें स्थळ पुन्हां पाहून घ्यावें असें वाटलें. आतां कॅथरीन व हेअरटन हीं दोघें तिथलीं मालक झालीं आहेत असें त्याला आढळून आलें. तीन महिन्यांपूर्वी हीथक्लिफ कसा मेला याची हकीकत त्याला एलेन डीन हिच्याकडून कळली. चार दिवस तो मुद्दाम उपाशी राहिला होता. तरुण कॅथरीन अर्नशॉ हिच्या आठवणींनीं तो बेजार झालेला होता. तशा भग्नहृदय अवस्थेंतच त्याला मरण आलें. त्याच्या मृत्यूमुळें कॅथरीन व हेअरटन यांना त्याच्या जुलुमांतून मुक्तता लाभली. त्या अडाणी मुलाला ती आतां वाचायला शिकवीत होती आणि त्याची उद्धट वागणूक सुधारण्याचा प्रयत्न करीत होती.

हीथक्लिफचें थडगें पाहायला लॉकवुड जाऊन आला. मध्यें कॅथरीन अर्नशॉ, एका बाजूला तिचा पति व दुसऱ्या बाजूला हीथक्लिफ, अशीं हीं थडगीं होती. प्रत्येकावर एकेक स्मारक-शिला होती. कॅथरीनची शिळा हवेमुळें काळवंडलेली व अर्धवट मातींत बुजलेली होती. एडगरची शिळा अंशतः

शेवाळलेली होती. हीथक्लिफची शिळा मात्र अजून साफ होती. हे लोक आपापलें वादळीं, तामसी जीवन जगल्यानंतर आतां तिथें अस्वस्थपणेंच झोंपलेले होते अशी दंतकथा आसपासच्या खेडेविभागांत पसरलेली होती. कित्येक वर्षांपूर्वी कॅथरीन व हीथक्लिफ हीं दोघें तिथल्या अंधारमय ओसाडींतून जशीं भटकत असत, तशीं अजूनहि भटकतांना आपल्याला दिसतात असा तिथल्या धनगरांचा आणि तिकडून रात्रीं प्रवास करणाऱ्या लोकांचा दावा होता.

ॲ रो स्मि थ

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* सिंक्लेअर ल्यूइस (१८८५-१९५१). *कथानकाचा प्रकार :* सामाजिक टीका. *काळ :* विसाव्या शतकाचीं आरंभींचीं वर्षें. *स्थळ :* उत्तर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें आणि वेस्ट इंडीज. *प्रथम प्रकाशन :* १९२४.

प्रमुख पात्रें : **मार्टिन ॲरोस्मिथ**, एक वैद्यकशास्त्रीय संशोधक. **लेओरा**, त्याची पत्नी. **डॉ. मॅक्स गॉटलिएब**, एक वैज्ञानिक. **गुश्ताव सॉन्डेलिउस**, एक वैज्ञानिक. **टेरी रिकेट**, मार्टिन याचा मित्र. **जॉइस लॅन्यॉन**, एक तरुण विधवा. **डॉ. आल्मुस पिकरबॉघ**, सार्वजनिक आरोग्य सुधारणेचा पुरस्कर्ता.

समीक्षण : अमेरिकन जीवनामधील अपुरेपणा व आत्मसंतुष्टता यांचें दिग्दर्शन करण्याच्या हेतूनें सिंक्लेअर ल्यूइस यानें ज्या कादंबऱ्या लिहिल्या, त्यापैकींच प्रस्तुत 'ॲरोस्मिथ' ही कादंबरी. लेखकाच्या 'बॅबिट' या कादंबरीनें अमेरिकन धंदेवाल्यांच्या बाबतींत जी कामगिरी बजाविली तीच कामगिरी अमेरिकन डॉक्टरांच्या बाबतींत 'ॲरोस्मिथ' या कादंबरीनें बजावावी असा त्याचा हेतु होता. वैद्यक-व्यावसायिकानें मानवजातीची सेवा करण्याचा एकमेव सभ्य मार्ग म्हणजे संशोधन हाच होय असा संदेश या कादंबरींत अभिप्रेत असलेला दिसतो. खासगी व्यवसायांत पुरोगामी डॉक्टराच्या गुणांची कदर होत नाहीं; सार्वजनिक आरोग्याचें क्षेत्र राजकीय भ्रष्टाचारानें बरबटलेलें असतें; फॅशनेबल खासगी इस्पितळ ही बहुधा व्यापारी कंपनी असते; संशोधनाला वाहिलेल्या उत्तमोत्तम संस्था देखील मुख्यत्वेंकरून प्रसिद्धीच्या मागें लागलेल्या असतात;—या गोष्टींचें

दर्शन घडविण्याचा प्रयत्न लेखकानें मार्टिन ॲरोस्मिथ या पात्राचें उदाहरण योजून केलेला आहे.

कथानक: ओहिओ राज्याच्या ओसाडींत वस्ती करायला गेलेल्या आद्य घराण्यांतला मार्टिन ॲरोस्मिथ हा वंशज. तो लहानाचा मोठा झाला एल्क मिल्स या गांवीं. विन्नेमॅक राज्यांतील या गांवांतल्या घरांचें बांधकाम ओबडधोबड व लाल विटांचें होतें. लहानपणीं ॲरोस्मिथ एकलकोंडा व चळवळ्या वृत्तीचा होता. त्याचा बहुतेक रिकामा वेळ वयोवृद्ध डॉक्टर व्हिकर्सन यांच्या दवाखान्यांत खर्ची पडे. हा खेड्यांतला डॉक्टर विधुर होता. त्याचें घरचें असें कुणीच नव्हतें. मार्टिनला वैद्यकव्यवसायाची गोडी लागली आणि तिला त्यानें उत्तेजन दिलें. वयाच्या एकविसाव्या वर्षी विनेमॅक विद्यापीठाच्या वैद्यकीय शाळेंत प्रवेश मिळवायची तयारी मार्टिन करीत होता. तिथें अभ्यास करीत असतांना सूक्ष्मजंतु-विज्ञान, संशोधन, आणि नामांकित जर्मन वैज्ञानिक प्रोफेसर मॅक्स गॉटलिएब यांचीं व्याख्यानें, या विषयांची त्याला सगळ्यांत जास्त गोडी लागली. या वैद्यकीय शाळेंत दाखल झाल्यावर त्याची अनेकांशीं मैत्री जमली आणि ती आजन्म टिकली. याच मुदतींत मादेलीन फॉक्स या विद्यार्थिनीशीं त्याचें प्रेमहि जमलें. इंग्रजीच्या पदवी परीक्षेचा अभ्यास करणारी ही तरुणी उथळ असून बुद्धिजीवीपणाचा उगाच आव आणीत असे. पश्चिमेकडील मागासलेल्या प्रदेशांतल्या त्या तरुणाला मात्र मादेलीन ही सुसंस्कृत स्त्रीजातीची प्रतिनिधी आहे असें वाटलें. त्यांचा वाङ्निश्चय ठरला.

मार्टिन प्रयोगशाळेमध्यें रात्रींमागून रात्री संशोधनकार्यांत घालवी. प्रो. गॉटलिएब यांचा तो आवडता विद्यार्थी झाला. एके दिवशीं प्रोफेसर मजकुरांनी त्याला एका विशेष कामासाठी झेनिथ सिटी हॉस्पिटलमध्ये पाठविलें. त्या ठिकाणीं लेओरा टोझर या आकर्षक नर्सची व त्याची गांठ पडली. लवकरच ती त्याला इतकी आवडूं लागली कीं तिच्याशींहि त्यानें वाङ्निश्चय करून टाकला. अशा प्रकारें तरुण मार्टिन ॲरोस्मिथ महाशय एकाच वेळीं दोन वाग्दत्त वधूंचे वर होऊन बसले. या दोघींपैकीं कोण निवडावी हें त्याला ठरवितां येईना. म्हणून त्यानें त्या दोघींनाहि आपल्याबरोबर खान्याला बोलावलें. आपली अडचण त्यानें दोघींपुढें निवेदन केली. तें ऐकतांच मादेलिन तावातावानें भरल्या ताटावरून व मार्टिनच्या आयुष्यांतूनहि कायमची निघून गेली. लेओराला त्या

प्रकाराची गंमत वाटली. ती जेवायला राहिली. आतां आपल्या आयुष्याला खरी सुरवात झाली असें मार्टिनला वाटलें.

प्रो. गॉटलिएब यांच्या मैत्रीमुळें मार्टिनला सूक्ष्मजंतु-विज्ञानाची फेलोशिप मिळाली. नॉर्थ डाकोटा राज्यांतून लेओराला घरचें बोलावणे आलें. तिची गैरहजेरी, डीनसाहेबांशीं झालेल्या कटकटी आणि व्हिस्कीपानाचा अतिरेक, या कारणांपायीं नाताळच्या सुटींत त्यानें त्या नोकरीला रामराम ठोकला. एखाद्या भटक्याप्रमाणे मजल दर मजल, प्रवास करीत तो व्हिटसिल्व्हानिया या गांवीं जाऊन पोंचला. हेंच लेओराचें गांव. तिच्या घरच्या निर्बुद्ध लोकांनीं दिलेल्या प्रतिकूल इशाऱ्यांना न जुमानता दोघांनीं आपलें लग्न उरकून घेतलें. लग्नानंतर मार्टिन एकटाच विनेमॅकला परत गेला. आतां तो संसारी माणूस झाला; म्हणून सूक्ष्मजंतु-विज्ञानक्षेत्रांतील कामगिरी सोडून देऊन सर्वसाधारण वैद्यकीय व्यवसायाच्या अभ्यासाकडे लक्ष देऊं लागला. मागाहून मोहॅलिस गांवीं लेओरा त्याला येऊन मिळाली.

इस्पितळांतील नोकरीची मुदत संपल्यावर मार्टिननें पत्नीच्या माहेरून पैसे घेऊन व्हिटसिल्व्हानिया येथें प्रॅक्टिस सुरू केली. पश्चिमेकडील गवती मैदानांच्या प्रदेशांतील त्या लहानग्या गांवीं मार्टिननें मित्र जोडले खरे पण त्याच्या सासुरवाडींतील लोकांच्या मतें ते मैत्री करायला लायक नव्हते. कसें का असेना, डॉक्टर या नात्यानें तो बराच यशस्वी होत होता. त्यानें अनेकांशीं शत्रुत्वहि संपादन केलें. दरम्यान सासुरवाडच्या घरांतील बिऱ्हाड हालवून तो सपत्नीक स्वतःच्या वेगळ्या घरीं राहायला गेला. लेओराचें पहिलें बाळंतपण झालें. मूल मृतावस्थेंतच निपजलें. आपल्या नशिबीं दुसरें मूल नाहीं हें त्यांना त्याच वेळीं समजून चुकलें.

मार्टिन पुन्हां संशोधन कार्यामध्यें लक्ष घालूं लागला. सुप्रसिद्ध स्वीडिश वैज्ञानिक गुस्ताव सॉंडेलिउस यांचें व्याख्यान मिनिॲापोलिस येथें होणार आहे असें कानांवर येतांच तो हें व्याख्यान ऐकायला गेला. त्या मार्गानें रोगनियंत्रणाचें साधन या दृष्टीनें सार्वजनिक आरोग्याकडे त्याचें लक्ष वळलें. सॉंडेलिउस साहेबांचा प्रभाव आपल्या मनावर तसाच राहूं देऊन तो व्हिट्सिल्व्हानियाला परतला, आणि तेथील सार्वजनिक आरोग्यखात्याचा हंगामी प्रमुख झाला. या अधिकारपदावर असतांना त्याला सर्वसाधारणपणें लोकांची अप्रियता पतकरावी

लागली आणि याला जें कारण घडलें तें असें : विशेष आदरणीय अशी एक शिंपीण विषमज्वराचा संसर्ग अजाणतेपणीं सतत पसरवीत आहे असें त्याला आढळून आलें; म्हणून तिला त्यानें तिच्या खेड्यांतील घरीं अलग राहायला धाडून दिलें. येवढ्यांत त्याला बऱ्याच वाढत्या पगाराची एक नवी नोकरी सांगून आली. आयोवा राज्यांतील नॉटिलस गांवचे डॉ. आल्मुस पिकरबॉग यांच्या हाताखालीं सार्वजनिक आरोग्यखात्याच्या असिस्टंट डायरेक्टरची ही जागा होती. ही संधि त्यानें साधून घेतली.

डॉ. पिकरबॉग हे समाजकार्याविषयीं आस्था बाळगणारे महान परोपकारी गृहस्थ असले तरी त्यांना वैद्यकीय ज्ञान जवळ जवळ मुळींच नाहीं, आणि रोगराईचें नियंत्रण शास्त्रीय पद्धतीनुसार करण्याच्या कार्यांत तर त्यांना मुळींच गोडी वाटत नाहीं असें नॉटिलस मुक्कामीं त्याला दिसून आलें. डायरेक्टर महाशयांचा सगळा वेळ, आरोग्यविषयक घोषवाक्यांना ओबडधोबड काव्य-पंक्तीचें रूप देणें, क्लबांतून व्याख्यानें देणें आणि ‘ गुटगुटीत बालक सप्ताह ’ ‘ दारूबंदी सप्ताह ’ ‘ वज्रदंत सप्ताह ’ असल्या सप्ताहांच्या मोहिमा काढून आरोग्यप्रचार करणें,—यांतच खर्च होत असे. आपल्या वरिष्ठाच्या असल्या कृत्रिम व भपकेबाज पद्धतींचा हळूहळू मार्टिनवरहि प्रभाव पडूं लागला. थोडासा वेळ संशोधन कार्यांत खर्च करण्याचा तो प्रयत्न करी खरा; तथापि नोकरीच्या कामांतच आपला सगळा वेळ जातो हें त्याच्या अनुभवास येऊं लागलें. इकडे डॉ. पिकरबॉगसाहेब लोकसभेच्या निवडणूक मोहिमेंत गुंतले आणि त्याच काळांत मार्टिननें गांवांतल्या अत्यंत स्वच्छ व कार्यक्षम अशा दूधवाडीची कसून तपासणी केली. गाईच्या आचळांमध्यें निर्माण झालेल्या स्ट्रेप्टोकॉकस जंतूंच्या संसर्गाद्वारां या दूधवाडींत रोगाचा प्रसार होत आहे असा त्याला पत्ता लागला. डॉ. पिकरबॉग यांचा सल्ला न जुमानतां त्यानें ती दूधवाडी बंद करून टाकली आणि या गोष्टीपायीं त्यानें अनेकांचें शत्रुत्व पतकरलें. इतकें होऊनहि, कांहीं दिवसांनीं जेव्हां डॉ. पिकरबॉग लोकसभेवर निवडून गेले तेव्हां त्यांच्या रिकाम्या जागीं हंगामी पब्लिक हेल्थ डायरेक्टर म्हणून मार्टिनचीच नेमणूक झाली.

या नव्या नेमणुकीनंतर आपल्याला सूक्ष्मजंतु-विज्ञानाचें संशोधन करण्यासाठीं अधिक वेळ मिळावा म्हणून मार्टिननें एका कार्यक्षम डॉक्टरची

आपल्या हाताखालीं नेमणूक केली. गांवांतली एक चाळ क्षयरोगाच्या जंतूंनीं ग्रासलेली पाहून ती त्यानें जाळून टाकायला लावली. बहुतेक याच कारणास्तव मार्टिनला राजीनामा द्यायला सांगण्यांत आलें. यापुढील एक वर्ष त्यानें शिकागो येथील राउन्सफील्ड क्लिनिक या भपकेबाज दवाखान्याचा पगारी पॅथॉलॉजिस्ट म्हणून काम केलें. मग त्याचा एक शास्त्रीय संशोधनात्मक लेख प्रसिद्ध झालेला वाचून त्याचे स्नेही व गुरुवर्य प्रो. मॅक्स गॉटलिएब यांचें पुन्हां त्याच्याकडे लक्ष वेधलें. त्या वेळीं ते न्यूयॉर्क शहरांतील मॅकगुर्क इन्स्टिटयूटमध्यें होते. त्यांनीं त्याला एक अधिकारपद देऊं केलें. त्यानें तें आनंदानें स्वीकारलें.

मॅकगुर्क इन्स्टिटयूटमध्यें त्यानें स्वतःला सगळा वेळ संशोधनाला वाहून घेतलें. या कामीं त्याला सतत सल्ला व मित्रत्वाचें उत्तेजन त्याच्या गुरुजींकडून मिळालें. स्टॅफिलोकॉकस या सूक्ष्म जंतूंचें त्यानें संशोधन केलें. प्रथम त्यानें या सूक्ष्म जंतूंना मारक असें रसायन शोधून काढलें आणि मागाहून त्यांना नष्ट करणारें औषध तयार केलें. त्याचे गुरुजी गॉटलिएब व या संस्थेंतील त्याचा सहकारी टेरी विकेट या उभयतांच्या प्रेरणेनें त्यानें रोग बरे करण्यासाठीं उपचार म्हणून उपयोगी पडणारें एक सूक्ष्मजंतु-संसर्गयुक्त औषध शोधून काढलें. या औषधाला त्यानें "क्ष-तत्त्व" असें नांव दिलें. या नवीन शोधाचें मूल्य आपल्याला निर्विवाद पटेपर्यंत याची प्रसिद्धि लांबणीवर टाकावी असें त्याला वाटत असलें तरी त्यानें आपल्या संशोधनाचें हें फलित ताबडतोब जाहीर करावें असा संस्थेच्या प्रमुखांनीं आग्रह धरला. परंतु त्याचा हा लेख लिहून पूर्ण होण्यापूर्वींच असा पत्ता लागला कीं या क्ष-तत्त्वाचा शोध पाश्चर इन्स्टिटयूटमध्यें बॅक्टेरिओ-फाज या नांवानें आधींच लागलेला आहे. हा असा विरस झाल्यानंतर त्याच नव्या प्रतिबंधक 'फाज' साधनाच्या आधारें गांठींचा प्लेग बरा करणें व त्या सांथीचा प्रतिबंध करणें कितपत शक्य आहे याचें संशोधन त्यानें आरंभलें.

दरम्यान गुस्ताव सॅाडेलिउसची स्वारी मॅकगुर्क इन्स्टिटयूटमध्यें दाखल झाली. मार्टिनच्या संशोधन कार्यांत सॅाडेलिउसला इतका रस निर्माण झाला कीं आपला बहुतेक वेळ तो आपला तरुण मित्र मार्टिन याला मदत करण्यांतच घालवूं लागला. त्याच सुमाराला वेस्ट इंडीज बेटांपैकीं सेंट हयूबर्ट या बेटावर प्लेगची सांथ उद्भवली. त्या सांथीविरुद्ध चाललेल्या लढ्यांत मदत करण्यासाठीं मार्टिन व सॅाडेलिउस

यांना तिकडे जाण्यास सांगण्यांत आलें. लेओराला घेऊन ते दोघे सेंट ह्यूबर्ट बेटाकडे बोटीनें रवाना झाले. जाण्यापूर्वी गॉटलिएबसाहेबांना मार्टिननें असें अभिवचन दिलें कीं आपण प्लेगच्या कांहीं केसींवर 'फाज' हा इलाज करण्याचें मुद्दाम नाकारून आपला प्रयोग चालू ठेवूं, म्हणजे या इलाजाचे परिणाम तुलनात्मक नोंद करून अजमावतां येतील.

उष्णकटिबंधांतील या बेटावर प्लेगची सांथ रोजच्या रोज वाढत चालली. सॅंडेलिउसला प्लेग होऊन तो मेला. या खेड्याकडून त्या खेड्याकडे भटकत असल्यामुळें मार्टिन आपल्या प्रयोगशाळेपासून बहुधा दूर दूरच असे. त्याच्या अशाच एका भ्रमंतीच्या काळांत लेओरानें त्याच्या प्रयोगशाळेंत टेबलावर पडलेली एक अर्धवट ओढलेली सिगरेट शिलगावली. पालथ्या झालेल्या प्रयोगनलिकेंतील जंतूंनीं त्या सिगरेटींतील तंबाखू भिजलेली होती. मार्टिन परतण्यापूर्वींच ती प्लेगनें मरण पावली.

मार्टिनला आपल्या निर्भेळ वैज्ञानिकाच्या भूमिकेचा विसर पडला. ज्यांनीं ज्यांनीं त्याचें औषध मागितलें त्यांना त्यांना त्यानें तें उपचारार्थ देऊन टाकलें. त्याच्या हाताखालच्या डॉक्टरनें संशोधनार्थ टिपणें करणें जरी चालूं ठेवलें, तरी मार्टिनला त्या निष्कर्षांमध्यें अतःपर गोडीच राहिली नाहीं. प्लेग ओसरूं लागल्यावर तो न्यूयॉर्कला परतला. तिथें एकाकी सुखहीन स्थितींत त्यानें जॉइस लॅन्यॉन ह्या श्रीमंत तरुण विधवेशीं लग्न केलें. हिच्याशीं त्याची ओळख सेंट ह्यूबर्ट बेटावरच झालेली होती. तथापि हें लग्न अपेशी ठरलें. आपल्या संशोधनांतून तिच्यासाठीं तो खुषीनें जेवढा वेळ देई, त्याच्यापेक्षां अधिक वेळाची ती मागणी करी; तिच्या धनाढ्य आणि फॅशनेबल मित्र-मैत्रिणींच्या सहवासांत त्याला अवघडल्यासारखें होई. मॅकगुर्क इन्स्टिटयूटनें त्याला असिस्टंट डायरेक्टरपद देऊं केलें, पण तें त्यानें नाकारलें. जॉइसच्या निषेधप्रदर्शनाला न जुमानतां तो व्हेरमॉंट येथील ग्रामीण प्रयोगशाळेंत आपला जुना मित्र टेरी विकेट याचा सहकारी म्हणून काम करायला निघून गेला. तिथेंच न्युमोनिया बरा करणारें औषध शोधून काढायचा प्रयोग करायचा असा दोघांचा बेत होता. शेवटीं त्याला एकदांचें वाटलें कीं आपलें कार्य—आपलें जीवन —आतां खरोखरी सुरू झालें.

ॲज यू लाइक इट : ज्याला जसें हवें तसें !

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* विल्यम शेक्स्पियर (१५६४-१६१६). *कथानकाचा प्रकार :* मेंढपाळ जीवनांतील अद्भुतरम्य कथा. *काळ :* मध्य-युग. *स्थळ :* मध्ययुगीन फ्रान्समधील आर्डेनचें अरण्य. *पहिला प्रयोग :* (अंदाजें) १६००.

प्रमुख पात्रें : **हद्दपार झालेला ड्यूक. फ्रेडरिक,** त्याचें राज्य बळकावणारा त्याचा भाऊ. **ऑलिव्हर,** सर रोलाँ द ब्वा याचा ज्येष्ठ पुत्र. **ऑरलँडो,** सर रोलाँ द ब्वा याचा कनिष्ठ पुत्र. **ॲडम,** ऑलिव्हरचा नोकर. **टचस्टोन,** खुषमस्कऱ्या. **रोझॅलिंड,** हद्दपार ड्यूकची कन्या. **सेलिया,** फ्रेडरिक याची कन्या.

समीक्षण : थॉमस लॉज याच्या ' रोझॅलिन ' या तत्कालीन लोकप्रिय कादंबरीवरूनच शेक्स्पियरनें या नाटकाचें बहुतेक कथानक उचललें आहे. त्यांतील त्याची भर म्हणजे नाट्यात्मक स्वभावचित्रण व कोटिबाज भाषा. ' ॲज यू लाइक इट ' हें सुखपर्यवसायी नाटक अनेक घटक तत्वांचें संमिश्रण आहे. तथापि या सगळ्या नाटकाला शेक्स्पियरच्या अत्यंत सुंदर काव्य-रचनेची साथ लाभलेली आहे. प्रेमळपणा, दोस्ती व सद्भावना हीं या नाटकाचीं घटक तत्वें आहेत आणि तीं केवढ्या महान मोलाचीं आहेत याचें दर्शन शेक्स्पियर या नाटकांत घडवितो.

कथानक : बऱ्याच काळापूर्वी फ्रान्समधील एका सुभ्याच्या ज्येष्ठ व कायदेशीर सुभेदाराला त्याचा कनिष्ठ भाऊ फ्रेडरिक यानें पदच्युत केलें. राज्यांतून हद्दपार केलेला हा वृद्ध ड्यूक अनेक इमानी अनुयायांसह आर्डेनच्या अरण्याकडे पळाला. तिथें तो सुखांत राहिला. दरबारी जीवनाच्या चिंतेंतून मुक्त झालेला असल्यामुळें त्याला निसर्गाच्या ज्ञानसाधनेला स्वतःला वाहून घेतां आलें. त्याची कन्या रोझॅलिंड ही मात्र आपल्या वडिलांचें राज्य बळकावून बसलेला आपला काका ड्यूक फ्रेडरिक याची कन्या सेलिया हिची सहचरी म्हणून काकाकडेच राहिली. या दोघी मुलींना एकमेकींशिवाय मुळींच करमत नसे. वडिलांनीं कांहींहि म्हटलें वा केलें तरी सेलिया आपल्या अत्यंत प्रिय सखीपासून ताटातूट करून घ्यायला तयार झाली नाहीं.

एके दिवशीं ड्यूक फ्रेडरिक यानें या मुलींना एक कुस्तीचा सामना बघायला जाण्याचा आदेश दिला. ड्यूकचा पठ्ठा चार्ल्स आणि ड्यूक ज्याला

सिंहिणीला ठार केलें. त्या झटापटींत खुद्द त्यालाच त्या सिंहिणीनें जखमी केलें. ओरलँडोनें आपल्याला मृत्यूच्या दाढेंतून वांचविलें म्हणून ऑलिव्हरला कृतकर्मांचा पश्चाताप झाला, आणि भाऊभाऊ पुन्हां आनंदानें एक झाले.

जखमेंतील फाजील रक्तस्रावामुळें ओरलँडोला फार अशक्तपणा आला आणि तो गनिमीडकडे जाऊं शकला नाहीं. आपल्या जखमी अवस्थेची निशाणी म्हणून त्यानें रक्तांत भिजलेला रुमाल देऊन ऑलिव्हरला आपल्याऐवजीं पुढें धाडलें. हातरुमाल पाहतांक्षणींच तो तोतया धनगर गनिमीड तत्काळ मूर्च्छित झाला. आपल्या भावाविषयींची ऑलिव्हरची आस्था बघून धनगरणीच्या वेषांतली सेलिया इतकी प्रभावित झाली कीं तिचें त्याच्यावर प्रेम बसलें आणि दुसऱ्या दिवशीं आपण लग्न करायचें असें त्या दोघांनीं ठरविलें. ओरलँडोला या बातमीनें येवढा हादरा दिला कीं त्याला थोडासा हेवाहि वाटूं लागला. पण गनिमीड जेव्हां त्याला भेटायला आला, तेव्हां त्या तरुण धनगरानें खुद्द लेडी रोझॅलिंड हिलाच दुसऱ्या दिवशीं हजर करण्याचें त्याला वचन दिलें. दरम्यान फीबी आपल्या तीव्र प्रेमभावनेचें पुनर्निवेदन करायला गनिमीडकडे आली आणि त्यानें सगळ्यांच्या हृदयांची गुंतागुंत आपण उद्यां उकलून दाखवूं असें अभिवचन दिलें.

दरम्यान आपली कन्या सेलिया ही पळून गेल्यामुळें संतापलेला फ्रेडरिक आपल्या ज्येष्ठ भावाला पकडण्याचा व त्याला त्याच्या सगळ्या अनुयायांसह ठार करण्याचा बेत करून मोहिमेवर निघाला. तथापि आर्डेनच्या अरण्या जवळपास त्याला एक म्हातारा महंत भेटला आणि त्यानें फ्रेडरिकला त्या दुष्ट बेतापासून परावृत्त केलें. दुसऱ्या दिवशीं, गनिमीडनें दिलेल्या वचनानुसार हद्दपार ड्यूक व त्याचे सारे अनुयायी या पाहुण्यांच्या समक्ष रोझॅलिंड स्वतः हजर झाली आणि तिनें आपण व सेलिया अशा दोघी अनुक्रमें धनगर गनीमीड व त्याची बहीण ॲलियाना या बनावट रूपांत कशा वावरलों याचा खुलासा केला. त्या दिवशीं चार लग्नें मोठ्या आनंदांत पार पडलीं. ओरलँडो-रोझॅलिंड, ऑलिव्हर-सेलिया, सिल्व्हियस-फीबी आणि टचस्टोन-ऑड्री. यांत भरीला भर म्हणजे महंताच्या उपदेशानें फ्रेडरिकचें येवढें संपूर्ण हृदयपरिवर्तन झालें कीं सर्वसंगपरित्याग करून जोगी होऊन मठवास करण्याचें त्यानें ठरविलें आणि तिथूनच आर्डेनच्या अरण्याकडे जासूद पाठवून आपल्या ज्येष्ठ भावाचा व त्याच्या सगळ्या अनुयायांचा जमीन जुमला त्यांचा त्यांना परत देऊन टाकला.

भारतीय ग्रंथ भवन

जगप्रसिद्ध अशा ७६० लेखकांच्या (यांत २१ लेखक ' नोबेल प्राइझ ' विजेते आहेत) उत्कृष्ट अशा १६०० कलाकृतींचा साराशरूप परिचय **अमर विश्व साहित्य** मालेंतून क्रमशः आपणांस सादर होईल.

या निवडक कलाकृतींत कादंबरी, कथा, नाटक, काव्य, चरित्र, इतिहास, तत्वज्ञान, प्रवास, निबंध, लोककथा इत्यादि सर्व साहित्य-प्रकार आढळतील.

प्रस्तुत दुसऱ्या भागांत फोरसाइट सागा, मादाम बाव्हरी, मोबी डिक, रॉबिन्सन क्रूसो, टेस, वॉर अँड पीस इत्यादि दहा इंग्लिश, सात अमेरिकन, दोन फ्रेंच व एक रशियन मिळून वीस कादंबऱ्या आणि एक इंग्लिश नाटक अशा एकवीस जगप्रसिद्ध ग्रंथांचे सारांश दिले आहेत.



मूल्य रु. ३-५०